**सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी**

**पृ.शी.**: स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक

L.C. BILL NO. VII OF 2012

( A BILL TO MAKE PROVISIONS TO ESTABLISH A NEW SCHOOL INCLUDING PROVISION FOR UP-GRADATION OF EXISTING SCHOOL ON SELF-FINANCED BASIS, TO MAKE SUITABLE PROVISIONS WITH REGARD TO REQUIREMENTS AND NORMS FOR ESTABLISHING SUCH NEW SCHOOL OR UP-GRADATION OF EXISTING SCHOOL, FOR CREATING AN ENDOWMENT FUND AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.) AS AMENDED BY JOINT SELECT COMMITTEE.

श्री.राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने संयुक्त समितीच्या प्रतिवृत्तानुसार असलेले सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक 7 - स्वयं अर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासह विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी आणि प्रमाणके ठरविणे, दाननिधी निर्माण करणे यांकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी योग्य त्या तरतुदी करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्यात आलेला आहे. त्या अहवालात ज्या गोष्टींचा विचार केला गेला आहे ते या विधेयकामध्ये अंतर्भूत केले आहे काय ? मी समितीचा अहवाल आणि विधेयक या दोन्हींचा अभ्यास केलेला आहे. अहवालातील खंड 5 मध्ये नमूद करण्यात आले आहे की, "नोंदणीकृत न्यास किंवा नोंदणीकृत संस्था किंवा नोंदणीकृत कंपनी किंवा स्थानिक प्राधिकरण." मूळ विधेयकामध्ये यातील कुठल्याही गोष्टींचा उल्लेख नाही. त्यामुळे अहवालातील तरतूद आणि विधेयकातील तरतूद वेगळी आहे. संयुक्त समितीमध्ये ज्या गोष्टी ठरल्या होत्या त्यांचा अंतर्भाव आपण यात केला पाहिजे. येथे वेगवेगळ्या गोष्टी नमूद केलेल्या आहेत.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या निदर्शनास आणून देतो की, कंसात दाखविलेले शब्द वगळण्यात आलेले आहेत. त्यानुसार यातील नोंदणीकृत शब्द वगळलेला आहे. त्यामुळेच तो कंसात दाखविलेला आहे. अधोरेखित केलेला शब्द हा संयुक्त समितीने सुचविलेला आहे.

श्री.विनोद तावडे : ठीक आहे.

श्री.राजेंद्र दर्डा : या शिवाय अधिकचा खुलासा मी माझ्या उत्तराच्या भाषणात करतो.

श्री.विनोद तावडे : ठीक आहे.

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक 7 - महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक यावरील संयुक्त समितीने मांडलेल्या अहवालावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, अत्यंत महत्त्वाचे आणि राज्यातील शिक्षण क्षेत्राला वेगळे वळण देणारे हे बिल आहे म्हणून त्याचा गांभीर्याने विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. हे बिल जेव्हा मांडले तेव्हा माझा या बिलाला विरोध होता. पण समितीने प्रदीर्घकाळ बैठका घेऊन या बिलातील तरतुदींना सुधारणा सुचवल्या आहेत. त्या सुधारणांचे स्वागत केले पाहिजे. मी पूर्णत: नाही पण अंशत: त्याचे स्वागत करतो. कारण कोणतीही सुधारणा वेगाने होऊ शकत नाही, याचे भान राखले गेले पाहिजे. शासनावर किंवा माननीय शिक्षण मंत्र्यांवर रेटा होता की, अनेक मराठी शाळा मान्यतेसाठी प्रतीक्षेत आहेत. स्पर्धा वाढते म्हणून त्यांना मान्यता देणे खूप अडचणीचे होते. त्यांना एक मार्ग मोकळा करून देण्याचा प्रयत्न या विधेयकाच्या माध्यमातून होत आहे. तो करत असताना शिक्षणाच्या व्यापारीकरणाला, शिक्षणाच्या बाजारीकरणाला आणि खाजगीकरणाला एक नवा रस्ता मोकळा होऊ नये यासाठी दक्षता घेणे अत्यंत आवश्यक होते. मी याचे अंशत: स्वागत याचसाठी करतो की, आधीच्या विधेयकामध्ये जो रस्ता मोकळा होता तो किमान अरूंद करण्याचे काम या सुधारणांनी नक्कीच झालेले आहे. म्हणून त्याचे स्वागत केले पाहिजे.

मराठी शाळांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब आग्रही होते. त्यांना स्वत:चे वेगळे प्रयोग राबवायचे आहेत. शासनाच्या नेहमीच्या चौकटीच्या बाहेर जायचे आहे. स्वत:च्या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

18-12-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 3

BGO/ D/ KTG/ 10:30

श्री.कपिल पाटील....

स्रोतांचा आधार घेऊन शाळा चालवायच्या आहेत. त्यांना मराठी, हिंदी किंवा अन्य भाषिक शाळा चालविण्यासाठी एक रस्ता मोकळा झालेला आहे. हे प्रयोग करीत असताना, स्वत:चे रिसोर्सेस उभे करीत असताना या शाळा घटनेची, राज्याची चौकट मोडून येता कामा नये. त्याची दक्षता आपण घेतली आहे आणि मी त्याचे स्वागत करतो. येथे तीन चौकटीचा उल्लेख आवर्जून केलेला आहे. त्या शाळांना पाळाव्या लागणार आहेत. मी आपले लक्ष खंड 13 (क) कडे वेधू इच्छितो. यात नमूद केले आहे की, "या अधिनियमातील कोणत्याही तरतुदींचे किंवा त्या खाली केलेल्या नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा या अधिनियमाखाली दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा राज्य शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेली प्रमाणके किंवा मानके किंवा अटी व शर्ती अशा कोणत्याही असल्यास त्यांची पूर्तता करण्यास असमर्थ ठरल्यास" (ख) विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा पोचवणारी कृती केल्यास किंवा दर्जाहीन शैक्षणिक कामगिरी केल्यास यातील जो शब्द वगळला आहे त्याला मात्र माझा आक्षेप आहे. तो शब्द घटनेच्या तत्वाशी निगडित आहे. मूळ जी तरतूद होती ती अतिशय चांगली होती. ती आपण वगळली आहे. कंसातील शब्द आपण वगळले आहेत, असे आपण अहवालाच्या प्रस्तावनेत सुरूवातीलाच म्हटले आहे. "विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा पोचवणारी" अशी तरतूद आहे. पण यातील "राज्याच्या" हा शब्द वगळलेला आहे. म्हणजे 'राज्याच्या हिताला' बाधा आली तरी चालेल. हे मला काही लक्षात येत नाही. समितीने हा शब्द का गाळला ते कळत नाही. ज्याच्यासाठी हा सगळा आग्रह असतो तोच शब्द गाळला आहे. शेवटी आपल्या राज्याची एक चौकट असते. प्रतिमा असते, भूमिका असते. ही भूमिका आपण राज्याच्या स्थापनेपासून स्वीकारली आहे. ही भूमिका आपल्याला राज्याचे आदरणीय नेते श्री.यशवंतराव चव्हाण यांनी घालून दिलेली आहे. यात आपण "राज्याच्या" हा शब्द गाळला आहे आणि "विद्यार्थ्यांच्या हिताला" हा शब्द ठेवला आहे तो मला मान्य आहे. तो शब्द स्वीकारलाच पाहिजे. पण "राज्याच्या" शब्द गाळण्याचे कारण मला समजले नाही. त्याचा खुलासा झाला पाहिजे. त्याच बरोबर "द्रोह किंवा द्वेषाच्या भावनांना उत्तेजन देणाऱ्या" हे दोन शब्द गाळले आहेत. हा अतिशय महत्त्वाचा मुद्दा होता. द्रोहाचे कोणतेही शिक्षण देता कामा नये. त्याला शासनाची मान्यता असता कामा नये. हा अतिशय गंभीर असा मुद्दा आहे. भारतीय संविधानाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चौकटीला मान्य नसलेली कोणतीही गोष्ट शाळेत शिरकाव करू देता कामा नये. त्यामुळे यासंबंधी थोडासा गांभीर्याने विचार व्हायला पाहिजे. ..4



श्री.कपिल पाटील....

माननीय शिक्षण मंत्री व सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे देखील हा मुद्दा स्वीकारतील. तशी सुधारणा त्यांनी हे विधयक मांडत असतानाच मुव्ह करावी अशी माझी सूचना आहे. शेवटी भारतीय संविधानाची चौकट अतिशय महत्त्वाची आहे. चौकटीच्या केसाला सुद्धा धक्का लागता कामा नये, यासाठी या सभागृहाने दक्षता घेतली पाहिजे. विधिमंडळ किंवा संसदेने एखादा कायदा पारित केला असेल व तो संविधानाच्या मूलभूत तत्त्वांना बाधा आणत असेल तर सर्वोच्च न्यायालय देखील हस्तक्षेप करते. संविधानाच्या विरोधात कोणतेही बिल आपल्याला सभागृहात मंजूर करता येत नाही. हा गंभीर असता मुद्दा आहे तो अजाणतेपणे, नकळत निसटला आहे किंवा नाही हे मला माहीत नाही. हे बिल मुव्ह करताना आपण ही चौकट गाळली तर त्याचा काहीही उपयोग होणार नाही. या बिलाच्या हेतू बद्दल मी आपले स्वागत करतो. या बिलामागे आपला अत्यंत प्रामाणिक आणि प्रांजळ हेतू आहे. आपण शाळांना उत्तेजन देण्यासाठी प्रयत्न करीत आहात. यासाठी माननीय शिक्षण मंत्र्यांनी गेले वर्षभर प्रयत्न केले आहेत. परिश्रम घेतले आहेत त्याचे स्वागत केले पाहिजे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

त्यांची प्रशंसा केली पाहिजे. मूळ विधेयकामध्ये ते शब्द आहेत त्याबद्दल माननीय मंत्री महोदयांचे स्वागत केले पाहिजे. परंतु मूळ विधेयकातील शब्द का वगळण्यात आले याचे मला कोडे पडले आहे आणि ते अतिशय गंभीर आहे. तेव्हा मूळ विधेयकातील दोन मूळ शब्द कायम ठेवले पाहिजेत.

सभापती महोदय, 13 (ख) मध्ये विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा अथवा द्वेषाच्या भावनांना उत्तेजन देणाऱ्या भावना असा जो उल्लेख आहे ती चौकट काढून टाकावी. या खंडामध्ये "राज्याचा" असा उल्लेख कंसात टाकलेला आहे. कंसातील शब्द वगळावयाचा आहे. राज्य हा शब्द वगळला हे मी समजू शकतो. पण पुढील दोन शब्द संविधानातील आहेत. आपणास संविधानाला हात लावता येणार नाही. राज्याचा उल्लेख मी समजू शकतो, तो अंतर्भूत आहे. द्वेष् आणि द्रोहाला थारा नाही असे आपल्या सर्वांचे तत्त्वज्ञान आहे आणि त्यास थारा देता कामा नये. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते देखील माझ्याशी सहमत होतील. देशाशी द्रोह करणारी कोणतीही गोष्ट शाळेत आली पाहिजे काय ? मला वाटते आपण याच्याशी सहमत होणार नाही.

खंड 13 (ग) मध्ये उल्लेख आहे की, दर्जाहीन शैक्षणिक कामगिरी केल्यास" ते स्वाभविक आहे या गोष्टीबद्दल काही करण्याची गरज नाही.

सभापती महोदय, या विधेयकातील "कंपनी" हा शब्द हद्दपार करण्यात आलेला आहे त्याबद्दल माननीय मंत्री महोदयांचे आणि संयुक्त समितीचे स्वागत केले पाहिजे. शिक्षणाचे कंपनीकरण, व्यापारीकरण, बाजारीकरण करण्याचा प्रयत्न भांडवली शक्ती करीत आहेत. कंपनी हा शब्द वगळल्याबद्दल मी पुन्हा एकदा मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. कारण शिक्षणाला सर्वात मोठा धोका कंपनीकरणाचा आहे. शिक्षण आता विकाऊ गोष्ट झाली आहे. ज्याच्याकडे पैसा आहे त्यांनी शिक्षण घ्यावे अशा प्रकारची भूमिका घेतली जाऊ लागली आहे. एकदा ही भूमिका स्वीकारल्यानंतर या देशातील, राज्यातील गरीब विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेण्याची सर्व दारे बंद होणार आहेत. हे कंपनीकरण माध्यमिक शिक्षणामध्ये आले तर अत्यंत कठीण गोष्ट आहे.

सभापती महोदय, आज खाजगी शाळा, महाविद्यालये किंवा ज्या शाळा महाविद्यालयांनी शासकीय अनुदान घेतलेले नाही त्या ठिकाणी सर्वसामान्य विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

यासाठी केंद्र सरकारने जाणीवपूर्वक मोठ्या शाळांमध्ये देखील 25 टक्क्यांचे आरक्षण घातले. गरीब विद्यार्थ्यांना देखील दर्जेदार व समान शिक्षण मिळाले पाहिजे ही त्या मागील भूमिका होती. कारण संविधानाने सर्वांन समान संधीचा आग्रह धरलेला आहे. आपण सर्वांना समान संधी देण्याचे तत्त्व स्वीकारले असेल तर समान संधी नाकारणारी कोणतीही गोष्ट आपण नाकारली पाहिजे. तेव्हा या विधेयकातून "कंपनी" हा शब्द हद्दपार केल्याबद्दल माननीय मंत्री महोदयांचे आणि संयुक्त समितीचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, 6 ते 14 वयोगटातील विद्यार्थ्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा कायदा 2009 मध्ये आला आणि तो या ठिकाणी बंधनकारक ठेवलेला आहे. ही अतिशय चांगली बाब आहे. या विधेयकाच्या माध्यमातून नवीन येणा-या शाळा फार मोठा हेतू ठेवून येतील असे समजण्याचे काही कारण नाही. मागील दाराने शिक्षणाचे कंपनीकरण करण्याचा छुपा हेतू देखील असू शकतो. पण किमान त्यास पायबंद घालण्याचा प्रयत्न केलेल आहे त्याचे स्वागत केले पाहिजे.

सभापती महोदय, या विधेयकातील "अपग्रेडेशन" या शब्दाबद्दल माझा आक्षेप आहे. त्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा अशी विनंती आहे. अस्तित्वात असलेल्या शाळांचे अपग्रेडेशन करावयाचे आहे अशा शाळा असा अर्थ आहे. इंग्रजीमध्ये "अपग्रेडेशन" आणि मराठीत "दर्जावाढ" असा शब्दप्रयोग करण्यात आलेला आहे. आपण इंग्रजीमध्ये अपग्रेडेशन हा शब्द वेगळ्या पध्दतीने वापरतो. त्यामध्ये ग्रेड आहे हे मला मान्य आहे. पण मराठीमध्ये त्याचे रुपांतर करताना त्यामध्ये ग्रेड येत नाही. मराठीत इयत्ता येते. तेव्हा या दर्जाहीन शाळा आहेत काय ? इंग्रजीमध्ये ग्रेड हा शब्द वापरला जातो. इंग्रजीमधील अपग्रेडेशनचा अर्थ माझ्या लक्षात येतो. पण मराठीत त्याचा नेमका उलट अर्थ होतो. अपग्रेडेशन शब्दाचे शब्दशः भाषांतर केल्यामुळे ही गडबड होत आहे. येथे अनुवाद व्हायला पाहिजे भाषांतर व्हावयाला नको. आपण दर्जावाढ हा शब्द स्वीकारला तर अन्य शाळा निम्नस्तरावर येतात आणि या शाळा वरच्या स्तरावर जातात. आपण कितीही भूमिका घेतली तरी सर्वसामान्यांसाठी,पददलितांसाठी एकप्रकारच्या शाळा आणि "आहे रे" वर्गासाठी वेगळ्या शाळा असा जो फरक आहे त्याचा वास दर्जावाढ या शब्दाला येतो. सन्माननीय

..3..



AJIT/ D/ KTG/ पूर्वी श्री.भारवि... 10:40

श्री.कपिल पाटील.....

सदस्य श्री.भाई जगताप सुधारणा मांडतील त्यावेळी हा वास येणार नाही याची खात्री बाळगतो. माननीय शिक्षण मंत्री जी भूमिका घेऊन येत आहे त्यास कोणातही काळा डाग लागू नये त्यासाठी माझा आग्रह आहे. हेतू खूप चांगला असतो, परंतु कधी उत्साहीपोटी गफलती होऊ शकतात.

सभापती महोदय, मी आणखी एका गोष्टींचा आग्रह धरतो त्याचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. राज्यात व मुंबई इंग्रजी माध्यमाच्या व अन्य बोर्डाच्या शाळा सुरु आहेत त्या शाळांची आज काय स्थिती आहे ? त्यातील काही मोजक्या शाळा दर्जेदार आहेत. अन्य शाळा या केवळ पैशांचे पीक काढण्यासाठी सुरु केलेल्या आहेत. इतर कोणत्याही धंद्यापेक्षा हा प्रतिष्ठित धंदा आहे आणि येथे पैसे कमावता येतात म्हणून शाळा काढण्यात आलेल्या आहेत. या शाळांमध्ये शिक्षकांचे बेसुमार शोषण सुरु आहे. "रायन"सारखी देशभर प्रसिध्द असलेली संस्था शिक्षकांना चार-पाच हजार रुपये पगार देते. रिलायन्स शाळा चांगली चालत आहे. काही शाळा दोन-दोन लाख रुपये फी घेऊन सुध्दा शिक्षकांना अतिशय कमी पगार देतात. शिक्षकांचे शोषण होता कामा नये. शिक्षण सर्वत्र समान असले पाहिजे आाणि आपण तसा आग्रह धरला पाहिजे. शिक्षकांचे शोषण होऊ नये यासाठी कोणत्या प्रकारची व्यवस्था करण्यात येणार आहे याचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. दर्जावाढ केलेल्या तथाकथित शाळा आणि आमच्या दर्जाच्या ज्या शाळा आहेत या दोन्ही शाळांचा दर्जा एकसमान असला पाहिजे. सर्वांना समान दर्जाचे शिक्षण मिळाले पाहिजे. घटनेने ही जबाबदारी शासनावर टाकलेली आहे. या जबाबदारीपासून शासन बाजूला तर जात नाही ना, याची ग्वाही माननीय मंत्री महोदयांनी येथे द्यावी, अशी विनंती करुन मी माझे भाष्ण पूर्ण करतो.

---------

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकावरील चर्चेला मी सुरुवात करणार होतो परंतु शाळांच्या संदर्भातील विधेयक असल्यामुळे आणि शिक्षक मतदार संघातील आमदारांना त्याचा पहिला मान मिळावा आणि त्यांनी शिक्षणावर बोलावे अशी माझी इच्छा होती म्हणून मी माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना जाणीवपूर्वक प्रथम बोलण्यास सांगितले. परंतु सोन्याचे टाकले, चांदीचे टाकले तरी वाकडे ते वाकडेच. भाषणाच्या शेवटी तुम्ही शिक्षकांच्या पगारावर आणि त्यांच्या शोषणावर आलातच.

सभापती महोदय, खरे म्हणजे आज या विधेयकावर जास्त बोलू नये असे मला वाटत होते. हे विधेयक वाचले नाही याचे कारण सभागृहामध्ये हे विधेयक विचारार्थ येण्यापूर्वी मंत्रीमहोदयांनी तातडीने ते संयुक्त समितीकडे सुपूर्द केले. त्यावर विचारविनिमय केल्यानंतर आज हे विधेयक सभागृहामध्ये आले आहे. सुदैवाने हे पहिले विधेयक आपल्या सभागृहामध्ये संमत होऊन ते विधानसभेमध्ये जाणार आहे. या विधेयकाच्या रुपाने या सभागृहाला हा सन्मान मिळाला आहे हा एक भाग आहे. त्या सन्मानाचा आदर करुन मी या ठिकाणी बोलण्यासाठी उभा आहे. संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यापूर्वीच्या मूळ विधेयकाची प्रत माझ्याकडे आहे. त्या विधेयकाच्या उद्देश व कारणे यामध्ये म्हटले आहे की, "बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 आणि केंद्र सरकारच्या विधेयक क्रमांक 35 मध्ये असलेल्या तरतुदीनुसार 6 ते 14 वयोगटातील सर्व मुला-मुलींना मोफत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा हक्क मिळाला आहे. या देशामध्ये जन्माला आलेल्या प्रत्येक मुलाचे वय 6 वर्षे झाल्यानंतर त्याला मोफत व सक्तीचे शिक्षण मिळाले पाहिजे असे केंद्र सरकारने आपल्या कायद्यामध्ये म्हटले आहे. आपण हे कशासाठी करीत आहोत हे शासनाने या विधेयकाच्या उद्देश व कारणे यामध्ये लिहिले आहे. "राज्य शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने तसेच राज्यातील काही खाजगी व्यवस्थापनाने अशा मुलांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी शाळा स्थापन केल्या आहेत तरीसुध्दा अनेक खाजगी संस्था."...वगैरे पुढे सर्व माहिती दिली आहे.

या कायद्यामध्ये जे नमूद केले आहे ते मी माझ्या समजुतीप्रमाणे वाचण्याचा प्रयत्न केला. आपले माननीय शिक्षणमंत्री हे उत्साही व प्रामाणिक आहेत. आपल्या खात्यामध्ये काहीतरी करण्याची त्यांची नेहमी धडपड असते. जे काम असेल त्याला योग्य न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

ते करीत असतात. परंतु मंत्र्यांनी काही जरी ठरविले तरी त्या खात्याचे सचिव आणि कायदा खात्याचे अधिकारी त्यांना सल्ला देत असतात ते ही गोष्ट कायद्यामध्ये बसत नाही असे आपले मत सांगत असतात.. त्यामुळे आपण किती जरी ठरविले तरी मंत्र्यांना त्यांच्यापुढे गप्प बसावे लागते. मला जे वाटते त्याप्रमाणे मी कायद्यामध्ये बदल करीत अशाप्रकारची हिंमत व ताकद स्वर्गीय वसंतदादा पाटील यांच्यामध्ये होती ती या सरकारने गमावली आहे. असा शब्द जर मी वापरला तर आपल्याला वाईट वाटेल. दुर्दैवाने पुचाट सरकारचा अचाट कारभार या ठिकाणी मांडण्यासाठी मी उभा आहे.

या देशामध्ये शिकणारा कोणताही मुलगा हा या देशाचा नागरिक आहे, त्याच्यावर या देशाचे संस्कार झाले पाहिजेत. त्यामुळे आपल्या जिल्हा परिषदेच्या सर्व शाळेत, महानगरपालिकेच्या शाळेमध्ये राष्ट्रगीत म्हटले जाते. एवढेच नाही तर पुस्तकाच्या पहिल्या पानावर "भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत" अशाप्रकारची प्रतिज्ञा असते व ती शाळेमध्ये म्हटली जाते. जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये ही प्रतिज्ञा एक दिवस मराठीमध्ये एक दिवस इंग्रजीमध्ये आणि एक दिवस हिंदीमध्ये म्हणून घेतली जाते. मुलांवर या देशाचे संस्कार करीत असतांना या राज्यामध्ये असलेल्या सीबीएसई, आयसीएसई, आयबी इंटरनॅशनल ब्रिटीश, आयजीसीएसई असे नाव गोंडस नाव लिहिल्यानंतर लोकांना बरे वाटते व ते 4 लाख, 5 लाख, 6 लाख लाख रुपयांपर्यंत फी द्यायला तयार होतात. त्यामध्ये सेंट जॉन, सेंट झेंवियर्स अशाप्रकारची ख्रिश्चन नावे असलेल्या मिशनरींच्या शाळांमध्ये राष्ट्रगीत म्हटले जात नाही...

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा बरोबर आहे त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे, मी त्याचे समर्थन करतो. परंतु त्यांनी म्हटलेले खरे नाही, मिशनरी शाळेमध्ये राष्ट्रगीत म्हटले जाते, प्रतिज्ञा म्हटली जाते. परंतु त्या नावाने काढलेल्या इतर आयबी च्या धंदेवाईक शाळेमध्ये म्हटले जात नाही. त्यामुळे आपण ते शब्द मागे घ्यावेत अशी माझी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, जातीचे स्तोम सरकार माजविणार असेल तर त्याबाबत बोलण्यास माझ्यावर कुणाचेही बंधन नाही हे आपण लक्षात ठेवावे. दिल्लीच्या राजकारणामध्ये आपण कुणावर आणि कशासाठी बंधन घालणार आहात? मी मिशनरी स्कूल



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

बोललो आणि तो शब्द  पुन्हा  रिपिट करीत आहे. याचे कारण या शाळांवर या सरकारचे नियंत्रण नाही. हा कायदा केला तरी सरकारचे नियंत्रण नाही. तसे असेल व आपण मला सांगितले तर आनंद होईल मी माझी चूक मान्य करीन. हे सरकार देखील या शाळांना राष्ट्रगीत म्हणावयास लावीत नाही. कोणत्या शिक्षण संस्था आहेत, कोणते शिक्षण खाते आहे, कोणती त्यांच्यावर निर्बंध आहेत? त्या सरकारने या ठिकाणी विधेयक आणले आहे? जुने विधेयक आता बाद झाले असून संयुक्त समितीचा अहवाल माझ्याकडे आला आहे.

केंद्र सरकारचा कायदा काय म्हणतो? केंद्र सरकारच्या या कायद्याची मराठी प्रत मला मिळाली नाही, हिंदी प्रत सुध्दा मिळाली नाही म्हणून इंग्रजी प्रत आणली आहे. आपण दिलेला अहवाल मराठीमध्ये आहे. केंद्र सरकारच्या या कायद्यात असे म्हटले आहे की, "Definition of child: 'A child means a male or female child of the age of six to fourteen years." म्हणजे 6 ते 14 वयोगटातील मुलांना सक्तीचे मोफत शिक्षण मिळाले पाहिजे या करिता केंद्र सरकारने हा कायदा संपूर्ण देशामध्ये लागू केला त्याप्रमाणे आपल्यालाही लागू आहे. यामध्ये एलिमेंटरी एज्युकेशन म्हणजे प्राथमिक शिक्षणाची व्याख्या दिली आहे. "Elementary education means the education from first class to eighth class." इयत्ता पहिलीपासून 8 वीपर्यंतच्या शिक्षणाला एलिमेंटरी एज्युकेशन असे म्हणतात त्या अनुषंगाने हे विधेयक आले आहे. या कायद्याला अनुसरुन हे विधेयक आणले असल्यामुळे त्या कायद्याला अनुसरुन त्या संदर्भातील शाळांमधील शिक्षणाकरिता हा कायदा असला पाहिजे. त्यानंतर संयुक्त समितीचा अहवाल माझ्याकडे आला. त्यामधील पान क्र. 1 वरील "ड" मध्ये "पूर्व प्राथमिक शाळा याचा अर्थ प्राथमिक शाळेशी संलग्न असलेली 3 ते 6 वयोगटातील बालकांसाठी कोणत्याही नावाने संबोधिण्यात येणारी कोणत्याही माध्यमाच्या बालवाडी,  छोटा शिशू, मोठा शिशू किंवा कोणत्याही पूर्व प्राथमिक पातळीपर्यंत शिक्षण देणारी शाळा". हे सर्व अनैसर्गिक आहे. ही बाब चांगली आहे प्रश्न तो नाही.

हा विषय माझ्यापुढे कां आला? हे मी तुमच्या माहितीसाठी सांगतो.  माझ्या पक्षाच्या नगरसेविका श्रीमती गुडेकर मॅडमचा मला फोन आला. त्यांच्या भावजयीची राजा शिवाजी विद्यालयातील नोकरी जाणार असून ती तुम्ही थांबवा.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

त्यामुळे मी ज्यावेळी संपर्क साधला तेव्हा त्यांनी मला सांगितले की, राजा शिवाजी विद्यालय मराठी माध्यमाच्या सर्व शाळा बंद करीत आहेत, शिशूवर्ग वगैरे बंद करीत आहेत. वर्ग बंद करणार म्हणून 21 वर्षे नोकरी केलेल्या महिलेस घरी जाण्यास सांगितले. मी म्हणालो की, असे कसे करता येईल ? ते म्हणाले की,. यामध्ये शासन मान्यतेचा विषय नाही. त्याला शासनाचे अनुदान मिळत नाही. अनुदानित शिक्षक असेल तर सरकारचे नियंत्रण असते, निर्बंध असते, पेन्शन असते आणि त्यांना कोठे तरी सामावून घेतले पाहिजे वगैरे बाबी असतात परंतु ते यामध्ये नाही. ज्या गोष्टींवर आपले निर्बंध नाही आणि जे त्या कायद्याच्या तत्वामध्ये बसत नाही त्यामध्ये या कायद्याने हस्तक्षेप करण्याचा प्रश्न कसा आला ? हे पैसे देणार आहेत का ? या ठिकाणी मोफत शिक्षण आहे पण हे आणलेले बिल स्वागतार्ह असेल तर या शाळेमध्ये, शिशू वर्गात जाणारी तुमची आमची जी मुले, नातवंडे आहेत, त्यांच्या फीची व्यवस्था सरकार करणार आहे का ? मी मुद्दाम जाणीवपूर्वक हा विषय मांडत आहे. त्या ठिकाणी काम करणाऱ्या शिक्षकांना शोषण न होता सरकारचे अनुदान मिळणार आहे का ? यामध्ये सरकारचा अधिकार कसा आला ?

2009 च्या विधेयकाच्या आधारावर हा कायदा आणलेला असताना आणि सहा वर्षापेक्षा वरच्या गटातील मुलांचा प्रश्न निर्माण झालेला असताना हा विषय यामध्ये कसा आला ? मी सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते सरांशी बोललो. त्यांना हे वाचून दाखविले नसणार. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते त्या समितीवर होते. म्हणून मी त्यांना विचारले. मी आपल्या हेतूबद्दल संशय घेत नाही. परंतु जे तत्वामध्ये, कायद्यामध्ये आहे ते या सदनामध्ये आले पाहिजे. या संदर्भात माननीय मंत्री महोदय उत्तर देणार आहेत पण हा विषय आपण आमच्या सभागृहामध्ये मांडत असताना ज्या कायद्याचा आधार घेतला त्या कायद्याच्या बाहेरची बाब या विधेयकामध्ये आणण्याचा काहीही संबंध नसताना आपण ती यामध्ये आणली आहे.

सभापती महोदय, शाळा याचा अर्थ देताना सुध्दा पूर्व प्राथमिक शाळा असे या विधेयकामध्ये नमूद केले आहे. जर या कायद्यामध्ये, "Elementary education means the education from first class to eighth class." अशी तरतूद असेल तर आपण आपल्या कायद्यातील तरतुदीमध्ये या तरतुदीचा वापर करावयास पाहिजे होता. यामध्ये आपण पूर्व प्राथमिक शाळेचा उल्लेख केलेला आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. दिवाकर रावते .....

या विधेयकामध्ये असे नमूद केले आहे की, " 'शाळा' याचा अर्थ, "पूर्व प्राथमिक शाळा, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालय अशी कोणतीही शासन मान्य शाळा असून ती कोणत्याही व्यवस्थापनाकडून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर चालविण्यात येणारी व कोणत्याही भारतीय वा परदेशी अभ्यासक्रमास अथवा मंडळास संलग्न असलेली जेथे कोणत्याही कारणाने शाळेत होणारा कोणत्याही प्रकारचा सर्व खर्च व्यवस्थापन स्वत: करील आणि राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्याकडून कोणतेही सहायक अनुदान किंवा वित्तीय सहाय्य देण्यात येणार नाही, आणि अशा शाळेच्या व्यवस्थापनाने निर्माण केलेल्या कोणत्याही दायित्वाची पूर्ती करण्यास राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण जबाबदार राहणार नाही, असा आहे." हे विधेयक खरे तर याकरिताच आहे. माझ्याकडे पैसे असले पाहिजेत. मी शाळा काढावयाची. मला शाळा काढण्यासाठी शासनाने मान्यता द्यावयाची आहे. मग तुझ्या खर्चाने काय करावयाचे ते कर. शिक्षक तुमचे, विद्यार्थी तुमचे, शाळा तुमची, खर्च तुमचा. शाळा कशी काढावयाची हे पुढे दिलेले आहे आणि ते फार गंभीर आहे. त्यावर मी नंतर बोलणार आहे.

आपण स्वयंअर्थसहाय्यित म्हणून मान्यता देणार ते मान्य आहे परंतु त्या शाळा या कायद्याअंतर्गत असल्या पाहिजेत असा तुमचा आग्रह आहे. 2009 च्या विधेयकाप्रमाणे बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 च्या तरतुदी अंतर्गतच या स्वयंअर्थसहाय्यित शाळा असल्या पाहिजेत असे आपण सांगितले आहे. या कायद्याच्या अंतर्गत त्या शाळा असल्या पाहिजेत असे म्हटल्यानंतर या विधेयकामध्ये (3) मध्ये असे म्हटले आहे की, "Every child of the age six to fourteen years shall have a right to free and compulsory education in a neighborhood school till completion of elementary education." या कायद्यात अशी तरतूद आहे की, 6 वर्षापासून 14 वर्षापर्यंतच्या मुलाला घराच्या बाजूबाजूला असलेल्या शाळामध्ये 100 टक्के मोफत शिक्षण मिळाले पाहिजे. म्हणजे फी घेता येणार नाही. या सदनामध्ये खाजगी शाळांनी किती फी घ्यावयाची याबद्दल चर्चा झाली. सन्माननीय सदस्य श्री. हिरे या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांच्याही संस्था आहेत. त्यावेळी चार लाख रुपये फी घ्यावयाची की 5 लाख रुपये फी घ्यावयाची या बाबतीत चर्चा चालू होती. ते आपल्या आवाक्याबाहेर होते. पण आपली चर्चा चालू होती.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

के.जी.साठी 5 लाख रुपये फी हे सर्व भयानक आहे. आपण त्याचा विचार सुध्दा करु शकत नाही. एखादे कुटुंब आपल्या मुलाच्या पूर्ण शिक्षणाकरिता सुध्दा 5 लाख रुपये खर्च करीत नाही. परंतु या समाजामध्ये आपल्या बोलता न येणाऱ्या मुलांवर 5 लाख रुपये खर्च करणारी कुटुंबे सुध्दा आहेत. किती वैभव आहे ? भारतात सोन्याचा धूर निघत होता असे म्हणतात त्याचे ते प्रत्यंतर आहे.

सभापती महोदय, माझा तो मुद्दा नाही. या विधेयकाप्रमाणे तुम्हाला संस्था काढण्यासाठी परवानगी मिळणार आहे परंतु तुमचे तुम्ही बघून घ्या अशी परिस्थिती आहे. त्या कशा निघणार त्यावर सर्व निर्बंध आहेत परंतु या कायद्याच्या अंतर्गत बसवून त्या शाळा असल्या पाहिजेत असा अधिकार शासनाने या कायद्याने घेतला आहे. त्यांनी स्वयंअर्थसहाय्यित शाळा काढावयाची आणि फी घ्यावयाची की नाही ? जर या कायद्याप्रमाणे ती शाळा काढली असेल तर फी घेता येत नाही. त्यांना मोफतच शिक्षण द्यावे लागेल. कारण केंद्र शासनाचा कायदा आहे आणि त्यांच्या अंतर्गत हे विधेयक आहे. आपले प्रिॲम्बलच तसे आहे. या कायद्याच्या अंतर्गत बसवूनच सगळे काम करावयाचे आहे. या शाळा विद्यार्थ्यांना पहिली ते आठवी पर्यंतचे शिक्षण मोफत देणार का ? त्या कायद्याच्या अंतर्गत ती शाळा असेल तर मोफत शिक्षण द्यावेत लागेल. त्या विधेयकामध्ये पुढे (4) मध्ये असे म्हटले आहे की, "Where a child above six years of age, has not been admitted in any school or though admitted could not complete his or her elementary education, then, he or she shall be admitted in a class appropriate to his or her age." म्हणजे शिक्षणाचा अधिकार देत असताना मध्येच जर त्या विद्यार्थ्याला शाळा सोडावी लागली तर तो शिक्षणापासून वंचित होऊ नये याची तरतूद या कायद्यामध्ये केलेली आहे. शासकीय अधिकारी सोडले तर तुमच्या आमच्या मुलांना सुध्दा असेच मध्येच कधी सहा महिन्यात एखाद्या शाळेत प्रवेशासाठी गेलो तर कोणत्याही शाळेत घेत नाहीत. परंतु ही तरतूद या विधेयकामध्ये आपण सर्वांकरिता करीत आहात. तो मुलगा कोणाचाही असू द्या, कसाही असू द्या, माझे घर मध्येच बदलले तर माझ्या मुलाला शाळेमध्ये घेतलेच पाहिजे अशी कायद्यामध्ये तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. या

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. दिवाकर रावते ...

विधेयकामध्ये (6) मध्ये असे म्हटले आहे की, "For carrying out provisions of this Act, the appropriate Government and the local authority shall establish, within such area or limits of neighborhood, as may be prescribed, a school, where it is not so established within a period of three years from the commencement of this Act."

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री दिवाकर रावते...

येथे बृहत आराखड्याचा विषय येतो. आजूबाजूच्या दीड किलोमीटरच्या परिसरामध्ये खाजगी शाळा काढली नाही तर सरकारला तेथे शाळा काढावी लागेल. " Every local authority shall provide free and compulsory elementary education to every child." या संबंधीचा उल्लेख या विधेयकामध्ये केलेला आहे. मी संपूर्ण विधेयकाचे येथे विश्लेषण करीत नाही. प्रत्येक मुलाला शिक्षण मिळाले पाहिजे अशा प्रकारचा कायदा केन्द सरकारने केलेला आहे. त्या कायद्याची अंमलबजावणी देशातील सर्व राज्यांनी केली पाहिजे. शिक्षणाच्या बाबतीत ही चांगली गोष्ट घडत आहे.

सभापती महोदय, तामिळनाडूमध्ये एका शाळेच्या बसला आग लागून 40 मुलांचा होरपळून मृत्यू झाला. खूप वाईट गोष्ट झाली. परंतु त्या 40 मुलांचे हौतात्म्य देशातील सर्व मुलांच्या कामी आले. शाळेच्या स्कूलबसेस कशा असाव्यात, कोणकोणत्या पध्दतीच्या असाव्यात, त्यामध्ये एक अटेण्डण्ट असावा, त्या एकाच रंगाच्या असाव्यात अशा प्रकाराचा कायदा करण्यात आला. तामिळनाडूमध्येच दुसरी एक वाईट घटना घडली. एका शाळेला आग लागून मुलांची कोंडी झाली आणि त्यामध्ये ती मुले होरपळली. मी हे सांगत आहे की, राज्य सरकार असो की, केन्द्र सरकार, त्यांचे मस्तकच ठिकाणावर नसते. हे प्रसंग घडल्यानंतर केन्द्रीय शिक्षणमंत्री तेथे भेट देण्यासाठी गेले नाहीत. अमेरिकेतील एका शाळेमध्ये एका आतंकवाद्याने अंदाधुंद गोळीबार करुन मुलांना ठार केले. त्यावेळी अमेरिकेचे अध्यक्ष ढसाढसा उडायला लागले. कच्चीबच्ची मेल्यामुळे ते रडायला लागले. ते संवेदनाहीन नव्हते. तामिळनाडूमध्ये दोन घटना घडल्यानंतर केन्द्रीय शिक्षणमंत्री घटनास्थळी गेले नाहीत. परंतु सर्वोच्च न्यायालयाने या घटनेची स्वत:हून दखल घेऊन देशातील सर्व शाळांनी मुलांना बाहेर जाण्यासाठी दुसरा जिना तयार करावा असे आदेश दिले. परंतु या देशाचे संवेदनाहीन असलेले शिक्षण मंत्री तामिळनाडूमध्ये घटनास्थळी गेले नाहीत. आपण काय करीत आहोत. तर खाजगी शाळांना परवानगी देत आहोत.

सभापती महोदय, या स्वयंअर्थसहाय्यित शाळा होणार आहेत. त्यांना फी घेण्याचा अधिकार नसेल असे मला वाटते. संयुक्त समितीच्या अहवालातील पान क्रमांक 3 वर शाळेची व्याख्या दिलेली आहे. उपखंड 2अन्वये अशी तरतूद आहे की, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 याच्या तरतुदीअन्वये स्थापन केलेल्या व मान्यता दिलेल्या शाळांना उक्त

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

खंडाच्या उपखंड (1) किंवा (2) मधील तरतुदी लागू होणार नाहीत असा उल्लेख वगळण्यात यावा"... मी या विधेयकातील सर्व खंडासंबंधी मी चर्चा करणार नाही. खरे तर या विधेयकातील प्रत्येक खंडावर बोलण्याची माझी इच्छा आहे. परंतु संयुक्त समितीमधील सन्माननीय सदस्यांचा मान राखणे हे माझे कर्तव्य आहे. जर आम्हाला या शाळा काढायच्या असतील तर त्या काढता येणार नाहीत..(अडथळा)...

सभापती महोदय, जी अनुसूची दिलेली आहे त्या अनुसूची अंतर्गत या शाळा काढावयाच्या आहेत. शाळा काढून त्या तुम्ही चालवायच्या आहेत. त्या बाबतीतील नियंत्रण मात्र मंत्री महोदयांनी आपल्या हातामध्ये ठेवलेले आहे. कायद्यामध्ये तशी तरतूद नाही. परंतु अनुसूचीमध्ये त्यानुषंगाने अंतर्भाव केलेला आहे. "अनुसूची क" मध्ये असे म्हटलेले आहे की, "विद्यमान शाळेची श्रेणीवाढ : प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक (विद्यमान शाळेचा डिआयएसई किंवा एसईएमआयएस क्रमांक द्यावा.) (7) राज्य मंडळ किंवा सीबीएसई (केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ) किंवा आयसीएसई किंवा आयजीसीएसई किंवा आयबी किंवा सीआयई किंवा कोणतेही मंडळे किंवा संस्था ती कोणत्याही नावाने असेल यांच्याशी सध्या असणा-या किंवा प्रस्तावित असणा-या संलग्नतेचा तपशील". या आंतरराष्ट्रीय शाळा आहेत. या शाळा राज्य शासनाला जुमानतात काय ? तुम्हाला साधे कॉन्व्हेण्ट स्कूल जुमानत नाही. आमदाराला सुध्दा ते जुमानत नाहीत. सरकारला मान पिळायला फक्त मराठी शाळा आणि त्यातील शिक्षकच मिळतात. कॉन्व्हेण्ट शाळेच्या बाबतीत सरकारला हात लावायला मिळत नाही. आमदाराला या शाळा हाकलून देतात. मंत्री महोदयांचे या शाळांवर नियंत्रण नाही. ते फक्त नियंत्रण असल्याचा आव आणून भाव खात फिरत असतात. अशा प्रकारचे शिक्षण खाते माननीय मंत्री महोदय श्री. राजेंद्र दर्डा यांच्याकडे आलेले आहे.

सभापती महोदय, मी अनुसूची "ग"मध्ये असे नमूद केलेले आहे की, "नवीन पूर्व-प्राथमिक किंवा प्राथमिक किंवा उच्च-प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा यथास्थित उच्च-माध्यमिक शाळा स्थापन करण्यासाठी - रु. तीन लाख. प्राथमिक स्तर ते उच्च-माध्यमिकपर्यंत नवीन शाळा स्थापन करण्यासाठी - रुपये दहा लाख. रुपये 3 लाख हे दर्जावाढ करण्यासाठी आहेत.

...नंतर श्री. गिते...

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ D/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम . 11.20

श्री.दिवाकर रावते...

अनुसूची "ग"मधील (ग) मध्ये " शाळेची प्राथमिक, उच्च-प्राथमिक, माध्यमिक किंवा यथास्थिती, उच्च प्राथमिक शाळेमध्ये दर्जावाढ करण्यासाठी रुपये तीन लाख, प्रत्येक दर्जावाढ करण्यासाठी असे नमूद केलेले आहे. त्यातील (क) मध्ये नवीन प्राथमिक किंवा प्राथमिक शाळेला संलग्न असलेली पूर्व-प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा यथास्थिती, उच्च-माध्यमिक शाळा स्थापन करण्यासाठी ग्रामपंचायत भाग, नगर परिषद, नगर सपंचायत किंवा औद्योगिक नगरी भागात रुपये दोन लाख, तीन लाख एवढे पैसे भरुन शाळेची मान्यता ठेवण्यात येणार आहे हा यातील महत्वाचा भाग आहे.

महोदय, सर्वात खंबीर बाब अनुसूची "क" मध्ये आहे. महाराष्ट्रातील मराठी शिक्षणाचे भवितव्य उद्धस्ततेकडे कसे लागणार आहे याकडे मी सभागृहाचे लक्ष वेधणार आहे. तुम्ही त्या गोष्टीस चांगलेच म्हणणार. प्रत्येक आदिवासी मातेचे कुपोषित बालक त्या मातेस गोंडसच वाटते. परंतु ते बालक कुपोषित असते. या विधेयकातील पृष्ठ क्रमांक 11 मध्ये जमिनीचा तपशील देण्यात आलेला आहे. त्या तपशीलातील (क) मध्ये व्यवस्थापनाच्या नावे असेली नोंदणीकृत जमीन असा उल्लेख आहे. जमीन शाळा काढणाऱ्यांच्या नावे असली पाहिजे ही गोष्ट बरोबर आहे. (ख) मध्ये असे म्हटले आहे की, न्यास, संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्या नावाने 30 किंवा त्याहून अधिक वर्षाचा नोंदणीकृत भाडेपट्टा विलेख. या कारणासाठी जमीन 99 वर्षाच्या लीजवर देण्यात येत होती, ती लीज आता आपण 30 वर्षावर आणली आहे, ते ठीक आहे.(ग) मध्ये असे म्हटले आहे की, शाळेला ज्याच्याशी संलग्नता हवी आहे, ते मंडळ किंवा संस्था किंवा ती परिषद. त्यानंतर (12) उपलब्ध जमिनीचे क्षेत्राचा उल्लेख केलेला आहे.

महोदय,आपण हे विधेयक वाचले तर पुणे शहरात शाळा काढता येतील काय ही गोष्ट आपल्या लक्षात येईल मुंबई व मुंबई उपनगरात किमान अर्धा एकर जागा असली पाहिजे. मुंबई शहरात अर्धा एकरची किंमत किती झाली आहे. शहरी भागात एक एकर आणि ग्रामीण भागात दोन एकर जमीन असली पाहिजे. ग्रामीण भागात अथवा जंगलात गेलात तरी तेथे 5 लाख रुपये प्रति गुंठा जमिनीची किंमत चालली आहे. चांगल्या भागात शाळा काढावयाची असेल 10 ते 15 लाख रुपये प्रति गुंठा जमिनीची किंमत आहे. या रकमेस 40 ने गुणले तर त्या जागेची किंमत 4 ते 5

2...

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.दिवाकर रावते...

कोटी रुपये होते. शाळा काढावयाची असेल त्यासाठी 4 ते 5 कोटी रुपयांची जमीन घ्यावी लागेल. शहरी भागात तर यापेक्षा किती तरी जास्त पैसे मोजावे लागतील.

महोदय,ज्या जमिनीसाठीची कागदपत्रे सादर केलेली आहेत अशा जमिनीवरील बांधकामांचा तपशील सुध्दा यात नमूद केला आहे. (13) (क) एकूण क्षेत्र चौरस मीटरमध्ये (ख) बांधकाचे क्षेत्र चौरस मीटरमध्ये (ग) प्रत्येक मुलामागे अंदाजे वर्गखोलीतील उपलब्ध क्षेत्र (प्रत्येक मुलासाठी अंदाजे एक चौरस मीटर) असाही उल्लेख बांधकामाच्या तपशीलात दिलेला आहे. वर्गखोल्यांची संख्या , वर्गखोल्यांचा आकार आठ मीटर xसहा मीटर, शिक्षक कक्ष, प्राचार्य कक्ष, कार्यालय कक्ष, ग्रंथालय या गोष्टी शाळांमध्ये असणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात एका शाळेची इमारत बांधण्यासाठी किमान 40 ते 45 लाख रुपये खर्च येतो. शहरात तो खर्च 1 ते 1.50 कोटी रुपयांपर्यंत होतो. तसेच त्या शाळेची सुसज्जता, तेथे सर्व नवीन उपकरणे आणणे, नवीन साधन सामुग्री आणणे यासाठी वेगळा खर्च येतो. मला ग्रामीण भागात एका शाळा काढावयाची असेल तर किमान 5 ते 6 कोटी रुपये खर्च करावा लागेल आणि शहरी भागात साधी शाळा काढावयाची असेल तर त्यासाठी किमान 10 कोटी रुपये खर्च करावा लागेल. एवढा खर्च करुन शाळा काढतील. पण 2009 च्या केंद्रीय कायद्याप्रमाणे 6 वर्षे ते 14 वर्षाच्या मुलाला प्राथमिक शिक्षण मोफत द्यावयाचे आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरात अनेक शाळा अशा आहेत की, त्या शाळांमधील विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी मैदानच नाही. सध्या शाळांच्या प्रांगणात विद्यार्थ्यांसाठी थोडेसे खेळण्याचे साहित्य लावले जाते, तेवढया जागेतच विद्यार्थ्यांना खेळावे लागते. शहरात शाळा काढण्यासाठी एवढी मोठी जमीन घेऊन, त्यासाठी 10 ते 15 कोटी रुपये खर्च करुन विना पैशाने विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन मोफत शिकविण्याचे काम करतील काय हा एक मोठा प्रश्न आहे. काही संस्था चालक मोठया प्रमाणात शाळा काढतील. मला असे वाटते की, एवढा खर्च करुन मराठी शाळा काढणे शक्य नाही असे मला वाटते.

3...



ABG/ KTG/ D/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम . 11.20

श्री.दिवाकर रावते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, या विधेयकाच्या माध्यमातून श्रीमंताच्या मुलांकरिता श्रीमंत पध्दतीने शिक्षण निर्माण करण्याकरिता एखादा धनिक निश्चितपणे शाळा काढेल. यासाठी जास्त पैसे खर्च करील. एखादा धनिक आपल्या खिशातील एवढी मोठी रक्कम खर्च करुन मराठी शाळा काढेल असे मला तरी वाटत नाही. ही एक कायमची व्यथा राहणार आहे.

सभापती महोदय, शासनाचे असे धोरण आहे की, इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मान्यता नसली तरी चालते. मनात येईल त्याने इंग्रजी माध्यमाच्या शाळा काढाव्यात. मराठी शाळा काढावयाची असेल त्यास शासनाची मान्यता घ्यावी लागेल. मराठी शाळा काढण्यासाठी निर्बंध घातले आहेत. परंतु इंग्रजी माध्यमाच्या शाळा काढण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शासनाचे निर्बंध नाहीत ही दुर्देवाची गोष्ट आहे. सध्या मराठी शाळांची मोठया प्रमाणात गळचेपी चालली आहे. राज्यात इंग्रजी माध्यमांच्या शाळा मोठया प्रमाणात सुरु झाल्या आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांना वाटते की, आपला मुलगा इंग्रजी शाळेतच शिकला पाहिजे. प्रत्येकामध्ये अशा प्रकारची मानसिकता निर्माण झालेली आहे, ती बदलण्याकरिता शासनाने काही केले पाहिजे, पालकांना प्रशिक्षित केले पाहिजे, पालकांचे मेळावे घेतले पाहिजेत. मुलगा मराठी शाळेत शिकत असला तरी तो इंग्रजी चांगल्या प्रकारे बोलू शकतो अशी उदारहणे पालकांना दिली पाहिजेत. या अनुषंगाने शासनाकडून कोणत्याही प्रकारचे प्रयत्न केले जात नाहीत. सध्या ज्या मराठी शाळा चालू आहेत, त्या बंद पडण्याच्या मार्गावर असताना अशा प्रकारचे विधेयक आणून एक नवीन खर्चीक बाब सभागृहासमोर आणली तर मात्र एक अतिशय गंभीर परिस्थिती ओढवेल.

महोदय,माननीय मंत्री महोदय, आपणास एका गोष्टीच्या बाबतीत धन्यवाद देतो. सध्या ज्या मराठी शाळा सुरु आहेत, त्या बंद होण्यापासून वाचवाव्यात. मराठी शाळा वाचवाव्यात म्हणून एक आंदोलन झाले. माननीय मंत्री महोदय माझ्यासोबत स्वत: आंदोलनकर्त्यांना भेटले. तुमच्या शाळा वाचविण्याकरिता मी शिक्षण मंत्री म्हणून सर्वतोपरी तुमच्या मागे राहीन आणि योग्य पध्दतीने कायद्यात बसवून तुम्हाला मदत करण्याचा निश्चितपणे प्रयत्न करीन असे त्यानी सांगितले. आंदोलनकर्त्यांकडे मराठी शाळांची यादी होती, त्यातील काही शाळा नावाला होत्या, त्या शाळा घेऊ नका असे त्यांनी सांगितले. जवळपास 70 ते 72 शाळा अशा आहेत की, त्या मराठी शाळा गेल्या

4...



श्री.दिवाकर रावते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सात ते दहा वर्षापासून सुरु आहेत. त्यातील काही शाळा तीन ते चार वर्षापूर्वीच सुरु झालेल्या आहेत. त्या शाळांना मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो. आपणही आंदोलनकर्ते आहात अशी भावना मनाशी बाळगून त्या आंदोलकांशी चर्चा केली, त्यांचे काम व्हावे म्हणून आपण आपली सर्व बुध्दीमत्ता पणाला लावली. त्यावेळी आपण असा शब्द दिला की, हे विधेयक सभागृहात पारीत होईल त्यांनतर त्या शाळांना मी मंजुरी देईन. विधेयक मंजूर झाल्यानंतर त्या शाळांना मान्यता देता येत नसल्यामुळे आपण आपली सर्व शक्ती पणाला लावली, तसेच या बाबतीत सखोल चर्चा केली. त्यानंतर या अनुषंगाने आपण उप सूचना तयार केली. एखादी उप सूचना विरोधी पक्ष सदस्यांकडून केली तर स्वीकारली जात नाही. विधेयकाच्या अनुषंगाने उप सूचना ही सत्ताधारी पक्षाकडूनच मांडावी लागते.

महोदय, हा विषय मराठी शाळा वाचविण्यासंबंधीचा आहे. म्हणून मी तुम्हाला मनापासून धन्यवाद देतो. या त्रुटी एवढयासाठीच मांडल्या आहे की, भविष्यात या विधेयका विरुध्द कोणी न्यायालयात आव्हान केले व न्यायालयाने हा कायदा अयोग्य आहे असे सांगितले तर आपल्याला मार्गदर्शन करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांच्या बाबत मी माझा हक्कभंग आणण्याचा अधिकार राखून ठेवतो. मी असे जाहीर करतो. माननीय श्री.दर्डा साहेब, आपण शिक्षण मंत्री म्हणून मुंबई शहरात एक एकर जागा घ्यावी आणि तातडीने मराठी शाळा सुरु करावी अशा प्रकारचे मी व्यक्तिगत आव्हान करतो. 72 मराठी शाळांचे आंदोलन झाले, त्या शाळांची यादी आपणाकडे सादर केलेली आहे. या विधेयकात आपल्याला अटी शिथिल करण्याचा अधिकार दिला आहे, त्या अटी शिथिल करुन या 72 शाळांना मान्यता द्यावी अशा प्रकारची विनंती करतो आणि आपले आभार मानून माझे मनोगत पूर्ण करतो. "जय हिंद." "जय महाराष्ट्र".

--------

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 7, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, अतिशय चांगले विधेयक सभागृहापुढे मंजुरीसाठी आणल्याबद्दल मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. मी दोन-तीन महत्वाच्या विषयाबाबत उहापोह करणार आहे. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी म्हटल्याप्रमाणे पृष्ठ क्रमांक 10 वर सहाव्या मुद्यामध्ये "The Reports of the Scrutiny Committee shall having regard to the norms and standards for the school as required under the provisions of right of children to free and compulsory education." राईट टू एज्युकेशनमध्ये ज्या शाळांचा समावेश होतो त्या शाळांच्या व्याख्येमध्ये प्रि-प्रायमरी शाळांचा देखील समावेश केलेला आहे. प्रि-प्रायमरी शाळांबाबत कोणतेही नॉर्म्स किंवा कण्डिशन्स राईट टू एज्युकेशनमध्ये नमूद केलेल्या नाहीत. आयसीएसई, सीबीएसई किंवा एसएससी यापैकी कोणत्याही बोर्डाच्या प्रि-प्रायमरी शाळांबाबतच्या अटी व शर्तींचा उल्लेख केलेला नसल्यामुळे मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात याबाबत खुलासा करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, शेडयुल्ड ए मध्ये शाळांचे इन्फ्रास्ट्रक्चर कसे असावे, इमारत कशी असावी, जमीन किती असावी याबद्दल मार्गदर्शन केलेले आहे. त्याचबरोबर शिक्षकांचा दर्जा देखील महत्वाचा आहे. दर्जेदार शिक्षण असणे हे देखील तेवढेच महत्वाचे आहे. निश्चित चांगले इन्फ्रास्ट्रक्चर असलेल्या संस्थांना अनुमती दिली पाहिजे. त्याचबरोबर शिक्षकांचा दर्जा चांगला नसेल तर त्या शाळांमधील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळणार नाही. Girls common room कम्पलसरी असावे. या ठिकाणी कुठेही या संदर्भात उल्लेख केलेला नाही.

सभापती महोदय, प्रत्येक शाळांना वेबसाईटचे ऑप्शन दिले तर त्या शाळा शासनाच्या पर्व्ह्यूमध्ये राहतील. एआयसीटीईच्या नॉर्म्समध्ये ही तरतूद केलेली आहे. परंतु शासनाने जरुर हा ऑप्शन ठेवावा. त्याचबरोबर असेम्ब्ली हॉल किंवा ऑडिटोरियमच्या संदर्भात सुध्दा ऑप्शन असणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 4 वर मुद्दा क्रमांक 4 मध्ये सूचना केली आहे त्याबद्दल खुलासा होणे आवश्यक आहे. एण्डाऊमेंट फंडाची तरतूद केलेली आहे. एन.एस.सी. आणि





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे..........

फिक्स डिपॉझिटच्या माध्यमातून शासनाकडे संस्थेच्या नावाने ठेव ठेवावी लागणार आहे. त्या ठेवीवरील व्याज संस्थेच्या नावे जमा होणार आहे की शासनाला वा बोर्डाला मिळणार आहे या संदर्भात खुलासा व्हावा एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

----

..3..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 7, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, गरीब विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षणाची दरी निर्माण करणारे हे विधेयक आहे असे मला वाटते. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवणार आहात काय अशी शंका माझ्या मनात निर्माण झाली आहे. नवीन प्राथमिक वा माध्यमिक शाळा स्थापन करण्यासाठी 2 लाख रुपये फी घेतली जाणार आहे. माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा मांडला आहे. ही 2 लाख रुपये फी रिफण्डेबल आहे की कायमस्वरुपी म्हणून घेतली जाणार आहे? जर कायमस्वरुपी म्हणून 2 लाख रुपये फी घेतली जाणार असेल तर ते चुकीचे आहे. शासनाने शिक्षणावर खर्च करण्यापेक्षा शिक्षण क्षेत्रातून पैसा मिळविण्याचा धंदा सुरु केला आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. शासनाने हे उत्पन्न मिळविण्याचे दुकान सुरु केले आहे.

सभापती महोदय, दर्जेदार शिक्षणाच्या गोष्टी शासन करते. माझे चुकत नसेल तर शासन बजेटमधील 6 टक्के रक्कम शिक्षण क्षेत्रावर खर्च करीत आहे. परंतु शासनामार्फत ज्या शाळा चालविल्या जात आहेत त्या शाळामधील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी या विधेयकामध्ये तरतूद केलेली आहे का? शासन लोकांकडून कर रुपाने पैसा वसूल करते आणि शिक्षण क्षेत्रावर मोठया प्रमाणात निधी खर्च करते. परंतु हा निधी खर्च करुनही शिक्षणाचा दर्जा वाढविण्यामध्ये, चांगले इन्फ्रास्ट्रक्चर तयार करण्यामध्ये गेल्या 50 वर्षाच्या काळात शासनाला यश आलेले नाही.

सभापती महोदय, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी झाडाखाली शाळा सुरु करुन बहुजन समाजातील मुलांना शिक्षण देण्याचे काम केले. त्या काळात इन्फ्रास्ट्रक्चर नव्हते, शाळांसाठी टॉयलेटची सुविधा नव्हती. तरी देखील बहुजन समाजाच्या मुलांना शिक्षणाची संधी मिळाल्यामुळे ते आज मोठमोठ्या पदावर विराजमान झालेले आहेत.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, शासनाने शिक्षण क्षेत्रात दरी निर्माण करणारे विधेयक आणलेले आहे. गरीब कुटुंबातील मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागणार आहे. या विधेयकामध्ये नवीन शाळा मंजूर करण्यासाठी ज्या अटी नमूद केलेल्या आहेत त्या विचारात घेतल्या तर नवीन शाळा उघडण्यासाठी आर्थिकदृष्टया संपन्न असणाऱ्या शिक्षण संस्था

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील............

हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या आहेत. मी या सभागृहात अनेकदा विनाअनुदान तत्वावर शाळा मंजूर करण्याची मागणी केली. माझ्या शिक्षण संस्थेमार्फत मी 40 शाळा चालवितो. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी माझ्या शिक्षणसंस्थेच्या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. आमच्या शिक्षण संस्थेच्या 20 ते 25 शाळांचा निकाल 100 टक्के लागतो. सर्व शिक्षकांना आमच्या संस्थेमार्फत वेतन दिले जाते. सर्व शाळा आदिवासी आणि डोंगरी भागात सुरु केलेल्या आहेत. पनवेल, अलिबाग येथे शाळा सुरु केलेल्या आहेत. ज्या ठिकाणी शाळा काढण्यास परवानगी मिळाली तेथे शासनाकडून अनुदान मिळू शकते. परंतु मी ध्येयवेडा आहे.

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

मी जास्तीत जास्त शाळा ग्रामीण भागात तसेच डोंगरी भागात काढलेल्या आहेत. माझ्या 20 ते 25 शाळांचा निकाल नेहमी 100 ते 90 टक्के लागत असतो. मुलांना सर्व सुविधा देण्याचा मी नेहमी प्रयत्न करीत असतो. जर माझ्या सारखा माणूस विद्यार्थ्यांना सर्व सुविधा देऊ शकतो तर शासन तशा प्रकारचा प्रयत्न का करु शकत नाही ? विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सर्व सुविधा का देऊ शकत नाही ? शिक्षणाच्या बाबतीत आपले राज्य कोठे चालले आहे ? स्व.यशवंतराव चव्हाणांनी आपल्या जे अभिवचन दिलेले होते त्या अभिवचनापासून आपले राज्य दूर चालले आहे हे आपले दुर्दैव आहे.

सभापती महोदय, आपण या राज्यामध्ये जवळ जवळ 1300 शाळा विनाअनुदान तत्वावर चालवित आहोत. या शाळांना कोणत्याही प्रकारची ग्रँट दिली जात नाही. या शाळा काढल्या नसत्या तर हे विद्यार्थी कोणत्या शाळेत गेले असते ? ज्या ग्रँटेबल शाळा आहेत त्या शाळांमध्ये हे विद्यार्थी गेले असते, त्या शाळेतील शिक्षकांना आपण परवानगी दिली असती व त्यांना पगारही दिले असते. परंतु हे सूत्र आपण मान्यच करीत नाही. या ग्रँटेबल शाळांना तुम्हाला तुकडयाही वाढवून द्याव्या लागल्या असत्या. शिक्षणाच्या संदर्भात आपण जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहात हे यावरुन स्पष्ट होते.

सभापती महोदय, हे बिल आणण्यापूर्वी विनाअनुदान तत्वावरील शाळांचे तुम्ही काय करणार आहात याची माहिती आम्हाला मिळण्याची आवश्यकता आहे. आपण जे काही करीत आहात ते ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी मुळीच करीत नाहीत. कारण ग्रामीण भागातील संस्था 2-3 लाख रुपये भरुच शकत नाही. त्यामुळे माझी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, या बिलाच्या माध्यमातून आपण जी फी मागितलेली आहे ती रद्द करावी. सन्माननीय सदस्य श्री. निरंजन डावखरे बोलले त्या प्रमाणे हे पैसे जॉईंट अकौंटमध्ये ठेवले पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो. हे बिल संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे अशी मागणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी केली होती व आपल्या सर्वांनी हे बिल संयुक्त समितीकडे पाठविले. संयुक्त समितीमध्ये काम करणाऱ्या सर्व सन्माननीय सदस्यांना मी धन्यवाद देतो. संयुक्त समितीमधील सन्माननीय सदस्यांनी जवळपास 70 टक्के आक्षेपार्ह मुद्दे वगळयाचे काम केलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

या बिलामध्ये ज्या जाचक अटी आहेत त्या वगळण्यात याव्यात तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण कसे देता येईल याबाबतीतील ठोस भूमिका माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी अशी मागणी करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम (विधानसभेने निवडलेले ) : सन्माननीय सभापती महोदय, सन 2012 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 7 महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित तत्वावर शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक, 2012 मध्ये शाळांचा दर्जा वाढविण्याची तरतूद करणे, नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेचा दर्जा वाढ करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी आणि प्रमाणके ठरविणे, दान निधी निर्माण करणे व या करिता त्यांच्या संबंधित किंवा तदनुषंगिक बाबीसाठी योग्य त्या तरतुदी करण्याकरिता हे विधेयक येथे आणलेले आहे.

सन्माननीय सभापती महोदय, मला सर्वात प्रथम माननीय मंत्रीमहोदयांच्या लक्षात एक बाब आणून द्यावयाची आहे की, राज्याचा शैक्षणिक विकास म्हणजेच सर्वांगीण विकास असे आपण म्हणत असतो. शिक्षणाचा विकास करण्यासाठी उद्योगाच्या तत्त्वानुसार शैक्षणिक बाजार आपण मांडलेला आहे की, काय असा या बिलातून अर्थ निघत आहे असे मी म्हणेन. याचे कारण असे आहे की, शासन एका बाजूला सांगते की, शैक्षणिक विकासासाठी आमच्याकडे पैसा नाही. तुम्हीच शाळा काढा, तुम्हीच पैसे जमा करा, तुम्हीच शिक्षकांचे पगार द्या आणि शिक्षणाचे जे काही आहे ते तुम्हीच बघा असा स्पष्ट संदेश या बिलामध्ये आहे. शिक्षणाच्या मुलभूत हक्कावर गदा आणणारे हे विधेयक आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. हे बिल संयुक्त समितीमध्ये गेले होते त्या संयुक्त समितीचा अहवाल माझ्या हातामध्ये आहे. एक गोष्ट मला समजत नाही की, एका बाजूला राज्यावर 2 लक्ष 80 हजार कोटी रुपयांचे कर्ज असून या कर्जामुळे राज्य कर्जबाजारी झालेले आहे. राज्याच्या तिजोरीमध्ये खडखडाट आहे. यासंदर्भात श्वेत पत्रिका काढावी अशी आमची मागणी होती. सिंचनाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनीच सर्व बाबी आपल्या समोर आणल्या . कॅगचा अहवाल माननीय मुख्यमंत्र्यांनीच बाहेर काढला होता. व त्यानंतर सिंचनाचा मुद्दा आला, श्वेतपत्रिका आली व त्यानंतर आम्ही सिंचनाच्या संदर्भात एसआयटीची मागणी केली.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माझी मागणी अशी आहे की, शिक्षणाच्या संदर्भात आता पहिल्यांदा श्वेत पत्रिका निघाली पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो. माननीय मंत्रीमहोदयांना मी विचारु इच्छितो की, ग्रामीण भागातील संस्था 2 एकर जमीन कोठून आणू शकणार आहेत, ग्रामीण भागातील संस्था 2-3 लाख रुपये कोठून आणणार आहेत ? ग्रामीण भागातील मुलांचे शिक्षण होऊ नये अशी आपली इच्छा आहे काय ? नगरपालिका,

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

महानगरपालिकेत आपल्या सारखी जी मंडळी आहेत ते 2-3 लाख रुपये देऊ शकतील. आमदार, खासदार सुध्दा शैक्षणिक संस्था काढू शकतील. परंतु या बिलाच्या माध्यमातून आपण महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शैक्षणिक विकास कसा करु शकणार आहात ? या बिलाच्या माध्यमातून या ठिकाणी काही गोष्टींचा खुलासा होणे अत्यंत आवश्यक आहे. संपूर्ण देशातील 35 राज्यांमध्ये शिक्षणाच्या संदर्भात आपल्या राज्याचा अगोदर 13 वा क्रमांक होता परंतु आता आपण 13 क्रमांकावरुन 17 व्या क्रमांकावर गेलेलो आहे. प्राथमिक शिक्षणाच्या एकत्रित पध्दती अहवालात यासंदर्भातील माहिती देण्यात आलेली आहे. शिक्षण विभागाचे मुख्य सचिव श्री. ज.स.सहारिया यांनी यासंदर्भात माहिती दिलेली आहे. आपल्या राज्याचे उदाहरण घेत असतांना शिक्षणाच्या संदर्भात संपूर्ण देशात आपला ज्यावेळेस 17 वा क्रमांक येतो त्यावेळेला आपले राज्य शिक्षणामध्ये किती पुढे आहे हे स्पष्टपणे दिसून येते.

यानंतर श्री. ओटवणेकर....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, उच्च शिक्षणाचा दर्जा आपल्या डोळ्या समोर आणावा. उच्च शिक्षणाचा दर्जा हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा केला पाहिजे. तंत्र शिक्षण संचालनालयातील अहवालाच्या शिफारशी आपण पाहिल्या तर असे दिसून येईल की, अमेरिका, कॅनडा, चीन या देशांच्या तुलनेत भारत देश शिक्षणात खूपच मागे आहे. 142 देशात आपल्या देशाचा 87 वा क्रमांक लागतो. त्यावरून शिक्षणामध्ये आपण किती पुढे आहोत हे दिसून येते. 142 देशात आपल्या देशाचा 87 वा क्रमांक लागतो हे माननीय मंत्री श्री.दर्डा साहेब आणि केंद्र शासनाला भूषणावह वाटत असेल तर स्वत:ची पाठ स्व:त थोपटून घेण्यास आमची काहीही हरकत नाही. त्यामुळे येथे काही गोष्टी स्पष्ट होणे अत्यंत आवश्यक आहे, असे मला वाटते.

आपण शिक्षणाच्या दर्जाचा देखील विचार केला आहे. आताच आमचे माननीय उप सभापती श्री.वसंत डावखरे यांनी काही गोष्टी स्पष्ट केल्या आहेत. त्यांनी सांगितले की, शिक्षकांचा दर्जा देखील अत्यंत चांगला असणे आवश्यक आहे म्हणजे शैक्षणिक दर्जा अधिक उंचावेल. माझे स्पष्ट मत असे आहे की, आज जो शिक्षणाचा दर्जा खाली आला आहे त्याला जबाबदार आम्ही आहोत, शासन आहे, श्री.दर्डा साहेब आपण आहात. कोळसा कितीही उगाळला तरी तो काळाच. मला त्या गोष्टीमध्ये जायचे नाही.

श्री.विनोद तावडे : कोळसा शब्द आपण उच्चारू नये.

श्री.रामदास कदम : तो शब्द मी मागे घेतो.

श्री.राजेंद्र दर्डा : तो शब्द आपण मागे घेऊ नये.

श्री.रामदास कदम : धन्यवाद. मी आपला आभारी आहे. मी एक उदाहरण दिले. मला त्या कोळशाकडे जायचे नाही. आपल्याला शैक्षणिक दर्जा उंचवायचा असेल तर उठसूठ कुठल्याही कामाला शिक्षकांना जुंपता कामा नये. पोलिओ डोस, एडस दिन, साथीचा रोग आटोक्यात आणण्यासाठी शिक्षकांना राबविण्यात येत आहे. शाळाबाह्य मुले आढळली की, प्रत्येक घरात जाऊन मुलांना आणण्याचे काम शिक्षकांना देत आहोत. झाडे लावणे, जनावरांची जनगणना करणे, माणसांची जनगणना करणे, निवडणुकीची कामे, भात शिजवून देणे, शौचालये बांधले आहे किंवा नाही याची पाहणी करणे, अशा प्रकारची अनेक कामे आपण शिक्षकांना करायला सांगत असतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

त्याच शिक्षकांना आपण सांगतो की, शिक्षणाचा दर्जा चांगला ठेवावा. या सगळ्या कामातून शिक्षकांना वेळ मिळाला तरच ते शिक्षण देतील. या बिलाद्वारे शिक्षणाचा दर्जा वाढविला पाहिजे असे आपण सांगत आहात त्यावेळी शिक्षकांवर ही जी अतिरिक्त कामाची बंधने टाकली आहेत ती काढून घेत आहोत अशा प्रकारची घोषणा येथे केली जाईल काय ? यापुढे हे शासन शिक्षकांना शिक्षणा शिवाय इतर कुठलेही काम देणार आहे असे सांगणार आहे काय ? तसे जर नसेल तर मग ही बिले आणण्याची नाटके कशाला करता ? येथे बिल आणून चर्चा करून ती बहुमताच्या जोरावर आपण पास देखील करून घेत आहात. आपण जर घोषणा केली तरच हे विधेयक एकमताने मंजूर होईल. ...... (अडथळा) ...... मी अतिशय गांभीर्याने मंत्रिमहोदयांना सांगत आहे की, आपल्यामध्ये खऱ्या अर्थाने शिक्षणाची चाड असेल, शिक्षणाचा दर्जा वाढवायचा असेल तर शिक्षकांना अतिरिक्त कामे देता कामा नये.

या बिलामध्ये शिक्षणाचा दर्जा वाढविण्याचा उल्लेख केला आहे. या बिलासंबंधी आपण गंभीर असाल तर आपण सांगावे की, रामदास कदम आपण ज्या ज्या गोष्टी आता येथे वाचून दाखविल्या त्यापैकी एकही काम आता यापुढे शिक्षकांना दिले जाणार नाही. ओठात एक आणि पोटात एक असता कामा नये. तेव्हा यासंबंधी शासनाची भूमिका अत्यंत स्पष्ट होणे आवश्यक आहे, अत्यंत गरजेचे आहे. बैलाच्या घाण्याला जुंपल्या सारखे शिक्षकांना शासकीय कामांना जुंपतो व त्यांच्याकडून शिक्षणाचा दर्जा वाढविण्याची अपेक्षा करीत आहोत. ही गोष्ट होणारच नाही. तेव्हा आजच याबाबत शासनाने निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

6 ते 14 वयोगटातील मुलांना मोफत शिक्षण देणार आहात. सार्वजनिक शिक्षण ही मृत्यूची घंटा कशी आहे ते देखील मी सांगणार आहे. 14 वर्षा पर्यंतच्या सर्व मुलांच्या नोंदी ठेवणे व शाळाबाह्य मुलाला शाळेत आणणे, गरजेनुसार वर्ग शाळा सुरू करणे आणि गुणवत्तापूर्वक शिक्षण देणे, या सगळ्या बाबीबाबत आपण कोणता निर्णय घेणार आहात त्याचा खुलासा आपल्या उत्तराच्या भाषणात देखील करावा.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्तव्य असल्याचे सन 2009 चा शिक्षण हक्क कायदा सांगतो. एका बाजूला आपण शिक्षण कायदा स्वीकारतो आहोत. त्याची अंमलबजावणी कधी होणार आहे हे देखील स्पष्ट होणे आवश्यक आहे. केंद्र शासनाचा सन 2009 चा शिक्षण कायदा आपण स्वीकारला आहे काय ? हा कायदा देशातील सर्व राज्यांना बंधनकारक आहे. असे असताना या कायद्याची अंमलबजावणी करण्याचे काम कधी पासून करणार आहात ? कारण त्यामध्ये ह्या सगळ्या बाबी आहेत. हे देखील स्पष्ट होणे अत्यंत गरजेचे आहे. आम्ही या अधिवेशनामध्ये शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी, शाळा वाढविण्यासाठी हा कायदा मंजूर केला असे सांगाल. पण या आधी जे कायदे केले त्याबाबत आपली नेमकी भूमिका काय आहे. केंद्र सरकाराने सन 2009 चा कायदा केला त्याबाबत आपली नेमकी भूमिका काय आहे ? त्याची अंमलबजावणी आपण कधी पासून करणार आहात ? मला वाटते त्याचा निर्णय आधी यायला पाहिजे होता आणि मग हा कायदा महाराष्ट्राच्या जनते समोर, विधि मंडळासमोर आणला पाहिजे होता. तेव्हा या संबंधी आपली नेमकी भूमिका काय आहे, ते स्पष्ट होणे अत्यंत आवश्यक आहे. गरजेचे आहे. अंमलबजावणीसाठी दरवर्षी घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्याचे बंधन राज्य शासनावर आहे. सभापती महोदय, अनेक मुद्यांवर बोलायचे आहे.

**उप सभापती** : आपले भरपूर मुद्दे असले तरी हे विधेयक संयुक्त समितीकडे जाऊन आलेले आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, संयुक्त समितीकडून हे विधेयक आले असले तरी त्यात काही त्रुटी असतील तर त्या मांडल्या पाहिजेत. केंद्र सरकारने सन 2009 मध्ये कायदा केला होता. त्यासंबंधी संयुक्त समितीच्या अहवालामध्ये काहीच उल्लेख नाही.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, माझी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना विनंती आहे की, जे विधेयक आहे त्यावर ते अधिक बोलू शकले तर चांगले होईल. मी सन्माननीय सदस्यांची तळमळ समजू शकतो. आपण राईट टू एज्युकेशन व शिक्षणाच्या कायद्यासंबंधी बोलला. त्याचा उल्लेख या बिलामध्ये परवानगीसाठी आहे. त्यावर मी बोलणार आहे. माझी एकच विनंती आहे की, राईट टू एज्युकेशन हा वेगळा कायदा आहे. फी नियमन कायदा वेगळा आहे. अनेक वेगवेगळे कायदा आहेत. हा कायदा फक्त परवानगी देण्यासाठी आणि शाळा चालविण्या संबंधातील आहे. तेवढ्यावरच सन्माननीय सदस्यांनी बोलावे अशी माझी विनंती आहे.

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी मर्यादित बोलावे असे माझे म्हणणे आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, विधिमंडळाला आपण कायदे मंडळ म्हणतो. ताक घुसळल्यावर लोणी बाहेर पडते, तसे चर्चा झाल्यानंतर हा कायदा तयार झाला पाहिजे असे माझे प्रामाणिक मत आहे.

यानंतनर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापती स्थानी तालिका सभापती श्रीमती शोभा फडणवीस )**

श्री.रामदास कदम...

ही बाब शिक्षणाची आहे याची मला कल्पना आहे. आपल्याकडे वेळ कमी आहे आणि कमी वेळेत आपणास अधिक काम करावयाचे आहे याची मला कल्पना आहे. माझी आपणास विनंती आहे की, कामकाजासाठी वेळ कमी पडत असेल तर आपण अधिवेशन आणखी आठ दिवस वाढवावे. अधिवेशन वाढविण्यास आपल्याला काय अडचण आहे ? कोणत्याही विधेयकावर दोन्ही बाजूने सविस्तर चर्चा झाली पाहिजे असे माझे मत आहे. माननीय मंत्री महोदय श्री.राजेंद्र दर्डा म्हणाले की, माझ्या प्रत्येक मुद्याला ते उत्तर देणार आहे. मी या ठिकाणी मुद्दे मांडले नाही तर त्यांना उत्तर कसे देता येईल ?

सभापती महोदया, नोंदी ठेवण्याचे बंधन राज्य शासनाच्या 2011 च्या नियमावलीने घातलेले आहे. ही नियमलावली काय सांगते, या नियमावलीची अंमलबजावणी करण्यात आली काय ? जर अंमलबजावणी केली असेल तर माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात तसे सांगावे. सर्वसामान्यांना मूलभूत शिक्षणाचा हक्क देण्याची जबाबदारी राज्य सरकारची व केंद्र सरकारची आहे. आपण फक्त महात्मा फुलेचे नाव घ्यावयाचे, माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांना किती वाईट वाटेल ? सर्वसामान्यांचा शिक्षणाचा मूलभूत हक्क शासन काढून घेत आहे. शाळा चालविण्याची जबाबबदारी शासन खाजगी शिक्षण संस्थावर टाकत आहे. शिक्षणाच्या मूळ गाभ्यावर घाला घालण्याचे काम शासन करीत आहे आणि आम्ही बाबत काही बोलायचे नाही काय ?

सभापती महोदया, आज महाराष्ट्रात जवळपास 2 लाख विद्यार्थी शाळाबाह्य आहेत. या बाबीचा उल्लेख या विधेयकात करण्यात आलेला नाही. या मुलांना शाळेत आणण्यासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहे ? राज्यात जिल्हापरिषदेच्या एकूण 62 हजार 40 शाळा आहेत, नगरपालिकांच्या 1 हजार 453 शाळा आहेत, महापालिकांच्या 144 शाळा आहेत आणि इतर शासकीय विभागांमध्ये 847शाळा आहेत. तर 32 हजार 553 खाजगी शाळा आहेत. आपण नवीन कायदे आणत आहोत. परंतु हे करीत असताना पुढचे पाठ मागचे सपाट अशी स्थिती आहे. मागील काळात शिक्षणासंबंधी जे कायदे केले त्याची अंमलबजावणी कशाप्रकारे करणार आहात याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे. मी मुद्दे सोडून बोलत नाही याची मंत्री महोदयांना

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

कल्पना आहे. मला या मध्ये अजिबात राजकारण करावयाचे नाही. शिक्षण हा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. मुले शाळेत येण्यासाठी शासनाने शाळेत खिचडी देण्यास सुरुवात केली. आज त्या खिचडीची काय अवस्था झाली आहे. खिचडीमध्ये किती भ्रष्टाचार झाला याबाबत मी नंतर बोलणार आहे. खिचडी प्रकरणात सी.बी.आय.ची चौकशी झाली त्यामध्ये दोषी असणाऱ्यांवर कारवाई झाली. पुन्हा त्यांनाच खिचडीचा ठेका देण्यात आला, यामध्ये जवळपास 1 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार आहे. या संदर्भातील कागदपत्रे मी आपणास देईन. ज्यांची सीबीआय चौकशी झाली त्यांनाच पुन्हा ठेका देण्यात आलेला आहे असा एक कलमी कार्यक्रम केला जात आहे. 2 लाख शाळाबाह्य मुलांना शाळेत आणण्यासाठी जो खिचडीचा कार्यक्रम राबविण्यात आला होता तो पूर्णत: फसलेला आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदया, माझी आपल्यामार्फत सन्माननीय सदस्य श्री.रामदास यांना माझी विनंती आहे की, पुरवणी मागण्यांच्या चर्चेच्या वेळी त्यांना या विषयावर बोलता येईल. आजचा विषय मर्यादित आहे. ज्या विषयावर हे विधेयक आणण्यात आले आहे त्यावर त्यांनी भाष्य केल्यास त्या विषयाला अधिक न्याय मिळेल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदया, मी विधेयकाच्या बाहेर जाऊन बोलत नाही आणि बोलणार देखील नाही. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, मी जुनी अकरावी इयत्ता पास झालो आहे. मी पाटकर कॉलेजमध्ये पुढील शिक्षणासाठी फॉर्म भरला होता, परंतु माझ्याकडे 100 रुपये नसल्यामुळे मला ॲडमिशन मिळाले नाही. आज माझ्या स्वत:च्या संस्था आहेत, माझ्या हायस्कूल्स आहेत. माझे डेन्टल कॉलेज आहे. माझ्या कॉलेजमध्ये डोनेशन घेतले जात नाही. माझ्या हायस्कूल्समध्ये एकही पैसा न घेता मोफत शिक्षण दिले जाते. ग्रामीण भागात 80-80 कि.मी. अंतरावर मी शाळा बांधल्या आहेत. मी या ठिकाणी जबाबदारीने बोलत आहे. बाळंतणीचे दु:ख बाळंतणीला माहीत असते. मी विधेयकाच्या बाहेर जाऊन बोलत नाही. मी अकारण सभागृहाचा वेळ घेणार नाही. पण या ठिकाणी विधेयक चर्चेला येते त्यावर सविस्तर चर्चा झाली पाहिजे. कारण

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

एकदा हे विधेयक मंजूर झाल्यानंतर त्यावर आम्हाला बोलता येणार नाही. आपणास हे विधेयक लवकर मंजूर करण्याची घाई आहे याची मला कल्पना आहे. आम्हाला फक्त विधेयकावर मनसोक्त बोलता येते. मी विषयाच्या बाहेर जाऊन बोलत नाही.

सभापती महोदया, या पुढे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळेल किंवा कसे अशी माझ्या मनात शंका आहे. माझ्याकडे 100 रुपये नव्हते म्हणून मला पुढील शिक्षण घेता आले नाही. तेव्हा यापुढे दुसरा रामदास कदम होऊ नये यासाठी शासन जबाबदारी घेणार आहे काय ? शासन शिक्षणाचा बाजार मांडत आहे. शासन स्वत:ची जबाबदारी खाजगी शिक्षण स्ंस्थांवर टाकत आहे.

सभापती महोदया, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे पालन होते काय ? ही जबाबदारी कोणावर आहे ? आपण या संबंधातील कायदे केलेले आहेत परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही.

सभापती महोदया, खाजगी संस्थांच्या शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी सहाय्यभूत घटक्ांचा पुरवठा करण्यात येईल असे नमूद करण्यात आलेले होते. आपण त्यांना कोणते सहाय्यभूत पुरवठा केलेला आहे हे सांगावे. आपण दर्जा वाढविण्यासाठी कायदा केला, पण त्याची अंमलबजावणी होते काय ? या कायद्यामुळे एक गोष्ट स्पष्ट होणार आहे की, यापुढे शाळांना अनुदान मिळणार नाही. सरकारचे पुढचे पाऊल काय असणार आहे हे न ओळख्ण्यापुरते आम्ही दूधखुळे नाही. आतापासूनच शासन प्राथमिक शाळांपासून सर्व गोष्टी खाजगीमध्ये घ्या असे सांगत आहे. शासन खाजगी संस्थांना सांगत आहे की, आपणच शाळा काढा, आपणच जमीन घ्या, आपणच शाळा बांधा आणि आपणच शिक्षकांना पगार द्या. तेव्हा यापुढे काय होणार याची आम्हाला कल्पना आहे. तसे नसेल तर माननीय मंत्री महोदयांनी येथे सांगावे की, ज्या शाळांना अनुदान मिळत नाही त्यांना अनुदान देण्यात येईल काय ? शासनाकडे पैसे नाही तर अनुदान कोठून देणार ? आता पुन्हा शासन 10 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढत आहे. सात हजार कोटी रुपये कर्ज काढले ते व्याजापोटी खर्च झालेले आहेत. तिजोरीमध्ये खडखडाट आहे. युतीच्या शासनाने कर्ज काढले तेव्हा आपण निवडणुकीत ढोल वाचवून सांगितले की, युती शासनाने तिजोरी लुटली.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्यासाठी जवळपास 400 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. आपल्याकडे शिक्षणासाठी पैसे नाहीत, परंतु सिंचनासाठी आहेत.

सभापती महोदया, या विधेयकाच्या माध्यमातून माझी आपल्यामार्फत मंत्री महोदयांना विनंती आहे की, कोकणासाठी एक स्वतंत्र विद्यापीठ द्यावे. आपण कोकणातील शाळांचा निकाल पाहिला तर महाराष्ट्रामध्ये कोकण पहिल्या क्रमांकावर आहे.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम......

10 वी आणि 12 वीकरिता नव्याने स्थापन झालेल्या माध्यमिक परिक्षा मंडळाच्या कोकण विभागाने आघाडी घेऊन एकापरीने राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये आपण कोठेही कमी नसल्याचे दाखवून दिले आहे. या विधेयकाच्या निमित्ताने कोकणासाठी मागणी आहे की, आपण कोकणासाठी आजच एक स्वतंत्र विद्यापीठ मंजूर करावे व तशी घोषणा करावी अशी मी या ठिकाणी मागणी करतो.

सभापती महोदया, आपण शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी कायदा करीत आहात त्यावेळी शाळेच्या दर्जा बाबत काय? शाळेचे बांधकाम चांगले असून चालणार नाही तर त्या शाळेमध्ये चांगली स्वच्छतागृहे असली पाहिजहेत, मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे असली पाहिजेत. सन 2009 च्या अधिनियमामध्ये व कायद्यामध्ये हेच अभिप्रेत केले आहे. मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे असली पाहिजेत व त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची सोय असली पाहिजे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना हात जोडून विनंती करीत आहे की, आपण या ठिकाणी चांगले विषय मांडले आहेत. आज दुपारी मागण्यांवरील चर्चेच्यावेळी आपण या विषयावर बोलू शकता. मी या सभागृहामध्ये मांडण्यात आलेल्या सर्वच प्रश्नांना उत्तर देणार आहे. वेळ कमी आहे आणि माननीय विरोधी पक्षनेत्यांना देखील या विधेयकावर बोलावयाचे आहे. तेव्हा या विधेयकावरील भाषण आपण लवकर संपवावे अशी माझी विनंती आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदया, सुप्रिम कोर्टाने 6 महिन्यांची मुदतवाढ दिली आहे हे विधान मी या ठिकाणी जबाबदारीने करीत आहे. राज्य घटनेच्या अनुशेष 21(अ) मध्ये म्हटले आहे. 14 वर्षेपर्यंतच्या सर्व मुलांना सक्तीचे मोफत शिक्षणाचा हक्क नाकारणे ही घटनेची पायमल्ली होत असल्याचे सुप्रिम कोर्टाने म्हटले आहे. या करिता आपण हा नवीन कायदा करीत असतांना केंद्र सरकारच्या सन 2009 च्या कायद्याच्या अनुषंगाने ज्यावेळी न्यायालय आपल्याला चपराक मारते त्यावेळी हे राज्य सरकार सुध्दा न्यायालयाचे ऐकत नाही. वेळ कमी आहे याची मला कल्पना आहे म्हणून मी काही महत्वाचे मुद्दे मांडीत आहे. सभापती महोदया, मी या विधेयकाच्या बाहेर जाऊन सभागृहाचा वेळ घेणार नाही..

**तालिका सभापती (श्रीमती शोभा फडणवीस)** : हे विधेयक संयुक्त समितीकडून आले आहे.

श्री. रामदास कदम : परंतु संयुक्त समितीमध्ये या गोष्टींचा ऊहापोह झालेला नाही. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

संयुक्त समितीचा अहवाल माझ्याकडे आला आहे तो मी दोन वेळा वाचून काढला आहे त्याबद्दल माझे दुमत नाही. परंतु नवीन शैक्षणिक कायदा करीत असतांना या पूर्वीच्या कायद्यातील तरतुदींचे काय झाले त्याबाबत उल्लेख करणे चुकीचे वाटत असेल तर मी खाली बसतो. या अनुषंगाने मला एक गोष्ट समजली पाहिजे की, न्यायालयाने आपल्याला सहा महिन्यांची मुदत दिली आहे त्यामध्ये राज्य घटनेच्या अनुशेष 21 (अ) अन्वये त्याची अंमलबजावणी आपणाकडून केव्हा होणार आहे त्याबाबतचा उल्लेख आपल्या उत्तराच्या भाषणामधून होणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, सर्व मुलांना शाळेमध्ये शिक्षण घेण्यासाठी प्रवेशाची हमी देण्याची भूमिका घेणार काय? आज आपण मुंबईमध्ये जाऊन पहा. कोणत्याही शाळेत मिनी के.जी. पासून ते सिनियर के.जी. पर्यंत प्रवेशासाठी एक-एक लाख रुपये दिल्याशिवाय मुलांना प्रवेश मिळत नाही. त्याबाबत या विधेयकामध्ये कोठेही उल्लेख नाही. एक-एक लाख रुपये घेऊन मुलांना प्रवेश देण्याचा व्यवसाय या शैक्षणिक संस्था करीत असतील तर त्याबाबत आपण कठोरपणे निर्णय केव्हा घेणार आहात, अशा शाळांची मान्यता आपण रद्द करणार की नाही, त्याबाबतचा उल्लेख या विधेयकामध्ये करण्यात आलेला नाही तर मग त्यावर बोलावयाचे नाही काय? सभापती महोदया, सर्वसामान्य गरीब माणूस असेल, मागासवर्गीय माणूस असेल, आदिवासी असेल तो दिवसभर कष्ट करुन संध्याकाळी हातामध्ये 100 रुपये पडल्यानंतर त्याची चूल पेटते व पोटातील आग विझते. त्या कष्टकऱ्याने आपल्या मुलाला शाळेत प्रवेश घेण्यासाठी 1 लाख रुपये कोठून आणावयाचे, या मुलांनी दर्जेदार शिक्षण घ्यावयाचे नाही काय, हे शिक्षण फक्त श्रीमंतांच्या मुलांसाठी आहे काय?

सभापती महोदय, राज्य शासन आणखी एक नवीन कायदा करीत असून त्यामध्ये ज्यांचे मासिक उत्पन्न 700 रुपये असेल ते कुटुंब दारिद्रय रेषेच्या बाहेर समजले जाईल. त्यामुळे या विधेयकामध्ये शिक्षणाच्या दर्जाचा उल्लेख केला असल्यामुळे त्या संबंधी स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये मला ते ऐकावयास मिळेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. या दर्जाची तहान भागवावयाची असेल तर कायद्याने 6 ते 14 वयोगटातील प्रत्येक मुलाला शिक्षणाचा हक्क दिला आहे. केंद्र सरकारच्या सन 2009 च्या कायद्यातील कलम 8 नुसार गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या हक्काचा कायदा असून केवळ शिक्षणाच्या हक्काचा कायदा नाही. गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या कायद्याची अंमलबजावणी कधी करणार आहात याचे उत्तर मला मिळाले पाहिजे. आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

या ठिकाणी फक्त दर्जेदार शिक्षण देणारा शब्द वापरला आहे. परंतु केंद्र सरकारच्या सन 2009 च्या कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी आपण कधी करणार आहात? त्याबाबतची भूमिका स्पष्ट होणे आवश्यक आहे असे मला वाटते.

कलम 29 मधील तरतुदीनसार प्रत्येक बालकाला केंद्रीय पध्दतीने कृतीशील शिक्षण मिळाले पाहिजे अशाप्रकारची तरतूद सन 2009 च्या कायद्यामध्ये आहे. तर मग केंद्र सरकारच्या या कायद्याची अंमलबजावणी आपण कधी करणार आहात, हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. हे विधेयक केवळ अशापध्दतीने या ठिकाणी मंजूर करुन चालणार नाही. परंतु अशापध्दतीने शिक्षणाचा मूलभूत हक्क आमच्याकडून हिरावून घेतला जात असेल, केंद्रशासनाने कायदा करुन देखील राज्य सरकार त्याची अंमलबजावणी करीत नसेल, केंद्र शासन तुमच्या कानफटात देत आहे, आदेश देत आहे आणि तरी सुध्दा त्याची अंमलबजावणी होत नसेल तर हा कायदा आपण कशासाठी आणीत आहात हे स्पष्ट होणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, मंत्रीमहोदयांना मी विचारु इच्छितो की, शिक्षक हे ज्ञान केंद्र व संस्कार केंद्र व्हावे असे आपण एकेठिकाणी म्हणाला होता. आपल्या भाषणातील मोठ-मोठी वाक्ये टाळया घेण्यासाठी ठीक आहेत. परंतु त्याची अंमलबजावणी केव्हा करणार आहात, आपले विचार चांगले आहेत परंतु दुर्देवाने आपल्याकडे शिक्षणासाठी निधी नाही. आपल्याकडे फक्त औषध खरेदीसाठी निधी आहे या बाबत मी पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये माझे विचार मांडणार आहे. औषध खरेदीमध्ये किती भ्रष्टाचार होत आहे, शैक्षणिक साहित्य खरेदीमध्ये किती भ्रष्टाचार होत आहे यावर मी बोलणार आहे. तेव्हा शिक्षणासाठी आपण हा निधी कोठून आणणार आहात, कधी आणणार आहात, किती आणणार आहात, त्याबाबत कॅबिनेटमध्ये केव्हा निर्णय होणार आहे, त्याकरिता आपण आपले वजन त्या ठिकाणी वापरणार आहात काय? हे आपण या ठिकाणी स्पष्ट करावे. आपल्याला कोणतेही सोंग करता येते परंतु पैशाचे सोंग करता येत नाही. आपण नेहमी चांगले बोलता, चांगली भाषणे करता, तुमच्या हेतूविषयी माझ्या मनामध्ये अजिबात शंका नाही. परंतु तुमच्याकडे पैसे नाहीत तर तुम्ही काय करणार? मागासवर्गीय, आदिवासींकडे बोट दाखवून तो पैसा आपल्याकडे वळवावा.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

आता पुन्हा ते दहा हजार कोटी रुपये खर्च करणार आहेत. आपण त्याकडे लक्ष ठेवावे. त्या दहा हजार कोटी रुपयांपैकी एखादा हजार कोटी रुपये मिळतात का ते पहावे. ते मिळाले तर काही अंशी शिक्षणाचा प्रश्न सुटेल असे मला वाटते.

शिक्षण हा धंदा नव्हे तर धर्म आहे आणि या धर्माचे आचरण झाले पाहिजे असे मला वाटते. आपण या बिलान्वये शिक्षणाचा धंदा करण्यासाठी निघाला आहात. सभापती महोदया, मी पुन्हा अतिशय जबाबदारीने बोलतो की, शिक्षण हा धंदा नव्हे, शिक्षण हा धर्म आहे आणि या धर्माचे आचरण शासन करणार आहे की नाही असा मी पुन्हा माननीय मंत्री महोदयांना प्रश्न विचारत आहे. घराला घरपण आणि गावाला गावपण देणे हे खऱ्या अर्थाने शिक्षकांचे काम असते. पण दुर्दैवाने ते आता होत नाही याची खंत देखील निश्चितपणे आपल्या मनामध्ये आहे. माननीय मंत्री महोदय, शिक्षक हे विद्यार्थ्यांमध्ये संस्कृतीचे व संस्काराचे रंग भरण्याचे काम करतात असे देखील आपण एका ठिकाणी म्हटले होते. आपले शब्द मी आपल्यालाच सांगत आहे. आपण चांगले बोलता पण दुर्दैवाने आपल्याकडून त्याची अंमलबजावणी होत नाही. आपले हातपाय बांधलेले आहेत आणि आपल्याला पळण्यास सांगत आहेत. आपण कसे पळणार आहात याची मला निश्चितपणे जाणीव आहे. पण यासाठी आता आपल्याला वेगळे प्रयत्न करावे लागतील.

सभापती महोदया, मी जास्त वेळ न घेता शेवटचा मुद्दा मांडणार आहे. धर्माच्या आधारे शिक्षण बेकायदा आहे असे न्यायालय सांगते. मतपेट्यांच्या राजकारणासाठी मुस्लीमांचे लांगूलचालन करणाऱ्या केंद्रातील युपीए सरकारला अहमदाबाद न्यायालयाने कानफाटात दिली. यांच्याकडून आपण काही शिकणार की नाही ? आम्हाला मते हवीत. बॉम्बस्फोट करणारे बीडचे, मराठवाड्याचे निघाले. मला बिलाच्या बाहेर जाऊन चर्चा करावयाची नाही पण या अनुषंगाने धर्माच्या आधारे विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची योजना करणे बेकायदा आहे असे जेव्हा न्यायालय सांगते तेव्हा त्यांच्याकडून महाराष्ट्र शासन काही शिकणार आहे की नाही ? या अनुषंगाने आपण काय निर्णय घेणार आहात ? आपण आणखी निर्णय घ्या. निवडणुका आल्या की सच्चर समित्या आणि आणखी काय काढावयाचे ते काढा. परंतु धर्माच्या आधारे शिक्षणाच्या बाबतीत निर्णय घेऊ नका असे जेव्हा आपल्याला न्यायालय सांगते तेव्हा त्या अनुषंगाने आपली नेमकी काय भूमिका असेल ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. रामदास कदम ....

सभापती महोदया गुजरात सरकारने देखील धर्माच्या आधारे शिक्षण देणार नाही अशी भूमिका स्पष्ट केलेली आहे. त्यांच्याकडून आपण काही शिकणार की नाही ? या बाबतीत कच्छ येथील एका काँग्रेस नेत्याने उच्च न्यायालयात अपील केले असता मुख्य न्यायमूर्ती भास्कर भट्टाचार्य यांच्या खंडपीठाने विशिष्ट धर्मासाठी अशा योजना लागू करणे बेकायदेशीर आहे असे सांगितले.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदया, खरे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम हे फार चांगले बोलत आहेत आणि माझी सुध्दा इच्छा आहे की, कदम कदम बढाये जा. त्याच पध्दतीने आपण पुढे गेले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम साहेबांना मी एकच विनंती करतो की, आपण फार चांगले मुद्दे मांडलेले आहेत आणि त्या संदर्भात मला उत्तर देण्याची इच्छा आहे...

**तालिका सभापती (श्रीमती शोभा फडणवीस)** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी आपले भाषण थोडक्यात संपवावे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदया, माझ्या भाषणातील एकही मुद्दा बिलाच्या बाहेरचा असेल तर ते काढून दाखवावे, मी एका मिनिटामध्ये खाली बसतो. आतापर्यंत 23 वर्षामध्ये मी कधीही बिलाच्या बाहेर जाऊन एकही शब्द बोललेलो नाही आणि आताही बोलणार नाही. आपण त्याची चिंता करु नका. या बिलावर बोलण्याचा माझा जो हक्क आहे, जो अधिकार आहे तो कोणीही हिरावून घेऊ शकणार नाही.

सभापती महोदया, मला आणखी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून दिली पाहिजे. इयत्ता आठवीपर्यंत नापास करावयाचे नाही या बाबत फेरविचार करण्याचा निर्णय शासन घेणार होते. हा धोरणात्मक विषय आहे. आठवीपर्यंत नापासच न करण्याचे धोरण सर्वंकष सातत्यपूर्ण मूल्यमापन योग्यरितीने होत नसल्याने अपयशी ठरत आहे ही भूमिका ज्यावेळी शासन समोर ठेवते तेव्हा याबाबत आपली नेमकी भूमिका काय असणार आहे, हे स्पष्ट होणे अत्यंत आवश्यक आणि गरजेचे आहे, असे मला वाटते. आता नवीन कायद्यानुसार एखाद्या शिक्षकाने जर वर्गात एखाद्या मुलाच्या कानफाटात मारली किंवा दम दिला तर त्याला तीन वर्षाची शिक्षा आहे. आपण हा जो कायदा केलेला आहे, जो नियम केलेला आहे त्या संदर्भात बोलत असताना सांगू इच्छितो की, तुम्ही-आम्ही

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. रामदास कदम .....

शाळेमध्ये असताना शिक्षकांनी आपल्याला अक्षरश: बदडले होते. एका बाजूला आपण शिक्षकांना सर्व कामे देतो आणि दुसऱ्या बाजूला जर एखादा विद्यार्थी शिक्षकाच्या तोंडावर थुंकला तर त्या शिक्षकाने असे म्हणावे की, मी महात्मा गांधी आहे, इकडे थुंकलास, आता इकडे सुध्दा थूंक. अशी भूमिका शिक्षकाने घ्यावी का ? विद्यादान करणारा जो शिक्षक आहे, नवीन पिढी घडविणारा जो शिक्षक आहे त्या शिक्षकाला जर तीन वर्षे तुरुंगवास देण्याची शिक्षा करणार असाल तर तो शिक्षक शिक्षण खड्डयात जाऊ दे असेच म्हणणार. तो फालतू वेळ काढील आणि निघून जाईल.

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

सभापती महोदय, आपण माझे मुद्दे ऐकले असाल तर माझा असा विश्वास आहे की, आपण मला शाबासकी द्याल.

**उप सभापती** : मी आपल्याला मघाशीच शाबासकी दिलेली आहे. आज आपण खरोखरच चांगले बोलला.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी एक महत्वाचा मुद्दा मांडलेला आहे की, जर शिक्षकाने एखाद्या मुलावर हात उगारला तर त्या शिक्षकाला तीन वर्षाची शिक्षा आहे. हे कसे काय होऊ शकते ? यामुळे शिक्षण कसे होऊ शकेल ? या बिलामध्ये शिक्षणाच्या दर्जाबाबत उल्लेख केलेला आहे. यामुळे शिक्षणाचा दर्जा चांगला कसा राहणार आहे ? शिक्षक येईल आणि वेळ काढून निघून जाईल. आपल्याला जो शैक्षणिक दर्जा अपेक्षित आहे तो आपल्याला कसा मिळणार ? अशा पध्दतीने कायदे आणून त्या शिक्षकावर सर्व बंदी आणावयाची आणि वरुन या कायद्यामध्ये सांगावयाचे की, दर्जेदार शिक्षण पाहिजे. ते दर्जेदार शिक्षण कसे मिळणार हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

आपण या बिलामध्ये अनावश्यक शब्द घातलेले आहेत. यामध्ये कायद्याला छेद देणारे, शिक्षणाच्या दर्जाला छेद देणारे जे कायदे अगोदर केलेले आहेत त्या कायद्यांची अंमलबजावणी करणार नाही असे स्पष्टीकरण आपण करणार आहात का ? 2009 मध्ये केंद्र शासनाचा शिक्षणाच्या हक्काचा कायदा आला त्यामध्ये जे नमूद केलेले आहे ते आम्ही रद्द करु आणि केंद्र सरकारला कळवू असे काही आपण सांगणार आहात का, निर्णय घेणार आहात का ? तसे काही असेल तर

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. रामदास कदम .....

आम्हाला सांगावे, आम्ही खाली बसतो. पण असे काहीही न होता फक्त आम्ही जे बिल समोर ठेवले आहे त्यावर कमी बोला, खाली बसा, आम्हाला बिल मंजूर करुन द्या आणि निघा, असे असेल तर कसे होणार ? या ठिकाणी आम्ही म-म म्हणण्यासाठी आलो आहोत का ? आम्ही या सभागृहामध्ये म-म म्हणण्यासाठी आलेलो नाही. जी बाब चुकीची आहे ती आपण स्पष्टपणे सांगितली पाहिजे. एखाद्या शिक्षकाने एखाद्या मुलावर हात उचलला तर त्या शिक्षकाला तीन वर्षे तुरुंगामध्ये पाठवावयाचे हे आपल्या मनाला सुध्दा पटणार नाही. त्या शिक्षकाचा हेतू शुद्ध असतो, स्वच्छ असतो. त्या अनुषंगाने आपण नेमका काय निर्णय घेणार आहात या बाबत देखील निर्णय झाला पाहिजे.

सभापती महोदय, ज्यावेळी आपण शाळा बांधतो त्यामध्ये सर्व शिक्षा अभियानातून शासकीय खर्चाने आपण अनेक शाळा ग्रामीण भागामध्ये बांधल्या. पण त्या शाळेमध्ये मागच्या बाजूला कोठेही दरवाजा ठेवलेला नाही. आपण आता जो नवीन कायदा केलेला आहे त्या कायद्याप्रमाणे मुलांच्या सुरक्षिततेसाठी एक सुरक्षित असा दरवाजा असणे आवश्यक आहे, गरजेचे आहे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ D/ KTG/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 12:30

श्री. रामदास कदम...

त्याची अंमलबजावणी केलेली नाही. आपण कायदा केला, परंतु अंमलबजावणी केली नाही. आपण या ठिकाणी फक्त कायदे करण्यासाठी बसलो आहोत काय ? कायदा केल्यानंतर त्याची अंमलबजावणी करायची नाही असे सरकारचे धोरण आहे काय ? आपण सर्वशिक्षा अभियानाच्या माध्यमातून बांधलेल्या शाळा आणि खाजगी शाळा यांचा सर्व्हे करुन संकटसमयी मुलांना बाहेर पडण्यासाठी वेगळा दरवाजा केलेला आहे काय हे तपासले पाहिजे.

माझ्याकडे अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांची आकडेवारी आहे. ती देऊन मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. परंतु याबाबतीत शासनाने आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. कायम विनाअनुदानित शाळांचा गोंधळ आज देखील चालू आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आणि माझे अन्य शिक्षक आणि प्राध्यापकांचे प्रतिनिधी असलेले सहकारी या सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित करतात, माननीय मंत्री महोदय त्यांच्या प्रश्नाला उत्तर देतात. पुढच्या अधिवेशनामध्ये ते पुन्हा तोच प्रश्न विचारतात. माननीय मंत्री महोदय तेच उत्तर देतात. असे वर्षानुवर्षे चालू आहे. प्राध्यापक आणि शिक्षकांच्या बाबतीत हे शासन उदासीन आहे.

सभापती महोदय, झोपलेल्या माणसाला जागे करता येते. परंतु झोपेचे सोंग घेतलेल्या माणसाला जागे करता येत नाही. सरकारची अवस्था याहून वेगळी नाही. कायम विनाअनुदानित शाळातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, उच्च माध्यमिक शाळातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, रात्रशाळातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आपल्या मागण्या घेऊन शिक्षण उप संचालकांच्या कार्यालयासमोर नेहमी धरणे आंदोलने करीत असतात. परंतु शासन केवळ बघ्याचीच भूमिका घेते. एखाद दुस-या शिक्षकाने अंगावर रॉकेल ओतून स्वत:ला जाळून घेतल्यानंतर शासन त्यांचे प्रश्न सोडविणार आहे काय ? शासन हे गेंड्याच्या कातडीचे असते असे म्हटले जाते. शिक्षणाच्या बाबतीत हे शासन निष्ठूर आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. शिक्षण हा माणसाच्या जीवनाचा मूलभूत पाया आहे. हा पाया मजबूत करण्यासाठी, दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आपण काय करणार आहात हे माननीय मंत्री महोदयांनी स्पष्ट करणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या बाबतीत हे शासन दुय्यम भूमिका घेणार असेल तर या राज्यातील लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य, आदिवासी मुलांचे भवितव्य अधांतरी राहील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

सभापती महोदय, केन्द्र शासनाचे साक्षर भारत अभियान देशातील सर्व राज्यामध्ये सुरु झाले. प्रौढ शिक्षणावर कोट्यवधी रुपये खर्च झाले. एवढा खर्च करुन किती लोक साक्षर झाले ? राज्यामध्ये शंभर टक्के प्रौढ साक्षर झाल्याचे सांगितले जाते. परंतु निवडणुका आल्यानंतर 40 टक्के लोक स्वाक्षरी करण्याऐवजी अंगठा लावतात. मग प्रौढ शिक्षणावर खर्च झालेले करोडो रुपये कुठे गेले ? ही प्रौढ शिक्षण योजना बासनात बांधून ठेवलेली आहे की कसे याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या माध्यमातून मी आदरणीय शिक्षण मंत्री महोदय श्री. राजेंद्र दर्डा यांच्या एक गोष्ट निदर्शनास आणू इच्छितो की, ते शिक्षण विभागासाठी एक मराठी सचिव देऊ शकत नसतील तर या मराठी राज्याच्या दृष्टीने ती शोकांतिका आहे एवढे बोलून आणि या विधेयकाला संपूर्ण विरोध करुन मी माझे भाषण संपवितो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

--

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ D/ D/ KTG/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 12:30

श्री. भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2012चे वि.प.वि. क्रमांक 7 - महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्ति शाळा (स्थापना व विनियमन) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील, लोकमान्य टिळक या मंडळींनी समाजासाठी मोफत शिक्षण ही संकल्पवना आणली. त्यांची प्रेरणा घेऊन स्व. यशवंतराव चव्हाण आणि इतर सर्व मान्यवरांनी सर्वस्तरावर मोफत शिक्षण देण्याचा पायंडा पाडला. महाराष्ट्रामध्ये प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये निघाली. पण त्याच महाराष्ट्रामध्ये आता मुलांना शिक्षण देण्यासाठी शासनाने स्वयं अर्थसहाय्यित विधेयक आणलेले आहे. प्राथमिक शाळांना सर्वशिक्षा अभियानाच्या माध्यमातून केन्द्र सरकारकडून पैसे येतात, माध्यमिक शिक्षणासाठी राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियानाच्या माध्यमातून पैसे येतात, उच शिक्षणासाठी पैसे येतात. त्यामध्ये राज्य शासनाचा देखील बरोबरीने हिस्सा असतो. परंतु आता हा राज्य शासनाचा हिस्सा दिवसेंदिवस कमी कमी होत चालला आहे. सर्व मुंलांना एकाच छताखाली मोफत शिक्षण मिळावे, ती एकाच छताखाली वाढावीत असा दृष्टीकोन आपल्या धुरीणांनी ठेवलेला होता. परंतु त्या धुरीणांच्या दृष्टीकोनाला या विधेयकाच्या माध्यमातून छेद दिला जात आहे नव्हे या विधेयकाने तो प्रस्थापित होत आहे, त्याला एका अर्थाने राजमान्यता मिळत आहे. म्हणून मी विनंती करतो की, हे विधेयक शासनाने परत घ्यावे. या विधेयकावर माझी भूमिका मी मांडली नाही तर पुढची पिढी आम्हाला दोष देईल. म्हणेल की, तुम्ही सभागृहामध्ये असताना तुम्ही तुमची भूमिका का मांडली नाही.

सभापती महोदय, शिक्षणाच्या बाजारीकरणाला चालना देणारी ही एक छान तरतूद शासनाने केलेली आहे. विद्यार्थ्यांकडून किती फी घ्यावी, विद्यार्थ्यांना कोणत्या सोई-सुविधा द्याव्यात या संबंधीचा उल्लेख विधेयकामध्ये नाही. शासनाने मात्र स्वत:ची कातडी वाचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. उद्या शाळा अंगावर आली तर सरकारच्या तिजोरीला कोणताही धक्का लागू नये याची काळजी घेऊन सरकारने आपली सुटका करुन घेतलेली आहे. शिक्षणाच्या बाबतीत शासन कोणतीही आर्थिक जबाबदारी घेणार नाही असा स्पष्ट संदेश सरकारने या विधेयकाच्या माध्यमातून दिलेला आहे. हा संदेश घेऊन तुमच्या आमच्या महाराष्ट्रामध्ये उद्या अराजकता निर्माण होऊ नये, हिंस्त्रवृत्तीची पिढी निर्माण होऊ नये अशी सरकारची प्रामाणिक इच्छा असेल आणि सरकारची राजकीय इच्छाशक्ती असेल तर सरकारने हे विधेयक परत घ्यावे असे मी आवाहन करतो.

..4..


असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, मागील 10-20 वर्षापासून महाराष्ट्रामध्ये शिक्षणाच्या बाबतीत एक चातुर्वर्ण तयार झालेला आहे. अब्जाधीशांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळा तयार झालेल्या आहेत. उदा. सीबीएसई सारख्या शाळा. लक्षाधीशांच्या कॉन्व्हेण्ट स्कूलच्या शाळा तयार झालेल्या आहेत. प्राथमिक शाळा, आश्रमशाळा, रात्रशाळा या गरिबांच्या शाळा तयार झालेल्या आहेत. या गरिबांच्या शाळांना संरक्षण कसे मिळेल हे देखील मंत्री महोदयांनी सांगावे. आमच्या सांगली जिल्ह्यामध्ये 14 हजार प्राथमिक शिक्षक होते. आता 6 हजार प्राथमिक शिक्षक आहेत. मराठीमधून प्राथमिक शिक्षण देणा-या शाळा दिवसेंदिवस बंद पडत आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे...

अशीच परिस्थिती नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या मराठी शाळांची आहे. या संदर्भात बघ्याची भूमिका शासन घेणार असेल तर बरोबर होणार नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी सांगितले की, दोन लाख शिक्षक हे या क्षेत्रातून बाहेर जात आहेत. माझे तर असे म्हणणे आहे की, हा आकडा 2 लाखा पेक्षा जास्त आहे. या संस्थांच्या मराठी शाळांमध्ये जे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, त्यांना नाममात्र शिक्षण मिळत आहे. पर्यायाने ते विद्यार्थी बाजूला फेकले जात आहेत. अधिक व्याप्ती आलेले विधेयक यावयास पाहिजे होते, दुर्देवाने तसे विधेयक सभागृहासमोर आणले गेले नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, विद्यमान शाळाबाबतची व्याख्या या विधेयकात दिली आहे. विद्यामान शाळांचा व्याख्येचा उल्लेख केला असला तरी मी त्याबाबतीत सांगू इच्छितो की, विद्यमान शाळांमध्ये दोन प्रकारच्या आहेत, त्या म्हणजे अधिकृत शाळा आणि अनधिकृत शाळा आहेत. आज महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयामध्ये कमित कमी 50 ते 60 अनधिकृत शाळा आहेत. आज सुध्दा आपल्या पटवर्धन ग्राऊंडवर 500 संस्था चालक येऊन बसतात. त्यांच्या संस्थेच्या इंग्रजी शाळांना मान्यता देण्याचा जी.आर.शासनाने जून, 2010 मध्ये काढला होता. त्यांनी शासनाकडे पैसे भरले आहेत. त्यांच्या शाळा चालू आहेत. परंतु त्या संस्था चालकाच्या संस्थाना अद्यापपर्यंत मान्यता दिली जात नाही. 225 मराठी माध्यमांच्या शाळा आहेत, त्या शाळा चालू आहेत. त्या शाळांचे प्रस्ताव शासनाने दाखल करुन घेतले आहेत. परंतुं त्या मराठी माध्यमांच्या शाळांना देखील अद्याप मान्यता देण्यात आलेली नाही. अनधिकृत शाळांच्या बाबतीत या विधेयकांच्या अनुषंगाने जनतेमध्ये कोणत्याही प्रकारचा संदेश जात नाही असे दिसून येते. त्या शाळा तशाच चालू ठेवणार आहात काय, त्यांच्यावर काही निर्बंध घालणार आहात की नाही, त्या शाळा चालू आहेत, त्यांचे प्रस्ताव शासनाकडे दाखल झ ाालेले आहेत, याबाबतचा कोणताही उल्लेख या विधेयकात दिसून येत नाही.

सभापती महोदय, कंपनी नियमांतर्गत नोंदणी झालेल्या कंपन्या शाळा मागण्यासाठी प्रस्ताव दाखल करणार आहे. या कंपन्या नफा कमाविण्यासाठी जन्माला आलेल्या असतात. राज्यातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी योगदान देऊ अशी त्यांची भावना मुळीच नसते. अशा कंपन्यांना शिक्षण क्षेत्रात प्रवेश देणार असलो तर त्या कंपन्या पुढे काय करतील याचा विचार न केलेलाच बरा.

2...

श्री.राजेद्र दर्डा : सदर कलम विधेयकातून वगळण्यात आले आहे.

श्री.भगवान सोळंके : आपण सदरची तरतूद या विधेयकातून वगळली असेल तर ती योग्यच गोष्ट आहे. सभापती महोदय, नोंदणीकृत संस्था आणि नोंदणीकृत न्यास असा उल्लेख या विधेयकात करण्यात आला आहे. नोंदणीकृत संस्था आणि नोंदणीकृत न्याय याचा छान उल्लेख केलेला आहे. धर्मादाय प्रयोजनासाठी नोंदणी केलेली संस्था असा उल्लेख केला आहे. धर्मादाय कायद्याखाली नोंदणीकृत केलेल्या संस्था देखील व्यापाऱ्याचीच कामे करतात. त्या संस्थांमध्ये कोर्टात मारामाऱ्या चालू आहेत. या संस्थांना सुध्दा शिक्षण क्षेत्रात प्रवेश देणार काय, त्या संस्था शासनास ऑडीट रिपोर्ट देतात काय, त्या संस्थांच्या रीतसर निवडणूका होतात काय, त्या संस्थांमध्ये एकाच कुटुंबाची सत्ता ठेवणार नाही अशी दखल घेतली गेली आहे काय अशा प्रकारचे निकष त्या संस्थांसाठी लावणे आवश्यक आहे. कारण अशा अनेक धर्मादाय संस्था आहेत, त्या संस्थेमध्ये नवरा अध्यक्ष, पत्नी सचिव, मुलगा कोषाध्यक्ष आहेत व अशा संस्था शिक्षण क्षेत्रात सहभागी होण्याचा प्रयत्न करीत आहेत. या गोष्टीला छेद देण्याचा विचार सरकारने केला पाहिजे.

सभापती महोदय, शाळेंचा दर्जावाढ असा शब्द वापरलेला आहे. या बाबतीत सांगू इच्छितो की, काही वेळेला नवीन स्तर वाढतो, काही वेळेला कमी होतो. स्तर बदल कधी सकारात्मक असेल असा शब्दप्रयोग करण्यात यावा.

सभापती महोदय विधेयकातील पृष्ठ क्रमांक 3 वरील 20 (2)(1) मध्ये असे म्हटले आहे की, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 यामध्ये किंवा त्या अन्वये केलेल्या नियमांमध्ये व्याख्या केलेल्या शब्दप्रयोगांना त्या अधिनियमात किंवा नियमांत अनुक्रमे नेमून दिल्याप्रमाणेच अर्थ असतील यासंदर्भात खाली कायद्यातील (2) मध्ये मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, 1947 असे म्हटले आहे. परंतु या ठिकाणी 1949 महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण असा उल्लेख आलेला नाही. त्या ठिकाणी फक्त अधिनियम म्हटले आहे. 1965 चा उल्लेख केला आहे आणि त्या ठिकाणी उच्च माध्यमिक असा उल्लेख केलेला आहे. 1965 मध्ये उच्च प्राथमिक हा प्रकार नव्हता. हा प्रकार 1975 मध्ये सुरु झाला. पूर्वलक्षी प्रभावाने सदर वर्ष कसे काय दाखवू शकता. यामध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. आपण 1965 हे वर्ष तसेच ठेवले तर भविष्यात अभ्यासक चुकीचा अर्थ काढतील. भविष्यात त्यांनी या गोष्टीचा अन्वर्थ लावू नये. ते वर्षे

3...



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 12:40

श्री.भगवान सोळंके....

तसेच राहिले तर जनतेमध्ये देखील चुकीचा संदेश जाईल. म्हणून त्यात दुरुस्ती करावी अशी माझी पुन:श्च विनंती आहे. महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम,1977 यामध्ये ज्याची व्याख्या केलेली आहे. परंतु 1981 सेवा शर्तीची नियमावलीचा उल्लेख केलेला नाही. त्याचाही या विधेयकात अंतर्भाव असण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 5 वर स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी देण्यासंबंधीचा उल्लेख केलेला आहे.काही वृत्तपत्राच्या प्रती फक्त तालुक्यापूरत्याच काढल्या जातात. अशा ठिकाणी जर प्रसिध्दी दिली तर शासनाचा प्रसिध्दी देण्यामागचा हेतू साध्य होणार नाही. जिल्हास्तरीय वृत्तपत्रे असा शब्दप्रयोग असणे आवश्यक आहे.

**उप सभापती** : आता मी सदर विधेयकावरील चर्चा् थांबवित आहे. सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुखे यांचे या विधेयकावरील भाषण मी अपूर्ण ठेवतो. या विधेयकावरील पुढील चर्चा पुरवणी मागण्यांवरील चर्चा् संपल्यानंतर घेण्यात येईल. या विधेयकावरील चर्चा पुन्हा सुरु होईल, त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंके यांना भाषण करण्याची संधी दिली जाईल. आता मी सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन: सुरु होईल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.46 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.: पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी**

(माननीय सदस्य श्री.विनायक मेटे व श्री.विक्रम काळे अंगावर घोषवाक्य लिहिलेले कपडे घालून सभागृहात प्रवेश करतात)

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मराठी समाजाला आरक्षण मिळावे आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे या दोन प्रमुख मागण्यांसाठी विधानभवनाच्या पायऱ्यांसमोर दोन्ही सभागृहाच्या 70 ते 75 माननीय सदस्यांचे सर्वपक्षीय धरणे आंदोलन सुरु आहे. खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आरक्षण व सवलती मिळाव्यात अशी आग्रहाची मागणी केली जात आहे. त्यामुळे आजचा प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन या विषयावर सभागृहात चर्चा करण्यात यावी अशी माझी विनंती आहे. संपूर्ण महाराष्ट्र या सभागृहाकडे आशेने पहात आहे. आपण त्यांना निराश करणार नाही अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री.दिवाकर रावते : महाराष्ट्र आशेने माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय सभापती यापैकी कोणाकडे पहात आहे?

**सभापती** : माननीय सदस्य श्री.विनायक मेटे आणि माननीय सदस्य श्री.विक्रम काळे, आपण ज्या पध्दतीने आपल्या अंगावर घोषवाक्य लिहिलेले कपडे घातले आहेत ते कृपया लॉबीमध्ये जाऊन काढावेत आणि मग सभागृहात यावे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी जो मुद्दा उपस्थित केला त्याबद्दल आपण काहीही भाष्य केले नाही.

**सभापती**: त्यावर मी माझे मत प्रदर्शित करतो. ज्या प्रश्नांकरिता सभागृहाबाहेर माननीय सदस्य धरणे धरुन बसले आहेत ते दोन्ही प्रश्न अत्यंत महत्वाचे आहेत. त्या अनुषंगाने प्रश्नोत्तराच्या तासानंतर मी आपल्याला विशेष बाब म्हणून मुद्दे मांडण्यास जरुर अनुमती देईन.

---

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**चिमूर येथील गुन्ह्याच्या चौकशी संदर्भात तक्रारकर्त्याला अद्ययावत माहिती न दिल्याबाबत**

**(१) * ३३५२९ श्री.मितेश भांगडिया , श्री.विनोद तावडे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमुरचे लोकप्रतिनिधी यांच्या विरोधात, चिमूर पोलीस स्टेशन मध्ये जीवे मारण्याच्या तक्रारीवरून दिनांक ३० जानेवारी, २०१२ राजी वा त्या सुमारास गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्ह्याच्या संदर्भात केंद्रीय उपसचिव, गृह विभाग, भारत सरकार यांनी अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांना चिमूर येथील लोकप्रतिनिधी यांच्या विरोधातील तक्रारीची चौकशी करून सदर चौकशी बद्दल तक्रारकर्त्याला अवगत करावे असे निर्देश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उपरोक्त तक्रारी बद्दल चौकशी करून चौकशीबाबतची अद्ययावत माहिती तक्रार कर्त्याला वेळोवेळी पाठविण्यात आलेली आहे काय,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) श्री.सुरज कन्हैय्यालाल कापसे यांच्या तक्रारीवरुन चिमूर पोलीस ठाणे येथे दिनांक ३०/०१/२०१२ रोजी चिमूरच्या आमदारांविरुध्द क्र.४७/१२, कलम ५०६ भा.दं.वि.सं अन्वये अहस्तक्षेप गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(२) या प्रकरणी उचित कार्यवाही करुन तक्रारकर्त्यास अवगत करावे असे केंद्रीय उपसचिव यांनी दि.१३/०३/२०१२ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) आमदारांविरुध्द गुन्हा नोंद करण्याची मागणी रास्त नसल्याचे अर्जदारास दि.२८/७/२०१२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) विलंब झालेला नाही.

श्री.मितेश भांगडिया : सभापती महोदय, चिमूरच्या आमदारांविरुध्द गुन्हा नोंद करण्याची मागणी रास्त नसल्याचे कळविले आहे हे खरे आहे काय? ज्या आमदारांविरुध्द गुन्हेगारी स्वरुपाचे ३२ खटले न्यायालयात प्रलंबित आहेत, त्यांच्याविरुध्द पुन्हा गुन्हा नोंदविण्याची मागणी रास्त नसल्याचे योग्य आहे काय? या आमदारांविरुध्द त्यांच्या निवडणूक काळात तडीपारीची नोटीस बजावण्यात आली होती. या आमदारांविरुध्द केव्हा गुन्हा नोंदविण्यात येणार आहे? तक्रारीमध्ये उल्लेख केलेले गौरव तुली व लकी खान या दोन व्यक्ती गुंड प्रवृत्तीच्या असल्याबाबत शहानिशा करण्यात आली आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत आणि त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय?

..३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, ज्या संदर्भात तक्रार करण्यात आली होती त्या संदर्भात गुन्हा नोंद करण्यास रास्त नसल्याचे उत्तरात म्हटले आहे. तक्रार आल्यानंतर तक्रारदाराला देखील चौकशीसाठी बोलावले होते. ज्यांची तक्रार आहे त्यांना देखील आपले म्हणणे मांडण्याची संधी दोन-तीन वेळा दिली होती. फक्त तक्रार केल्यानंतर पुढे तपासाच्या दृष्टीने त्यांची मदत झाली नाही म्हणून अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. ज्या संबंधित लोकांचा उल्लेख केला आहे त्याची वेगळी चौकशी सुरु आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, हा सामान्य नागरिकाशी संबंधित विषय नसून या राज्याचे माजी मंत्री व विद्यमान आमदार यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याचा विषय आहे. आतापर्यंत त्यांच्या विरोधात ३२ खटले न्यायालयात प्रलंबित आहेत. केंद्रीय गृह विभागाच्या उप सचिवांनी राज्य सरकारच्या गृह विभागाला या प्रकरणात लक्ष घालून अहवाल पाठवावा असे कळविले होते. राज्याच्या गृह विभागाने या संदर्भातील अहवाल केंद्रीय गृह विभागाच्या उप सचिवांना सादर केला आहे काय?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, केंद्रीय गृह विभागाच्या उप सचिवांचे पत्र आले होते. या तक्रारीची दखल घेऊन त्या संदर्भातील माहिती तक्रारदाराला कळवावी अशा सूचना दिलेल्या होत्या, त्या सूचनेचे पालन आम्ही केले आहे.

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, चिमूरच्या आमदारांविरुध्द क्रमांक ४७/१२, कलम ५०६ भा.द.वि.स.अन्वये अहस्तक्षेप गुन्हा नोंदविण्यात आल्याचे उत्तरात म्हटले आहे. अहस्तक्षेप गुन्ह्याची व्याख्या सभागृहाला अवगत केली जाईल काय?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, ज्या तक्रारीमध्ये हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नाही अशा प्रकारची तक्रार दाखल केली जाते. या प्रकरणात चौकशीअंती गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा विषय एका लोकप्रतिनिधीबाबतचा आहे. ज्यांच्यावर ३२ गुन्हे दाखल झालेले आहेत. हे लोकप्रतिनिधी राज्याचे मंत्री राहिलेले आहेत. पोलीस स्टेशनवर या विषयाचा तपास करताना वेगळा दबाव नक्की असणार आहे. कलम ५०६ अंतर्गत गुन्हा दाखल केला जात असेल तर अहस्तक्षेप गुन्हा कसा होऊ शकतो? पोलीस स्टेशनवर

..४..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थानिक पातळीवर दबाव असल्यामुळे तक्रारीची दखल घेतली जात नाही. अशा घटना घडतात त्यामुळे राजकारणातील लोकप्रतिनिधी बदनाम होतात. स्थानिक पोलीस चौकशी करु शकणार नाहीत म्हणून माझी आग्रही मागणी आहे की, या प्रकरणाची चौकशी करावयाची असेल तर हे प्रकरण सीआयडीकडे सोपविण्यात येईल काय?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या तक्रारीची स्थानिक पोलिसांनी योग्य चौकशी केली आहे. डीवायएसपी यांना चौकशी करण्यास सांगितले आहे. कोणाला पाठीशी घालण्याचा किंवा कोणताही दबाव आला असण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. ज्यावेळी लोकप्रतिनिधी विरोधात तक्रार दाखल केली जाते त्यावेळी निश्चितपणे योग्य तपास केला जातो.

श्री.विजय गिरकर : या प्रकरणी केंद्रीय गृह विभागाच्या उप सचिवांनी पत्र पाठविले आहे. तक्रारीची दखल घेऊन अहस्तक्षेप गुन्हा दाखल केल्याचे उत्तरात म्हटले आहे. कायदा हा सर्वांना समान असतो. ३२ गुन्हे या आमदारांविरुध्द दाखल असतानाही त्यांना सोडून दिले जाणे योग्य नाही.

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 333529.....

श्री. विजय गिरकर ...

केंद्रीय गृह सचिवांनी या विषयाच्या संदर्भात दखल घेतली आहे परंतु या विषयाच्या संदर्भात सरकारने दखल घेतलेली नाही. त्यामुळे या प्रकरणात संबंधितांना सोडून देण्यात आलेले आहे त्यामुळे या घटनेच्या संदर्भात सीआयडी मार्फत चौकशी केली जाणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये सन्माननीय सदस्यांनी 32 गुन्हयांचा उल्लेख केलेला आहे. परंतु मी जे काही सांगत आहे ते राजकीय दृष्टीने घेऊ नका. ते जेव्हा त्या बाजूला होते तेव्हा त्यांच्यावर किती गुन्हे होते व ते या बाजूला आल्यानंतर त्यांच्यावर किती गुन्हे दाखल झाले, हे गुन्हे कधीचे आहेत या सर्व बाबी आम्ही तपासून बघू. या प्रकरणात श्री. कापसे यांनी तक्रार नोंदवलेली आहे. कापसे यांचा मेहुणा साबरा यांनी श्री. वडेट्टीवार यांच्या बंगल्याच्या बाहेर 8-10 लोकांना बोलतांना पाहिले होते. यामध्ये लकी आणि गौरव तुली यांना भांगडियांची 12 लाखाची सुपारी दिली होती. ज्याने तक्रार नोंदवली आहे त्याचा मेहुणा त्या ठिकाणी गेला होता, त्याने 10-12 लोकांना एकत्र बोलतांना पाहिले, ते 10-12 लोक कोण आहेत याचा पत्ता नाही. कापसे यांनी तक्रार केलेली होती त्यामुळे त्यांना तपासासाठी वारंवार बोलावले असतांना सुध्दा ते येऊन पुढची माहिती देण्यास तयार नाहीत. असे असतांना सुध्दा पोलिसांनी खोलात जाऊन या घटनेची चौकशी केलेली आहे.

हा प्रश्न लोकप्रतिनिधीच्या संदर्भातील असल्यामुळे मी सदनाला एवढेच सांगू इच्छितो की, खान व तुली यांची पार्श्वभूमी गुन्हेगारीची आहे काय याबाबत एस.पी. लेव्हलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत हे सर्व प्रकरण पुन्हा तपासण्यात येईल. या प्रकरणात कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. यामध्ये काही तथ्य असेल तर पोलीस कारवाई करतील परंतु तिसऱ्याने ऐकले, याने सांगितले, त्याने तक्रार दिली असे असतांनाही पोलिसांनी या प्रकरणात सर्व तपास केलेला आहे. लोकप्रतिनिधी बाजारात बोलत होते म्हणून उद्या तक्रार करा असे कोणी सांगितले तर ते योग्य नाही. परंतु कोण बोलत होते हे सांगितले जात नाही, काय बोलले सांगितले जात नाही असे असतांना एवढयावर गुन्हे दाखल करावयाचे म्हटले तर ते योग्य नाही. या प्रकरणाचा वरिष्ठ अधिकाऱ्याकडून तपास केला जाईल याबाबत मी अगोदरच माहिती दिलेली आहे.

केंद्र सरकारच्या अवर सचिवांकडे या विषयाचा जसा प्रस्ताव गेला तसा हा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 333529.....

श्री. आर.आर.पाटील.....

प्रस्ताव माझ्याकडे आला होता. महाराष्ट्रात अशा प्रकारच्या घटना घडू नये म्हणून जशी माझी जबाबदारी होती तशा पध्दतीने सरकारने सुध्दा सूचना दिल्या होत्या. जिवीताला धोका होऊ नये म्हणून संरक्षण दिले तर त्यामध्ये आम्ही कोणती चूक केली ? उलट पोलिसांनी यांना संरक्षण देण्याची भूमिका पार पाडलेली आहे. कापसे जर अधिकची माहिती द्यावयास तयार असतील तर आम्ही अधिक खोलात जाऊन चौकशी तर करुच परंतु ज्याने फोनवरुन मेहुण्याकडून माहिती ऐकली, त्या मेहुण्याने तिसऱ्याकडून माहिती ऐकली व ही सर्व माहिती फोनवरुन सांगितली परंतु प्रत्यक्ष समोर येऊन काहीच माहिती दिली जात नाही, तपासामध्ये सहकार्य केले जात नाही. असे असतांनाही पोलीस चौकशी करीत आहेत. या प्रकरणाच्या संदर्भात कापसे यांनी येऊन माहिती सांगितली तर आपण म्हणाल ती चौकशी करण्यास शासन तयार आहे. परंतु हे सर्व प्रकरण केवळ ऐकीव माहितीवर तयार झालेले आहे. तरी सुध्दा या प्रकरणात श्री. भांगडीया यांच्याकडून माहिती घेतली जाईल, कापसे जेथे असतील त्यांना तेथून आणून त्यांच्याकडून माहिती घेतली जाईल, जोपर्यंत तपासाचे निष्कर्ष येत नाहीत तोपर्यंत संरक्षण तर दिले जाईलच पण ज्या लोकांची या प्रकरणात नावे घेतलेली आहे त्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासली जाईल. त्यांचा या घटनेशी संबंध असेल तर कठोर कारवाई सुध्दा केली जाईल.

---------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सिन्नर (जि.नाशिक) येथील १२ विविध कार्यकारी सहकारी संस्थांना अवसायनात काढणेबाबत.**

**(२) * ३५००५ श्री.जयवंतराव जाधव , श्री.अनिल भोसले , श्री.हेमंत टकले , श्री.दिपक साळुंखे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) येथील १२ विविध कार्यकारी सहकारी संस्थांना अवसायनात काढणेबाबत माहे डिसेंबर, २०११ मध्ये अवसायन पूर्वी नोटीसा देण्यात आलेल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्था अवसायनात काढणेबाबत जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी माहे जुलै २०१२ वा तद्‌नंतर शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ व त्याखालील तरतुदीअन्वये संस्थांचे कामकाज नियम व उपविधीप्रमाणे चालत नसेल तर अशा संस्था अवसायनात घेणेबाबतचे अधिकार संस्थेच्या निबंधकास प्रदान केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग १ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हर्षवर्धन पाटील** : (१) प्रत्यक्षात १३ विविध कार्यकारी सहकारी संस्थांना अवसायनपूर्व नोटीस देण्यात आलेल्या होत्या.

(२) होय.

(३) होय

(४) व (५) वैद्यनाथन पॅकेज अंतर्गत ज्या संस्था लाभ मिळण्यासाठी अपात्र ठरविण्यांत आल्या आहेत अशा संस्थांबाबत नाजीकच्या अर्थक्षम संस्थांमध्ये विलीनीकरण करणे, संस्था बंद करणे, अथवा संस्था सक्षम करणे बाबत आराखडा तयार करण्यांत आलेला आहे. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,म.रा.पुणे यांचे स्तरावरुन वैद्यनाथन पैकेजचा लाभ मिळविण्यासाठी अपात्र ठरविण्यांत आलेल्या संस्थांबाबत वरील प्रमाणे कारवाई करण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयांना सूचना देण्यांत आलेल्या आहेत. भाग-१ मधील नमूद संस्थांबाबत अवसायनपूर्व नोटिसा अनिष्ट तफावत व थकबाकीमुळे देण्यांत आलेल्या होत्या. दरम्यान संस्थांना थकबाकी वसुली करण्यासाठी मुदत देण्यांत आली होती. टंचाईग्रस्त परिस्थितीमुळे शासनाने सक्तीच्या वसुलीला स्थगिती दिल्यामुळे संस्थांना प्रभावीपणे वसुली करता आली नाही. तसेच अवासायनपूर्व नोटिशीच्या अनुषंगाने टंचाईग्रस्त परिस्थिती व सक्तीच्या वसुलीवरील निर्बंधामुळे कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, १२ विविध कार्यकारी संस्थांना अवसायानाच्या नोटीसा काढलेल्या आहेत. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, अनिष्ठ तफावत आणि थकबाकीमुळे त्यांना नोटीसा देण्यात आल्या होत्या. संस्थांना थकबाकी वसूल करण्यासाठी मुदत देण्यात आली होती. पुढे असेही म्हटले आहे की, टंचाईची परिस्थिती आणि सक्तीच्या वसुलीवरील निर्बंध यामुळे कार्यवाही होऊ शकले नाही. आपण या संस्थांना किती मुदतीत काम करावयास सांगितले आहे ? मुदत संपल्यानंतर या संस्थांना आपण अवसायानातून मुक्त करणार आहात काय ?

...४..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : ३५००५.....

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, वैद्यनाथन समितीच्या शिफारसीनुसार ज्या विकास सोसायटयांच्या बॅलन्सशीटमध्ये तोटा आहे किंवा अनिष्ठ तफावत आहे अशा सोसायटयांना आपण प्रिलिमनरी नोटीस देत असतो. त्याप्रमाणे सिन्नर तालुक्यातील १२ नाही तर १३ कार्यकारी सहकारी संस्थांना नोटीस दिलेल्या असून त्यांची तपासणी केली असता त्यातील ५ संस्था अनिष्ठ तफावतीमधून आता बाहेर आलेल्या असून त्यांचे याबाबतीतील लेखी म्हणणे विभागाला प्राप्त झालेले आहे. उर्वरित ज्या ८ संस्थानी, दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे आम्हाला पैसे वसूल करता आले नाही त्यामुळे आम्हाला कालावधी वाढवून द्यावा यासंदर्भात त्यांनी अर्ज केलेला आहे त्यामुळे या संस्थांचीही तपासणी करण्यात येईल व तपासणी अंती पुढील निर्णय घेण्यात येईल.

-----------

....५...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या बांधावर खतांचा पुरवठा होत नसल्याबाबत.**

**(३) * ३३३६७ श्री.भगवान साळुंखे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.रामनाथ मोते , श्री.नागो गाणार :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने राज्यातील शेतकऱ्यांची पिळवणूक थांबवण्यासाठी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर खतांचा पूरवठा करण्याची मोहीम घेतली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगली जिल्ह्यात शासनाच्या आदेशानुसार प्रत्यक्षात शेतकऱ्यांना त्यांच्या बांधावर खतांचा पुरवठा झालाच नसल्याचे माहे जून २०१२ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारे शासन आदेशानुसार कार्यवाही न करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव देवकर,श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांचे करिता** : (१) होय.
(२) हे खरे नाही. २७ नोव्हेंबर, २०१२ अखेर २३१ गावातील ८२८७ शेतकऱ्यांना ५१८० मे.टन खताचा पुरवठा त्यांच्या बांधावर करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, राज्य सरकारच्या ध्येय धोरणानुसार बांधावर खत पुरवठा या योजनेशी हा प्रश्न निगडीत आहेत. सांगली जिल्हयात सुमारे ७०० गावे असून प्रत्येक गावात सुमारे ८० टक्के शेतकरी राहतात. असे असतांना २३१ गावांना बांधावर खत पुरवठा करण्याच्या योजनेचे कोणते निकष लावण्यात आले होते ? २३१ गावात सुमारे २५ हजार शेतकरी असतांना केवळ ८२८७ शेतकऱ्यांचीच या योजनेमध्ये निवड कशी काय करण्यात आली ? ज्या शेतकऱ्यांना खताचा पुरवठा केला गेला त्या शेतकऱ्यांची यादी पटलावर ठेवली जाईल काय ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या योजनेनुसार ज्या गावात शेतकऱ्यांचे गट स्थापन झाले असतील किंवा नवीन गट तयार करावयाचे असतील अशा शेतकऱ्यांनी बांधावर खत उपलब्ध करुन देण्याची मागणी केली असेल तर अशा शेतकऱ्यांना या योजनेतून लाभ दिला जातो. या योजनेमध्ये कृषी विभागाचे अधिकारी गावात जाऊन पिकाच्या पध्दतीनुसार तसेच ज्या कंपनीला खताच्या साठयाची परवानगी दिली असेल त्यांच्याकडे अगोदर खताची मागणी नोंदवली जाते,ज्या गटाने खताची मागणी केली असेल अशा शेतकऱ्यांनी खत पुरवठा करणाऱ्या कंपनीकडे खताचा ॲडव्हान्स डिमांड ड्राफ्ट द्यावा लागतो. बांधावर खत देण्याची योजना गेल्या वर्षापासून सुरु

...६...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: ३३३६७....

श्री. गुलाबराव देवकर .....

करण्यात आलेली आहे. सांगली जिल्हयामध्ये जवळपास ९८३ गटांनी खताची मागणी केली होती व त्यामध्ये ८२८७ शेतकऱ्यांचा समावेश होता. या ठिकाणी ५१८० मेट्रीक टनाचा खताचा पुरवठा करण्यात आलेला आहे. जून महिन्याच्या सुरुवातीला १२ गटांना २०० मेट्रीक टनाचा खत पुरवठा करण्यात आला होता. खताची मागणी जेवढया गटाने केली होती त्या सर्व गटांना खतांचा पुरवठा करण्यात आलेला आहे. यामध्ये ज्या शेतकऱ्यांना या योजनेतून खत पुरवठा करण्यात आलेला होता त्याची यादी मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, बांधावर खत देण्याची योजना असली तर प्रत्यक्षात शेतकऱ्यांना बांधावर खत मिळालेले नाही. काही भागात त्यांनी ग्रामपंचायतीमध्ये खत दिलेले आहे. सगळयात महत्वाची बाब अशी आहे की, शेतकऱ्यांना खताचा पुरवठा जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात झाला पहिजे परंतु हे खत नोव्हेंबर महिन्यात मिळाल्यामुळे शेतकऱ्यानी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चे काढले होते ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :सभापती महोदय, खत पुरवठा करतांना प्रत्येक वेळी खताच्या संदर्भात तक्रारी होत असतात. यामध्ये शेतकऱ्यांना वाढीव भावाने खते घ्यावी लागतात त्यामुळे तक्रारी झाल्यानंतर व्यापाऱ्यांच्या दुकानावर कारवाई केली जाते. त्यामुळे असे होऊ नये यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावरच या योजनेच्या माध्यमातून खत पुरवठा करण्याचा अभिनव कार्यक्रम शासनाने हाती घेतला. या योजनेला राज्यामध्ये चांगल्या प्रकारे यश मिळालेले आहे. परंतु या योजनेचे हे पहिलेच वर्ष असल्यामुळे या योजनेची जेवढी व्याप्ती वाढावयास पाहिजे होती तेवढी वाढू शकली नाही ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33367....

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील...

येत्या खरीप हंगामा पासून 50 टक्के शेतकरी गटांची स्थापना करून खत देण्याची भूमिका आपण घेतली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये एक प्रश्न नेहमीच निर्माण झालेला आहे तो म्हणजे रॅक पॉईंटचा. गेल्या वर्षी पेक्षा या वर्षी चंद्रपूर येथे जो खतांचा पुरवठा झाला आहे तो काही अडचणीचा झालेला नाही हे माझ्याकडे उपलब्ध असलेल्या आकडेवारीवरून मला दिसून येत आहे. विशिष्ट खताची मागणी होती त्यामुळे थोडीशी अडचण आली. या वर्षी निश्चितपणे त्यामध्ये सुधारणा केली जाईल. याला कारण आता रॅक पॉईंट देखील मंजूर होत आहेत. तसेच बाजूच्या जिल्ह्यातून देखील आपण खत वाहतुकीची व्यवस्था करतो. जून-जुलै ऑगस्टमध्ये खते मिळायला पाहिजे हा मुद्दा बरोबर आहे. त्यासंबंधी योग्य ती काळजी घेतली जाईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, बांधावर खत देत असताना आपण शेतकऱ्यांकडून ॲडव्हान्स पैसे घेतो. दुष्काळी भागातील शेतकरी असतात त्यांच्याकडे निधीचा आणि पैशाचा आधीच तुटवडा असतो. सांगली जिल्ह्याची जिल्हा नियोजन समितीची बैठक झाली होती तेव्हा आम्ही अशी मागणी केली होती की, जे तालुके दुष्काळी म्हणून जाहीर केले आहेत तेथील शेतकऱ्यांकडून ॲडव्हान्स पैसे न घेता त्यांनी मागणी केल्यानंतर खतांचा पुरवठा करावा. त्यानंतर त्याच्याकडून पैसे घ्यावे. ही मागणी सन्माननीय पालकमंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी मान्य केली. त्यामुळे दुष्काळी तालुक्यातील शेतकऱ्यांनी खताची मागणी केल्यानंतर त्यांच्याकडून ॲडव्हान्स पैसे न घेता त्यांना आपण खतांचा पुरवठा करणार आहात काय ? त्यानंतर आपण त्यांच्याकडून पैसे वसूल करावेत.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, व्यावहारिक दृष्ट्या हे शक्य नाही. आपण खत कंपन्यांकडून खतांचा पुरवठा करीत असतो. खत कंपन्यांना ॲलोकेशन दिलेले आहे. त्यामुळे हे काही शक्य होणार नाही. त्यांनी डीपीडीसीमधून काही नियोजन केले, खास बाब म्हणून मान्यता घेऊन आमच्या खात्याकडे ॲडव्हान्स पैसे जमा केले तर त्यासंबंधी काही तरी विचार करता येईल. पण विभाग म्हणून उधारीवर खत वाटपाचा कार्यक्रम करणे शक्य होणार नाही.

.......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**यवतमाळ येथील जुन्या पोलीस वसाहतीची मोठया प्रमाणात झालेली दुरवस्था**

**(4) * 34977 श्री.संदिप बाजोरिया , श्री.रमेश शेंडगे , श्री.हेमंत टकले , श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक 25620 ला दिनांक 30 मार्च, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) यवतमाळ येथील पोलीस मुख्यालयास लागून असलेल्या जुन्या पोलीस वसाहतीची मोठया प्रमाणात दुरवस्था झाली असतानाही तेथे 45 पोलीस कुटुंबे राहत आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,
(3) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर वसाहतीच्या दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध करुन दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सतेज उर्फ बंटी पाटील श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** :(1) हे खरे आहे.
(2) होय.
(3) व (4) यवतमाळ येथील पोलीस मुख्यालयास लागून असलेल्या पोलीस वसाहतीतील इमारती ब्रिटीश काळात बांधलेल्या असून त्या अतिशय जिर्ण झालेल्या आहेत. सदर इमारतीच्या दुरुस्तीवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यापेक्षा त्या पाडून नविन इमारती बांधणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने शासनास प्रस्ताव सादर करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांना कळविण्यात आलेले आहे.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वपूर्ण असा प्रश्न आहे. सर्वप्रथम मी माननीय मंत्र्यांना धन्यवाद देतो की, त्यांनी दुरवस्था झाली असल्याचे मान्य केले आहे. यवतमाळ जिल्ह्यात विविध ठिकाणी पोलिसांच्या वसाहती आहेत. त्यापैकी ही वसाहत सर्वात जुनी आहे. येथे 45 कुटुंब राहतात. तेथील पोलीस कुटुंब असुविधांशी झुंज देत आहे. त्यांना प्रातर्विधीसाठी जंगल शोधावे लागते. विजेच्या तारा अर्धवट अवस्थेत तुटून पडलेल्या आहेत. त्यांना विजेचा शॉक लागण्याची शक्यता आहे. माझे फक्त दोनच प्रश्न आहेत. आपण नवीन इमारतीचे बांधकाम केव्हा पासून सुरू करणार आहात ? पोलीस वसाहतीची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाल्याचे आपण मान्य केले आहे. तेव्हा या कुटुंबाची तात्पुरती दुसरीकडे राहण्यासाठी व्यवस्था करणार आहात काय ? यवतमाळमध्ये 102 शासकीय क्वार्टर्स रिक्त आहेत. तेथे त्यांची तात्पुरती व्यवस्था करणार आहात काय ?

...3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34977

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, राज्यातील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्या संख्येच्या तुलनेत घराची कमतरता आहे. मी या संबंधातील माहिती पटलावर देखील ठेवायला तयार आहे. राज्यात एकूण 2,09,443 एवढे अधिकारी व कर्मचारी आहेत. त्यापैकी केवळ 86 हजार कर्मचाऱ्यांनाच आपण निवासाची सुविधा उपलब्ध करून देऊ शकतो. एकूण कर्मचाऱ्यांच्या 80 टक्के लोकांना घराची सवलत देण्याची आवश्यकता आहे. कारण 20 टक्के लोकांना स्वत:चे घर असू शकते. त्यामुळे 80 टक्के उद्दिष्ट गाठायचे ठरविले तर 81063 घरांची आवश्यकता लागेल असे गृह विभागाला वाटते. ही घरे बांधायची ठरविले तर 12667 कोटी रूपये ढोबळमानाने लागतील. यासाठी फार मोठा निधी लागेल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी किती घरे बांधण्याची आवश्यकता आहे याचा आकडा सांगितला आहे. माझे असे म्हणणे आहे की, ज्या जुन्या वसाहती आहेत त्याची किमान डागडुजी तरी शासनाने करावी. आज या वसाहतींची दुरूस्ती होत नाही. ही घरे शिकस्त झालेली आहेत, पडायला आलेली आहेत. तेव्हा किमान त्याच्या दुरूस्ती पुरती तरी तरतूद करावी अशी माझी विनंती आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी घरांची किती कमतरता आहे हे सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली परिस्थिती खरी आहे. यवतमाळ येथील पोलीस वसाहत ही इंग्रजांच्या काळात बांधलेली आहे. आज तेथे राहणे शक्य नाही. कोकण, उवरित महाराष्ट्र, विदर्भ येथील पोलिसांच्या वसाहती ह्या इंग्रजांच्या काळातील आहेत व मराठवाड्यातील वसाहती ह्या निजामाच्या काळातील आहेत. एका बाजूने घरे कमी आहेत व दुसऱ्या बाजूने 8945 घरे ही राहण्यास पूर्णपणे अयोग्य आहेत. मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना मनापासून धन्यवाद देतो. त्यांनी या कामासाठी गेल्या दोन वर्षापासून अतिशय चांगली तरतूद केलेली आहे. 422 कोटी रूपये इतका नियतव्यय इमारतींसाठी दिलेला आहे. त्यात पोलीस ठाणी, पोलिसांची घरे इत्यादींचा समावेश आहे. 130 कोटी रूपये इतका नियतव्यय निवासासाठी दिलेला आहे. एकंदरीत घरांची आवश्यकता व घरांची दुरूस्ती त्या तुलनेमध्ये बजेटमधून मिळणारे पैसे हे फार कमी आहेत.

पोलिसांकडे उपलब्ध असलेल्या जागेवर BOT वर काही प्रमाणात खाजगी वापर करावा व अन्य विभागां सारखा तेथे .......

...4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34977

श्री.आर.आर.पाटील...

घरांचा मोठा कार्यक्रम घ्यावा असाही विचार विभागाने केला होता. भविष्यातील गरज लक्षात घेऊन आज उपलब्ध असलेल्या जागाच ा कमी पडत आहेत. त्यातील व्यापारी तत्त्वावर काही जागा दिल्या तर पुन्हा आणखी जागेची कमतरता भासू शकेल. म्हणून तो मार्ग अवलंबता आला नाही. काही शहर व गावांमध्ये जागा अतिरिक्त आहे तेथे 100 टक्के पारदर्शीपणा ठेवून घरे बांधणे शक्य होईल. ज्या शहरांमध्ये, गावांमध्ये जागांची कमतरता आहे त्यासाठी बजेटमध्ये जास्तीची तरतूद पाहिजे अशा प्रकारची मागणी गृह विभागाने केली होती. मी पुन्हा एकदा श्री.अजितदादा पवार यांना धन्यवाद देईन की, त्यांनी आपल्या बजेट स्पीचमध्ये 130 कोटी रूपयां व्यतिरक्त आणखी 100 कोटी रूपये घरांच्या दुरूस्तीसाठी अतिरिक्त ठोस निधी दिला जाईल अशा प्रकारचा उल्लेख केला होता. त्यानुसार गृह विभागाने निधीची मागणी केली आहे. मला अपेक्षा आहे की, हे 100 कोटी रूपये देखील लवकरच मिळतील. जेथील घरे लवकर दुरूस्त करणे आवश्यक आहे त्यासाठी लवकर पैसे उपलब्ध करून दिले जातील. पण जी घरे दुरूस्तीच्या पलीकडे गेली आहेत तेथे नवीन घरे बांधण्याचा कार्यक्रम सुद्धा गतीने हातामध्ये घेतला जाईल.

........

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## यवतमाळ जिल्ह्यात कृषी केंद्रातील अधिकारी व कर्मचारी शेतकऱ्यांची पिळवणूक करीत असल्याबाबत

**(5) * 34083 श्री.विनायकराव मेटे , श्री.सतीश चव्हाण** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) यवतमाळ जिल्ह्यात कृषी केंद्रातील अधिकारी व कर्मचारी शेतकऱ्यांची पिळवणूक करीत असून स्वस्त दरात मिळणारे रासायनिक खत जास्त दराने काळ्याबाजारात विकत असल्याची बाब माहे सप्टेंबर, 2012 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.गुलाबराव देवकर,श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकरिता** : (1) अंशत: खरे आहे.

(2) होय.

(3) चौकशीमध्ये जादा दराने रासायनिक खतांची विक्री केल्याचे आढळून आल्याने 02 कृषि सेवा केंद्राचे परवाने निलंबीत तर 07 कृषि सेवा केंद्राचे परवाने कायमस्वरुपी रद्द करण्यात आलेले आहेत.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझ्या लेखी प्रश्नाला शासनाने अंशत: खरे आहे असे उत्तर दिले आहे. त्यानुसार शासनाने कारवाई देखील अंशत: केली आहे. शासनाने पूर्ण कारवाई केलेली नाही. कृषि केंद्राचे परवाने शासनाने रद्द केले आहेत. पण त्याला साथ देणाऱ्या अधिकारीवर्गावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. या अधिकाऱ्यांच्या सहमतीनेच हे सर्व झाले आहे. त्यांना मात्र आपण मोकळे सोडले आहे. त्यामुळे शासनाने येथे अंशत:च उत्तर दिलेले आहे. तेव्हा या बाबात शासन पूर्ण उत्तर देणार आहे काय ? यात साथ देणाऱ्या, शेतकऱ्यांची पिळवणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, जादा किंमतीने खते विकण्याचा प्रकार सुरू होता म्हणून जवळपास 9 कृषि केद्रांवर आपण कारवाई केली आहे. त्यांचे खत विक्रीचे परवानेच रद्द केले आहेत. यासाठी आपण 17 भरारी पथके राज्यभरात निर्माण केलेली आहेत. भरारी पथके, अधिकारी व कर्मचारी सातत्याने चौकशी करीत असतात, भेटी देण्याचा प्रयत्न करीत असतात. येथे सन्माननीय सदस्यांनी कर्मचाऱ्यां विरूद्ध कोणती कारवाई केली असा प्रश्न उपस्थित केला आहे. त्यासंबंधी असे सांगू इच्छितो की, याबाबत चौकशी करण्यात येईल.

...6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34083....

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, लेखी उत्तरात नमूद करण्यात आले आहे की, '2 कृषि सेवा केंद्राचे परवाने निलंबित तर 7 कृषि सेवा केंद्राचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आलेले आहेत." आपण दोन परवाने निलंबित करण्याचे कारण काय आहे ते कायमस्वरूपी रद्द का करण्यात आले नाहीत व दुसरा प्रश्न असा आहे की, या प्रकरणात तत्कालीन ADO श्री.इंगळे यांचा सहभाग होता. त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34083....

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, या संदर्भात जी कार्यवाही करणे आवश्यक आहे ती केलेली आहे. भरारी पथकाच्या माध्यमातून परवाने निलंबित करण्यात आलेले आहेत. कृषी आयुक्तांना सूचना दिलेल्या आहेत की, या प्रकरणी फक्त परवाने निलंबित करुन चालणार नाही, तर ज्या गावामध्ये, तालुक्यामध्ये अशाप्रकारच्या घटना घडल्या आहेत, त्या तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक किंवा जिल्हापरिषदेचे ऐडीओ यांची चौकशी करावी. त्यांचा जर प्रत्यक्ष सहभाग असेल तर त्यांच्यावर कारवाई करावी अशाप्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बीड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागात होत असलेला गैरप्रकार**

**(6) * 34164 श्री.धनंजय मुंडे** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बीड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागात सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सहीने मोठया प्रमाणात कामे मंजूर करण्याचा व त्याच्या नोंदी करण्याचा प्रकार अतिरिक्त जिल्ह्याधिकारी यांच्या तपासणीत उघडकीस आल्याची बाब माहे सप्टेंबर, 2012 च्या पहिल्या आठवड्यात निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मागील 4 वर्षांपासून आवक-जावक रजिस्टरमध्ये खाडाखोड, तांत्रिक मंजुरीच्या रजिस्टरवर कार्यकारी अभियंत्यांची सही नसल्याचे ही उघडकिस आले, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे?

**श्री.रणजित कांबळे, श्री. छगन भुजबळ यांच्याकरिता** : (1) अतिरिक्त जिल्हाधिकारी, बीड यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांच्या कार्यालयाची दिनांक 3/9/2012 रोजी तपासणी केली, तपासणीचा अहवाल जिल्हाधिकारी, बीड यांनी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना पुढील कार्यवाहीसाठी सादर केला आहे.

(2), (3) व (4) तपसणी अहवालात निर्देशित केलेल्या उणीवांच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांच्यामार्फत चौकशी प्रगतीत आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागात सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सहीने मोठ्या प्रमाणात कामे मंजूर करण्यात आली व हा प्रकार उघडकीस आला तेव्हा या संबंधीची तक्रार जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांनी अतिरिक्त जिल्ह्याधिकाऱ्यांना या प्रकरणाची चौकशी करण्यास सांगितले. चौकशी मध्ये आढळून आले की, सेवानिवृत्त अधिकारी श्री.बी.आर.रोडे यांनी जवळपास 400 कामांना मागील तारखा टाकून परवानगी दिली. श्री.बी.आर.रोडे हे दिनांक 30.8.2012 रोजी सेवानिवृत्त झाले. त्याच बरोबर आमदार निधी, खासदार निधी, डोंगरी विकास कार्यक्रम निधी या अंतर्गत घेणाऱ्या कामांना सुध्दा त्यांनी मागील तारखा टाकून मंजुरी दिली. जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचा

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 34164....

श्री.धनंजय मुंडे..

तपासणी अहवाल अधीक्षक अभियंत्यांकडे व मुख्य अभियंत्याकडे पाठविला. परंतु त्या संदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी अधीक्षक अभियंत्यांना दोन वेळा स्मरणपत्रे पाठविली. त्यामध्ये त्यांनी नमूद केले होते की, सार्वजनिक बांधकाम विभागात अनागोंदी कारभार सुरु आहे. तेव्हा या प्रकरणी तातडीने चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करावी. जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेल्या पत्राची कोणत्याही प्रकारे दखल घेण्यात आली नाही.

सभापती महोदय, माझा प्रश्न आहे की, जिल्ह्याधिकाऱ्यांनी कारवाई करण्याचे निर्देश देऊनही अधीक्षक अभियंत्यांनी संबंधितांवर कारवाई केली. तेव्हा अधीक्षक अभियंत्यावर कारवाई करण्यात येईल काय ? माझा दुसरा प्रश्न आहे की, निवृत्त कार्यकारी अभियंता तसेच कनिष्ठ अभियंता यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात ? मागील तारखा टाकून जी कामे मंजूर करण्यात आली ती सर्व कामे रद्द करणार काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, अतिरिक्त जिल्हाधिकारी, बीड यांनी सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये जाऊन प्रत्यक्ष चौकशी केली. त्या चौकशीमध्ये कामामध्ये अनियमितता झाल्याचे आढळून आले. यामध्ये एकूण 11 जणांचा समावेश आहे. ज्यामध्ये ड्राफ्टमन, कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक, स्ट्रक्चरल इंजिनिअर, दोन सहाय्यक इंजिनिअर्स, सिव्हील इंजिनिअर, शिपाई तसेच एक उप अभियंता जे पी.ए.टू. डेप्युटी इंजिनिअर आहेत, त्यांना शो-कॉज नोटीस दिलेली आहे. अधीक्षक अभियंता हे राजपत्रित अधिकारी आहेत. त्यामुळे त्यांची फाईल मुख्य अभियंत्यांनी माननीय मंत्री आणि माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे पाठविलेली आहे, त्यांच्याकडून फाईल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर चार्जशीट दाखल करण्यात येईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाचा कारभार म्हणजे "आंधळं दळतय आणि कुत्रं पीठ खातय" असा आहे. त्या ठिकाणी कोणाचा कोणाला मेळ नाही. कोण कुठे काम करते, कोण कुठे सह्या करते, उप अभियंता आणि अधीक्षक अभियंता कधी कार्यालयात बसत नाहीत. सेवानिवृत्त झाल्यानंतरही अधिकारी 400 कामे मंजूर करुन बोगस बिले काढत आहेत. बीड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये करोडो

..4..



AJIT/ पूर्वी श्री.भारवि... 01:30

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 34164....

श्री.विनायक मेटे....

रुपयांचा गैरव्यवहार झालेला आहे. संबंधितांवर फक्त कारवाई करुन चालणार नाही तर त्यांच्यावर गुन्हे दाखल केले पाहिजेत. तसेच त्यांच्या मालमत्तेची चौकशी केली पाहिजे, त्या शिवाय बोगस कामांची चौकशी केली पाहिजे. तेव्हा माझा प्रश्न आहे की, या प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, चौकशीमध्ये आढळून आले की, यामध्ये प्रशासकीय चूक होती. आमदार निधी, खासदार निधी आणि डोंगरी विकास कार्यक्रमाचा निधी या कामांचा संबंध जिल्हाधिकारी कार्यालयाशी होता आणि त्या कामांची नोंद झाली नव्हती. रजिस्टर्डमध्ये त्यांनी गॅप ठेवला होता. जे टेंडर रजिस्टर्ड भरले होते त्याच्यावर अधीक्षक अभियत्यांची सही व्हावयाची होती. असे दोन सिरीयस लॅप्सेस आढळून आले. अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांना चौकशीमध्ये जे आढळून आले ते मी येथे सांगत आहे. टेक्नीकल सॅक्शनचे जे रजिस्टर्ड असते त्यामध्ये आमदार निधी, खासदार निधी आणि डोंगरी विकास कार्यक्रमाशी संबंधित असलेल्या कामांची नोंद करण्यात आली नव्हती. इन्व्हर्ड आणि आऊटव्हर्ड रजिस्टर्ड ब्लॅक होते. टेंडर रजिस्टर्डमध्ये जवळपास 552 कामांची नोंद झाली होती, परंतु त्यावर सह्या झाल्या नव्हत्या. मस्टर चेक करण्यात आले तेव्हा काही अधिकारी गैरहजर असल्याचे आढळून आले होते. या सर्व प्रशासकीय चूका आहेत. संबंधितांवर ताबडतोब कारवाई करण्याच्या सूचना दुसऱ्याच दिवशी जिल्हाधिकाऱ्यांनी मुख्य अभियंता, औरंगाबाद यांना दिल्या. त्यांची चौकशी चालू आहे. संबंधितांना शोकॉज नोटीस दिलेली आहे. संबंधितांकडून शोकॉज नोटीसचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर जी काही कारवाई करण्याची आवश्यकता आहे त्याप्रमाणे केली जाईल.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, उत्तरामध्ये नमूद केले आहे की, दिनांक 3.9.2012 रोजी तपासणी करण्यात आली. मंत्री महोदयांनी सांगितले की, अजून अहवाल प्राप्त झालेला नाही. तपासणी होऊन जवळपास तीन-चार महिने झालेले आहेत. या प्रकरणाचा अहवाल दाबून ठेवण्यात आलेला आहे काय ? तेव्हा माझा प्रश्न आहे की, या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेता तो अहवाल तातडीने मागवून घेण्यात येईल काय ? तसेच संबंधितांचे पेन्शनचे पेपर्स थांबविण्यात येतील काय ?

..5..


असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, दिनांक 30.11.2012 रोजी त्यांच्यावर चार्जशीट झ ालेली आहे.जे अधिकारी सेवानिवृत्त झालेले आहेत त्यांच्यावर चार वर्षापर्यंत कारवाई करता येते. त्यानुसार या प्रकरणी जे सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता आहेत त्यांचे पेन्शन आपणास थ्ांबविता येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय तरुण असल्यामुळे त्यांच्याकडून आम्हाला खूप अपेक्षा आहेत. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, ही घटना गंभीर आहे. या प्रकरणी चौकशी होऊन चार महिने झालेले आहेत. खरे म्हणजे प्रथम संबंधितांचे पेन्शन थांबविले पाहिजे. सेवा निवृत्त झाल्यानंतरही 400 कामांना मागील तारखा टाकून मंजुरी देण्यात आलेली आहे तेव्हा या सर्व प्रकरणाची चौकशी सीआयडीमार्फत करण्यात येईल काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, संबंधित अधिकाऱ्याचे पेन्शन अगोदरच थांबविण्यात आलेले आहे. चौकश्ी अधिकारी जी काही कारवाई सुचवतील त्याप्रमाणे संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

**सभापती** : मी माननीय राज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. एका विभागीय कार्यालयामध्ये 11 कर्मचाऱ्यांनी वेगवेगळ्या पध्दतीने ओमिशन करण्याचे ठरविले व

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ...

मेजरमेंटचे रेकॉर्डींग करुन त्यावर सही करावयाची अशा पध्दतीने चुका केल्या गेल्या आहेत. त्यामुळे ही बाब गंभीर स्वरुपाची आहे असे मानणे गरजेचे आहे. या प्रकरणाची संपूर्ण चौकशी मुख्य अभियंत्यांनी आठ ते दहा दिवसात पूर्ण करावी असे आपण जिल्हाधिकाऱ्यांना आदेश द्यावेत. तसेच ज्या प्रकरणामध्ये गंभीर चुका झालेल्या आहेत त्या कर्मचाऱ्यांना आपण निलंबित केले पाहिजे. संबंधित कार्यकारी अभियंता सेवानिवृत्त होऊन चार वर्षे झाली असली तरी देखील नियम 8 प्रमाणे त्यांची चौकशी करता येते त्यादृष्टीने त्यांची चौकशी करण्यात यावी. जेणेकरुन या बाबतीत झ ाालेल्या अनेक अनियमित बाबी बाहेर येऊ शकतील.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, होय.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, आपण निर्णय दिला आहे त्याबद्दल मी आपला आभारी आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी करुन चालणार नाही तर सी.आय.डी.मार्फत चौकशी झाली पाहिजे.

श्री. विनायक मेटे : मी मुख्य अभियंत्यांमार्फत चौकशी करण्यात यावी असे सांगितले आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बीड जिल्हयातील शेतकऱ्यांची पीक कर्जाची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत**

**(७) * ३३८८९ प्रा.सुरेश नवले , श्री.संजय दत्त , श्री.सुभाष चव्हाण , श्री.चरणसिंग सप्रा , डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयामध्ये शेतकऱ्यांना पीककर्ज वाटपासाठी बँकेने रुपये एक लक्ष बिनव्याजी आणि ३ लक्ष रुपयापर्यंत एक टक्का दराने कर्ज देण्याचे शासनाने आदेश असतानासुध्दा बँका कर्ज देत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,पीक कर्जाची प्रलंबित प्रकरणे निकाली काढून पीककर्ज वाटप करण्यात यावे या मागणीसाठी ४०० शेतकऱ्यांनी जिल्हयाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरु केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.हर्षवर्धन पाटील** : (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) जिल्हाधिकारी बीड यांनी सदर प्रकरणी राष्ट्रीयकृत / ग्रामीण बँकाना त्यांच्याकडे असलेली प्रलंबीत प्रकरणे त्वरीत निकाली काढून कर्जवाटप करण्याबाबत सूचना देऊन कर्जवाटपाबाबतचा दर आठवड्याला आढावा घेऊन सबंधीत बँकेस कर्ज वाटप करणे बाबत सूचना दिलेल्या आहेत.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, किती प्रकरणे प्रलंबित होती व या प्रलंबित कर्ज प्रकरणांची एकूण थकीत रक्कम किती होती?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, बीड जिल्ह्यामध्ये राष्ट्रीयीकृत बँकामार्फत ५५ हजार शेतकऱ्यांनी कर्जाची मागणी केली होती. त्यामध्ये ३१ कोटी रुपयापर्यंत पीक कर्जाचे वाटप करण्यात आले होते. २७ हजार शेतकऱ्यांना ग्रामीण बँकामार्फत १४ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले. दीड लाख शेतकऱ्यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामार्फत ३५० कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले. असे एकूण ८६० कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले. सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, राष्ट्रीयीकृत बँकानी शेतकऱ्यांकडून पीक कर्जाची वसुली करीत असतांना व्याजाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ३३८८९....

श्री.हर्षवर्धन पाटील....

रकमेची वसूली करता कामा नये. अशाप्रकारच्या घटना काही राष्ट्रीयीकृत बँकामार्फत घडल्या आहेत हे खरे आहे. तशाप्रकारे त्या बँकानी शेतकऱ्यांच्या अकाऊंटमधून व्याजाची आकारणी करु नये या करिता जिल्हाधिकारी, बीड यांनी बैठक घेतली आहे. राज्य सरकारने राष्ट्रीयीकृत बँका आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाना १ लाख रुपयापर्यंत पीक कर्ज आणि ३ लाख रुपयापर्यंत पीक कर्जाची व्याज सवलत योजना सुरु आहे. त्यामुळे या राज्यामध्ये कोणत्याही शेतकऱ्याने पीक कर्ज घेतले असले तरी ते मुदतीच्या फेडण्यापूर्वी कोणत्याही बँकेला त्यावर व्याज लावता येणार नाही अशाप्रकारची भूमिका राज्य सरकारने स्पष्ट केली आहे.

श्री. रणजित पाटील: सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या पीक कर्जाबाबत नाबार्डने स्पष्ट धोरण ठरविले आहे. त्यामध्ये केपी सम सेव्हिंग अकाऊंट म्हणजे किसान पत्र आणि सेव्हिंग अकाऊंट हे एकच असावे. सहकारी बँकामधून जे कर्ज वितरीत केले जाते ते पहिल्याच दिवशी टर्म लोनमध्ये क्रेडिट होते. त्याची संपूर्ण अमाऊंट ही सेव्हिंग अकाऊंटमध्ये ट्रान्सफर केली जाते. असे केले तर त्याला काहीही अर्थ रहात नाही.याबाबत जर नाबार्डने स्पेसिफिक गाईडलाईन्स दिल्या असतील तर राज्य सहकारी बँकेने पहिल्याच दिवशी हे क्रेडिट लोन टर्म लोनमध्ये कन्व्हर्ट करावे. परंतु तसे न करता पहिल्याच दिवसापासून राज्य सहकारी बँकेकडून फ्लॅट इंटरेस्ट वसूल केले जाते हे खरे आहे काय? हे खरे असेल तर त्यावर राज्य शासनाचे कोणते धोरण राहणार आहे?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, खरे म्हणजे हा पीक कर्जाच्या संदर्भातील प्रश्न आहे. आपल्याकडील पीक कर्जाची पध्दत अशी आहे की, संबंधित पीक कर्ज आपण पॅचमार्फत शेतकऱ्यांना देतो. पॅचच्या माध्यमातून दोन ते तीन वर्षाचे क्रमपत्रक तयार करुन त्या क्रमपत्रका प्रमाणे रक्कम दिली जाते. माननीय सदस्यांनी जिल्हा बँक आणि राज्य सहकारी बॅकेच्या बाबतीत मांडलेली बाब तपासून घेण्यात येईल. वास्तविक पहाता कोणती बँक कसे व्याज लावते हा प्रश्न आहे. आपण पीक कर्जाचे वाटप पॅचमार्फत करीत असल्यामुळे एक लाख आणि तीन लाखाचे धोरण राज्य शासनाने स्वीकारले आहे. तथापि, काही बँका स्वत:च्या फंडामधून पीक कर्ज देतात, काही बँकानी नाबार्डच्या ४ टक्के धोरणाप्रमाणे पीक कर्जासाठी क्वॉटम ठरवितात. त्याप्रमाणे राज्य सहकारी बँकेमार्फत ते कर्ज आपण वितरीत करतो. बऱ्याचवेळा थेट जिल्हा सहकारी बँकांना ते पीक कर्ज देण्यात यावे अशी मागणी करण्यात येते. याकरिता नाबार्ड, राज्य सहकारी बँक आणि



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ३३८८९....

श्री.हर्षवर्धन पाटील....

जिल्हा सहकारी बँक यांनी एकत्र बसून याबाबत धोरण ठरवावे. यामध्ये जर काही तांत्रिक अडचणी असतील तर त्या निश्चितपणे दूर केल्या जातील.

श्री. अमरसिंह पंडीत : सभापती महोदय, तारांकित प्रश्नामध्ये म्हटले आहे की, "रुपये एक लक्ष बिनव्याजी आणि ३ लक्ष रुपयापर्यंत एक टक्का दराने" बीड जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे डीएलबीसीचे चेअरमन असून त्यांना बीड जिल्हयाच्या गेवराई तालुक्यातील अनेक उदाहरणे माहीत आहेत व आम्ही त्यांच्या निदर्शनास आणून दिली आहेत. डॉ.पंजाबराव देशमुख व्याज दर अनुदान सवलत योजनेचे पैसे स्टेट बँक ऑफ हैद्राबाद या बँकेच्या ॲग्रिकल्चर अकाऊंटमध्ये जमा झाले असताना ११ महिने झाले तरी हे पैसे त्या शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा न करता त्यांच्याकडून १२ टक्के व्याज दराने पैसे वसूल करण्याचे काम बँकेने केले आहे. साधारणपणे २२ कोटी रुपयांची रक्कम त्या खात्यामध्ये जमा झाली आहे. अशापध्दतीने ज्या ज्या राष्ट्रीयीकृत बँकाकडे डॉ. पंजाबराव देशमुख व्याजदर अनुदान सवलत योजनेचे पैसे जमा झाले आहेत त्या संबंधित बँकावर आपण कारवाई करणार आहात काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितलेली संख्या बरोबर आहे. त्या जिल्ह्याची लीड बँक स्टेट बँक ऑफ इंडिया आणि स्टेट बँक ऑफ हैद्राबाद आहे. या दोन राष्ट्रीयीकृत बँकामार्फत पीक कर्ज वाटप करण्यात आले होते. त्यामध्ये त्यांनी सरळ व्याज आकारणी केली आहे. राज्य सरकारने त्या बँकाना व्याजदर सवलत योजनेमधून पैसे दिले आहेत. मी परवा त्या संदर्भात अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. मुळात राज्य सरकारने हे अनुदान शेतकऱ्यांना देण्याचे मान्य केले असल्यामुळे बँकामध्ये जमा झालेली रक्कम १५ दिवसाच्या आत तातडीने शेतकऱ्यांना दिली जाईल. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत यासंबंधी दि. २६.६ ला एक बैठक घेतली, त्यानंतर १८.७ ला एक बैठक घेतली, त्यानंतर २५.७ ला एक बैठक घेतली. ही बाब माझ्या निदर्शनास आल्यानंतर या राज्यातील राष्ट्रीयीकृत बॅक ,कमर्शिअल बँक , जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राज्य सहकारी बँकानी शेतकऱ्यांची पीक कर्जाची मुदत संपण्यापूर्वी त्यांच्याकडून व्याजाची आकारणी करु नये अशा सूचना मी आयुक्तांना दिल्या आहेत.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

१८-१२-२०१२ ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) S ५

DGS/ ०१:४०

ता.प्र.क्र. ३३८८९....

श्री.हर्षवर्धन पाटील....

माननीय उप मुख्यमंत्र्यांनी यापूर्वी असा निर्णय घेतला होता की, ही व्याजदर सवलत योजनेची रक्कम तीन-तीन महिने ॲडव्हान्समध्ये जिल्हा बँकाना उपलब्ध करुन दिली तर अशाप्रकारच्या अडचणी पुन्हा येणार

नाहीत. त्यामुळे पुढील अर्थसंकल्प तयार करीत असतांना या बाबत विचार केला जाईल. याचे कारण या रकमा बँकेला वेळेवर दिल्या नाही तर बँका अडचणीत येतात. पर्यायाने शेतकऱ्यांच्या लेजर अकाऊटमधून तशाप्रकारे व्याजाची आकारणी केली जात असल्यामुळे तशाप्रकारे आकारणी करु नये अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. यावर्षी आपण २१ हजार कोटी रुपयांचे पीक कर्जाचे वाटप केले आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सर्वोदय शेतकरी समस्या निवारण समिती, अकोला येथील सर्वोदय शेतकरी समस्या निवारण समितीने अधिग्रहीत केलेल्या जमिनीबाबत**

**(८) * ३४२९३ डॉ.रणजित पाटील , श्री.नागो गाणार , श्री.विनोद तावडे , श्री.प्रवीण पोटे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वोदय शेतकरी समस्या निवारण समिती, अकोला या समितीने महाराष्ट्र कृषी विद्यापीठांतर्गत अधिग्रहीत केलेली जमीन मूळ शेतजमीन धारकांमार्फत बिजोत्पादन केल्याबाबतचे निवेदन मा.कृषी मंत्री, मुंबई व आयुक्त कृषी, पुणे यांना दिनांक ४ सप्टेंबर, २०१२ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील** : (१) महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठांतर्गत अधिग्रहीत केलेली जमीन बिजोत्पादनासाठी खाजगी कंपन्यांना न देता कृषी विद्यापीठे व मूळ शेतजमीन धारकांमार्फत बिजोत्पादन करण्याबाबत सर्वोदय शेतकरी समस्या निवारण समिती, अकोला यांच्याकडून निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाहीच्या सूचना महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत कृषी विद्यापीठांना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, दुसऱ्या उत्तरामध्ये म्हटले आहे की,"कार्यवाहीच्या सूचना महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत कृषी विद्यापीठांना देण्यात आल्या आहेत". दिनांक १६ एप्रिल २०१२ रोजी साई प्रवरा ॲग्रो प्रोसेसिंग पार्क इथे एक गुंतवणूकदारांची परिषद झाली. त्या परिषदेमध्ये माननीय कृषी मंत्र्यांनी शासनाची भूमिका मांडीत असतांना त्या ठिकाणी राज्याचे कृषी विभागाचे प्रधान सचिव डॉ. गोयल, पणन संचालक डॉ. तोशनीवाल साहेब, कृषी औद्योगिक कार्यकारी महामंडळाच्या संचालक सौ. लोचन मॅडम उपस्थित होत्या. त्यावेळी आपण भूमिका मांडीत असतांना राज्य शासनाच्या मालकीची कृषी विद्यापीठाची जमीन देखील कॉर्पोरेट कंपन्यांना देऊन त्या ठिकाणी बिजोत्पादन केले जाईल असे सांगितले. या माध्यमातून गुंतवणूकदारांकडून, कॉर्पोरेट जगताकडून ५ हजार कोटी रुपये उभे करणार आहात हे खरे आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ३४२९३...

डॉ. रणजित पाटील...

काय? ही जमीन भाडे तत्वावर दिली जाईल. प्रकल्प तत्वावर ४० टक्के अनुदान देणार आहात. याला मान्यता मिळविण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहात हे खरे आहे काय?

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, काही गुंतवणूकदारांची परिषद झाली ही गोष्ट खरी आहे. त्यामध्ये हा विषय चर्चिला गेला आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 01:50

ता.प्र.क्र.34293 . . . .

श्री.राधाकृष्ण विखे पाटील . . . .

त्यावेळी राज्य शासनाने पहिल्यांदाच आपली भूमिका स्पष्ट केली आहे की, कृषी विद्यापीठाच्या किंवा कोणत्याही प्रकारच्या सरकारी जमिनी कोणत्याही खाजगी संस्थेला देणार नाही ही राज्य शासनाची भूमिका कायम आहे. यामध्ये आम्ही विद्यापीठाच्या दृष्टीने एवढीच सुधारणा करावयास सांगितली आहे आणि याबाबतीत विद्यापीठांवर अधिकार सोपविलेला आहे. याबाबत कार्यकारी परिषदेने तो निर्णय घ्यावयाचा आहे. राज्यामध्ये बीज उत्पादन मोठया प्रमाणात झाले पाहिजे पण ते आज होत नाही. मात्र आज खाजगी कंपन्या पुढे येण्यास तयार आहेत. संयुक्त कराराने विद्यापीठांनी बीज उत्पादन करावे. त्यासाठी सरकारची संमती पाहिजे असेल किंवा त्यांना ते करणे आवश्यक आहे की नाही याबाबतचा निर्णय विद्यापीठाने करावयाचा आहे. तसेच फळ प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यासाठी आपण राज्यामध्ये प्रयत्न करीत आहोत. त्यासाठी कृषी विद्यापीठाने जरी संबंधित कंपन्यांबरोबर जॉईंट व्हेन्चर केले किंवा त्यांच्याकडे असलेल्या जमिनीमध्ये मोठ्या प्रमाणात फळ बागांची लागवड केली तर त्याबाबत संशोधन होणे फार महत्वाचे आहे. यामध्ये संशोधनाचा मुख्य गाभा आहे. त्यामुळे अशा काही जमिनी परत करावयाच्या आणि खाजगी संस्थेला वा खाजगी व्यक्तीला द्यावयाच्या असे शासनाचे कोणतेही धोरण नाही आणि तसे ठरविण्याचा प्रश्न नाही.

----

. . . .टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पूर्व विदर्भातील पोलीस खात्यातील भ्रष्ट अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करणेबाबत**

**(9) *34514 श्रीमती शोभाताई फडणवीस** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पूर्व विदर्भातील पोलीस खात्यातील एकूण 11 भ्रष्ट शासकीय अधिकाऱ्यांविरुध्द उघड चौकशी व आरोपपत्र दाखल करण्याची मंजुरी देण्यास टाळाटाळ केली जात असून संबंधित खात्यातील आणि शासनातील उच्चपदस्थ त्यांना पाठीशी घालत असल्याचे माहे सप्टेंबर, 2012 च्या दुसऱ्या आठवडयात उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, भ्रष्टाचार करणाऱ्यांना सरकार पाठीशी घालणार नाही असा दावा मुख्यमंत्री यांनी करुनही अद्याप या 11 भ्रष्ट अधिकाऱ्याविरुध्द कारवाई न केल्याची कारणे काय आहेत,

(3) असल्यास, उक्त प्रकरणी तातडीने कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.आर.आर. पाटील यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

(2) , (3) व (4) प्रस्तुत प्रकरणी माहे सप्टेंबर, 2012 पर्यंत तसेच माहे सप्टेंबर, ते आजपर्यंत पोलीस खात्यातील भ्रष्ट अधिकाऱ्यांविरुध्द उघड चौकशी करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित किंवा प्रस्तावित नाही. तथापि, माहे सप्टेंबर, 2012 च्या दुसऱ्या आठवड्यात नागपूर परिक्षेत्रातील पोलीस खात्यातील अधिकाऱ्यांविरुध्द लाचेच्या सापळा प्रकरणात आरोपपत्र दाखल करण्याची मंजुरी मिळणकरिता संबंधित सक्षम अधिकारी यांच्याकडे दिनांक 9/3/2012 व दिनांक 13/07/2012 रोजी पाठविलेले दोन प्रस्ताव प्रलंबित होते. सदर प्रस्तावांपैकी एका प्रकरणात दिनांक 11/10/2012 रोजी मंजूरी प्राप्त झाली असून, मा. न्यायालयात अभियोग दाखल करण्याची तजवीज ठेवली आहे. तसेच दुसऱ्या प्रकरणात सक्षम अधिकाऱ्यांकडून त्रुटी पूर्ततेकरिता प्रस्ताव परत प्राप्त झाला असून, सदर प्रकरणाची छाननी सुरु आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की,"माहे सप्टेंबर ते आजपर्यंत पोलीस खात्यातील भ्रष्ट अधिकऱ्यांविरुध्द उघड चौकशी करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित किंवा प्रस्तावित नाही." माझा प्रश्न असा आहे की, अशा किती अधिकाऱ्यांचे प्रश्न न्यायालयामध्ये दाखल केले आहेत? तसेच दिनांक 13-7-2012 रोजी एक प्रकरण आलेले आहे. परंतु अजूनपर्यंत सदरहू प्रकरणाची छाननी केलेली नाही. माझा प्रश्न असा आहे की, सदरहू छाननी केव्हा पूर्ण होणार आहे आणि त्यानुसार किती लोकांच्या संबंधातील कारवाई न्यायालयामध्ये सादर करणार आहात?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, अलिकडच्या काळामध्ये ट्रॅपमधील ज्या केसेस आहेत त्यांची चार्जशीट लवकरात लवकर दाखल व्हावीत अशा प्रकारचा उपक्रमच गृह विभागाने हाती घेतला होता. बऱ्याच वेळेला लोकांच्या अशा तक्रारी येतात की, ही प्रकरणे गृह विभागामध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रलंबित रहात आहेत. पण वर्ग-1 च्याबाबतीत चार्जशीट दाखल करताना, ओपन इन्क्वायरी करताना संबंधित विभागाची मान्यता घ्यावी लागते. आम्ही याबाबतीत कालबध्द कार्यक्रम ठरविलेला आहे. जर ओपन इन्क्वायरीचे प्रकरण असेल किंवा ॲन्टी करप्शन ब्युरोला प्रॉपर्टीच्या बाबतीत काही माहिती मिळाली असेल आणि जर तीन महिन्याच्या आत संबंधित विभागाने जर मान्यता दिली नाही तर डीम्ड परमिशन आहे व यासाठी मान्यता दिली आहे असे गृहीत धरुन ॲन्टीकरप्शन ब्युरो ओपन इन्क्वायरीला सुरुवात करील. तसेच सहा महिन्याच्या आत चार्जशीटला परवानगी दिली नाही तर चार्जशीट दिले जाईल. पूर्व विदर्भातील पोलीस विभागाच्या संदर्भात सांगावयाचे तर दोन प्रकरणे प्रलंबित होती. त्यातील एका प्रकरणाबाबत यापूर्वीच मान्यता दिलेली आहे आणि एका प्रकरणामध्ये काही माहिती मागविलेली आहे म्हणून प्रलंबित असून कोणत्याही अधिकाऱ्यांना पाठिशी घालण्यात आलेले नाही. तसेच पूर्व विभागामध्ये कोणतीही प्रकरणे प्रलंबित नाहीत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, पूर्व विदर्भातील काही भाग हा नक्षलग्रस्त आहे. त्या दृष्टीकोनातून त्या विभागामध्ये चांगल्या प्रकारचे अधिकारी असावयास पाहिजेत ही अपेक्षा आहे. जर तेथे भ्रष्ट अधिकारी असतील तर त्याठिकाणी नक्षलवाद्यांचे वेगळ्या प्रकारे प्रभुत्व वाढण्याची शक्यता आहे. या दृष्टीकोनातून शासन त्यांच्या बाबत जलद गतीने कारवाई करणार आहे काय?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पूर्व विभागामध्ये एकतर चांगले अधिकारी असले पाहिजेत अशा पध्दतीची कार्यवाही सरकारने यापूर्वीच केली आहे. त्याठिकाणी अगदी फ्रेश असे पोलीस दलातील तरुण आय.पी.एस. अधिकारी या भागामध्ये जास्तीतजास्त रहातील याबाबत शासनाने नेहमीच दक्षता घेतलेली आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी असा सरळ प्रश्न विचारला होता की, यातील किती प्रकरणे न्यायालयामध्ये दाखल केली आहेत? तसेच दिनांक 13-7-2012 चे प्रकरण होते त्या संबंधातील प्रस्ताव त्रुटीपूर्ततेसाठी परत झाला असून सदर प्रकरणाची छाननी जुलै पासून डिसेंबरपर्यंत होऊ शकत नाही. तर याबाबतीत छाननी झाली आहे काय ? जर छाननी झाली नसेल तर ती केव्हा पूर्ण करणार आहात आणि सर्व केसेस न्यायालयामध्ये दाखल करणार आहात ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, एकंदर दोनच प्रकरणे प्रलंबित होती. त्यातील एकाला मान्यता दिली असून एकच प्रकरण प्रलंबित असून त्याबाबत फक्त एक महिन्याच्या आत सर्व पूर्तता करुन मान्यता दिली जाईल. डी.जी.लेव्हलवर मान्यता दिली जाते. शासनाकडे हा .....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रस्तावही येत नाही. एक महिन्याच्या आत ही कारवाई केली जाईल. तसेच एकंदर किती प्रकरणे कोर्टामध्ये प्रलंबित आहेत याबाबतची माहिती मी सदनाच्या पटलावर ठेवेन.

----

. . . .टी-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**राज्यातील मुंबई-पुणे सारख्या शहरांमध्ये परराज्यातील शस्त्रास्त्रांची बेकायदेशीररित्या होत असलेली विक्री**

**(10) *33850 श्रीमती विद्या चव्हाण** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील मुंबई-पुणे सारख्या शहरांमध्ये परराज्यातून गावठी पिस्तुले, रिव्हॉल्व्हर आणून मोठया प्रमाणात बेकायदेशीररित्या विकली जात असल्याचे माहे ऑगस्ट, 2012 मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) तसेच परराज्यातून शस्त्र आणून त्यांचा वापर होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) ऑगस्ट, 2012 मध्ये वा त्यादरम्यान पुणे शहरामध्ये परराज्यातून गावठी पिस्तुले, रिव्हॉल्वर विकत आणल्याचा एक गुन्हा दाखल झाला आहे. मुंबई शहरात परराज्यातून बेकायदेशीररित्या पिस्तुल, रिव्हॉल्वर विकत असल्याबाबत एकही गुन्हा दाखल झालेला नाही.

(2) व (3) पुणे शहरामध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यातील आरोपींकडून परराज्यातून आणलेली 9 अग्निशस्त्रे, 76 काडतुसे, 1 फुलथ्रू बॉक्स, 2 मोकळ्या मॅगझीन, 1 मोबाइल फोन व रेक्झीनची बॅग असा एकूण 2,69,900/- चा माल जप्त केला असून त्याचेविरुध्द हडपसर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. 3296/12 आर्म ॲक्ट 3/25, मुंबई पोलीस ॲक्ट कलम 37 (1) /आर.डब्ल्यू/135 नुसार गुन्हा दाखल केला आहे.

(4) परराज्यातून बेकायदेशीररित्या शस्त्रे आणल्याची व ती बाळगल्याची व विकली जात असल्याची माहिती मिळाल्यास त्यांना तत्काळ पकडून त्यांच्याविरुध्द नियमानुसार योग्य ती कार्यवाही केली जाते.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, या प्रश्नातील उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"ऑगस्ट 2012 मध्ये वा त्यादरम्यान पुणे शहरामध्ये परराज्यातून गावठी पिस्तुले, रिव्हॉल्वर विकत आणल्याचा एक गुन्हा दाखल झाला आहे. मुंबई शहरात परराज्यातून बेकायदेशीररित्या पिस्तुल, रिव्हॉल्व्हर विकत असल्याबाबत एकही गुन्हा दाखल झालेला नाही." माझा असा प्रश्न आहे की, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, मध्यप्रदेश या राज्यातून येणाऱ्या शस्त्राव्दारे राज्यातील गुन्हेगारांनी आपली दहशत प्रस्थापित करुन गेल्या पाच वर्षामध्ये या शस्त्राव्दारे 380 जणांना गोळया घालून त्यांची हत्या करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशमध्ये 1043, बिहारमध्ये 311, झारखंड येथे 419, पश्चिम बंगालमध्ये 317, मध्य प्रदेशमध्ये 164 .....



ता.प्र.क्र.33850 . . . .

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी प्रश्न विचारावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय,माझे असे म्हणणे आहे की,हे लोक एवढ्या मोठ्या प्रमाणात शस्त्रे घेऊन येतात आणि नाशिकपर्यंत आल्यावर ट्रेनने मुंबईमध्ये येऊन सर्रास या हत्यारांचा वापर करुन लोकांच्या हत्या करतात असे झालेले आहे. अशी स्थिती असताना याठिकाणी जे उत्तर दिले आहे ते बरोबर नाही असे माझे म्हणणे आहे. त्याचप्रमाणे चाकूचा वापर करुन 380 लोकांच्या हत्या झालेल्या आहेत. पूर्वी मुंबईमध्ये क्राईम ब्रँचने गँगस्टर विरोधात .....

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांना प्रश्न विचारावयाचा नाही असे समजावयाचे काय ? सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी जे लेखी उत्तर देण्यात आले आहे ते बरोबर नाही असे माझे म्हणणे आहे. शासनाने त्याचा खुलासा करावा.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी सुधारित उत्तर देखील देण्यात आलेले आहे आणि ते वितरित देखील करण्यात आले आहे. मला असे वाटते की, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण या जुने उत्तर पहात असतील. मात्र याठिकाणी योग्य ते दिलेले आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मोठ्या प्रमाणात जी शस्त्रास्त्रे सापडतात ती जप्त करण्यात येतात. त्या शस्त्रास्त्रांची नंतर विल्हेवाट लावण्याबाबत शासनाचे काही धोरण आहे काय? अशा शस्त्रास्त्रांच्या बाबतीत नंतर काय केले जाते?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, अशा प्रकारे सापडलेल्या शस्त्रांच्या बाबतीत सांगावयाचे तर कोर्टामध्ये त्या केसचा निकाल लागेपर्यंत पोलिसांना मुद्देमाल म्हणून ती जप्त करुन ठेवावी लागतात. परंतु आपल्याकडे केसचा निकाल देखील लवकर लागत नाही. त्यामुळे मुद्देमाल म्हणून ही शस्त्रे पोलिसांकडे रहातात आणि ज्या केसेसमध्ये निकाल लागलेले आहेत, ती शस्त्रे पोलिसांच्या ताब्यात आहेत. काही वर्षापूर्वी लोकप्रतिनिधी असतील, पोलीस असतील त्यांना ती सवलतीच्या दरामध्ये म्हणजे त्याचे जे व्हॅल्यूएशन असेल त्यानुसार दिली जात होती. पण कोर्टाच्या एका निर्णयामुळे गेली अनेक वर्षे तो शस्त्रसाठा पोलिसांकडे पडून आहे.

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, आपण मला प्रश्न विचारण्यासाठी परवानगी दिली त्या

. . . .टी-7



श्री.राम पडांगळे . . . .

बद्दल मी आपला आभारी आहे. पुणे आणि विशेषत: मुंबई मध्ये बाहेरुन शस्त्रे आणली जातातच. आपण अनेक गँगवॉरमध्ये पाहिले आहे. लोखंडवाला कॉम्प्लेक्स मध्ये पोलिसांनी 6 जणांना मारले.

पण त्यांच्याकडे कट्टा वगैरे सारखी शस्त्रे मिळाली आणि ती उत्तर प्रदेशातून आणलेली होती. बांद्रा येथे काल्या ॲन्थोनीची हत्या झाली आणि त्याला उत्तर प्रदेश मधून आणलेल्या कट्टयानेच मारले होते.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी प्रश्न विचारावा.

श्री.राम पडांगळे : मुंबईमध्ये खुले आम बाहेरच्या राज्यातून शस्त्रे आणली जातात. परंतु पोलिसांना याबाबतीत रिपोर्ट मिळत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.अशा वेळी आपण मुंबई शहरामध्ये जास्त खबरे पसरवून त्यांच्याकडून माहिती घेणार आहात काय असा माझा प्रश्न आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, याठिकाणी जी शस्त्रे आणली जातात ही दुर्दैवाची गोष्ट आहे. पण पोलीस शस्त्रे पकडतात ही सुदैवाची गोष्ट आहे. याबाबतीत खबऱ्याकडून किंवा सदनामधील कोणाकडे किंवा आणखी कोणाकडे काही माहिती असेल त्याबाबतची माहिती आम्ही निश्चितपणे घेऊ आणि संबंधितांवर कारवाई करु.

----

यानंतर श्री.बरवड . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील ज्येष्ठ नागरिक, वृध्दांच्या संरक्षणासाठी विशेष धोरणीची आखणी करण्याबाबत**

**(११) * ३३३१३ श्री.विनोद तावडे , श्रीमती शोभाताई फडणवीस , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.चंद्रकांत पाटील , श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ज्येष्ठ नागरिक, वृध्दांवर हल्ल्यांच्या संख्येत तसेच त्यांचे खून होण्याच्या प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नागरिकांबाबत एका विशेष धोरणाची आखणी करण्याबाबत, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचे स्वरूप काय आहे तसेच या धोरणामध्ये कोणत्या सुविधा, योजनांचा समावेश करण्यात आला आहे तसेच या धोरणाच्या अंमलबजावणीकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) या धोरणाची आखणी करण्याकरिता शासनाने कोणाकडून सूचना मागविल्या होत्या, असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(५) ज्येष्ठ नागरिकांच्या धोरणाबाबत शासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) होय. अंशत: वाढ आहे.

(२), (३), (४) व (५) राज्याचे सर्व समावेशक असे ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर करण्याबाबतची कार्यवाही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत चालू आहे. ज्येष्ठ नागरिक धोरणाचा मसूदा तयार करण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी व शासन प्रतिनिधी यांची मसुदा समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने मसुदा सादर केला असून त्यास मंत्रीमंडळाची मान्यता घेण्याबाबतची कार्यवाही चालू आहे. सदर मसुद्यामध्ये विविध सुविधा व योजनांचा समावेश आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हा प्रश्न सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारित जास्त येतो त्यामुळे हा प्रश्न राखून ठेऊन उद्या किंवा परवा चर्चेला घेतला तर योग्य होईल. कारण यामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भातील धोरणाबाबतचा विषय येऊ शकतो. माझी आपल्याला विनंती आहे की, गृह विभागापेक्षा सामाजिक न्याय विभागाकडे हा प्रश्न देऊन उद्या किंवा परवा चर्चेला घेतला तरी चालेल.

**सभापती** : हा प्रश्न आज या ठिकाणी उपस्थित केला गेला आहे त्यामुळे हा प्रश्न तहकूब ठेवतो असे म्हणणे म्हणजे माननीय मंत्री महोदयांवर अकारण अन्याय केल्यासारखे आहे.

श्री. आर. आर. पाटील : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावेत. यामध्ये संयुक्त जबाबदारी आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

ता. प्र. क्र. 33313....

श्री. विनोद तावडे : मंत्रिमंडळाची संयुक्त जबाबदारी आहे आणि प्रश्नाचे उत्तर येणार असेल तर अडचण नाही.

श्री. आर. आर. पाटील : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अंतिम आठवडा प्रस्ताव म्हणून हा विषय आणावा. राज्यामध्ये या प्रश्नावर व्यापक चर्चा होण्याची आवश्यकता आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही या विषयावर अंतिम आठवडा प्रस्ताव आणला तर ते म्हणतील की, विदर्भावर अन्याय केला. कारण त्यांना माहीत आहे की, आम्ही विदर्भाच्या अनुषंगाने अंतिम आठवडा प्रस्ताव दिलेला आहे. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, आता महाराष्ट्रामध्ये ज्येष्ठ नागरिकांची संख्या सव्वा ते दीड कोटी झालेली आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भातील धोरण अतिशय महत्वाचे आहे.

**सभापती** : आपण या प्रश्नाच्या अनुषंगाने 2 प्रश्न विचारावेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, 1999 ला केंद्र शासनाने ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भातील धोरण अंगीकारल्यानंतर गोवा, केरळ, कर्नाटक, मध्यप्रदेश, आंध्र प्रदेश, राजस्थान, दिल्ली या सात राज्यांनी ते धोरण आपल्या राज्यात स्वीकारले आहे.

श्री. रमेश शेंडगे : आम्ही या संदर्भातील प्रस्ताव दिलेला आहे.

श्री. हेमंत टकले : ज्येष्ठ नागरिकांच्या संरक्षणाच्या संदर्भातील विषय आम्ही चर्चेसाठी दिलेला आहे.

**सभापती** : अधिवेशनाचा एकंदर कालखंड आणि त्यामध्ये उपलब्ध असणारे विषय पाहता या कालखंडामध्ये किती विषय चर्चेला येतील याला सुध्दा मर्यादा आहेत. त्यामुळे त्या बाबतीत लगेच या ठिकाणी सांगता येणार नाही. सन्माननीय सदस्यांनी 2 प्रश्न विचारुन हा प्रश्न संपवावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाकडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने प्रस्ताव दिला होता पण काँग्रेसने इंदू मिलचा प्रस्ताव आणल्यामुळे तो प्रस्ताव मागे पडला. सभापती महोदय मला या प्रश्नाच्या अनुषंगाने दोनच गोष्टींची माहिती पाहिजे. 1999 मध्ये केंद्र शासनाने ज्येष्ठ नागरिकांच्या विषयातील धोरण घोषित केले त्याला आता 12 वर्षे झालेली आहेत. महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांची लोकसंख्या जवळजवळ 10 टक्केच्या वर आहे. आज जर आपण वेळेत या विषय

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

ता. प्र. क्र. 33313 .... श्री. विनोद तावडे ....

विषयातील भूमिका घेतली नाही तर पुढच्या काळात अनेक प्रश्न निर्माण होतील. ज्येष्ठ नागरिकांच्या संघटनांनी वेळोवेळी माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांच्या गाठीभेटी घेतल्या. गेली अडीच तीन वर्षे प्रत्येक भेटीमध्ये आता आम्ही धोरण आणतच आहोत आणि त्या धोरणामध्ये सर्वंकष विचार होणारच आहे असे सांगितले जाते. त्यामुळे असे धोरण येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी तरी घोषित करणार का ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो सामाजिक न्याय विभागाशी संबंधित प्रश्न आहे म्हणून मी सकाळी ब्रिफींगच्या वेळी त्याही विभागाला बोलवून घेतले होते. ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत पोलिसांनी मुंबई शहरामध्ये ज्या उपाययोजना केलेल्या आहेत त्यामध्ये त्यांच्या नोंदी ठेवणे, नोकरांच्या नोंदी घेणे, महिन्यातून एकदा पोलीस कॉन्स्टेबलने त्या वयोवृध्द माणसांना जाऊन भेटणे, त्यांना आधार देणे, अशा गोष्टी केलेल्या आहेत. जो उपक्रम आम्ही मुंबईमध्ये सुरु केलेला आहे तो लवकरच ज्या ठिकाणी पोलिसांची संख्या चांगली आहे त्या पुणे, नागपूर, औरंगाबाद या मोठ्या महानगरांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने हा उपक्रम सुरु करण्यात येईल.

सामाजिक न्याय विभागाने वृध्दांच्या बाबतीत एक धोरणही ठरविले आहे. लवकरच तो प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर येईल आणि वयोवृध्द नागरिकांच्या बाबतीत, ज्येष्ठ नागरिकांच्या धोरणाच्या बाबतीत आम्ही निर्णय घेऊ. त्यामध्ये आणखी दुरुस्त्या करावयास पाहिजे. कारण सामाजिक न्याय विभागाने ज्येष्ठ नागरिकांची जी व्याख्या केलेली आहे त्यामध्ये 60 ते 70 वर्षामधील असेल तर तरतरीत वृध्द, 70 ते 80 वर्षामधील असेल तर वृध्द आणि 80 वर्षाहून अधिक वय असेल तर वयोवृध्द अशी व्याख्या केलेली आहे. या व्याख्येपासून त्यांना दिल्या जाणाऱ्या सवलतीपर्यंत मंत्रिमंडळामध्ये आम्ही निश्चितपणे विचार करु. केंद्र सरकारने वयोवृध्द ज्येष्ठ नागरिकांच्या बाबतीत जो हेतू व्यक्त केला आहे त्यामध्ये देशातील कोणत्याही राज्यापेक्षा अधिक चांगले, दिलासा देणारे, वयोवृध्दांना न्याय देणारे धोरण आणि कायदा निश्चितपणे आपल्या राज्यामध्ये लवकरात लवकर आणण्यात येईल.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या प्रश्नाच्या आधी उपस्थित झालेल्या प्रश्न क्रमांक 33850 च्या अनुषंगाने माझा पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. या प्रश्नाच्या सुधारित उत्तरामध्ये फायर आर्म्सचे मराठीत भाषांतर अग्निशस्त्रे असे केलेले आहे. वर हत्यारे, शस्त्रे असा उल्लेख केलेला आहे पण फायर आर्म्सचे अग्निशस्त्र हे भाषांतर जरा चुकीचे वाटते. आपल्या मराठी विभागाकडून ते तपासून घेऊन त्याबाबत योग्य शब्द घ्यावा अशी मी विनंती करतो.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जर योग्य शब्द सुचविला तर तो मोकळ्या मनाने स्वीकारला जाईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचा मुद्दा

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. मराठा समाजाचा ओबीसीमध्ये समावेश करुन त्यांना 25 टक्के आरक्षण द्यावे ही आमची एक मागणी तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रामध्ये स्मारक त्वरित उभे करावे ही दुसरी मागणी आणि खुल्या वर्गातील म्हणजे त्यामध्ये मुस्लीम असतील, खिश्चन असतील, ब्राम्हण किंवा अन्य असतील, यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बलांना आरक्षण आणि सवलती द्याव्यात ही तिसरी मागणी आहे या तीन मागण्यांकरिता आम्ही सर्व पक्षातील जवळपास 100 आमदारांनी विधान भवनाच्या प्रांगणामध्ये पायऱ्यांवर बसून धरणे आंदोलन केले.

गेल्या अनेक वर्षापासून या संदर्भामध्ये महाराष्ट्राच्या सर्व समाजाची मागणी आहे. या संदर्भामध्ये केंद्र शासनाकडून तसेच राज्य शासनाकडून अनेक आयोग नेमले गेले. कालेलकर आयोग, मंडल आयोग, राज्य मागासवर्गीय आयोग, बापट आयोग, सराफ आयोग असेल या सर्व आयोगांनी आपापले अहवाल दिलेले आहेत. या व्यतिरिक्त हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टानेही काही निर्णय दिलेले आहेत तसेच स्वातंत्र्याच्या अगोदर सुध्दा काही निर्णय दिले गेले आहेत. या सर्वांनी निर्णय दिलेले आहेत तसेच इंग्रजांच्या काळातील अनेक दाखले सुध्दा आहेत. असे असताना आणि इतर अनेक प्रांतांमध्ये मराठा समाजाला न्याय मिळालेला असताना, आंध प्रदेश, तामिळनाडू अशा काही राज्यांमध्ये बॅकवर्ड क्लासमध्ये त्यांना समाविष्ट केले असताना, या राज्यामध्ये या समाजाची आणखी दुर्दशा झालेली असताना, अतिशय वाईट परिस्थिती असताना, हलाखीची परिस्थिती असताना शासन याकडे गांभीर्याने पाहण्यास तयार नाही. त्यामुळे अतिशय उद्विग्न होऊन सर्व पक्षातील आम्ही 100 आमदार धरणे आंदोलनाला बसलो. या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री, माननीय गृह मंत्री तसेच माननीय संसदीय कार्य मंत्री उपस्थित आहेत त्यांनी या ठिकाणी मराठा समाजाला आरक्षण, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक आणि खुल्या वर्गाबद्दलचा निर्णय जाहीर करावा आणि या राज्यातील सर्व वर्गाला आणि समाजाला न्याय द्यावा अशी माझी आपल्यामार्फत विनंती आहे.

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, गेली अनेक वर्षे हा विषय प्रलंबित आहे. लोकसभेमध्ये सुध्दा खासदार राजू शेट्टी यांनी प्रश्न विचारल्यानंतर केंद्र शासनाने उत्तर दिले आहे की, या विषयामध्ये लवकरात लवकर काही तरी समारात्मक निर्णय करणार आहोत. महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या दृष्टीने हा अतिशय गंभीर विषय आहे. अनेक वर्षे त्या त्या गावामध्ये सर्वार्थाने गावचे प्रमुख म्हणून राहिल्यानंतर आज या मराठा समाजातील मुले कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेऊ शकत नाहीत, त्यांना नोकरी मिळत नाही अशी स्थिती असताना केंद्र सरकार जर या बाबतीत सकारात्मक विचार करणार असेल तर मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो की, या विषयाच्या संदर्भामध्ये सर्व पक्षातील आमदारांचा एक गट तयार करुन केंद्राकडे या विषयाचा नीट पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे एका बाजूने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक करण्याचे आपण घोषित केले आणि ते करणार आहोत हा जसा अभिमानाचा विषय आहे तसेच अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक करण्याचा विषय वर्षानुवर्षे प्रलंबित आहे. ज्या प्रकारची तडफ माननीय मुख्यमंत्र्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या बाबतीत दाखविली तीच तडफ सर्व पक्षांना बरोबर घेऊन या स्मारकाच्या बाबतीत सुध्दा त्यांनी दाखविली पाहिजे आणि यामध्ये सुध्दा ज्या ज्या अडचणी आहेत त्या संपवून हे स्मारक लवकरात लवकर झाले पाहिजे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक अरबी समुद्रामध्ये व्हावे यासंबंधीचा विषय येथे उपस्थित केला. या विषयासंबंधी शासनाच्या वतीने या सदनामध्ये घोषणा करण्यात आली होती. छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक होणे ही राज्याच्या आणि देशाच्या दृष्टीने अत्यंत भूषणावह अशी बाब आहे. इंदू मिलच्या जागी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक होत आहे ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे अरबी समुद्रामध्ये स्मारक होण्याच्या बाबतीत काही पर्यावरणाच्या अडचणी आल्या आहेत. केन्द्रात काँग्रेसचे आघाडी सरकार आहे. आपण सर्वांनी विशेषत: सत्ताधारी पक्षातील मंडळींनी केन्द्रामध्ये थोडे अधिक प्रयत्न केले तर स्मारक उभारण्याच्या बाबतीत काही मार्ग निघू शकेल. नवी मुंबईतील विमानतळ जर पर्यावरणाच्या जोखडातून बाहेर निघू शकतो तर मग छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक हे देखील आपल्या सर्वांच्या प्रयत्नामुळे पर्यावरणाच्या जोखडातून बाहेर पडू शकेल.

सभापती महोदय, आरक्षणाच्या बाबतीत आमच्या पक्षाने भूमिका निश्चित केलेली आहे. आर्थिकदृष्टया मागासलेल्या सवलती द्याव्यात अशी शिवसेनेची भूमिका राहिलेली आहे. यातून मराठा समाजाला देखील न्याय मिळाला पाहिजे. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिली, त्याबद्दल धन्यवाद.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी दोन विषय उपस्थित केले. जेव्हा हे सभागृह सकाळी 11.00 वाजता सुरु झाले त्यावेळी सुमारे 50 पेक्षा जास्त लोकप्रतिनिधी विधान भवनाच्या प्रवेशद्वारावर बसलेले होते. नंतर ते आपणास आपल्या दालनामध्ये येऊन भेटले. मराठा समाजाला आरक्षण आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक करणे हे दोन विषय या ठिकाणी मांडण्यात आले. या संदर्भात सर्वच सन्माननीय सदस्यांच्या भावना सारख्या आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते देखील या विषयावर या सभागृहामध्ये अनेक वेळा बोलले आहेत. अनेक राजकीय पक्षांनी देखील या संदर्भात भूमिका घेतलेली आहे. आर्थिकदृष्टया मागासलेल्यांना शिक्षणामध्ये,नोकरीमध्ये सवलत मिळावी अशी सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. या संदर्भात लवकरच माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्षनेते यांच्यासमवेत एक बैठक घेण्यात येईल. छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक करण्याबाबत प्रयत्न झाले. परंतु पर्यावरणाचा प्रश्न आडवा आला. तेव्हा या दोन्ही प्रश्नाबाबत मी सांगितल्या प्रमाणे बैठक घेऊन मार्ग काढण्याचा सकारात्मक प्रयत्न केला जाईल.

श्री. विनायक मेटे : मी माननीय मंत्री महोदयांचा आभारी आहे. मागे मुंबईमध्ये झालेल्या अधिवेशनामध्ये या प्रश्नावर चर्चा झाली होती. सभागृहाचे कामकाज दोन वेळ बंद पाडण्यात आले होते. त्यावेळी माननीय उप सभापती श्री. वसंतराव डावखरे हे माननीय मुख्यमंत्र्यांना जाऊन भेटले आणि त्यांनी 15 दिवसात बैठक घेण्यात येईल असे सांगितले. आता चार महिने होऊन देखील बैठक झालेली नाही. माझी विनंती आहे की, या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन हे अधिवेशन संपण्याच्या आत मराठा समाजाला द्यावयाचे आरक्षण आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक या दोन विषयाच्या संदर्भात बैठक घ्यावी. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर महाराष्ट्रातील संपूर्ण जनतेने सरकारचे अभिनंदन केले. या शासनाने छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक करण्याच्या बाबतीत निर्णय घेतलेला असताना त्याबाबतीत का वेळ लागत आहे ? तेव्हा या दोन विषयाच्या संदर्भात हे अधिवेशन संपण्यापूर्वी बैठक घेतली जाईल असे मंत्री महोदयांनी जाहीर करावे.

**सभापती** : माननीय उप मुख्यमंत्री सभागृहामध्ये आहेत. या आधी देखील हा विषय या सदनामध्ये मांडण्यात आला होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री हे

..3..



सभापती...

सभागृहामध्ये उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक हा महाराष्ट्राचा अभिमान आहे. देशपातळीवरही तो आहे. या प्रश्नामध्ये माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री या दोघांनीही लक्ष घातलेले आहे. या कामाला त्यांनी सर्वोच्च प्राधान्य देऊन राज्याची एक मोठी प्रतिष्ठा या दृष्टीने हे स्मारक तातडीने होईल यादृष्टीने प्रयत्नांची पराकाष्ठा करावी.

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, हे अधिवेशन संपण्याच्या आत आपण आपल्या दालनामध्ये माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते आणि पक्षाच्या प्रमुखांना बोलावून मिटींग घ्यावी. त्यामध्ये या विषयी चर्चा करुन आपण पुढे जाऊ.

**सभापती** : चांगली सूचना आहे. मराठा समाजाचा प्रश्न देखील अनेक वर्षे प्रलंबित राहिलेला आहे. आपल्या सर्वांच्या प्रयत्नाने मराठा समाजाचा प्रश्न सुटणे अत्यंत गरजेचे आहे. याही विषयाच्या बाबतीत मी स्वत: लक्ष घालीन आणि माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते, विविध पक्षाचे गटनेते यांचे सहकार्य घेऊन या प्रश्नाला चालना देण्यात येईल.

श्री. विनायक मेटे : मराठा समाजासाठी आरक्षण आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे आंतरराराष्ट्रीय दर्जाचे स्मारक हे दोन्ही विषय त्या बैठकीमध्ये घ्यावेत.

**सभापती** : माननीय उप मुख्यमंत्री यांनी दोन्ही विषय बैठकीत घेऊ असे सांगितलेले आहे.

--

**<u>सभागृहापुढील कामकाजासंबंधी</u>**

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवरील बाब क्रमांक "दोन" वरील विषय मी आज प्रलंबित ठेवत आहे.

----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-12-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) V-4

MSS/ पूर्वी श्री. बरवड 02:10

**पृ.शी./मु.शी.**: महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती दिप्ती चवधरी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिलांचे हक्क व कल्याण समितीचा तिसरा अहवाल सादर करते.

**सभापती** : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



<u>**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**</u>

**सभापती** : आज सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनाद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र. पाटील, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ

दीपक सावंत, श्री. रामनाथ मोते, डॉ. नीलम गो-हे श्री. चंद्रकांत पाटील, ॲड अनिल परब, सर्वश्री विजय गिरकर, विनायक राऊत डॉ. रणजित पाटील, श्री. सुमंत गायकवाड आणि ॲड. आशिष शेलार यांनी पुरोगामी महाराष्ट्रामध्ये गर्भातील भ्रूणापासून ते वयोवृद्ध महिलांचा जीव असुरक्षित असल्याचे निदर्शनास येणे, गत काही वर्षात महिलांवरील अत्याचाराच्या घटनात लक्षणीय वाढ होणे, महिला पोलिसांचा विनयभंग होणे, मानखुर्द येथील महिला सुधारगृहामध्ये महिलांवर अत्याचार झाल्याचे निदर्शनास येणे, गृह खात्याच्या बेजबाबदार कारभारामुळे महिलांवरील अत्याचारात वाढ झाली असणे, या विषयावर चर्चा करण्यासाठी दिवसाचे संपूर्ण कामकाज स्थगित करण्याची सूचना दिलेली आहे. हा नियम 289 चा विषय कसा होतो हे विरोधी पक्षनेत्यांनी थोडक्यात सांगावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या सभागृहामध्ये माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील उपस्थित आहेत. गेल्या काही दिवसामध्ये राज्यात आणि शहरांमध्ये महिलांवर होणा-या विविध प्रकारच्या अत्याराच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. हा कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न आहे. गर्भातील स्त्रीभ्रूण पासून वृध्द महिलांवर अत्याचार होत आहेत. 65 वर्षाच्या वृद्ध महिलेवर देखील बलात्काराची घटना घडलेली आहे. या बाबतीत स्त्री-पुरुषांच्या अनेक संघटनांनी चिंता व्यक्त केलेली आहे. नवजीवन सुधारगृहामध्ये घडलेली घटना असेल, कोल्हापूरमधील पोलिसाच्या मुलीवर झालेला बलात्कार असेल अशा प्रकारच्या महिलांवर होणा-या अत्याचाराच्या घटना दिवसें दिवस वाढत असल्याने याविषयावर गांभीर्याने चर्चा व्हावी व ठोस अशी उपाययोजना निश्चित केली जावी यासाठी ही चर्चा आग्रहाने घ्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

--

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 02:20

**पृ.शी./मु.शी.**:महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अनुपालन अहवाल सादर करणे

श्रीमती दिप्ती चवधरी (सदस्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिलांचे हक्क व कल्याण समितीच्या आठव्या अहवालावरील अनुपालन अहवाल सादर करते.

**सभापती** : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अनुपालन अहवाल सादर झाला आहे.

----------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**म.वि.प. प्रस्तावाच्या सूचनेबाबतनियम 289 च्या संदर्भात**

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या प्रश्नासंदर्भात शासनाने श्री.चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. त्यांनी अनेक सूचना केल्या, त्या सूचनांची अंमलबजावणी का होत नाही, महिलांवरील अत्त्याचाराचे प्रकार थांबावेत म्हणून गृह विभागाकडून ज्या घोषणा केल्या जातात, तशाच घोषणा महिला व बालविकास विभागाकडून होतात. महिलांची छेडछेड हा गुन्हा आम्ही अजामीनपात्र करणार आहोत. 2003 पासून 2012 पर्यंत हीच घोषणा आम्ही ऐकतो आहोत. नियम 289 च्या अनुषंगाने शासनास विनंती आहे की, महिलांवरील छेडछाडीचे प्रकार होऊ नयेत म्हणून कोणकोणत्या उपाययोजना केल्या जाणार आहेत, अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या विरुध्द कोणत्या प्रकारची शिक्षा केली जाणार आहे अशा विषयांच्या बाबतीत शासनाकडून तातडीने उत्तरे मिळाली पाहिजेत म्हणून ही नियम 289 ची प्रस्तावाची सूचना स्वीकारली जावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील साहेब, आपल्याला या बाबतीत काही बोलावयाचे आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : नाही.

प्रा.वर्षा गायकवाड : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी एफडीजी, मोलेस्टेशन आणि सेक्च्युअल ॲब्युज संबंधी प्रश्न मांडला. हेल्थ फाऊंडेशनने आम्हाला एक बील दिलेले आहे, मधल्या काळात या बिलाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्याशी चर्चा केलेली आहे. आमच्याकडील काही महिला आमदारासमवेत देखील चर्चा केलेली आहे. त्या संदर्भात एक कमिटी तयार करणार आहोत. याचा पूर्णपणे रिव्हयू घेऊन निर्णय घेऊ असे मला वाटते.

डॉ.नीलम गोऱ्हे : श्री.चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. आणखी दुसरी समिती नेमण्याची काहीही आवश्यकता नाही.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड : श्री.चंद्रशेखर धर्माधिकारी समितीने जो अहवाल दिलेला आहे, त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्या बरोबर चर्चा केलेली आहे. श्री.चंद्रशेखर धर्माधिकारी समितीने दिलेला अहवाल आणि हेल्थ फाऊंडेशनचा अहवाल या दोघांचा आपण सविस्तर रिव्हयू घेऊ आणि त्यानंतर निर्णय घेऊ.

**सभापती** : ही चर्चा उद्या घ्यायची काय ?

श्री.आर.आर.पाटील : माझी काही हरकत नाही. दोन्ही सभागृहातील कामकाज पाहून चर्चेची वेळ ठरवावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते व इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्या सूचनेतील विषय हा नियम 289 मध्ये बसत नसला तरी महिलांवर होत असलेले अत्याचार हा विषय अतिशय महत्वाचा आहे. उद्या अथवा परवा मी या विषयाच्या बाबतीत सभागृहात अल्पकालीन चर्चा घेण्याचे ठरविले आहे. या अल्पकालीन चचेला मी एक तास वेळ देणार आहे. या अल्पकालीन चर्चेस सभागृहात ज्यावेळी सुरुवात होईल, त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी आपापली मते मांडावीत.

---------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**नियम 93 अन्वये सूचना**

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास मोते, विनोद तावडे,भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार यांनी " शासनमान्य अनुदानित माध्यमिक शाळांमधील पदवीधारक ग्रंथपालांना पाचव्या वेतन आयोगानुसार 5500-9000 ची वेतनश्रेणी देण्याचे आदेश देऊनही दिली न जाणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री विनायक राऊत यांनी "मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात वकिली करणाऱ्या श्री.मोहनलाल जैस्वाल यांच्या नागपूर शहरातील सोनेगाव येथील घरावर दिनांक 17.12.2012 रोजी दरोडेखोरांनी टाकलेला दरोडा " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. नागो पुंडलिक गाणार यांनी "मुंबई घाटकोपर येथील सर्व्हे क्रमांक 13 पैकी 130 गुंठे जमीन सामाजिक न्याय विभागाने दिलेल्या काजरोळकर गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी खाजगी विकासकाला देणे, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना सामाजिक न्याय विभागातील वरिष्ठ अधिकारी व उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत असल्याचे उघडकीस येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी " कांदिवली,मुंबई येथील समतानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत हनुमान नगर, आकुर्ली रोड येथे दिनांक 8 जुलै, 2012 रोजी शशिकांत घाडीगांवकर यांचा कृष्णा तळेकर व त्याच्या साथीदारांनी मारहाण करुन खून केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवूनही आरोपींना अटक केली नसल्याची घटना उघडकीस येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

5..



यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "राज्यातील आदिवासींची उपजीविका सुदृढ बनविण्याच्या दृष्टीने केलेल्या कायद्यातील कलम (3.1 ब) सामुहिक वन हक्काच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दाव्यासंदर्भात अंमलबजावणी होऊ न शकणे, परिणामी आदिवासी आपल्या हक्कापासून संचित राहणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "बुलढाणा जिल्हयातील श्री संत गजानन महाराजांची समाधी असलेल्या शेगाव येथे येणाऱ्या भक्तांसाठी मूलभूत सुविधा मंजूर असूनही त्याबाबतची कामे अद्यापही सुरु न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया, ॲड.अनिल परब, डॉ.रणजित पाटील यांनी "अकोला महानगर पालिकेतील कर्मचाऱ्यांचे चार महिन्यांचे वेतन व सेवानिवृत्ती वेतन प्रलंबित असणे, तसेच अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून अनुकंपा तत्वावरील नियुक्त्याही प्रलंबित असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील,रामनाथ मोते यांनी "म्हाडाच्या वांद्रे येथील जमिनीवर फलक लावण्याचे काम म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी मे.गोल्डलाईन ॲडव्हर्टायझर या कंपनीला विनानिविदा दिले असून या प्रकरणाची चौकशी करण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "कोल्हापुरातील टाऊन हॉल वास्तुसंग्रहालयाचे नूतनीकरण चार महिन्यापूर्वी होऊनही अद्यापपर्यंत उद्‌घाटन न झाल्याने जनता व कलाप्रेमी यांच्या मनामध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

6...



यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "मौजे येरुली, ता.वाई, जि.सातारा येथील गट नं.700 मध्ये शेतघर बांधण्याकरिता जमीन मालक श्री.अमीर अहमद नेन्सी यांच्या परवानगी आर्जस उपविभागीय अधिकारी,वाई यांनी मान्यता देणे, तथापि तहसील कार्यालयाने जमीन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मालकास बेकायदेशीररित्या बांधकाम व गौणखनिज उत्खनन करीत असल्याबाबत पाठविलेली नोटीस " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे. आता मी सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी 3.00 वाजेपर्यंत तहकूब करीत आहे.

--------

यानंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**उप सभापती** : आज लक्षवेधी सूचना घेतल्या जाणार नाहीत तसेच पुरवणी मागण्यांवर देखील चर्चा होणार नाही. शिक्षणावरील विधेयक आता चर्चेला घेतले जाईल. या विधेयकावर बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी कमी वेळेत, कमी शब्दात आपले विचार मांडावेत. सदर शिक्षणावरील विधेयक संमत झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या संदर्भात चर्चा केली जाईल.

**पृ.शी.**: स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक

( चर्चा पुढे सुरु .....

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2012 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 7 महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक, 2012 यावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, जागतिकीकरणाच्या युगामध्ये आपली तरुण पिढी विशेषत: विद्यार्थ्यांसमोर जी काही आव्हाने आहेत त्याला सामोरे जाण्यासाठी त्यांना तयार करण्याचे महत्वाचे काम आपल्यावर येऊन पडले आहे. पुढील काळात केवळ भारत देश म्हणून नाही तर संपूर्ण जग एकसंघ होणार आहे व त्यामध्ये जी काही आव्हाने आहेत ती आव्हाने पेलणे अत्यंत आवश्यक आहे. ही आव्हाने पेलावयाची असतील तर आपल्या शिक्षणाचा दर्जा उत्तम असणे आवश्यक आहे. आपल्या विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे व त्या माध्यमातून जगाच्या स्पर्धेत त्यांना उभे राहण्यासाठी जी सक्षमता लागते ती सक्षमता आपल्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे मी या विधेयकाचे स्वागत करतो. आपल्याकडे शिक्षणाचा 2009 चा कायदा आला. या कायद्यामध्ये मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याचा निश्चिय करण्यात आला. शिक्षणामध्ये सुविधांची कमतरता भासू नये यासाठी अनेक सामाजिक संस्था शिक्षण क्षेत्रामध्ये प्रामाणिपणे काम करु इच्छित आहेत. या सामाजिक संस्थांना काम करण्याचे प्रोत्साहन या बिलाच्या माध्यमातून मिळणार आहे.

मुंबई शहरात गेल्या 6-7 वर्षापासून अनेक इंटरनॅशनल स्कूल निर्माण झालेल्या आहेत. त्या शाळांवर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नव्हते ते नियंत्रण यापुढे या विधेयकाच्या माध्यमातून येणार

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे......

आहे. या शाळांमध्ये जी काही 2 लाख, 3 लाख रुपये तर काही ठिकाणी 10 लाख रुपये फी घेतली जाते त्याचा उल्लेख या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी केलेला आहे. या विधेयकात यासंदर्भात उल्लेख नसला तरी या राज्यात किंवा देशात शिक्षणाच्या संदर्भात जे काही कायदे आहेत त्या कायद्याच्या माध्यमातून नियंत्रण येऊ शकेल. जसे विजेच्या दराबाबत एमईआरसी नियंत्रण ठेवत असते त्याच प्रमाणे या शाळांमध्ये असलेल्या सोयी-सुविधा, शिक्षणाची गुणवत्ता लक्षात घेऊन या शाळांनी किती फी आकारावी यासाठी एमईआरसी प्रमाणे रेग्युलेटर अपॉईंट केले तर केवळ दर्जेदार शिक्षणच नाही तर माफक दरात दर्जेदार शिक्षण देण्याचे काम या निमित्ताने होऊ शकेल असा मला विश्वास आहे.

या विधेयकामध्ये कंपनीला वगळण्यात आले आहे. परंतु माझ्या मनात शंका आहे की, एचपीसीएल,इंडियन ऑईल किंवा इतर ज्या काही केंद्र शासनाच्या कंपन्या आहेत किंवा दाभोळ पॉवर प्रोजेक्ट किंवा रत्नागिरी येथे जी कंपनी पॉवर प्लॉंट टाकत आहे त्या कंपनीने त्या ठिकाणी शाळा काढल्या तर त्या शाळा कोणत्या नियमांच्या अंतर्गत येतील ? या कंपन्या आपल्या नियमामुळे शाळा काढू शकणार नाहीत. कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सीबिलीटीमध्ये जे काही पैसे जमा होतात व त्याच्या माध्यमातून त्या कंपन्या शाळा काढणार असतील तर त्या शाळांना आपण या विधेयकाच्या माध्यमातून अटकाव करणार का ? या शाळांना आपण कशा प्रकारची सूट देणार आहात ? हे विधेयक अत्यंत चांगले आहे. कोणीही यावे आणि शाळा काढाव्यात, त्यावर शासनाचे कोणतेही नियंत्रण राहणार नाही अशा पध्दतीचे या अगोदर जे वातावरण होते ते वातावरण यामुळे बदलणार आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ 03:10

श्री.प्रकाश बिनसाळे....

मी पुन्हा एकदा माननीय मंत्री महोदयांना विनंती करू इच्छितो की, MERC ज्याप्रमाणे विजेचे दर ठरविते त्या प्रमाणे या शाळांची गुणवत्ता, त्यांच्यामध्ये असणाऱ्या सोयीसुविधा, तेथे असणारा शिक्षक वर्ग, पायाभूत सुविधा या सगळ्यांचा विचार करून शिक्षणाच्या फीचे नियमन करणे तितकेच महत्वाचे आहे. तेही काम आपण करावे अशी माझी सूचना आहे. त्यातून चांगल्या पद्धतीचे शिक्षण महाराष्ट्रातील तमाम विद्यार्थ्यांना मिळू शकेल असे मला वाटते.

सभापती महोदय, आणखी एक गोष्ट माझ्या मनाला खटकते. RTE मध्ये 25 टक्के गरीब मुलांना मोफत शिक्षण देण्याची तरतूद आहे. ज्या शाळांमध्ये एक ते दीड लाख रूपये फी देऊन शिक्षण घेण्यासाठी येणारी मुले असतात त्यांच्या सोबत गरीब वर्गातील विद्यार्थ्याला जोडले तर त्याच्यामध्ये न्यूनगंड निर्माण होईल. ही तफावत फार मोठी आहे. एका बाजूला उद्योगपतीचा मुलगा असेल तर दुसऱ्या बाजूला शिपायाचा मुलगा असेल. हे विद्यार्थी उद्योगपतीच्या मुलाच्या बाजूला जाऊन बसले तर त्यांच्यामध्ये न्यूनगंड निर्माण होईल अशी मला साधार भीती वाटते. तेव्हा याचा अभ्यास करणे देखील महत्त्वाचे आहे. शासनाने 25 टक्के गरीब मुलांना मोफत शिक्षण देण्याची जी तरतूद केली आहे त्याचा मानसोपचार तज्ज्ञांतर्फे अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यातून जर एक वेगळा मार्ग निवडता आला व 25 टक्के मोफत शिक्षण देण्याचे उद्दिष्ट साध्य करता आले तर समाजाचे चांगले होईल. विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळू शकेल. ह्या विधेयकाचे मी स्वागत करतो व माझा पाठिंबा जाहीर करून मी येथेच थांबतो. धन्यवाद.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि.क्र.7 - महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक,2012 वरील संयुक्त समितीच्या अहवालावर आपण चर्चा करीत आहोत.

मघापासून अतिशय विद्वत्तापूर्वक भाषणे झाली आहेत व त्यातून अनेक मुद्दे पुढे आले आहेत. परंतु, काही कारणाने एका मुद्याकडे लक्ष वेधण्याचे राहून गेले असावे असे मला वाटते. बहुचर्चित शिक्षण नियंत्रण विधेयक संयुक्त समितीकडून मंजूर होऊन आल्यानंतर सभागृहाने पारित केले. तद्नंतर ते विधेयक केंद्र सरकारकडे मान्यतेसाठी पाठविले. महाराष्ट्रामध्ये विना अनुदान शाळा आहेत. त्या शाळा लोकांकडून मोठ्या प्रमाणावर अडवणूक करून लाखो रूपये घेत आहेत. त्यांच्याविरूद्ध आपण काही तरी नियंत्रण आणणार अशी आशा आमच्यामध्ये निर्माण केली. हे शिक्षण संचालकांना कळल्यामुळे गेल्या वर्षी दुपटीने पैसे वसूल करून घेतले आहेत. त्या विधेयकाला केंद्र सरकारची अजून मंजुरी मिळालेली नाही. परिणाम असा होत आहे की, संस्थाचालक सावध होत आहेत व सावध झाल्यानंतर पालकांची कुंचबणा आणि ओढाताण होत आहे. महाराष्ट्रात सर्वत्र ठिकाणी परीक्षा होत आहेत.

आपण जो पर्यंत शिक्षण शुल्क विधेयकाचे नियंत्रण करीत नाही तो पर्यंत या सर्व संस्था उभा राहणार आहेत. कारण या संस्था सुद्धा एका अर्थाने विना अनुदानित आहेत. आपण या विधेयकाला गोंडस नाव दिलेले आहे. लहान मुल जन्माला येते तेव्हा ते आपल्याला वेगळे दिसते. पण त्याला आपण टोपरे व अंगरखा घातल्यानंतर ते छान दिसते, सुंदर दिसते. त्याप्रमाणे आपण विना अनुदानित ऐवजी स्वयं अर्थसहाय्यित असा शब्द वापरला आहे. पण या शाळांचे कशा पद्धतीने नियंत्रण होणार आहे याबद्दल आपल्याकडे उत्तर नाही. आता या स्वयं अर्थसहाय्यित शाळा सुरू होतील. कुठल्या भाषेत किती शाळा सुरू होणार आहेत ? प्रत्येक जिल्ह्यासह प्रत्येक तालुक्यात इंग्रजी शाळा पाहिजे अशी जनतेची मागणी असू शकते. पाच-दहा वर्षात महाराष्ट्राचे चित्र काय असेल, याचा कधी विचार केला आहे काय ? जिल्हा व तालुका निहाय अमुक एवढ्या मराठी शाळा असल्या पाहिजे असे आरक्षण आपण करणार आहात काय ? आपण जर शाळांना संरक्षण दिले नाही तर अशाच पद्धतीने स्पर्धा होणार आहेत. मला तर असे वाटते की, स्वयं अर्थसहाय्यित शाळा ह्या मोठ्या प्रमाणावर इंग्रजी माध्यमाच्या होणार आहेत. मुंबईमध्ये तर .....

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

हिंदी, गुजराती माध्यमाच्या देखील शाळा होण्याची शक्यता आहे. पुण्या सारख्या ठिकाणी तर इतर भाषेतील शाळांची मागणी पुढे आलेंली आहे. या सगळ्या शाळा भराभर सुरू होतील. 5 ते 10 वर्षात कोणत्या भाषेत शिक्षण घेतलेले विद्यार्थी असतील याचा विचार केला पाहिजे. तो केला नाही तर 2012 मध्ये कोण शहाणे आमदार होते असा प्रश्न सन 2022 मध्ये विचारला जाईल. आपण पुढील भविष्याचा विचार न करता तात्पुरती मलमपट्टीची विधेयके आणली तर त्यातून काहीही साध्य होणार नाही.

मला तर असे वाटते की, या बिलाला केंद्र सरकारच मान्यता देणार नाही. जसे शिक्षण शुल्क विधेयकाचे झाले तसे याचे होणार आहे. वर्ष दीड वर्ष झाले पण याचा प्रवास पुढे कुठ पर्यंत गेला आहे हे काही कळत नाही. त्या विधेयकाचे अकाली निधन झाले आहे की व्हेंटीलेटरवर आहे हे सन्माननीय शिक्षण मंत्र्यांनी सांगावे. आपण बृहत आराखड्यासंबंधी देखील बोलत होता. तेव्हा शाळांसंबंधी आपण कोणता धोरणात्मक निर्णय घेणार आहात हे देखील कळले पाहिजे. या संबंधातील रूपरेषा ठरविली नाही तर ठिगळांची गोधडी जशी होते तशा प्रकारची परिस्थिती शिक्षण क्षेत्राची झालेली दिसते. शिक्षण शुल्क नियंत्रण करणारे जे विधेयक आहे ते आपण ताबडतोब अंमलात आणण्यासाठी गती कशी देता येईल हे पहावे. तसेच कुठल्या भाषेच्या शाळा किती असणार यासंबंधातील नियंत्रणाची भूमिका सरकारने निश्चितपणाने घेतली पाहिजे असे मला वाटते. एवढे बोलून मी येथेच थांबते. धन्यवाद.

.....

...4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक 7 - महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक 2012 वर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

काही दिवसांपूर्वी याच सभागृहातून सन्माननीय सदस्यांनी महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांना शिक्षण कसे मिळेल, लाखो मुले शिक्षणा पासून वंचित राहणार नाही या दृष्टीने एक विचार मांडला. त्यावेळी त्यांनी यश प्राप्त केले होते. मला आठवते की यापूर्वी कायम विनाअनुदानित हा शब्द शिक्षण विभागाने लागू केला होता. महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात येणाऱ्या नवीन शाळांना व शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या करणाऱ्या कार्यकर्त्यांना बंदी घालण्याचे काम कायम या शब्दाने केले होते. सुज्ञ, जाणकार लोकप्रतिनिधींना शिक्षणाप्रती असलेले प्रेम, समाजाप्रती असलेली जिज्ञासा, आपण समाजाचे देणे लागत आहोत हे ध्यानात घेऊन त्यांनी कायम हा शब्द कायद्यातून वगळण्याचा निर्णय घेतला. मग टप्प्याटप्प्याने सर्व शाळा अनुदानवर यायला सुरूवात झाली.

ज्यावेळी हे विधेयक आले त्यावेळी महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा असे नाव का देण्यात आले हे लक्षात येत नव्हते. असे नाव देऊन विधेयक आणण्याचे नेमके कारण काय आहे ? विधेयक हातामध्ये पडल्यानंतर मी उद्देश शोधण्याचा प्रयत्न केला. एखादे विधेयक आणताना शासनाने विधेयकाचा उद्देश व कारणे नमूद करणे आवश्यक असते. कोणत्या उद्देशाने हे विधेयक आणले आहे हे शासनाने सांगितले पाहिजे. एखादे विधेयक आणत असताना शासनाचा उदार हेतू असतो. त्या माध्यमातून समाजाचे भले व्हावे, विधेयकामध्ये अंतभूर्त होणाऱ्या घटकाचे भले व्हावे असे शासनाला वाटते.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्री.भारवि.. 03:20

श्री.विनायक राऊत..

जेणेकरुन त्या विभागाच्या माध्यमातून समाजाचे भले व्हावे, विधेयकात अंतर्भूत असलेल्या घटकाचे भले व्हावे हा उद्देश विधेयक मांडत असताना तो उद्देश आणि कारणे यामध्ये देण्याची आवश्यकता असते. परंतु या विधेयकामध्ये मला उद्देश आणि कारणे हे पानच आढळले नाही. मूळ विधेयकामध्ये कदचित ते पान असेल. संयुक्त समितीने जे विधेयक मंजूर केलेले आहे त्यामध्ये ते पान नाही. आम्हाला विधेयकाची कारणे आणि उद्देश वाचायला मिळाले नाही. विधेयकाच्या नावावरुन शासनाची या मागील भूमिका किती कपटी स्वरुपाची आहे हे स्पष्ट होते.

सभापती महोदय, स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासह विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी तरतुदी करणे तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी आणि प्रमाणके ठरविणे व दान निधी निर्माण करणे असा उल्लेख आहे. दान निधी निर्माण करणे हा विधेयकातील महत्वाचा शब्द आहे. भारतीय राज्य घटनेने हिंदुस्थान सरकार व राज्य सरकारवर जी काही बंधनकारक कर्तव्ये टाकलेली आहेत ज्याचा उल्लेख भारतीय संविधानाच्या 21 (क) मध्ये आहे. प्राथमिक शिक्षण देणे हे केंद्र आणि राज्य सरकारचे आद्य कर्तव्य आहे. त्यानंतर 94 व्या दुरुस्तीमध्ये केंद्र सरकारने पुरोगामी धोरणातून सन 2009 मध्ये शिक्षण हक्क कायदा मंजूर केला. मला अशी शंका येते की, हे सरकार, केंद्र सरकारला असे दाखवून देत आहे की, आपण तळागाळातील सर्वांना शिक्षण देण्यासाठी कायदा केला. पण केंद्र सरकार ज्या कायद्याने आमच्यावर आर्थिक बंधने घालत आहे त्या आर्थिक बंधनातून सुटण्यासाठी आम्ही आदर्श असे एक विधेयक आणत आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी आपल्या भाषणात शिक्षण हक्क कायद्याचा उत्कृष्टपणे उल्लेख केला. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व श्री.सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सुध्दा शिक्षणाचा अधिकार आणि शिक्षणाची कर्तव्ये यासंबंधी उत्कृष्टपणे मते मांडली आहेत. प्राथमिक शिक्षण देणे आणि प्राथमिक शिक्षण घेणे हे दोन्ही राज्य घटनेवर आधारभूत असल्यामुळे प्राथमिक शिक्षण मोफत देण्याचे बंधनकारक कर्तव्य शासनावर आहे. त्यातून बाहेर निघण्याचे एक कपट कारस्थान या विधेयकाच्या माध्यमातून शासन करीत आहे असा आरोप मी जबाबदारीने करीत आहे. केंद्र सरकारने शिक्षण हक्क कायदा केला त्या कायद्याची

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत..

पायमल्ली या स्वयं-अर्थसहाय्यित विधेयकाच्या माध्यमातून होणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितले की, जवळपास 2 लाख मुले आजही शिक्षणापासून वंचित आहेत. महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांना फर्मान काढण्यात आले की, शाळा सुटली की त्यांनी बाहेर जायचे. फूटपाथ, गाव,वाड्या वस्त्या येथे जाऊन 6 ते 14 वयोगटातील अशिक्षित मुले सापडली की, त्या मुलांना शाळेत घेऊन यायचे आणि त्यांच्या वयोमाननुसार त्यांना अपेक्षित असलेल्या इयत्तेमध्ये बसवावयाचे असे शिक्षण हक्क कायदा सांगतो. त्यासाठी आर्थिक तरतूद केलेली आहे. विशेष शिक्षक नेमले आहेत. शिक्षकांवर अतिरिक्त कामाचा बोजा पडला तर त्यांना विशेष सवलत देण्याची तरतूद केली आहे. आम्ही त्या शिक्षण हक्क कायद्याचे स्वागत केलेले आहे. आज त्या कायद्याची आवश्यकता होती. परंतु महाराष्ट्र सरकारने मात्र केंद्र सरकारच्या कायद्याला हरताळ फासण्याचे काम केलेले आहे. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेच्या कलम 21(क) मध्ये मूलभूत शिक्षणाचा अधिकार आम्हाला प्राप्त करुन दिला आणि त्याचे दायीत्व भागविण्याची जबाबदारी केंद्र आणि राज्य सरकारवर टाकली आहे. कदाचित डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी चूक तर केली नाही ना आणि ती चूक सुधारण्याचे काम सध्याचे सरकार बाजारी स्वरुपात करीत आहे काय अशी शंका हे विधेयक वाचल्यानंतर लक्षात येते. सभापती महोदय, आपण बेल वाजविली आहे. परंतु, आमच्यासारख्या सर्वसामान्य घटकांतील लोक शिक्षण क्षेत्रात काम करतात, त्यांना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते याची आपल्याला कल्पना आहे. तेव्हा माझी अपेक्षा आहे की, आपण मला विधेयकावर विस्तृतपणे बोलण्याची संधी द्याल.

सभापती महोदय, मागील आठवड्यात अनुदान सूत्र ठरवित असताना पुनर्मूल्यांकनाचे निकष ठरविण्यात आले. मला शिक्षण मंत्री महोदयांबद्दल आदर आहे. आपण त्या जाचक अटी वाचाव्यात आणि हे विधेयक सुध्दा वाचावे. या दोघांचे एकप्रकारे संगनमत होऊन या महाराष्ट्रातून मराठी भाषा हद्दपार करण्याचे पाप हे सरकार करीत आहे काय असा माझा प्रश्न आहे. मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेयपयोगी 27 वस्तू मोफत दिल्या जातात. या सर्व शालेयपयोगी वस्तू जुलै महिन्यात दिल्या जातात.

..3..



AJIT/ पूर्वी श्री.भारवि.. 03:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत..

सभापती महोदय, शिक्षणापासून कोणी वंचित राहणार नाही असे शिक्षण हक्क कायदा सांगत आहे. तर हे महाराष्ट्र शासन या विधेयकाच्याद्वारे तो दरवाजा बंद करीत आहे. कारण या विधेयकामध्ये ज्या अटी घालण्यात आलेल्या आहेत त्या सर्वच अटींची पूर्तता होणे शक्य नाही. संयुक्त समिती सदस्यांचा मी शतश: ऋणी आहे कारण त्यांनी या विधेयकातील अट क्रमांक 12 डिलीट केलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, ज्या अधिकाऱ्याच्या सुपीक की नापीक बुध्दीमत्तेतून स्वयं अर्थसहाय्यित विधेयक आलेले आहे त्या विधेयकाच्या विरोधात न्यायालयाने निर्णय दिला तर त्या अधिकाऱ्याच्या विरुध्द हक्कभंग आणावाच लागेल. कारण कायम विनाअनुदानित शाळांतील कायम हा शब्द काढल्यानंतर त्या शाळा टप्प्याटप्प्याने अनुदानावर येत आहेत. त्यामुळे शासनाच्या तिजोरीवर भार पडत आहे आणि त्याच वेळी अधिकाऱ्यांच्या डोक्यातून निर्माण झालेले हे स्वयं-अर्थसहाय्यित विधेयक आहे. अन्यथा अशा पध्दतीचे विधेयक मांडण्यात आले नसते.

सभापती महोदय, अनुदान मूल्य ठरवित असताना, पुनर्मूल्यांकन करीत असताना रेन हार्वेस्टींगची अट घालण्यात आलेली आहे. ग्रामीण भागातील शाळांना रेन हार्वेस्टींगची अट लागू होऊ शकते काय ? कोणत्या ग्रामपंचायतीची शाळा रेन हार्वेस्टींग करु शकते ? नगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये रेन हार्वैस्टींग कसे होऊ शकते ? ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये अशाप्रकारच्या अटी टाकून पुनर्मूल्यांकनाच्या शर्ती हे शासन मान्य करुन घेत असेल तर महाराष्ट्रातील भाषिक शाळा कधीही अनुदानतत्वावर येणार नाहीत किंबहुना त्यांना शेवटच्या घटका मोजाव्या लागणार आहेत. सरकारकडून मूल्यांकनाच्या शिफारशीचे एक पाप आणि स्वयं-अर्थसहाय्यित विधेयकाच्या माध्यमातून दुसरे पाप होत आहे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये "कंपनी" असा उल्लेख करण्यात आला होता त्यावरुन कळते की, शासनाला भविष्यामध्ये सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून शाळा चालवावयाच्या नाहीत.

यानंतर श्री.सरफरे..

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनायक राऊत....

बहुउद्देशीय धोरणाने काम करणाऱ्या सामाजिक संस्थेला शाळा चालविण्यास द्यावयाचे नाही त्याऐवजी एखाद्या खाजगी कंपनीला शाळा चालविण्यास द्यावयाची, मोठया धनिकांना शाळा चालविण्यास द्यावयाची. मुंबई आणि नवीन मुंबईमध्ये काय चालले आहे, शिक्षणाच्या नावाखाली एज्युकेशन हब, शिक्षणाची औद्योगिक नगरी उभी राहिल्याचे पहातो. त्या ठिकाणी चार्टर्ड फ्लाईट, हेलिकॉप्टरमधून फिरणारे शिक्षण सम्राट आहेत. त्याचबरोबर या सभागृहामध्ये सायकलवरुन जाऊन शिक्षकांचे आणि विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविणारे आमदार सुध्दा आहेत त्यांचा अनुभव काय आहे, ज्यावेळी आपण स्वयंअर्थसहाय्यित विधेयक तयार करतो त्यावेळी त्याच्या पाठीमागे शाळा सुरु करावयाची असेल, विद्यार्थ्यांना शिकवावयाचे असेल तर हे लक्षात घेतले पाहिजे की, मोठया शहरामध्ये देखील मराठी शाळेसाठी विद्यार्थी मिळत नाहीत, मुंबईमध्ये मराठी विद्यार्थी मिळत नाहीत, ठाण्यामध्ये मराठी विद्यार्थी मिळत नाहीत. परंतु महाराष्ट्राच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यातील दुकानवाड गावामध्ये सुध्दा मराठी विद्यार्थी असून त्या ठिकाणी इंग्रजी शाळा आहे. अशावेळी मराठी शाळा वाचवा असा टाहो सर्वजण फोडतात, मराठी शाळांना प्रोत्साहन द्यावे अशी मागणी घेऊन आम्ही शासनाकडे येतो त्यावेळी मराठी शाळांची नाकेबंदी करुन शासनाने मराठीचा घात करण्याचा प्रयत्न केला तर त्याला विरोध केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. त्यामुळे हे विधेयक आपण नेमके कुणासाठी मंजूर करणार आहात? विद्यार्थ्यासाठी विधेयक आणले. हे महाराष्ट्रातील मराठी भाषिक विद्यार्थ्यांसाठी आहे की, महाराष्ट्रातील धनिकांसाठी आहे?

सभापती महोदय, मघाशी माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी आयर्न इंटरनॅशनल स्कूलचा उल्लेख केला. या देशामध्ये 92 शाळा आहेत त्यामध्ये कोणता कायदा अस्तित्वात आहे? मराठी वगळता अल्पसंख्यांकाच्या शाळेचा दर्जा प्राप्त करुन घ्यावयाचा . अल्पसंख्यांकाच्या शाळांमध्ये कोणत्या कायद्याची अंमलबजावणी होत आहे? त्या ठिकाणी एस.एस. कोड आहे काय, त्या ठिकाणी एम.ई.पी.एस. ॲक्ट नाही, सेवा-शेर्ती लागू नाही, पेन्शन योजना नाही, क्वॉलिफिकेशन नाही, बिंदू नामावली नाही. अल्पसंख्यांकाच्या शाळेमध्ये एखादा मुख्याध्यापक किंवा मुख्याध्यापिकेची नियुक्ती करावयाची झाली तर इतर शाळांप्रमाणे त्यांच्याकरिता शैक्षणिक अर्हतेची आवश्यकता नाही. एखाद्या माध्यमिक शाळेमध्ये मुख्याध्यापक नेमावयाचा झाला तर तो ग्रॅज्युएट आणि तो ट्रेड टिचर असला पाहिजे. परंतु अल्पसंख्यांकाच्या शाळेमध्ये 12 वी पर्यंत उत्तीर्ण झालेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक राऊत....

शिक्षक सुध्दा मुख्याध्यापक होऊ शकतात. त्या ठिकाणी कायद्याचे काहीही बंधन नाही. कायद्याची अडचण फक्त मराठी भाषिक शाळांसाठी आहे. अशावेळी जर आपणास शाळा चालवावयाची असेल तर ती चालवा. त्या करिता आम्ही तुम्हाला दाननिधी निर्माण करुन दिला आहे. पान 3 वर "ग" सूचीमध्ये "शाळा याचा अर्थ पूर्व प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा" .

सभापती महोदय, मला माननीय शिक्षण मंत्र्यांना एक प्रश्न विचारावयाचा आहे की, या विधेयकांतर्गत पूर्व प्राथमिक विभाग घेणार काय? त्याचप्रमाणे शिशू वर्गामध्ये छोटा शिशू,मोठा शिशू या वर्गांना या विधेयकामध्ये अधिकृतपणे मान्यता देणार काय? असाल तर तेथील कर्मचाऱ्यांना शासनाच्या सेवा शर्तीसुध्दा लागू करणार काय? या शाळांना शासनाने लागू केलेल्या अनुज्ञेय असलेल्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी लागू करणार काय? त्या जर आपण तेथील शिक्षक व कर्मचाऱ्यांना लागू करणार असाल तर मी त्याचे मनापासून स्वागत करतो. परंतु लागू करीत नसाल तर ती धूळफेक आपण करु नका. आजपर्यंत पूर्व प्राथमिक शिक्षकांना कायद्याचे संरक्षण मिळत नाही तरी सुध्दा त्यांचा आपण अंतर्भाव या विधेयकामध्ये केला आहे त्या अर्थी तुम्हाला हे बंधनकारक आहे हे आपल्याला कबूल करावे लागेल. सभापती महोदय, शासनाने सुशिक्षित बेरोजगारांच्या 500 रुपयांचे अर्थसहाय्य देण्याचे जाहीर केले आहे, वरिष्ठ नागरिकांना 200 रुपये पेन्शन देणाचे जाहीर केले, राजीव गांधी श्रावण बाळ योजना लागू केल्या. या पूर्वी सुध्दा आपण कांद्याचे भाव जाहीर करीत होता.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत . . . .

सभापती महोदय, सुशिक्षित बेरोजगारांना शासनाने 500 रुपय भत्ता देण्याचे जाहीर केले. सिनिअर सिटीझन यांना 200 रुपये इतके पेन्शन जाहीर केले. तसेच राजीव गांधी श्रावण बाळ योजना होत्या. तसेच कांद्याचा भाव जाहीर करावयाचा, ऊसाचा भाव जाहीर करावयाचा. आता येथे शाळेच्या तुकड्यांचा भाव जाहीर केला जातो. शाळा सुरु करीत असताना एकाच वेळेला छोटा शिशुवर्ग ते दहावी पर्यंतची एकतरी शाळा कुठे सुरु झालेली आहे काय ? एकतर पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक. जेव्हा पहिली पासून शाळा सुरु होते तेव्हा ही तुकडी दुसऱ्या वर्षी, दुसरी त्यानंतर तिसरी याला नैसर्गिक वाढ म्हणतात. जेव्हा नैसर्गिकरित्या तुकडी वाढ होते तेव्हा तुम्ही त्याला दर्जावाढ असे संबोधित आहात. आपण दरसूची पहावी.

सभापती महोदय,पान क्र.13, कलम 4(1) (ग) यामध्ये असे म्हटलेले आहे की,"शाळेची प्राथमिक,उच्च-प्राथमिक, माध्यमिक किंवा यथास्थिती, उच्च-माध्यमिक शाळेमध्ये दर्जावाढ करण्या साठी रुपये 3 लाख. (क) मध्ये असे म्हटलेले आहे की,"नवीन प्राथमिक किंवा प्राथमिक शाळेला संलग्न असलेली पूर्व-प्राथमिक किंवा उच्च माध्यमिक किंवा माध्यमिक किंवा यथास्थिती, उच्च-माध्यमिक शाळा स्थापन करण्यासाठी ग्रामपंचायत भागात किमान दोन लाख रुपये. ग्राम पंचायत क्षेत्रामध्ये एक दर्जावाढ करावयाची असेल तर त्यांनी दोन लाख रुपये भरले पाहिजेत. (ख) प्राथमिक स्तर ते उच्च माध्यमिक स्तरापर्यंत नवीन शाळा स्थापन करण्यासाठी कनेक्टीव्हीटी असते. पण त्यासाठी सुध्दा याठिकाणी वेगळे धोरण नाही तर तुम्ही दर्जावाढ केली असल्याने किमान पाच लाख रुपये भरले पाहिजेत. एका तुकडीला पाच लाख, ग्राम पंचायतीमध्ये दोन लाख. जर एखाद्या ग्राम पंचायतीच्या कार्यक्षेत्रामध्ये जर तुमच्या-आमच्यासारख्या दानशूर व्यक्तीने एक सामाजिक ऋण म्हणून ग्रामीण भागामध्ये वंचितांना शिक्षणाचा लाभ मिळावा यासाठी आपण शाळा सुरु कराल आणि नंतर दर्जा वाढ करण्यासाठी शासनाकडे गेल्यानंतर शासन असे म्हणेल की, तुमची सामाजिक भावना बाजूला ठेवावी. तुम्ही दोन लाख रुपये ्द्या. तुम्ही त्यांना सांगाल की, ही "क" वर्ग ग्राम पंचायत आहे, तरी ते नाही असेच म्हणतील. ते सांगतील की, याबाबतीत विधेयक पास केले आहे, दोन लाख रुपये द्यावेच लागतील, मग काहीही करा. अशा प्रकारे् शिक्षणाचा बाजार मांडण्याचे काम स्वयं-अर्थसहाय्यित शाळा या विधेयकाच्या माध्यमातून शासन करीत असेल तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जी घटना लिहिलेली आहे त्याचे उल्लंघन होत आहे. पण त्याचबरोबर केंद्र शासनाने 2009 मध्ये राईट टू एज्युकेशन हे विधेयक मंजूर केले आहे केंद्र शासनाच्या कायद्याचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत . . . .

उल्लंघन करण्याचा तुम्हाला अधिकार नाही. कारण तुमचे राज्य शासन आहे. याबाबत शासनाच्या भूमिकेमध्ये स्वयंस्पष्टता नाही तर हे विधेयक स्वयं-अर्थसहाय्यित आहे. मला माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे की, जर हे विधेयक पास झाले तर आजपर्यंत तुमच्याकडे अनुदानासाठी प्रलंबित असलेल्या ज्या केसेस आहेत त्या सर्व केसेस तुम्ही यामध्येच समाविष्ट करणार आहात की नाही असा प्रश्न आहे. मागच्या वेळेला "कायम" हा शब्द काढून टाकल्यानंतर त्यांना टप्प्याटप्प्याने अनुदानावर घेण्याचे ठरविले. पण शाळांना एक रकमी अनुदानावर घेतले तर शासनाच्या तिजोरीवर भार पडणार आहे. परंतु यामध्ये महाराष्ट्र शासनाने गॅनबाची मेख ठेवलेली आहे. शासनाने यासाठी एक समिती नियुक्त केली आणि एकूण जे प्रस्ताव येतील त्यातून फक्त 20 टक्क्याची लॉटरी काढावयाची म्हणजेच अनुदानासाठी 4000 च्या आसपास शाळा आणि अनुदान मात्र फक्त 20 टक्के शाळांना द्यावयाचे. जर हे विधेयक पास झाले तर ते स्वयं-अर्थसहाय्यामध्ये जाईल आणि त्यांना अनुदान मिळण्याचे सर्व मार्ग बंद होतील. जर माझी शंका खोटी असेल तर तसे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. यापूर्वी अनुदान मिळण्यासाठी ज्या-ज्या शाळांनी अर्ज केले आहेत, त्या सर्वांचे पुनर्मूल्यांकनामध्ये जी शिथिलता दिलेली आहे त्याचा त्या शाळांना लाभ घेता येईल. अशा शाळांना आम्ही अनुदानावर घेऊ. त्या शाळांचा स्वयं-अर्थसहाय्यित मध्ये समावेश करणार नाही असे स्पष्ट आश्वासन माननीय मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

**उप सभापती** : मला असे वाटते की, मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांना या विधेयकाच्या संबंधात बोलण्यासाठी भरपूर वेळ दिलेला आहे. सन्माननीय सदस्य जवळपास 25 मिनिटे बोलत आहेत.

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे. मला थोडेच बोलावयाचे आहे. मी जास्त वेळ घेत नाही.

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, आजच माननीय शिक्षण मंत्री महोदयांच्या संबंधात वर्तमान पत्रामध्ये एक बातमी वाचली. आपण असे म्हटलेले आहे की, शिशु वर्गाच्या मुलाखतीबाबत शिक्षण हक्क कायद्याचा वापर करुन बंदी घालू. तुम्ही विद्यार्थ्यांची, पालकांची मुलाखत घ्यावयाची नाही यासाठी माननीय मंत्री महोदय आपण शिक्षक हक्क कायद्याचा आधार घेत आहात. एकीकडे त्या कायद्याचा वापर करत असताना शासनाला स्वयं-अर्थसहाय्यित विधेयक आणण्याची गरजच काय आहे हा प्रश्न आहे. मग हे विधेयक मंजूर झाल्यानंतर त्या कायद्याला हरताळ फासणार आहात



APR/ 03:40

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

काय? मग मी पुन्हा एकदा महत्वाचा मुद्दा आपल्यासमोर रिपीट करतो की, जर अशा पध्दतीने शिक्षण हक्क कायद्याच्या अनुषंगाने 6 ते 14 वयोगटातील काही मुले अद्यापही शिक्षणापासून वंचित राहिल्याचे सिध्द झाले आणि जर त्यांच्यासाठी माझ्यासारख्या माणसाने नवीन शाळा काढण्याचे .... जर माझ्यासारख्याने प्रस्ताव दिला तर तो प्रस्ताव आपण अनुदान सूत्रानुसार घेणार की अर्थ सहाय्यित विधेयकानुसार घेणार याचे उत्तर मिळण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मी पुन्हा एकदा सांगतो की, हे विधेयक महाराष्ट्रातील मराठी माध्यमाच्या सर्व विद्यार्थ्यांच्या आयुष्यामध्ये अंध:कार निर्माण करणारे, त्यांचे आयुष्य बरबाद करणारे आणि मराठी भाषेचे खच्चीकरण करणारे, अनावश्यक ठरणारे स्वयं-अर्थसहाय्यित विधेयक आणले जात आहे ते केवळ एक विशिष्ट हेतू लक्षात ठेऊन आणि विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याबाबत स्वत: वर असलेली, घटनेनुसार आलेली जी जबाबदारी आहे, यापासून बाजूला जाण्याचे कपट-कारस्थान शासन करीत आहे त्याचा विरोध करुन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-----

. . . .3 बी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.विजय गिरकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, माझे सन्माननीय मित्र

सर्वश्री. दिवाकर रावते, रामदास कदम आणि श्री.विनायक राऊत यांनी जे मुद्दे मांडले आहेत त्यांच्या भावनांशी मी सहमत आहे.पण हे करीत असताना याठिकाणी एस.सी.,आदिवासी, ओ.बी.सी.आणि भटक्या विमुक्त या घटकातील जे विद्यार्थी आहेत ते यामध्ये कुठे बसणार आहेत. गेल्या 65 वर्षामध्ये या सर्व वर्गामध्ये शिक्षणाची परिस्थिती पूर्वी होती तशीच आज खेड्यापाड्या मध्ये आहे. असे असताना शासन नवीन शाळांसाठी 5 कोटी, 10 कोटी रुपये खर्च करणार असेल तर सहाजिकच त्यांना डोनेशन घेण्याचाही अधिकार दिलेला आहे. दानपात्र म्हणजे ज्याने दान दिले त्यालाच प्रवेश मिळणार. एका ठिकाणी एखाद्या मुलाला ज्युनिअर शाळेमध्ये प्रवेश घ्यावयाचा असेल तर त्याच्या आई-वडीलांची चाचणी होते.नंतर त्या मुलाचा आय-क्यू पाहिला जातो आणि मग त्याला शाळेमध्ये प्रवेश दिला जातो.समजा जर एखादी मोलकरणीचे काम करणारी बाई असेल किंवा गावामधील बाई असेल किंवा एखाद्या मजुराचा मुलगा असेल आणि त्याला या शाळेमध्ये घेण्यात आले तर . . ..

श्री.भाई जगताप (खाली बसून) : आता ती पध्दत बंद झाली आहे.

श्री.विजय गिरकर : सभापती महोदय, ती पध्दत बंद झालेली नाही. सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. 25 टक्के राखीव ठेवणार आहोत. परंतु 25 टक्के सर्वांसाठीच ठेवणार आहात. पण याठिकाणी ओबीसी धरुन 52 टक्के रिझर्वेशन आहे. मग 25 टक्क्यामध्ये जनरल आणि ओ.बी.सी.असे 52 टक्के हे 25 टक्क्यामध्ये घुसवणार आहात. मग जो मागासलेला, आदिवासी असेल त्या विद्यार्थ्याचा क्रमांक एकदमच मागे जाणार आहे. ते या 25 टक्क्यामध्ये बसणारच नाही. त्यामुळे याबाबत मला भीती वाटत आहे. आता अनेक जण डावपेच आखत आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील हे शिक्षण महर्षी होते. पण ते आता नाहीत. आता शिक्षण सम्राट झालेले आहेत. त्यातून परत आम्ही अल्पसंख्य म्हणून बाजूला जातो. मग मी गुजराथी आहे म्हणून ती शाळा माझी आहे किंवा मी जैन आहे किंवा मी आणखी दुसऱ्या जमातीचा आहे. जो व्यापारी वर्ग आहे तो शाळा काढून त्यांच्या समाजातील मुलांना प्रवेश दिला जातो. तेथे बाकीची मुले देखील असतात पण त्यांना असे विचारले जाते की, तुम्ही गुजराथी समाजाची असाल तरच तुम्हाला या शाळेमध्ये प्रवेश मिळेल. अशा प्रकारे मुंबईमध्ये अल्पसंख्यांकांच्या ज्या शाळा सुरु झाल्या आहेत तेथे मराठी मुलांना प्रवेश मिळणार नाही तर एस.सी., ओ.बी.सी.च्या मुलांना तेथे प्रवेश मिळण्याचा प्रश्नच उद्भवत ..

.. . .2 बी-5



श्री.विजय गिरकर . . ..

नाही. अशा वेळी जर शासन 52 टक्के रिझर्वेशन मध्ये असलेल्या मुलांना तुम्ही 25 टक्क्यामध्ये समाविष्ट करणार असाल तर ते योग्य नाही. माझे असे म्हणणे आहे की, शासनाने सर्वांना प्रवेश

द्यावा. जे मराठा समाजाचे आहे, ओ.बी.सी.आहेत, दुर्बल घटकातील आहेत त्यांनाही प्रवेश द्यावा. मात्र तुम्ही या सर्वांना मिळून 25 टक्के प्रवेश देणार. मग 25 टक्क्यामध्ये किती जणांना प्रवेश देणार आहात आणि त्यातून त्यांचे काय भले होणार हा प्रश्न आहे. आज एस.सी.समाजाला 14 टक्के, आदिवासींना 60 टक्के रिझर्वेशन आहे आणि तेच 22 टक्क्यापर्यंत होते. ओबीसी 27 परसेंट आहेत. तसेच आर्थिक दुर्बल घटकातील लोक आहेत आणि अशा वेळी जर त्या समाजाची 52 किंवा 60 किंवा 70 टक्क्यापर्यंत संख्या असेल आणि जर त्यांना तुम्ही 25 टक्क्यापर्यंतच सामावून घेतले तर या घटकांवर अन्याय होणार आहे. तसेच आता अल्पसंख्यांकांसाठी शाळा, कॉलेजेस काढलेल्या आहेत. पण त्या कॉलेजमध्ये या समाजातील मुलांना प्रवेशच मिळत नाहीत. जर ती व्यक्ती जैन असेल किंवा गुजराथी असेल तरच तुला प्रवेश मिळू शकेल. अशा प्रकारचे जे भेदाभेद निर्माण झाले आहेत. त्यामुळे याबाबतीत सांगावयाचे तर केवळ श्रीमंतांची किंवा मोठ्या वर्गातील मुले शिक्षण घेऊ शकतात. केंद्र शासनाचा 2004 चा "राईट टू एज्युकेशन" कायदा आहे, त्या कायद्याला तर आपण पायदळी तुडवलेच आहे. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले की, शिक्षणाचा वसा घ्या, शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. परंतु जर तुम्ही त्यांना अशा प्रकारे शिक्षणापासून अडवत असाल आणि मग त्याला सांगत असाल की, शिका, संघटित व्हा, संघर्ष करा तर ते योग्य नाही.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटना लिहिली, संविधान लिहिले आहे त्यामध्ये त्यांनी शिक्षणाचा मुलभूत अधिकार ठेवलेला आहे, तो अधिकार काढून घेण्याचा प्रयत्न या विधेयकाच्या माध्यमातून केल्याचे मला जाणवत आहे. त्यामुळे खालच्या वर्गातील माणसांना चांगल्या प्रकारचे शिक्षण घेताच नाही. जर त्या व्यक्तीकडे पैसे असतील किंवा ती व्यक्ती डोनेशन देणार असेल तरच प्रवेश मिळेल. तसेच तुझ्याकडे गाडी आहे काय, टी.व्ही.आहे काय, फ्रीज आहे काय, कॉम्प्युटर आहे काय इ.सर्व प्रश्न त्या व्यक्तिला विचारले जातात. पण या लोकांना रोजच्या जेवणाची चिंता असते. अशा वेळी जर एखाद्या बाईचा पती व्यसनाधीन असेल तर आपला मुलगा कोणत्या शाळेत जात आहे हे देखील त्या मुलाच्या आईला माहिती नसते. मात्र दुसरीकडे असा ...

2 बी-6



श्री.विजय गिरकर . . ..

वर्ग आहे की, जर घरातील मुलाची परीक्षा असेल तर त्याला गाडीतून शाळेमध्ये सोडण्यात येते. त्याला सगळया प्रकारचे खाद्यपदार्थ पुरवित असतात. मात्र ज्यांच्याकडे अशी स्थिती नाही ती मुले रात्री न जेवता दुसऱ्या दिवशी उपाशीपोटी शाळेमध्ये जातो. कारण त्याला इच्छा असते की, मी

शिकले पाहिजे, मोठे झाले पाहिजे. परंतु याठिकाणी एक दरी निर्माण केली जात असून आम्हाला याबाबतीत 25 टक्के प्रवेश देणार आहोत असे जे गाजर दाखविले जात आहे. पण ते दिले आहे काय? यावर्षी देखील अल्पसंख्यांक म्हणूनच प्रवेश देण्यात आलेला आहे. एकाही मराठी भाषिकांना ॲडमिशन दिलेली नाही. एकीकडे शासन 25 टक्क्याचे गाजर दाखवून त्यामध्ये अनेक जणांना समाविष्ट करीत आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांनी सांगितल्याप्रमाणे या विधेयकाच्या बाबतीत पुनर्विचार करावा आणि या वर्गाला देखील शिक्षण मिळेल, त्याचा अधिकार मिळेल यादृष्टीने प्रयत्न करावेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना याची माहिती आहे. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या गावामध्ये चौथ्या इयत्तेनंतर शाळा नव्हती. अंबवणे येथे शाळा होती आणि त्यासाठी 13 कि.मी.अंतरावरील मंडणगडला जावे लागत असे. आता आपण 1999 पासून सोयी केल्या आहेत. पण जर दापोलीतील शाळा अशा प्रकारच्या असतील तर अंबवणेच्या शाळेमध्ये कोण येणार हा प्रश्न आहे. म्हणून शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी निधी वापरण्यात यावा. परंतु एस.सी., आदिवासी, ओ.बी.सी. तसेच भटक्या विमुक्त समाजातील लोकांनी सध्या ते आहेत तेथेच रहावे. केवळ आमचे उच्चवर्णीय शिकतील, तेच मोठे होतील आणि आतापर्यंत तुम्ही जसे दहा हजार वर्षे मागे राहिला आहात तसेच तुम्ही रहावे अशा प्रकारची परिस्थिती या विधेयकाच्या माध्यमातून निर्माण होण्याची मला भीती वाटते. त्यामुळे पुन्हा या विषयाच्या बाबतीत चर्चा करुन, त्यासाठी एखादा अभ्यासगट नेमून सर्व बाबींचा विचार करावा अशा प्रकारची विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

श्री. राजेंद्र दर्डा ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, आज महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित शाळा विधेयकावरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, दिवाकर रावते, निरंजन डावखरे, जयंत प्र. पाटील, रामदास कदम, भगवान साळुंखे, प्रकाश बिनसाळे, विनायक राऊत, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री भाई गिरकर, भाई जगताप आणि सतीश चव्हाण यांनी भाग घेतला. या विधेयकावरील चर्चेच्या निमित्ताने आज खूप चांगली चर्चा झाली. या चर्चेच्या निमित्ताने भविष्यात निश्चितपणे शिक्षणाची दिशा कशी असली पाहिजे याबद्दल मार्गदर्शन झाले. काही बाबतीत जे गैरसमज झालेले दिसतात त्याबद्दल मी नंतर बोलणारच आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित शाळा विधेयक मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडण्यात आले होते त्या वेळेला विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात आली होती. मला काही माहिती निश्चितपणे पटलावर ठेवणे आवश्यक आहे. या समितीतील सर्वपक्षीय सर्व सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावरील चर्चेमध्ये फार मोठ्या प्रमाणात भाग घेतला. या समितीच्या एक नव्हे तर सात बैठका झाल्या. काही सन्माननीय सदस्य निवडणुकीमध्ये जरी व्यस्त असले तरीही ते समितीच्या बैठकीमध्ये येऊन गेले. या बैठकांच्या माध्यमातून जास्तीतजास्त चांगले विधेयक देण्याचे काम या समितीने केले त्याबद्दल या समितीच्या सर्व सन्माननीय सदस्यांचे मी मनापासून आभार व्यक्त करु इच्छितो. समितीच्या बैठकांमध्ये विधेयकाच्या प्रत्येक कलमावर सविस्तर चर्चा झाली तसेच या बैठकांमध्ये विशेषत: स्थानिक प्राधिकरण, पूर्व प्राथमिक शाळा, कंपन्यांच्या शाळांना मान्यता, शाळेची व्याख्या, निकष, गुणवत्ता, अर्जाच्या छाननीची छाननी समिती, परवानगीची कार्य पध्दत आणि कालावधी इत्यादी मुद्यांबाबत विशेष चर्चा झाली.

सुरुवातीलाच मी या सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो की, शिक्षण हक्क कायद्याच्या सर्व तरतुदी या कायद्यांतर्गत येणाऱ्या शाळांना लागू राहणार आहेत. सर्व सन्माननीय सदस्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना दिली म्हणूनच आम्ही या सभागृहात आहोत. त्यामुळे या ठिकाणी जे सांगण्यात आले की, शिक्षण हक्क कायद्याच्या तरतुदींची पायमल्ली होणार आहे त्याबाबत मी निश्चितपणे सांगू इच्छितो की,

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. राजेंद्र दर्डा .....

शिक्षण हक्क कायदा हा या देशाचा कायदा आहे आणि आज कोणतेही विधेयक आले तरी या विधेयकाला त्या सर्व तरतुदी निश्चितपणे लागू होणार आहेत.

सभापती महोदय, सध्या राज्यात 75 हजार 466 प्राथमिक शाळा आहेत. त्यापैकी 65 हजार 324 शाळा मराठी माध्यमाच्या आहेत. या प्राथमिक शाळांपैकी 90 टक्के शाळा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून चालविल्या जातात. राज्यात 19 हजार 767 माध्यमिक शाळा असून त्यापैकी 15 हजार 466 मराठी माध्यमाच्या शाळा आहेत आणि यातील मराठी माध्यमाच्या 90 टक्के शाळा खाजगी व्यवस्थापनाकडून चालविल्या जातात. 2001 पासून कायम विनाअनुदान तत्व स्वीकारण्यात आले. त्यानुसार 2001 ते 2008 या कालावधीमध्ये मराठी माध्यमाच्या सुमारे 2200 शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात आली. विविध घटकांकडून होणारी मागणी लक्षात घेऊन या शाळांच्या परवानगी आदेशातील कायम हा शब्द 2009 मध्ये वगळण्यात आला.

सभापती महोदय, केंद्र शासनाच्या बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षण अधिनियम, 2009 ची अंमलबजावणी या राज्यामध्ये 1.4.2000 पासून सुरु झाली. अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, शासन या बिलाच्या माध्यमातून आपल्या डोक्यावरील जबाबदारी झटकून कोठे तरी बाहेर जात आहे. या ठिकाणी असेही सांगण्यात आले की, या शासनाला कोणताही बोजा घ्यावयाचा नाही त्यामुळे ही एक पळवाट आहे. या राज्याने अत्यंत आग्रहपूर्वक एक धोरण स्वीकारलेले आहे आणि ते म्हणजे एक किलोमीटरच्या परिसरामध्ये बालकाला प्राथमिक शिक्षण मिळालेच पाहिजे. 3 किलोमीटरच्या परिसरात उच्च प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे आणि पाच किलोमीटरच्या परिसरात त्याला माध्यमिक शाळा उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक आहे. त्या दृष्टीकोनातून राज्य शासनाने बृहत आराखडा तयार केला आणि जाहीर केला. आता नवीन शाळांची जाहिरात सुध्दा निघत आहे. प्राथमिकच्या बाबतीत जाहिरात निघालेली आहे आणि माध्यमिकच्या बाबतीत पुढच्या एका आठवड्यात जाहिरात येणार आहे.

सभापती महोदय, बृहत आराखड्यामध्ये या ज्या सर्व शाळा आहेत त्या मराठी माध्यमाच्या आहेत आणि इतर माध्यमांसाठी आवश्यक असेल त्या ठिकाणी त्या शाळा देण्यासाठी शासन कटिबध्द आहे. बृहत आराखड्यामध्ये परवानगी देण्यात आलेल्या शाळांना भविष्यात विहित अनुदान

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सूत्रानुसार अनुदान देण्यात येणार आहे. म्हणजे अनुदान देण्यात येणार नाही असे नसून अनुदान देण्यात येणार आहे. प्रत्येक बालकाला नजीकच्या शाळेमध्ये मोफत शिक्षण देण्याची जबाबदारी शासन निश्चितपणे पूर्ण करील असा विश्वास मी या ठिकाणी देतो. मी सांगितले की, राज्यामध्ये पहिली ते बारावीचा विचार केला तर 1 लाख शाळा आहेत, 2 कोटीपेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आपण बृहत आराखडा जाहीर केलेला आहे. हे सर्व असले तरी आज अनेक शैक्षणिक संस्था किंवा अनेक उद्योग-व्यवसाय करणारे किंवा जे सेवानिवृत्त होतात आणि नंतर ज्यांना असे वाटते की, आपण सामाजिक भावनेतून काही तरी करावे असे लोक पुढे येत आहेत आणि ते सांगतात की, आम्ही आमच्या खर्चातून हे काम करु इच्छितो. शासनाने आपली जबाबदारी पूर्ण केलेली आहे. शासनाने आपली जबाबदारी पूर्ण केल्यानंतर अनेकांना असे वाटते की, आम्ही दर्जेदार शिक्षण देण्याच्या कामामध्ये पुढाकार घेऊ इच्छितो. अशा सर्व संस्थांना या विधेयकाच्या माध्यमातून शाळा सुरु करण्यास परवानगी मिळणार आहे. त्यांना बृहत आराखड्याचे बंधन राहणार नाही. त्यामुळे मला असे वाटते की, गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याच्या दृष्टीकोनातून हे विधेयक अत्यंत महत्वाचे आहे.

सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांनी बिल वाचलेले असल्यामुळे मी विधेयकाबद्दल फारसे बोलण्यात काही अर्थ नाही. त्यापेक्षा सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्या मुद्यांच्या संदर्भात जर मी सांगितले तर ते अधिक चांगले होईल असे मला वाटते. शेवटी हे विधेयक मंजूर झाल्यानंतर या विधेयकाला राईट टू एज्युकेशन लागू आहे का, फी नियमन कायदा लागू आहे का, असे अनेक प्रश्न विचारण्यात आले. त्याचा यामध्ये समावेश झालेला नाही. हे विधेयक आहे आणि या विधेयकाला आपल्याकडे असलेली जी सर्व विधेयके आहेत ती सर्व लागू होणार आहेत हे मी सुरुवातीलाच स्पष्ट करु इच्छितो. त्यामुळे याबद्दल शंका राहणार नाही असे मला वाटते. स्वयं-अर्थसहाय्यित तत्वावरील ज्या शाळा आहेत त्या जर काही कारणांमुळे बंद झाल्या आणि त्यांचे दायित्व उद्‌भवल्यास अशा दायित्वासाठी संस्थेच्या दाननिधी म्हणजे सुरक्षा रकमांमधून खर्च करण्यात येणार आहे. ही दान रक्कम शासनाला वापरावयाची आहे म्हणून या ठिकाणी त्याचा वापर करण्यात आला नाही असे नाही.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. राजेंद्र दर्डा .....

सभापती महोदय, आज या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी असे सांगितले की, आपण जे काही करीत आहोत ते घटनात्मक चौकटीत राहूनच केले पाहिजे. कंपनी हा शब्द वगळला त्याबद्दल त्यांनी अभिनंदन केले. परंतु त्यांनी एक मुद्दा असा उपस्थित केला की, विधेयकातील कलम 13 (ख) मध्ये 'राज्याचा' हा शब्द वगळलेला आहे. तसेच 'द्रोह अथवा व्देषाच्या भावना' हे शब्द वगळलेले आहेत. शिक्षणामध्ये विद्यार्थी हा केंद्रबिंदू असल्याने

यानंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.बरवड 04:00

श्री.राजेंद्र दर्डा....

विद्यार्थ्याचे हित त्यामध्ये समाविष्ट केलेले आहे. विद्यार्थ्याचे हित हेच राज्याचे हित आहे. विद्यार्थी हेच राष्ट्राचे हित आहे. द्रोह किंवा व्देषच नाही तर विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा आणणारी कोणतीही कृती अशा वॉयडर ॲस्पेक्ट बाबत समितीने विचार केलेला आहे ही गोष्ट सुध्दा मला नमूद केली पाहिजे.

सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे हे या बाबतीत काही बोलले नाही, परंतु मला त्यांचे आभार व्यक्त केले पाहिजेत. ज्यावेळेला आम्ही हे विधेयक तयार करीत होतो, ते त्या समितीमध्ये सदस्य म्हणून आले नाहीत. परंतु त्यांनी त्यांच्या पक्षाचे जे सदस्य या समितीमध्ये होते, त्यांनी सूचना केल्या होत्या, त्या सूचनांचा विचार विधेयक तयार करताना निश्चितपणे केलेला आहे. त्यांनी या विधेयकात "स्थानिक प्राधिकरण नाही " असा उल्लेख करण्यात आलेला नाही ही बाब निदर्शनास आणून दिली होती. स्थानिक प्राधिकरणाचा उल्लेख विधेयकातील पृष्ठ क्रमांक 4 वरील ओळ क्रमांक 18 मध्ये करण्यात आलेला आहे ही गोष्ट मी या ठिकाणी आवर्जून सांगतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या विधेयकाच्या अनुषंगाने अतिशय चांगले मुद्दे मांडले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रावते यांची याबाबतची तळमळ मागच्या अधिवेशनात देखील आम्ही पाहिलेली आहे. त्यांनी दोन-तीन महत्वाचे प्रश्न उपस्थित केले होते. पूर्व प्राथमिक शिक्षणाला परवानगी का देतो असा त्यांचा एक मुद्दा होता. पूर्व प्राथमिक शिक्षणाला परवानगी देण्याचा आपल्याला अधिकार आहे काय असाही मुद्दा त्यांनी उपस्थित केलेला आहे. मराठी शाळेमध्ये विद्यार्थ्यांची गळती मोठया प्रमाणात होत आहे असा तिसरा मुद्दा उपस्थित केला आहे. या बाबतीत त्यांनी दुःख सुध्दा व्यक्त केलेले आहे.

सभापती महोदय, मी या सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो की, कोणत्याही पूर्व प्राथमिक शाळेला ती प्राथमिक शाळेला संलग्न असल्यासच पूर्व प्राथमिक म्हणून मान्यता देण्यात येईल. म्हणजे पूर्व प्राथमिक ही प्राथमिक शाळेला पहिल्या वर्गाला जोडलेले असेल तरच मान्यता देण्यात येईल. याचे कारण असे आहे की, जर आम्ही येथे पूर्व प्राथमिक कव्हर केले नसते तर आपल्याला कल्पना आहे की, 25 टक्के दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचा आहे. अनेक शाळा, अनेक संस्था पूर्व प्राथमिकमध्ये प्रवेश देतात आणि मग पहिलीमध्ये गेल्यानंतर त्याला सांगतील की, आमचा हा पहिलाच विद्यार्थी असल्यामुळे आम्हाला 25 टक्के दुर्बल

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा...

घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची गरज नाही. कोणत्याही शाळेने हा खेळ खेळू नये. म्हणूनच पूर्व प्राथमिक हे पहिल्या वर्गाला जोडण्यात आलेले आहे. अशा पूर्व प्राथमिकला मान्यता देण्याचे काम या विधेयकाच्या माध्यमातून होणार आहे.

सभापती महोदय, पूर्व प्राथमिक नियंत्रित, रेग्युलेट करण्याचे घटनात्मक अधिकार विधिमंडळास आहे. म्हणूनच शासनाने महाराष्ट्र शालेय पूर्व केंद्रे, प्रवेशाचे नियम, अधिनियम 1996 मध्ये तयार केलेला आहे. तो अधिनियम प्रशासकीय कारणास्तन 2001 मध्ये निरसित केला. तसेच आता आपण करीत असलेला कायदा पूर्व प्राथमिक पासून उच्च माध्यमिक पर्यंत लागू राहील, यात काही गैर नाही. कोणत्याही गोष्टी यामध्ये बेकायदेशीर नाहीत. संयुक्त समिती ही विधिमंडळाची लहान प्रतिकृती असल्यामुळे समितीच्या निर्णयाबद्दल असे आक्षेप घेणे सुध्दा योग्य होणार नाही. या समितीमध्ये सर्व बाजूने अभ्यास करण्यात आलेला आहे. हे विधेयक घटनात्मक दृष्टया समितीने तपासलेले आहे. त्यामुळे मला खात्री आहे की, पूर्व प्राथमिक बाबतचा जो मुद्दा होता त्यास मी या ठिकाणी उत्तर दिलेले आहे.

सभापती महोदय, मराठी शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये गळती मोठया प्रमाणात होत आहे ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत यांनी सांगितले की, मुंबई महानगरपालिकेच्या मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांना 27 प्रकारचे साहित्य दिले जाते. तरी विद्यार्थी मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत प्रवेश घेत नाहीत. असे का होते ? एवढे साहित्य दिल्यानंतरही मराठी शाळांमध्ये विद्यार्थी येत नसतील तर या गोष्टीचा विचार शासनालाही करावा लागेल आणि समाजाला देखील याचा निश्चितपणे विचार करावा लागणार आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी इंग्रजी शाळांना कोणत्याही प्रकारची परवानगी शासनाकडून दिली जात नाही. माझ्याकडे येणारे 70 टक्के लोकप्रतिनिधी हे इंग्रजी माध्यमातील शाळा सुरु करण्याच्या परवानगीसाठी येतात. हे कटू असले तर ते सत्य आहे. मराठी शाळा वाढल्या पाहिजे, त्या टिकल्या पाहिजेत यासाठी वेगळेच काही तरी करणे आवश्यक आहे. मराठी शाळा आपल्याला टिकवावयाच्या असतील तर सेमी इंग्रजी हा पॅटर्न आपल्याला स्वीकारावा लागणार आहे. आपण सेमी इंग्रजी शाळा सुरु करु शकलो तर व त्या ठिकाणी सायन्स, गणित, हे विषय इंग्रजी भाषेत घेऊ शकलो तर विद्यार्थ्यांचा मराठीतून इंग्रजी शाळेकडे जाणारा जो कल असेल तो कल आपण निश्चितपणे रोखू शकू. त्यादृष्टीकोनातून शासन निश्चितपणे प्रयत्न करणार आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा...

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी तीन-चार महत्वाचे मुद्दे उपस्थित केले. पूर्व प्राथमिकच्या बाबतीत मी मघाशीच उल्लेख केलेला आहे. शिक्षकांचा दर्जा चांगला असला पाहिजे अशा प्रकारचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला आहे.

श्री.दिवाकर रावते : आपण या राज्याचे शिक्षण मंत्री आहात. आपल्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात आणि जनतेमध्ये चुकीचा संदेश जाणे अयोग्य आहे. आपण असे म्हणाला की, मराठी शाळेमध्ये सेमी इंग्रजी शाळा सुरु करण्याचा शासनाचा मानस आहे. आई-वडिलांची भावना असते की, आपल्या मुलाला इंग्रजी भाषा बोलता यावी, लिहिता यावी. आपण या ठिकाणी शासनाच्या धोरणाच्या विरुध्द एक वाक्य वापरले आहे. आपण शिक्षण मंत्री असल्यामुळे शासनाच्या धोरणाच्या विरोधात बोलण्याचा आपल्याला अधिकार नाही. आपण असे म्हणाला की, सेमी इंग्रजी शाळा सुरु करुन सायन्स, गणित हे विषय इंग्रजीतून शिकवू. त्यामुळे सेमी इंग्रजी शाळामधील विद्यार्थ्यांना इंग्रजी येईल असा समज चुकीचा आहे. उच्च शिक्षणामध्ये सुध्दा, महाविद्यालयांमध्ये सुध्दा एम.ए.बी.एड.पर्यतचे शिक्षण मराठीतूनच द्यावे अशा प्रकारची 1974 च्या कायद्यात तरतूद केलेली आहे. शासनाच्या तरतुदीच्या विरोधात सांगणे हे अयोग्य आहे एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री.राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे आपले मुद्दे आग्रहाने मांडतात. ज्या दिवशी इयत्ता 10 वी चा निकाल होता, त्याबाबतीत पत्रकार परिषद सुंरु होती, त्यावेळी आपण मला दूरध्वनीवरुन ही गोष्ट सांगितली होती. मराठी माध्यमातून आपण शिकू शकतो. विज्ञानच नव्हे तर कोणताही विषय मराठीतून शिकू शकतो. जे विद्यार्थी इंग्रजीकडे जात आहेत, सेमी इंग्रजी शाळा सुरु केल्या तर विद्यार्थ्यांचा इंग्रजी माध्यमाकडे जाण्याचा ओघ कमी होईल एवढेच मला सांगावयाचे होते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी शिक्षकांच्या दर्जा वाढला पाहिजे यासंबंधी उल्लेख केलेला आहे. आपण शाळा कशासाठी सुरु करीत आहोत, त्यासाठी हजारो, कोटी रुपयांचा खर्च का करतो, संस्था चालकांसाठी करतो की विविध घटकांसाठी करतो. विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी या सर्व गोष्टी शासन करीत असते. माझी कोणतीही शाळा नाही. विद्यार्थी हा शिक्षणातून तयार झाला पाहिजे. विद्यार्थ्यांना गुणात्मक

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा....

शिक्षण मिळाले पाहिजे असा दृष्टीकोन समोर ठेऊन शासन निर्णय घेत असते. सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांना माहिती म्हणून सांगू इच्छितो की, केद्र सरकारने टीचर इंटरन्स टेस्टच्या माध्यमातून शिक्षक हे अधिक चांगले तयार झाले पाहिजेत या दृष्टीकोनातून प्रयत्न केला. मला मान्य केले पाहिजे की, महाराष्ट्र त्या कामामध्ये सध्या मागे आहे.

यानंतर श्री. जुन्नरे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा...

सभापती महोदय, शिक्षकाला नोकरीमध्ये लागण्याच्या अगोदर त्याला टीईटी टेस्ट उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये आपल्याला खूप काम करावे लागणार आहे. येणाऱ्या भविष्यात आपण टीईटी इलिजिबिलीटी ठेवणार आहोत. वेबसाईटच्या संदर्भात या ठिकाणी चांगली सूचना करण्यात आलेली आहे. ज्या शाळेत संगणक आहेत त्यांनी आपली संकेत स्थळावर माहिती देणे आवश्यक आहे तसेच ज्या शाळेमध्ये संगणक नाही त्यांनी यासंदर्भातील सर्व माहिती फळयावर लिहिणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री. निरंजन डावखरे तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी दान निधीचा उल्लेख केलेला आहे. या अधिनियमाअंतर्गत शाळेने कोणतीही रक्कम शासनाकडे भरावयाची नसून विधेयकातील अनुसूची (ग) मध्ये नमूद केलेली रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत बचत प्रमाणपत्राद्वारे अथवा बँकेत मुदत ठेव म्हणून व्यवस्थापनाच्या नावाने ठेवावयाची आहे. त्यामुळे हा मुद्दा सुटेल असे मला वाटते.

सभापती महोदय, या ठिकाणी सीबीएसई, आयसीएसई, आयबी अशा शाळांवर शासनाचे नियंत्रण नाही असा उल्लेख करण्यात आलेला आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ग्रामीण भागातील शाळांना आपण 2 लाख रुपयांची मर्यादा ठेवली आहे तसेच 5 कि.मी.च्या परिसरातील विद्यार्थी शाळेत आला पाहिजे ही जी आपली अपेक्षा आहे त्यासंदर्भातील अट कमी केली पाहिजे असे मला वाटते.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी आता जी सूचना केलेली आहे त्यासंदर्भात संयुक्त समितीमध्ये खूप चर्चा झाली व त्यानंतरच आम्ही या मुद्यावर येऊ शकलो.

सभापती महोदय, या ठिकाणी सीबीएसई, आयसीएसई, आयबी अशा शाळांवर शासनाचे नियंत्रण नाही असा उल्लेख या ठिकाणी करण्यात आलेला आहे. या विधेयकातील कलम 14(1) मध्ये राज्याबाहेरील किंवा भारताबाहेरील कोणत्याही मंडळाशी किंवा संस्थेशी संलग्नता मिळऊ पाहणाऱ्या शाळांना या अधिनियमाच्या तरतुदी लागू असतील असे नमूद करण्यात आलेले आहे. आरटी कायद्यातील कलम 18 व कलम 19 नुसार कोणत्याही राज्यातील बोर्डाच्या शाळेला शिक्षण अधिकाऱ्याची मान्यता घेणे आता बंधनकारक करण्यात आलेले आहे. ज्यावेळी मी शिक्षण मंत्री

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा...

म्हणून काम पाहण्यास सुरुवात केली त्यावेळेस माझे अधिकारी सांगायचे की, साहेब आम्ही सीबीएसई किंवा आयसीएसई शाळेत गेलो तर ते आम्हाला आत सुध्दा येऊ देत नाही. परंतु आता ही परिस्थिती राहिलेली नाही. या शाळांना मान्यता घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यामुळे राज्याचे कोणत्याही बोर्डाच्या शाळेवर शासनाचे नियंत्रण राहणार आहे.

सभापती महोदय, काल मला दोन संस्थाचालक भेटले होते. त्यांनी मला सांगितले की, "साहेब आपण हे जे विधेयक आणत आहात ते विधेयक आपण आणू नये." त्यावेळेस मी त्यांना म्हणालो की, "या विधेयकामुळे काय त्रास होणार आहे ?"त्यावेळी ते म्हणाले की, " हे विधेयक आले तर आमच्या शाळेतील विद्यार्थी दुसऱ्या शाळेत जातील."त्यावेळेस मी त्यांना म्हणालो की, "हे कसे शक्य आहे?" त्यावेळेस ते दोन संस्थाचालक म्हणाले की,"साहेब नवीन शाळा नवीन टेक्नॉलॉजी आणतील, चांगले शिक्षक आणतील." त्यावेळेस मी म्हणालो की, "तुमची तर अनुदानित शाळा आहे" त्यावेळेस ते म्हणाले की, "आमची अनुदानित शाळा आहे परंतु एकदा पूर्ण पगार मिळाल्यानंतर आम्हाला त्रासच असतो."

सभापती महोदय, ज्या शाळा येतील त्यांना जर आपल्या शाळा चालवावयाच्या असतील तर त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम या ठिकाणी उपस्थित नाहीत परंतु त्यांनी असे सांगितले होते की, शासन आपली जबाबदारी टाळत आहे. त्यांनी पुढे असेही सांगितले होते की, महाराष्ट्र राज्य शिक्षण क्षेत्रामध्ये 13 क्रमांकावरुन 17 क्रमांकावर गेले आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, सप्टेंबर, 2010 मध्ये सर्व्हेक्षण झाले होते. शैक्षणिक निर्देशांक तयार करीत असतांना 20 निर्देशांकाचा विचार करावा लागत असतो. यामध्ये शैक्षणिक सुविधा, भौतिक सुविधा, शिक्षण उपलब्धता व शैक्षणिक फल निष्पत्तीचा विचार केला जात असतो. सभापती महोदय, आपणच नाही तर संपूर्ण सभागृह माझ्या मताशी सहमत होईल की, शिक्षक, भौतिक सुविधा, शैक्षणिक सुविधा, शिक्षण उपलब्धता यामधून शेवटी काय निघते ? पूर्वी आपण फल निष्पत्तीमध्ये प्राथमिक शाळेच्या संदर्भात दहाव्या क्रमांकावर होतो आता आपण चवथ्या क्रमकांवर आलेलो आहे.

सभापती महोदय, उच्च प्राथमिकमध्ये आपण पूर्वी 9 क्रमांकावर होतो परंतु आता आपण 8 क्रमांकावर आलो आहे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत यांनी शाळा बाहय विद्यार्थ्यांचा उल्लेख केलेला आहे. आपल्याकडे शाळाबाहय विद्यार्थी मोठया प्रमाणावर आहेत आणि आता अशा प्रकारच्या शाळा सुरु झाल्या तर शाळा बाहय विद्यार्थ्यांची संख्या वाढेल. आपल्या राज्यात गेल्या 3 वर्षापूर्वी 60 टक्के शाळा बाहय विद्याथी होते परंतु मागच्या वर्षी आपण 1.3 टक्क्यावर आलेलो आहे. शाळा बाहय विद्यार्थ्यांच्या बाबतीत आपण निश्चितपणे सुधारणा केली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राऊत साहेब असेही म्हणाले होते की, मूल्यांकनाचे निकष कठोर आहेत. ज्यावेळेस कायम शब्द वगळण्यात आला त्यानंतर मूल्यांकनाचे निकष ठरविण्यासाठी 5 सदस्य सचिवांची समिती निर्माण करण्यात आली होती. त्या सचिव समितीने गुणवत्ता वाढीच्या संदर्भात निकष ठरवलेले आहेत. अनुदान देण्याच्या अगोदर शाळेचा निकाल, विद्यार्थ्यांची उपस्थिती,दहावीचा निकालाचा विचार केलेला आहे. 5 सदस्य सचिव समितीने गुणवत्तेच्या संदर्भातच प्रश्न विचारलेले आहेत. भौतिक सुधारणा नसेल तर त्यांनी कमी मार्क्स दिलेले आहेत. ज्यावेळेला एखाद्या संस्थेला शाळा सुरु करण्यासाठी अनुदान देते, पगार देते, वेतनेतर अनुदान देते त्याबाबतीत कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली पाहिजे याची काळजी शासन घेईलच.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा....

शिक्षणाचा दर्जा हा वाढलाच पाहिजे. त्यासाठीच आपण मूल्यांकनाचे निकष ठेवले आहेत. तथापि, काही निकषांमध्ये शिथिलता आणण्याचे काम आपण करीत आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी अल्पसंख्याक शाळासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला आहे. अल्पसंख्याक शाळांना आपल्या मर्जीतील मुख्याध्यापक नेमण्याचा अधिकार घटनेने दिला आहे. मात्र अन्य अटी, शर्ती व पात्रता यातून कोणतीही सूट देण्यात आलेली नाही.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी फी रेग्युलेशन बिलासंबंधीचा मुद्दा येथे उपस्थित केला आहे. हा कायदा आपण मंजूर केलेला आहे. हे विधेयक संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविले होते. त्या समितीमध्ये सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे देखील होत्या. या समितीने मेहनत घेतल्यानंतर आपण हे बिल मंजूर केलेले आहे. या विधेयकाला 5 केंद्रीय मंत्रालयातून परवानगी मिळणे आवश्यक असते. 4 मंत्रालयांनी परवानगी दिलेली आहे. एका मंत्रालयाने त्रुटी काढली असून त्याची पूर्तता देखील सप्टेंबर महिन्यामध्ये केली असून ते बिल पुन्हा आपण त्यांच्याकडे पाठविले आहे. पण अद्यापपर्यंत आम्हाला मंजुरी मिळालेली नाही. मी मागच्या महिन्यामध्ये दिल्लीला गेलो होतो. तेव्हा त्यांना सांगितले की, आमचे बिल आपल्याकडे प्रलंबित आहे. तेव्हा त्यांनी असे सांगितले की, केंद्र सरकारच्या माध्यमातून

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मी येथे दोन तीन मुद्दे उपस्थित केले होते त्याला अजून उत्तर मिळालेले नाही.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मला जेवढे उत्तर देणे शक्य होते तेवढे मी दिलेले आहे. केंद्र सरकारचे "Prohibition to unfair practices in school" हे विधेयक येत आहे. राज्यातील सर्व शिक्षक मंत्र्यांच्या समितीने या विधेयकाला अंतिम स्वरूप दिलेले आहे. आगामी अधिवेशनात लोकसभा सुरळीत चालली तर हे विधेयक मंजूर होईल. केंद्र शासनाचे असे म्हणणे आहे की, आपले विधेयक आणि त्यांचे येणारे विधेयक

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, लोकसभेचे कामकाज चालणार किंवा नाही याबद्दल माननीय मंत्र्यांनी शंका व्यक्त केल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सध्या जे चित्र दिसते तेच मी सांगतो आहे. मी येथे सर्व मुद्यांचा खुलासा केला आहे. सन्माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंके यांनी सरकारच्या तिजोरीला धक्का लागणार नाही असे या विधेयकाचे वर्णन केले आहे. या बिलाच्या उद्देशामध्ये सांगण्यात आले आहे की, शासन...

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, त्यांच्या तिजोरीत काहीच नाही.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी सुरूवातीलाच सांगितले आहे की, शासनाने आपली जबाबदारी पूर्ण केलेली आहे. ज्यांना शाळा सुरू करायची आहे त्यांच्यासाठी आपण हे सर्व करीत आहोत. येथे कोकणा संबंधातील मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. कोकणातील दहावी आणि बारावीचे निकाल खूप चांगले आहेत. त्याबद्दल निश्चितपणे वेगळा विचार करण्यात येईल. येथे जे मुद्दे उपस्थित करण्यात आले होते त्याचे माझ्या परीने निरसन करण्याचा प्रयत्न मी केलेला आहे. मी सभागृहाला आश्वस्त करू इच्छितो की, या विधेयकाच्या माध्यमातून निश्चितपणे गुणवत्ता वाढेल. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

**प्रश्न** मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 (दोन्ही संम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

**खंड 7 (2) : परवानगी देणे**

**तालिका सभापती** : खंड 7 ला सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सुधारणा सुचविली आहे. ती त्यांनी मांडावी.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

पृष्ठ क्रमांक 5

ओळ क्रमांक 40 ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा -

"(2) सदर अधिनियम अंमलात येण्यापूर्वी सुरू असलेल्या पाच वर्षापूर्वीच्या शाळा ज्या बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,2009 च्या शर्तीची पूर्तता करीत असतील अशा शाळांना या अधिनियमान्वये परवानगी देण्याचा अधिकार शासनास असेल.

..3



श्री.दिवाकर रावते...

(3) राज्य शासनाने पोट कलम (1) व (2) अनुसार दिलेला निर्णय अंतिम असेल"

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महोदय, दुसरी सुधारणा ही जास्त महत्त्वाची असल्यामुळे मी ही सुधारणा मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागतो. या प्रकरणी दोन गोष्टींसंबंधी आपल्याकडून अपेक्षित खुलासा झालेला नाही. तो आपण करावा अशी माझी विनंती आहे.

सभागृहाच्या अनुमतीने सुधारणा परत घेण्यात आली.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांनी जो मुद्दा मांडला होता त्यासंबंधी आपण खुलासा केलेला नाही. आपण येथे शिक्षणाच्या दर्जा संबंधीचा उल्लेख केला आहे. सर्व भाषिक शाळांसंबंधी देखील आपण आपले मत येथे मांडले. त्याचे आम्ही स्वागत करतो. शिक्षक कसा असावा यासंबंधी देखील आपण थोडक्यात निवेदन केले. शिक्षणाचा दर्जा वाढविण्याची योग्यता असलेल्या शिक्षकांसंबंधी आपण अभिमान व्यक्त केला आहे.

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आपल्या 10-12 मिनिटांच्या वक्तव्यात शिक्षणावर बोलताना शिक्षकांवर देखील बोलले. ते शिक्षक मतदार संघाचे प्रतिनिधी असताना देखील शिक्षणावर बोलले म्हणून मी त्यांचे अभिनंदन केले. शेवटी शेवटी ते शिक्षकांवर आले. कारण त्यांना मतदार सांभाळावे लागतात. तो विषय नाही. मी मागच्या वेळी आपल्याकडे एक प्रस्ताव ठेवला होता. आपण शाळांना मान्यता देतो. तेव्हा ती शाळा स्वत:च शिक्षकाची नेमणूक करते. ते काय करतात ते सर्वांनाच माहीत आहे. कालच माझ्याकडे ठाण्यातील एक बाब आली. ती मी येथे नमूद करीत नाही. मी त्यांना सांगितले की, त्यांना न्याय देण्याकरिता मी दूरध्वनी केला होता तो परत घेत आहे. अल्पसंख्याक शाळेमध्ये प्रमुख नेमत असताना तो शैक्षणिकदृष्ट्या इतर शाळांच्या योग्यतेचाच असावा. हा जो मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांनी मांडला आहे त्यासंबंधी खुलासा झालेला नाही. आपण बोलता बोलता तो मुद्दा अर्धवट सोडून दिलेला आहे.

दुसरा मुद्दा असा आहे की, आपण शाळेला मान्यता दिल्या नंतर तेथील शिक्षकांची नियुक्ती करण्याचे अधिकार शासनाने स्वत:कडे घ्यावेत. त्या शिक्षकांच्या मुलाखती शासनाने स्वत: घ्याव्यात

..4..



श्री.दिवाकर रावते....

व निवड करावी. त्या त्या जिल्ह्यात त्या त्या भागात शासनामार्फत शिक्षक देण्यात यावे. कारण त्यांचे पगार आपण देत असतो. त्यासंबंधी खुलासा केला तर बरे होईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, खरे म्हणजे मी बिलावर बोलणार होतो. आपण शिक्षणावर बरीच चर्चा करीत आहोत. IG IB ICSE अशा दिल्ली बोर्डाच्या शाळा येत आहेत. त्या नियमाने आता आपल्या अंडर येतील. केरळ राज्याने त्यांच्या राज्याची भाषा या शाळांना सेकंड लँग्वेज म्हणून अनिवार्य केली आहे. त्याप्रमाणे दिल्ली बोर्डाच्या शाळांना मराठी भाषा, सेकंड लँग्वेज म्हणून अनिवार्य करणार आहात काय ? आज त्यासंबंधी होय किंवा नाही म्हणता येणार नाही. त्यासंबंधी आपण विचार करू शकतो. मागे आपण बजेट सेशनमध्ये श्वेतपत्रिकेचा उल्लेख केला होता. ती श्वेत पत्रिका पाटबंधारे सारखी नाही. या राज्याच्या दृष्टीने शिक्षण हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अतिशय महत्त्वाचे आहे. आपण शिक्षकांना पगार देतो म्हणजे आपण विद्यार्थ्यांवर गुंतवणूक करीत आहोत तेव्हा बजेट अधिवेशनामध्ये एक दिवस जास्त बसून शिक्षणाच्या श्वेतपत्रिकेवर चर्चा केली पाहिजे असे मला वाटते.

यानंतर श्री.अजित...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी अमुक इतकी जमीन पाहिजे अशाप्रकारची अट आहे असे सांगितले. परंतु ती अट आरटीईमध्ये आहे, त्यामुळे ती अट आपल्याला लागू करणे क्रमप्राप्त आहे. पण शिक्षण हा विषय कंकरंट लिस्टमध्ये असल्यामुळे केंद्र सरकारने आरटीई त्यांच्या अनुषंगाने केलेला आहे. परंतु आपल्या राज्यातील वेगळी परिस्थिती लक्षात घेता आपल्या राज्याचा आरटीई करु शकतो आणि तसे करण्याचा मानस राज्य सरकारचा आहे काय ?

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपली सुधारणा मागे घेतली. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी अतिशय महत्वाचा मुद्दा उपस्थित केला. राज्यामध्ये एससीसी बोर्डा व्यतिरिक्त अन्य बोर्डाच्या शाळा या अधिनियमान्वये राज्य शासनाच्या नियंत्रणात येणार आहेत, त्याचे आपण स्वागत केले पाहिजे. आपण मराठीचा जसा आग्रह धरला तसा इयत्ता पहिली ते आठवी हा राज्य सरकारच्या अखत्यारितील विषय आहे. तेव्हा त्या अभ्यासक्रमाच्या संदर्भात आपला हस्तक्षेप सहज शक्य आहे आणि त्यामुळे तेथे आपले नियंत्रण आवश्यक आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्याचा उल्लेख केला. अनुदानाच्या प्रश्नासंबंधी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व शाळा दोन दिवस पूर्णपणे बंद आहेत. जो जिल्हा सर्व बाबतीत पुढे आणि ज्या ठिकाणी पटपडताळणीमध्ये कोणताही गैरव्यवहार झालेला नाही अशा जिल्ह्यातील शाळांच्या प्रश्नांबाबत माननीय मंत्री महोदयांनी लक्ष घालू अशाप्रकारचे आश्वासन दिल्यास त्यांना थोडा दिलासा मिळेल. आज सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व शाळा बंद आहेत. शिक्षक रस्त्यावर आले आहेत,उपोषण करीत आहेत. आपण उपोष्ण मागे घ्यावे अशी मी त्यांना विनंती केली. माननीय मंत्री महोदय या प्रश्नामध्ये लक्ष घालतील असे सांगितले. तेव्हा आपण या ठिकाणी आश्वासन दिल्यास एक चांगला मेसेज जाईल आणि ज्या जिल्हयाचा आपण गौरव केला तो सार्थकी लागेल एवढेच मला सांगावयाचे आहे.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मी विधेयकावर सविस्तर बोलत नाही. पण माझ्या मतदारसंघातील विषय असल्यामुळे मला बोलले पाहिजे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 197 प्राथमिक शाळा बंद आहेत. संस्थाचालकांना शाळांना कुलूप लावले आहे.सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना रस्त्यावर आणून अध्यापनाचे काम सुरु केले आहे. शासनाने मागील नऊ वर्षापासून वेतनेतर अनुदान दिलेले नाही त्यासाठी हे आंदोलन सुरु आहे. मी सर्व कार्यकर्त्यांशी व पदाधिकाऱ्यांशी बोललो आहे..त्यांना सांगितले की, वेतनेतर अनुदान देण्याबाबत मंत्रिमंडळाचा निर्णय झालेला आहे. परंतु त्यांच्या मनामध्ये अजूनही संभ्रम आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी वेतनेतर अनुदानाच्या संदर्भात खुलासा करावा अशी विनंती आहे. तसेच शिक्षणाधिकाऱ्यांच्या माध्यमातून आपला संदेश त्या संस्थांपर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था करावी म्हणजे हे आंदोलन मागे घेतले जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माझी उप सूचना मागे घेत असताना एक गोष्ट सांगू इच्छितो की, मराठी शाळा वाचविण्यासाठी महराष्ट्रात जे आंदोलन झाले त्या सर्व शाळांचा मी उल्लेख केलेला आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आपण उप सूचना योग्य पध्दतीने देऊन त्या शाळांना अभय देऊ. त्या शाळा हा कायदा येण्यापूर्वीच्या असल्याने आणि त्यातील ज्या शाळा बृहत आराखड्यामध्ये बसतील त्यांना मान्यता द्यावी. माझ्याकडे शाळांची यादी आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, ती यादी माझ्याकडे देखील आहे, आपण ती वाचू नका. या विधेयकास सत्तारुढ पक्षाकडून सुधारणा येणे आवश्यक आहे. म्हणून अधिकाऱ्यांच्या संमतीने, विधी खात्याच्या संमतीने योग्य ती सूचना त्यांनी केली, या विधेयकाच्या माध्यमातून ज्या 72-73 मराठी शाळांना पुनरुज्जीवन मिळणार आहे त्याबाबत मी आपणास खास धन्यवाद देतो. माझी सूचना मागे घेत असताना सत्ताधारी पक्षाकडून जी योग्य सूचना येत आहे त्याचे आपण सर्वांनी स्वागत करावे. या विधानपरिषदेने एवढ्या मराठी शाळा पुनरुज्जीवित करुन वाचविल्या आहेत हा संदेश विधानसभेमध्ये जावा अशी माझी विनंती आहे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेते, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील आणि रामनाथ मोते यांनी चार-पाच मुद्दे उपस्थित केले.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा.....

सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी सांगितले की,सिंधुदुर्ग जिल्ह्यातील संस्थाचालकांनी शाळांना कुलूप लावून शाळा बंद ठेवल्या आहेत, परंतु त्यांचे रस्त्यावर अध्ययापनाचे काम सुरु आहे. अध्यापनाचे काम सुरु आहे ही अतिशय चांगली बाब आहे. पण ज्यासाठी त्यांचे आंदोलन सुरु आहे त्याची माहिती बाहेर आलेली आहे. सन 2004 पासून वेतनेतर अनुदान बंद होते ते वेतनेतर अनुदान दिनांक 1 एप्रिल 2013 पासून सुरु करण्याची घोषणा माननीय मुख्यमंत्री महोदयांनी केलेली आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, ज्या सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली पाहिजे. 20 जून 2012 रोजी शासन निर्णय निर्गमित झालेला आहे त्यानुसार राज्यातील सीबीएसई किंवा आयसीएसई शाळांना परवानगी दिलेली आहे त्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकविणे अनिवार्य आहे. इतकेच नाही तर इयत्ता आठवी इयत्तेपर्यंत त्या शाळांना मराठी भाषा शिकवावी लागणार आहे. त्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवले जाते किंवा कसे हे मी स्वत: तपासले आहे. कारण माझा नातू ज्या इंग्रजी शाळेत जातो त्या शाळेत मराठी भाषा शिकविली जाते हे मी पाहिले आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आणखी एक मुद्दा उपस्थित केला होता. त्यांनी सांगितले की, शिक्षण हा विषय इतका महत्वाचा असल्यामुळे त्यादृष्टीने त्यावर अधिक अभ्यास व्हावा. त्यांनी श्वेतपत्रिका असा शब्द वापरला. शिक्षणाशी संबंधित जेवढे घटक आहेत त्या सर्व घटकांनी एकत्रित येऊन सुधारणा सुचवाव्यात. आपण अनुदान वगैरे शब्द वापरतो परंतु ही एक गुंतवणूक आहे. त्यादृष्टीने ही श्वेतपत्रिका आपण सर्वांनी मिळून तयार करु आणि महाराष्ट्रातील शिक्षणाला एक वेगळी दिशा देऊ.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : खंड 7 व 8 विधेयकाचे भाग झाले.

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**नवीन खंड क्रमांक 9**

**तालिका सभापती** : खंड 8 नंतर नवीन खंड दाख्ल करण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.अशोक उर्फ भाई जगताप व सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी सुधारणा सुचविली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.भाई जगताप ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील सूचना मांडत आहे.

"राज्य शासनास, शिक्षणाचे माध्यम म्हणून इंग्रजी वगळता कोणत्याही भाषेतून शिक्षण देणाऱ्या आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी कमीत कमी पाच वर्षाच्या कालावधीकरिता चालविल्या गेलेल्या शाळांच्या बाबतीत, या अधिनियमा अन्वये अशा शाळेला परवानगी देण्याचा अधिकार असेल ;

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

परंतु, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 याच्या तरतुदींचे अनुपालन केले असल्याखेरीज, अशा कोणत्याही शाळेला या कलमाअन्वये परवानगी दिली जाणार नाही.

परंतु, आणखी असे की, कलमे 3,4 व अनुसूची "क" चा परिच्छेद 12 यांच्या तरतुदी वगळता, या अधिनियमाच्या सर्व तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह अशा शाळेला लागू असतील", याबाबत मला एक तोंडी सूचना करावयाची आहे. यामध्ये मला असे वाटते की, ...

श्री. राजेंद्र दर्डा (बसून) : आपण जर माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी उपस्थित केलेल्या मुद्यासंबंधी उल्लेख करीत असाल तर त्याचा खुलासा मी केला आहे.

श्री. भाई जगताप : आपण खुलासा केला आहे? मला या ठिकाणी एक मौखिक सूचना करावयाची आहे. तो या सभागृहाचा अधिकार आहे. सभागृहाचे नियम आणि परंपरा या अनुसार मी हे सांगत आहे. त्याबाबत अधिक काही न बोलता फक्त खंड 13 (ख) मध्ये जो उल्लेख करण्यात आला आहे त्याबाबत मला सांगावेसे वाटत आहे की, हा संयुक्त समितीकडून आलेला अहवाल आहे. ती बाब या ठिकाणी कंसामध्ये घातली गेली असल्यामुळे ती डिलिट होईल असे मला वाटते. ती होऊ नये असे मला या ठिकाणी नमूद करावयाचे आहे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, माननीय सदस्यांची भावना मला समजली आहे, त्यावर सभागृहात चर्चा होऊन मी उत्तर देखील दिले आहे. शिक्षणामध्ये विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्या विद्यार्थ्याचे हित त्यामध्ये समाविष्ट केले आहे. विद्यार्थ्याचे हित हेच राष्ट्राचे आणि राज्याचे हीत आहे. त्यामध्ये द्रोह किंवा व्देष काय, विद्यार्थ्याच्या हिताला बाधा आणणारी कोणतीही कृती त्यामध्ये येत नसल्यामुळे त्याला आक्षेप घेण्याची आवश्यकता नाही एवढीच विनंती मी आपल्याला करतो.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या चौकटीमध्ये म्हटले आहे , त्यामध्ये सर्व आले आहे. त्यामुळे माझी मौखिक सूचना आपण समजून घेऊन त्याप्रमाणे वाक्य रचनेमध्ये बदल करण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड 8 नंतर नवीन खंड दाखल करण्याबाबत सुचविण्यात आलेली सुधारणा विधेयकाचा भाग झाला.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

परिणाम स्वरुप खंड 9 ते 23 त्यात अनुषंगिक बदल होऊन खंड 10 ते 24 झाले.

खंड 10 ते 13 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

**राज्यातील, राज्याबाहेरील किंवा भारताबाहेरील कोणत्याही मंडळाशी किंवा संस्थेशी संलग्नता मिळवू पाहणाऱ्या शाळेला अधिनियमाच्या तरतुदी लागू असणे**

**तालिका सभापती** : खंड 14 ला सन्माननीय सदस्य सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, सतीश चव्हाण यांनी सुधारणा सुचविली आहे, त्यांच्यापैकी कोणाही एकाने ती मांडावी.

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

पृष्ठ क्रमांक 7 मधील ओळ क्रमांक 15 मध्ये "कलम 10" ऐवजी "कलम 11" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड 14, सुधारल्याप्रमाणे, विधेयकाचा भाग झाला.

खंड 15 ते 21 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

**नियम करण्याचा अधिकार**

**तालिका सभापती** : खंड 22 ला माननीय सदस्य सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, सतीश चव्हाण यांनी सुधारणा सुचविली आहे, त्यांच्यापैकी एकाने ती मांडावी.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

पृष्ठ क्रमांक 8 वरील ओळ क्रमांक 32 व 33 मध्ये "कलम 16" आणि "कलम 22" या ऐवजी अनुक्रमे "कलम 17" आणि "कलम 23" हा मजकूर दाखल करण्यात येईल"

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड 22, सुधारल्याप्रमाणे, विधेयकाचा भाग झाला.

खंड 23 व 24 विधेयकाचे भाग झाले.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, संयुक्त समितीने सादर केल्याप्रमाणे सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 7 महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक "सुधारल्याप्रमाणे" संमत करण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 7 "सुधारल्याप्रमाणे" संमत झाले आहे.

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : पुरवणी मागण्यांवरील चर्चेचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांावरील चर्चा आज मंगळवार, दिनांक 18 डिसेंबर 2012 रोजी घेण्यात येईल. पूरक मागण्या व त्यासंबंधातील बाबी या संबंधीची माहिती सन्माननीय सदस्यांना पत्रक भाग-2 व्दारे वेगळी प्रस्तुत करण्यात आली आहे. प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी भाषण करताना बाब क्रमांक व पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगणे आवश्यक आहे. सदरहू चर्चा संबंधित बाबी पुरती मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणास विदितच आहे. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सन्माननीय सदस्यांनी कृपया लक्षात घ्यावे.

**विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या**

**तालिका सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

1) सामाजिक न्याय,विमुक्त/भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय कल्याण आणि व्यसन मुक्ती - एन-3, एन-4
2) कृषि व पणन मंत्री - डी-3, व्ही-2,व्ही-5
3) ग्रामविकास, वित्त व नियोजन मंत्री - ओ-2,ओ-8,ओ-9,ओ-10,ओ-16,ओ-17,ओ-18 ओ-19,ओ-22,ओ-23,ओ-24,ओ-25,ओ-26,ओ-27,ओ-28,ओ-29,ओ-31,ओ-33, ओ-34,ओ-35,ओ-36,ओ-37,ओ-39,ओ-40,ओ-41,ओ-42,ओ-43,ओ-44,ओ-45, ओ-46,ओ-47,ओ-48
4) जलसंपदा (कृष्णा खोरे-पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री -आय-1, आय-3,आय-5
5) शालेय शिक्षण मंत्री - ई-4
6) वस्त्रोद्योग, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ मंत्री -व्ही-2,झेडई-1
7) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण आणि राजशिष्टाचार मंत्री - ए-4,आर-1
8) कामगार आणि विशेष सहाय्य मंत्री -के-4,एन-3
9) रोजगार हमी योजना आणि जलसंधारण मंत्री -ओ-3

. . . .2 आय-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

10) पशुसंवर्धन,दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री - डी-4,डी-5,डी-6,डी-7

11) क्रीडा व युवक कल्याण मंत्री - ई-3

12) महिला व बालविकास मंत्री - एक्स-1, एक्स-2

13) पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य मंत्री - झेडडी-1, झेडडी-2

. . . .2 आय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ 04:50

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, विशेष उल्लेख राहिले आहेत.

**तालिका सभापती** : विशेष उल्लेख उद्या घेण्यात येतील.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी या सदनाचे आणि सर्व सन्माननीय सदस्यांचे मनापासून आभार व्यक्त करण्यासाठी उभा आहे. कारण कामकाज पत्रिकेवर वेगळे काम दाखविलेले असताना आपण विधेयकाच्या कामकाजाला प्राधान्य दिले आणि हे विधेयक मंजूर केले त्याबद्दल मी आपला मनापासून आभारी आहे.

----

2 आय-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, काल याठिकाणी मी हा मुद्दा मांडला होता. परंतु आता माननीय वित्त मंत्री किंवा राज्यमंत्री सदनामध्ये उपस्थित नाहीत. तरी देखील मी माझा मुद्दा मांडतो. परंतु याबाबतीत माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर मिळेल याबाबत त्यांना ताकीद देण्यात यावी.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी काल बिल्स् प्रणालीच्या गैरप्रणालीच्या विषयाबाबत मुद्दा मांडला होता.राज्याच्या तिजोरीतून खर्च होणाऱ्या प्रत्येक पैशाला विधीमंडळाची मान्यता लागते. पुरवणी मागण्यांमध्ये त्याची मान्यता घेतली जाते आणि तसेही नसेल तर लोकलेखा समिती कडे पुन्हा तो विषय जातो. असे असताना जर काही अधिकाऱ्यांनी परस्पर ठरल्या पेक्षा अधिक किंवा वेगळ्या प्रकारे खर्च केला असेल तर हा जनतेच्या निधीचा बेपर्वाईने केलेला वापर आहे. तसेच राज्यातील सर्वोच्च सभागृहाचा अवमान आहे. त्यामुळे या अधिकाऱ्यांवर आजच तात्काळ निलंबनाची कारवाई सरकार करणार आहे काय असा मला या निमित्ताने प्रश्न विचारावयाचा आहे.

सभापती महोदय, बाब क्र.115 मध्ये कामगार विभागाच्या बाबतीत धक्कादायक गोष्ट अशी आहे की, 5000 हजार चौ.फू.पेक्षा अधिकचे क्षेत्रफळ विकसित करणाऱ्या विकासकाच्या करारनाम्याच्या किंमतीवर एक टक्का सेस आकारण्यात येतो. हा कशासाठी आकारण्यात येतो तर तेथील कामगारांच्या विविध स्किल्स् विकसित कराव्यात यासाठी हा पैसा गोळा केला जातो आणि त्या माध्यमातून 932 कोटी रुपये इतका पैसा राज्य शासनाच्या तिजोरीमध्ये जमा आहे. हा निधी गेल्या पाच वर्षामध्ये या रकमेवर जेवढे व्याज आले असते, त्याच्या केवळ 1 लाख 90 हजार फक्त खर्च झाला आहे. पण यापेक्षा जास्त व्याज जमा झाले असेल. आपण कराच्या माध्यमातून 932 कोटी रुपये गोळा केले आहेत. त्यातून कामगारांच्या हितासाठी, त्यांच्या सोयी-सुविधांसाठी खर्च करुन वेगवेगळे कुशल कामगार तयार करावेत, त्यांच्यासाठी अभ्यासक्रम तयार करावा यासाठी खरे म्हटले तर हा सेस आहे. पण दुर्दैवाने 932 कोटी रुपये जमा झाले आहेत याकडे आपल्या विभागाचे लक्ष नाही. तसेच असे मानले जाते की, 2030 साली जगामध्ये भारत राष्ट्र हे सगळयात तरुण ह्युमन रिर्सोस असणारे राष्ट्र असणार. कॅनडातील सर्वसाधारण ॲव्हरेज वय 67 ते 70 असेल. यु.एस.मध्ये 63 ते 65 पर्यंत असेल आणि युरोपिअन देशामध्ये 60 च्या वर असेल. त्यामुळे भारतातील ॲव्हरेज वय 35 ते 37 पर्यंत असेल. त्यामुळे जर जगातील सर्व स्कील्स याठिकाणी जर

2 आय-5



श्री.विनोद तावडे . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विकसित करून घेतल्या तर आपले ह्युमन रिसोर्स हे जगावर एका अर्थाने राजवट करु शकते इतके मानव संसद आपल्याकडे असू शकते आणि त्या मानव संसाधनाला ज्या स्किल्ड शिकविल्या पाहिजेत यासाठी माननीय पंतप्रधान यांनी 100 कोटी रुपये पहिल्यांदा घोषित केले आणि त्यानंतर परत निधी वाढविला. पण आपण पैसे गोळा केले. पण आपण असले कर्मदरिद्री आहोत की, आपले सरकार पैसे गोळा करीत आहे आणि पाच-पाच वर्षे खर्च करीत नाही. याबाबत आज सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी असे या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्र.182 तेल्लारा जिल्हा, अकोला येथील मागासवर्गीयांच्या वसतीगृहाकरता शासनाने मंजुरी दिली. पण स्थानिक शासकीय अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती पुरविल्यामुळे सदरहू वसतीगृह अकोला येथून यवतमाळ येथे स्थलांतरीत केले. परंतु स्थलांरीत करण्याचे काही नियम आहेत. पण शासनाने याला मंजुरी दिली. परंतु त्याठिकाणी जागेची उपलब्धता असतानाही शासकीय अधिकाऱ्यांनी चुकीची, दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे सदर वसतीगृह अकोला येथून यवतमाळ येथे स्थलांतरीत केले. मात्र या प्रकरणामध्ये अकोला येथे वसतीगृहासाठी जागा उपलब्ध असल्याचा अहवाल जमिनीच्या 7/12 सह विशेष समाजकल्याण अधिकारी, अकोला यांनी शासनास सादर करुन सुध्दा वसतीगृहाला अद्याप पुनश्च मान्यता देण्यात आलेली नाही.त्यामुळे अकोला येथील मागासवर्गीयांचे नुकसान टाळण्यासाठी जिल्ह्यात पूर्व मंजुरी मिळाली असली तरी पुन्हा तातडीने मान्यता देण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी इंदू मिलच्या बाबतीत प्रस्ताव मांडला होता आणि त्याला आम्ही सर्वांनी संमती देऊन तो पारीत केला. पण काल मुंबईतील "आपले महानगर" या वर्तमानपत्रामध्ये भारत सरकारचे अवर सचिव श्री.अनिल कुमार यांचे पत्र छापण्यात आले आहे. या पत्रामध्ये अद्याप इंदू मिलचे हस्तांतरण झाले नसून याबाबत त्यातील अडचणी काय आहेत याविषयी मोठा पाढा वाचलेला आहे. त्यामुळे आपण याठिकाणी सर्व प्रकारची चर्चा करुन सुध्दा जर ही अवस्था असेल तर याबाबतीत सामाजिक न्याय विभागाकडून थोडेसे स्पष्टीकरण आले तर बरे होईल.

सभापती महोदय,आता सदनामध्ये माननीय मंत्री महोदय आले आहेत.राज्यातील सामाजिक

. . . .2 आय-6



श्री.विनोद तावडे . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

न्याय विभागांतर्गत वाटप होणाऱ्या विना अनुदानित आणि अनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रथम वर्ष व व्दितीय वर्षामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये मोठी तफावत आहे. यापूर्वी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी हा मुद्दा मांडला होता. वर्धा, यवतमाळ, अमरावती, नाशिक, मुंबई येथील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना 140 रुपये आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागासवर्गाच्या विद्यार्थ्यांना 108 रुपये प्रतिमहा भत्ता दिला जातो. परंतु पुणे जिल्ह्यामध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना 330 रुपये दिले जातात. सन्माननीय सदस्यही पुण्यातून येतात मग तेथे काही वेगळे आहे काय? जे मुंबई, यवतमाळ, अमरावती, वर्धा येथे एवढा भत्ता मिळत नाही मग सन्माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघेसाहेब, पुणे येथे 330 रुपये का दिले जातात? याचे कारण आम्हाला समजले तर बरे होईल.

सभापती महोदय, दुसरा विषय म्हणजे आपण बजेटमध्ये उच्च शिक्षणाच्या बाबतीत घोषणा केली की, जी काही विना अनुदानित महाविद्यालयातील जे शुल्क असेल ते आपण देणार आहोत. इंजिनिअरींग, मेडिकल, नर्सिंग इ. कोर्सेसमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश घेतात, त्याचे शुल्क देण्याचे मान्य केले आहे. पण शिष्यवृत्तीच्या बाबतीत 1800 कोटी रुपयांची थकबाकी आहे आणि शासनाच्या विभागातील अधिकारी वेळच्या वेळी देत नसल्यामुळे महाविद्यालये अडचणीमध्ये येतात. तसेच काहीतरी चिरीमिरी किंवा लक्ष्मीदर्शन झाल्याशिवाय तेथील कॉलेजनां शिष्यवृत्ती मिळत नाही असे मी तुम्हाला पुराव्यानिशी सांगू शकतो. मी हे खाजगी नर्सिंग कॉलेजेसच्या असोसिएशनचा अध्यक्ष असून कोणत्या कॉलेजसाठी किती डिमांड झाली हे देखील सांगू शकतो. यामुळे एकतर असे होते की, महाविद्यालये परस्पर विद्यार्थ्यांकडून फी घेतात. त्यांना सांगितले जाते की, अगोदर फी भरावी नाहीतर प्रवेश मिळणार नाही अशा प्रकारची भाषा वापरु लागले आहेत. परंतु तसे केले तर ॲट्रॉसिटी ॲक्ट लागेल हे माहिती असूनही ते करतात. कारण ते म्हणाले की, आम्ही समाजकल्याण विभागा कडून आम्ही शिष्यवृत्ती आणू शकत नाही कारण आम्हाला तेथे पुन्हा पैसे भरावे लागतात. अशा प्रकारे आपले 1800 कोटी रुपये अडकलेले आहेत ते आपण कधी क्लिअर करणार आहात.याबाबतीत आपल्याला कोणी दाद लागू देणार आहे काय असा प्रश्न आहे. या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी माहिती सांगावी अशी आग्रहाची विनंती आहे.मघाशी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये एक मुद्दा उपस्थित झाला होता आणि बाब क्र.191 च्या निमित्ताने मी तो मांडत आहे....

. . . .2 आय-7



श्री.विनोद तावडे . . ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ज्यांना निवृत्ती वेतन मिळत नाही त्यासाठी धोरण आखणे जरुरीचे आहे. मघाशी असा मुद्दा उपस्थित झाला की, ज्येष्ठ नागरीकांच्या धोरणाच्या बाबतीत सांगताना याबाबत लवकरच, नजिकच्या काळात असे शब्द न वापरता आम्ही ठोसपणे दि. 26 जानेवारीच्या आत ज्येष्ठ नागरीकांच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याचे धोरण घोषित करु असे शासनाने सांगावयास पाहिजे. राज्यातील एकूण जनतेच्या टक्केवारीमध्ये ज्येष्ठ नागरीक 10 टक्के आहेत, जवळजवळ सव्वा कोटी पेक्षा जास्त आहेत. त्यांच्या साठी धोरण जाहीर करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.बरवड . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

काही शहरे ज्येष्ठ नागरिकांचे हब होत आहेत. पुणे, तळेगाव अशा ठिकाणी या धोरणाच्या माध्यमातून काही वेगळ्या गोष्टी अंमलात आणता येतील असे धोरण शासन कधी पर्यंत आणणार या बाबतीत निश्चित कालावधी सांगावा. त्यामध्ये मोफत वैद्यकीय सेवा, वैद्यकीय विमा वगैरे गोष्टी येतील. त्याच्या डिटेल्समध्ये मी जात नाही. पण या धोरणाची तारीख जरी कळली तरी त्यांच्या दृष्टीने ते फार योग्य होईल.

सभापती महोदय, यानंतर मी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 214 वरील बाब क्रमांक 248 बाबत बोलणार आहे. आपण राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु केली. 8 जिल्ह्यांमध्ये 1 लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या सर्व नागरिकांना मोफत आरोग्य सेवा पुरविण्याचे आश्वासन आपण दिले होते. या विम्याचे हप्ते राज्य शासनाने विमा कंपनीकडे जमा केले. मी पत्र देऊन या सर्व बाबतीत माहिती गोळा केली. शासनाने हप्त्यापोटी किती रक्कम भरली, कंपन्यांनी रुग्णांच्या औषधोपचारावर आतापर्यंत किती खर्च केलेला आहे या सर्व बाबतीत माहिती घेतल्यानंतर असे लक्षात आले की, शासनाने दोन हप्त्यांमध्ये 91 कोटी 72 लाख रुपये एवढी रक्कम विमा कंपन्यांकडे भरलेली आहे. जी माहिती मला आरोग्य खात्याकडून मिळाली ती मी सांगत आहे. त्या मोबदल्यात या कंपन्यांनी मात्र आतापर्यंत 14 कोटी 81 लाख रुपये एवढाच खर्च केलेला आहे. या बाबतीत खरोखर वस्तुस्थिती काय आहे ? आपण 91 कोटी रुपयांचा हप्ता भरुन जर कंपन्या जर 14 कोटी रुपयेच खर्च करणार असतील तर त्यातील वस्तुस्थिती या निमित्ताने स्पष्ट व्हावी अशी मी आग्रहाची मागणी करतो.

सभापती महोदय, मघाशी मी माननीय क्रीडा मंत्री श्री. वळवी यांच्याशी बोललो. एकतर आपले जे बोलघेवडे मंत्री आहेत त्यांना चाप लावला पाहिजे नाही तर ते जे बोलतात ते त्यांनी केले पाहिजे.

श्री. अमरसिंह पंडित : बोलघेवडे हा असंदीय शब्द आहे...

श्री. विनोद तावडे : यामध्ये असंसदीय काय आहे ? काही सन्माननीय सदस्य नावे सांगा असे म्हणत आहेत. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी मागणी केली की, अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक झाले पाहिजे. माननीय मंत्री श्री. आर आर. पाटील

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. विनोद तावडे ....

यांनी घोषणा करुन 8 वर्षे झाली. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांना सांगू इच्छितो की, आपल्याला बोलघेवड्या मंत्र्यांचे उदाहरण हवे असेल तर ते देतो. नुसती घोषणा केली जाते. पुढे काय झाले, माहीत नाही. ज्यावेळी आपल्या महिला कबड्डी संघाने विश्वचषक जिंकला त्यावेळी विमानतळावर त्यांच्या स्वागताला शासनाचे मंत्री उपस्थित नव्हते. शासनाचे जिल्हाधिकारी उपस्थित नव्हते. त्या ठिकाणी क्रीडा खात्याचा कोणी तरी अधिकारी आला असेल. आपले केंद्रातील नेते ज्यावेळी येतात त्यावेळी आपण त्यांच्या स्वागताला जातो. आधीचे राज्यमंत्री तर त्यांचे बूट, चपला उचलावयाचे. तेवढे करु नका पण ज्यांनी विश्वचषक आणला त्यांच्या स्वागताला श्री. वळवी साहेब यांच्यासारखे कॅबिनेट मंत्री उपस्थित राहावयास पाहिजे होते. आपण आला नाहीत. विरोधी पक्षाचे नेते त्या ठिकाणी गेले. मग त्याची चर्चा झाली. त्यानंतर लगेच ताबडतोब मुख्यमंत्र्यांनी आणि बाकीच्यांनी त्यांना 1 कोटी रुपयांचे रोख बक्षीस देण्याची घोषणा केली. मी गेले तीन महिने सातत्याने पाठपुरावा करीत आहे. अनेक पत्रे दिलेली आहेत. अनेक वेळा भेटी घेतल्या. आज माननीय मुख्यमंत्र्यांची सही झालेली आहे असे मला उडतउडत कळले आहे. आपण जी घोषणा करतो तो शेवटी एक सन्मान आहे. खरोखरच जर तो सन्मान द्यावयाचा असेल तर तो लगेच दिला पाहिजे. त्यांचे पालक, कबड्डीपटू यांना सोबत घेऊन आम्ही अनेक वेळा भेटलो. शेवटी ते कबड्डीपटू असे म्हणावयास लागले हे दिले नसते तरी चालले असते पण हा आमचा अपमान आहे. हे आम्हाला देऊ नका. ही भीक आम्हाला नको. आम्ही मागावयास आलो होतो का ? घोषणा केली की पुढच्या सात दिवसात ते मिळाले पाहिजे आणि त्या पध्दतीने सर्व कायदेशीर गोष्टी केल्या पाहिजेत. उगाच कबड्डीपटू मागे लागत आहेत. ते असे म्हणाले की, आणखी एक वर्ल्डकप आणेपर्यंत हे बक्षीस मिळेल की नाही याबद्दल शंका आहे. आपल्या महिला कबड्डी संघाने विश्वचषक जिंकला हा आपला गौरव आहे. आपण या गौरवाचा जर सन्मान करणार नसू तर ते योग्य नाही. या संदर्भात सही झालेली आहे, आता होईलच असे उत्तर देऊ नये. हे अधिवेशन संपण्याच्या आत त्यांना या ठिकाणी बोलवून त्यांना हातात हे बक्षीस सन्मानाने देऊ अशी घोषणा क्रीडा मंत्री करणार आहेत का याची आम्ही वाट पहात आहोत.

सभापती महोदय, यानंतर मी कृषी, पशुसंवर्धन व दूग्धव्यवसाय विकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 53 वरील बाब क्रमांक 71 बाबत बोलणार आहे. यामध्ये शासकीय दूध योजनेसंबंधीचा मुद्दा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. विनोद तावडे ....

आहे. राज्यातील एकूण 31 हजार 966 पैकी 11 हजार 28 दूध संकलन करणाऱ्या प्राथमिक सहकारी दूध संस्था आजमितीला बंद आहेत. राज्याच्या आणि केंद्राच्या विविध योजना दूध सहकारी संघांकडून राबविल्या जात आहेत. नाशिक आणि नवी मुंबई येथील प्रत्येकी 2 तालुका दूधसंघ बंद आहेत. नवी मुंबईमध्ये 2, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर विभागातील प्रत्येकी 1 जिल्हा दूध संघ बंद आहे. स्वच्छ दूध उत्पादन योजनेअंतर्गत जून महिन्यात राज्यातील दूध प्रकल्पासाठी 3 कोटी रुपये मंजूर झालेले आहेत. परंतु दूध संघाच्या पुनर्वसनासाठी याच महिन्यात राज्यातील केंद्रांना प्रत्येकी 5 लाख रुपये निधी प्राप्त झाला आहे असे असताना मराठवाडा विशेष पॅकेज, विदर्भ पॅकेज, पंतप्रधान पॅकेज, मुख्यमंत्री पॅकेज असा सगळा मोठा निधी प्राप्त झाला असताना सुध्दा आणि एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध असताना निधीचे नियोजन व वाटप कशा प्रकारे व कोणाला करण्यात आले ही बाब सभागृहासमोर येणे गरजेचे आहे. बंद असलेल्या दूध संस्थांच्या नावाखाली शासकीय योजनांमार्फत शासकीय निधीचा अपहार करणाऱ्या या सक्रीय टोळीचा पर्दाफाश केला पाहिजे. हे सर्व संघ बंद आहेत तरी त्यांना वाटप केल्याचे दाखवित आहेत. या बाबतची सर्व माहिती या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने संबंधित मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये सादर करावी अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सभागृहासमोर चर्चेला असलेल्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी सामाजिक न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 165 वरील बाब क्रमांक 181 बाबत बोलणार आहे. ज्या भटक्या जमाती आहेत, विशेषत: मराठवाड्यामध्ये ज्या भटक्या जमाती आहेत ते सगळीकडे फिरत असतात. त्यांचे मतदार यादीमध्ये कोठेही नाव नाही. कारण त्यांना घरच नाही. ते फक्त पालीमध्ये राहतात. त्यामुळे कोणीही तहसीलदार त्यांना रेशन कार्ड देण्यास तयार नाही. त्याचबरोबर त्याचे ज्या ठिकाणी मूळ गाव असेल आणि त्यांचे घर नसले तरी मतदार यादीमध्ये नाव येऊन मतदानाचा जो हक्क आहे तो त्यांना मिळाला पाहिजे. त्यांना रेशन कार्ड मिळाले पाहिजे. यासाठी शासनाने ठोस निर्णय घेतला पाहिजे.

इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फीच्या संदर्भातील एक मुद्दा आहे. मागच्या वेळी मागण्यांवर चर्चा करीत असताना माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात असे सांगितले होते की, ही रक्कम जूनमध्ये दिली जाईल. ही रक्कम मार्चमध्ये दिली जाते परंतु जूनमध्ये दिली जाईल असे सांगितले. त्याची पूर्तता झालेली नाही. ती रक्कम शेवटी येते आणि संस्थाचालक विद्यार्थ्यांकडून फी घेतात पण पुन्हा ती परत देत नाहीत असे आरोप होतात, प्रत्यारोप होतात. ती रक्कम जूनमध्ये मिळावी अशी विनंती आपण वित्त विभागाला करावी.

सभापती महोदय, या नंतर मी नियोजन विभागावरील मागण्यांच्या संदर्भात प्रामुख्याने बोलणार आहे. नियोजन विभाग जे जी.आर. काढतात ते घटनेला धरुन काढत नाहीत. या सभागृहामध्ये गेल्या अधिवेशनामध्ये सुध्दा मी हा विषय उपस्थित केला होता. माझी लक्षवेधी सूचना माननीय सभापती महोदयांनी राखून ठेवली होती. त्यानंतर दालनामध्ये चर्चा झाली. नियोजन समितीची बैठक आणि त्याचे अधिकार हे पालकमंत्र्यांना नाहीत. त्या ठिकाणी पालकमंत्र्यांना अधिकार देता येत नाहीत. समितीपुढे चर्चा करुन त्याच ठिकाणी मंजूर करावयास पाहिजे. परंतु आज नियोजन मंडळाची बैठक पाच दहा मिनिटामध्ये आटोपतात आणि सगळे अधिकार पालकमंत्र्यांना देतात. त्याच्या विरोधात आम्ही कोर्टात गेलो. एवढेच नव्हे तर या राज्यातील काही नियोजन समित्या अजूनही स्थापन झालेल्या नाहीत. या ठिकाणी ग्रामपंचायती आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका झाल्या. नगरपालिकांच्या निवडणुका झाल्या. या दोन्ही संस्थांमधून 32 सदस्य निवडून दिले जातात. दोन सभासद आमदारांतून निवडले जातात. 2 सभासद शासन नियुक्त करते. 2 सभासद तज्ज्ञ म्हणून त्या समितीमध्ये असतात.

यानंतर श्री. गिते ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 05:10

श्री.जयंत प्र.पाटील....

यात फक्त 8 सदस्य असताना राज्यात नियोजन समितीच्या बैठका होतात.

महोदय, मी मागच्या अधिवेशनामध्ये हरकत घेतली होती. परंतु माझी हरकत मान्य केली गेली नाही. माननीय सभापतींनी मंत्री महोदयांना आदेश दिला की, तुम्हाला असे करता येणार नाही. एवढे करुनही जिल्हा नियोजन मंडळाची बैठक होती, त्यावेळी या बैठकी संदर्भात मी नियोजन विभागाच्या सचिवांना दूरध्वनी केला. मी त्यांना सांगितले की, तुम्हाला अशा प्रकारचा जी.आर.काढता येत नाही. 74 व्या घटना दुरुस्तीचे तुम्ही उल्लंघन करता आहात, घटनेचा अवमान करता आहात. या संदर्भात नियोजन विभागाच्या सचिवांनी सांगितले की, आम्ही हे काम घटने प्रमाणेच करतो. मी नियोजन सचिवांना लेखी पत्र दिले. केवळ माननीय मंत्री महोदयांच्या दबावाखाली पुन्हा त्या ठिकाणी नियोजन मंडळाची बैठक घेण्यात आली. ही बैठक चालविली. त्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करण्यास मी आठ तास लावले. सकाळी 11.00 वाजता बैठक सुरु झाली आणि ती बैठक सायंकाळी 7.30 वाजता संपविली. तरी देखील बैठक अर्धवट झाली. नंतर पुन्हा 8 दिवसांनी बैठक झाली. त्या आठ दिवसांच्या कालावधीत मी उच्च न्यायालयात गेलो. बैठकीच्या दिवशीच हे प्रकरण सकाळी 11.00 वाजता उच्च न्यायालयाच्या बेंच समोर आले. या प्रकरणाचा 11.30 वाजता माननीय न्यायाधीशांनी निकाल दिला. जो पर्यंत नियोजन समितीचे सर्व सदस्य निवडून येणार नाहीत, तोपर्यंत या बैठकीचे कामकाज थांबवावे. त्या दिवशीची बैठक रद्द झाली. नियोजन विभागाचे सचिव यासंदर्भात कायदा बघत नाहीत, कोणत्याही कायद्याचा ते अभ्यास करीत नाहीत. उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे राज्यातील डी.पी.डी.सी.चा कारभार पूर्णपणे थांबलेला आहे.

सभापती महोदय, वर्ष संपण्यास जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च एवढेच तीन महिने शिल्लक राहिलेले आहेत. या तीन महिन्यामध्ये बजेट प्रोव्हीजन कशा तऱ्हेने करणार आहात ? कामांच्या निविदा कधी निघणार, कामांना सुरुवात कधी करणार यासंबंधीचे गणित कसे बसविणार आहात हा खरा प्रश्न आहे. राज्यातील सर्व जिल्हयातील डी.पी.डी.सी.बैठका झालेल्या आहेत. परंतु रायगड जिल्हयात गेल्या 11 महिन्यापासून बैठकच झाली नव्हती ही बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली होती. निवडणुका, आचारसंहिता या कारणांमुळे सदर बैठका पुढे ढकलण्यात आल्या. आम्ही आम्ही प्रत्येक गोष्टीसाठी उच्च न्यायालयात धाव घ्यावयाची काय? मघाशी कोणी तरी बोलले की,

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

श्री.जयंत प्र.पाटील...

तुम्ही गरीब आहात काय ? प्रत्येक गोष्टीसाठी आम्हाला उच्च न्यायालयाकडून न्याय मागण्यासाठी जावे लागते आणि उच्च न्यायालयाकडून आम्ही निर्णय घेऊन येतो.

महोदय,मी या सभागृहाचा गेल्या 12 वर्षापासून सदस्य आहे. मी वयाच्या 17 व्या वर्षापासून काम करीत आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद पासून विधिमंडळ सदस्यांपर्यंत आलो आहे. आम्ही जेव्हा विभागाच्या सचिवासमवेत बोलतो, त्यावेळी सचिव कायदाचे वाचनच करीत नाहीत असे दिसून येते. गेल्या अधिवेशनात मागण्यावरील चर्चेच्या वेळी मी 74 व्या घटना दुरुस्तीचे पुस्तक आणून दाखविले. त्या घटना दुरुस्ती प्रमाणे आम्हाला काही तरी यासंबंधी ज्ञान आहे असे आवर्जून सांगितले. सभापती महोदय, आपणच त्यावेळी सभापतीस्थानी होतात. या गोष्टीची आपणाला पूर्णपणे माहिती आहे. विभागाचे अधिकारी मंत्र्याच्या दबावाखाली येऊन बेकायदेशीरपणे जी.आर.काढतात. त्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई झाली पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे. त्या अधिकाऱ्यांनी मंत्र्यांना लागलीच काही गोष्टी निदर्शनास आणून दिल्या पाहिजे, त्यांनी नोटींग केले पाहिजे. मग श्री.पांढरे सारखे अधिकारी सेवानिवृत्तीच्या वेळी बोलतात. अधिकारी अगोदर काहीच बोलत नाहीत. नियोजन मंडळाच्या बैठका वर्षातून किमान तीन वेळा झाल्या पाहिजेत. डी.पी.डी.सी.मध्ये होणारे कामकाज याबाबतची पाहणी शासन स्तरावरुन झाली पाहिजे. तसेच या गोष्टींची चर्चा सभागृहात झाली पाहिजे.

सभापती महोदय, नियोजन मंडळाच्या बैठकी संदर्भात हायकोर्टाने आदेश दिलेला आहे, त्या आदेशानुसार घटने प्रमाणे काम केले पाहिजे. परंतु आमच्या डी.पी.डी.सी.च्या बैठकी बाबत घटनेप्रमाणे कामकाज झालेले नाही. भविष्यात तरी संबंधित अधिकाऱ्यांनी घटनेप्रमाणे कामकाज करावे व त्याबाबतीत शासनाने लक्ष घालावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 308, पान क्रमांक 263, ही पर्यावरण विभागाशी संबंधीत आहे. मी पर्यावरणाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, माझ्या गावात आर.सी.एफ.चा कारखाना आहे. आर.सी.एफ.ची वेस्टेज वॉटर सप्लायची पाईप लाईन वरच्या बाजूला आलेली आहे. हा मुद्दा मी मागच्या अधिवेशनात देखील उपस्थित केला होता. या बाबतीत पर्यावरण विभागाने हर्बर विभागास

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

कळविले होते. हर्बर विभागाने खडकवासला जल संशोधन केंद्राला अहवाल तयार करण्यास सांगितले. त्या पाईप लाईनमुळे धोका निर्माण झालेला आहे, पाईप लाईन फुटली तर तेथील दोन-तीन गावे भस्मसात होतील असा अहवाल जल संशोधन केंद्राने दिलेला आहे. तेथे पर्यायी जे.टी.

कशी बांधावयाची याचे डिझाईन सुध्दा त्यांनी तयार करुन दिलेले आहे. आर.सी.एफ.चे अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी यांची एक संयुक्त बैठक बोलवावी. हे काम मार्गी लागण्याची शक्यता असल्याने त्या कामास गती द्यावी अशी मी पर्यावरण मंत्र्यांना विनंती करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

-------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, बाब क्रमांक 169, पृष्ठ क्रमांक 153, ग्रामविकास विभागाच्या मागणीच्या अनुषंगाने मी माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणावर पेयजल योजना तयार केल्या जातात. या योजनांचे नियमन आणि नियंत्रण जिल्हा परिषद करीत असते. या योजनांची तांत्रिक पाहणी करण्याचे अधिकार 50 लाख ते 2.50 कोटी रुपयांपर्यंत जीवन प्राधिकरणाच्या अधीक्षक अभियंत्यांना आहे आणि 2.50 कोटी ते 5.00 कोटी रुपयांपर्यंतच्या योजनांची तांत्रिक पाहणी करण्याचे अधिकार मुख्य अभियंता यांना आहेत.

सभापती महोदय, बीड जिल्हयामध्ये एकाही जलपेय योजनांची पाहणी ना अधीक्षक अभियंता यांनी केली ना मुख्य अभियंता यांनी केली. या योजनांमध्ये प्रचंड मोठया प्रमाणात गदारोळ आहे. या योजनांमध्ये फार मोठा गोंधळ आहे. या योजनांमध्ये मोठया प्रमाणात अपहार झालेला आहे. त्यामुळे मला राज्य शासनाला कळकळीची विनंती करावयाची आहे की, बीड जिल्हयामध्ये जिल्हा परिषदेच्या ज्या योजना आहेत, त्यात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झालेले आहेत.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले..........

त्यामध्ये अधिकारी, पदाधिकारी यांच्या संगनमताने लोणी खाण्याचे काम सुरु आहे. ग्रामविकास खात्याने तांत्रिक तपासणी करण्याचे अधिकार मुख्य अभियंता आणि अधीक्षक अभियंता यांना द्यावेत अशा प्रकारची मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पदाधिकारी यांचा मूकपणे सुरु असलेला संवाद, किंबहुना गैरव्यवहार टाळायचा असेल तर मुख्य अभियंता आणि अधीक्षक अभियंता यांनी तांत्रिक तपासणी केली तरच योजना मोठया प्रमाणात यशस्वी होऊ शकतात. बीड जिल्हयामध्ये जवळजवळ 148 योजना या पूर्णत्वाच्या दिशेने जाणा-या आहेत. आनंदवाडी, बहिरवाडी, बोरखेड, हातजळ, कळखांब, कामखेडा आदी योजना आहेत. कामखेडा योजनेबाबत ग्रामस्थांनी बऱ्याच तक्रारी केलेल्या आहेत. परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी त्या तक्रारींकडे लक्ष द्यायला तयार नाहीत. पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मी शासनाला विनंती करतो की, ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजनांचा बट्टयाबोळ अधिकाऱ्यांनी चालविला आहे तो वाचविण्यात यावा.

सभापती महोदय, बाब क्रमांक 172, पृष्ठ क्रमांक 154. ग्रामीण भागामध्ये ज्या गावांच्या आजूबाजूला डोंगर आहेत असे डोंगर ग्रामपंचायती वृक्ष लागवडीसाठी दत्तक घेणार असतील तर त्या ग्राम पंचायतींना राज्य शासनाने विशेष निधी दिला पाहिजे. त्यासाठी राज्य शासनाने योजना राबवावी अशी माझी विनंती आहे. आज बोडके, उजाड असणारे डोंगर पर्यावरणाचे रक्षण करण्यास मदत करतील. डोंगर हिरवेगार दिसतील आणि माणसांची मने रमतील. ज्यांना चिंतन करायचे आहे ते डोंगरावरील वृक्षाखाली जाऊन शांतपणे चिंतन करतील. त्यामुळे ग्रामविकास विभागाला विनम्र सूचना करतो की, ज्या ग्रामपंचायती डोंगरावर वृक्ष लागवड करण्याचा संकल्प करतील त्यांना विशेष निधी दिला जावा. राज्य शासनाने 100 कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प केलेला आहे. हा संकल्प तडीस नेण्यासाठी सुचविल्याप्रमाणे डोंगर वृक्ष लागवडीसाठी दत्तक देण्याची योजना राबविण्यात यावी. त्यामुळे ते डोंगर जगतील. डोंगर म्हणजे कुंभ आहेत. हे कुंभ पाणी शोषण करण्याचे काम करतात. डोंगरावर वृक्ष असतील तर पाण्याचा झिरपा होईल आणि उन्हाळयामध्ये पाणी टंचाई भासते त्यावर मात करता येईल. त्या दृष्टीने शासनाने निश्चितपणे प्रयत्न करावा अशी विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ पूर्वी श्री.गिते 05:20

प्रा.सुरेश नवले..........

सभापती महोदय, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभाग, पृष्ठ क्रमांक 51, बाब क्रमांक 68. महाराष्ट्रातील जे कुक्कुटपालन व्यावसायिक आहेत त्यांचा व्यवसाय धोक्यात आलेला आहे. अंडे आधी की कोंबडी आधी हा विषय आता संपला आहे. अंडे आणि कोंबडी दोन्हीही धोक्यात आहेत. मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो की, कुक्कुटपालन व्यवसाय वाचवायचा असेल तर कच्चा माल आणि पक्का माल यातील तफावत दूर केली पाहिजे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कोल्हापूर येथील शाहू मिलच्या जमिनीवर राजर्षी शाहू महाराजांचे स्मारक उभारणे

**मु.शी.**: कोल्हापूर येथील शाहू मिलच्या जमिनीवर राजर्षी शाहू महाराजांचे स्मारक उभारण्यासंबंधी माननीय उप मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.अजित पवार ( उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

कोल्हापूर येथील शाहू मिलच्या जमिनीवर राजर्षी शाहू महाराज यांचे स्मारक उभारण्याच्या संदर्भात आज दिनांक 18 डिसेंबर, 2012 रोजी नागपूर येथील विधानभवन येथे माननीय मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीस माननीय विरोधी पक्षनेते श्री.एकनाथराव खडसे, कोल्हापूर जिल्हयाचे पालकमंत्री, वस्त्रोद्योग मंत्री, कोल्हापूर जिल्हयातील मंत्री, राज्यमंत्री, संबंधित इतर मान्यवर उपस्थित होते. बैठकीत साधकबाधक चर्चा झाली. या बैठकीत कोल्हापूर येथील शाहू मिलच्या जमिनीवर राजर्षी शाहू महाराज यांचे भव्य स्मारक उभारण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. त्या जिल्हयाचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली लोकप्रतिनिधी व इतिहास तज्ज्ञ आणि शासकीय अधिकारी यांचा समावेश असलेली समिती गठीत करण्याचाही निर्णय घेण्यात आला. या समितीने शाहू मिलच्या संपूर्ण जागेचे योग्य नियोजन करुन समाजाच्या दृष्टीने अभिप्रेत असलेल्या व शाहू महाराजांनी मांडलेल्या वेगवेगळया विकास योजना व न्यायालयीन निकालाच्या आधीन राहून अंतिम निर्णय घेण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जे निवेदन केले त्याचे मी स्वागत करतो. या बैठकीला विधानसभेतील विरोधी पक्षनेते उपस्थित होते. या सदनाचे प्रतिनिधीत्व करणारे विरोधी पक्षनेते उपस्थित नव्हते याचे वैगुण्य वाटते.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी माननीय उप मुख्यमंत्र्यांचे सभागृहाच्या वतीने हार्दिक अभिनंदन करतो. आज सकाळी आम्ही छत्रपती शिवरायांचे स्मारक उभारणे व मराठा समाजाला आरक्षण मिळावे हे दोन विषय मांडले होते. या विषयांबाबत याच अधिवेशनात घोषणा झाली तर आनंद वाटेल.

..4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार : त्या संदर्भातील बैठक माननीय मुख्यमंत्री आणि माननीय सभापती महोदय आयोजित करतात. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबद्दल मी एवढेच सांगू इच्छितो की, काल विधानसभेमध्ये चर्चा होत असताना तेथे दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी मागणी केलेली होती की, माननीय मुख्यमंत्र्यांनी याबद्दलची बैठक तातडीने घ्यावी आणि संसदीय कार्य मंत्र्यांनी आणि मी स्वत: सांगितले होते की, बैठक उद्याच घेण्यात येईल आणि त्या पध्दतीने बैठक घेण्यात आली. त्या बैठकीला विधानसभेचे माननीय विरोधी पक्षनेते उपस्थित होते. विधानसभेमध्ये उत्तर दिलेले असल्यामुळे त्यांच्यासमवेत बैठक बोलावली होती. या सभागृहात आज निवेदन केलेले असल्यामुळे माननीय सभापतींच्या अध्यक्षतेखाली शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याबाबत बैठक होईल.

----

.5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2012-2013 च्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु.....

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, मी राज्य शासनाचे अभिनंदन करतो. कुक्कुटपालन व्यवसाय आज अतिशय धोक्यात आलेला आहे. पोल्ट्री मालकांनी स्वत:चा व्यवसाय बंद करण्यास सुरुवात केलेली आहे. या व्यवसायाचे नियमन किंवा नियंत्रण प्रामुख्याने महाराष्ट्राबाहेरुन म्हणजे हैद्राबाद येथून चालते. हैद्राबादमध्ये दररोज कोट्यवधी अंड्यांचे उत्पादन होते. त्यामुळे तेथील प्रॉडक्शन कॉस्ट आणि महाराष्ट्रामध्ये अंडी उत्पादनासाठी लागणारी प्रॉडक्शन कॉस्ट यात खूप अंतर आहे. कच्चा माल आणि पक्का माल यातील फरक दूर करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये देसाई नावाच्या भगिनींचे या व्यवसायावर चांगले नियंत्रण आहे. माझी महाराष्ट्र शासनाला विनंती आहे की, श्रीमती देसाई या महाराष्ट्रातील सुप्रसिध्द पोल्ट्री व्यावसायिक आहेत, त्यांच्यासमवेत बैठक घेऊन निर्णय घेण्यात आला तर महाराष्ट्रातील कुक्कुटपालन व्यावसायिक निश्चितपणे तग धरु शकतील.

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले ....

सभापती महोदय, बाब क्रमांक 75,पृष्ठ क्रमांक 57 क्रीडा धोरणाच्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. कबड्डी खेळाला एक वेगळेच ऐतिहासिक महत्व आहे. सांदीपनी ऋषींच्या आश्रमात श्री कृष्ण कबड्डी खेळले होते. प्रभू राम चंद्र हे कबड्डीचे वारसदार होते. अशा या कबड्डीला पुन्हा एकदा महत्व प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न राज्य शासनाने केलेला आहे. आंतरराष्ट्रीय कबड्डी खेळणाऱ्या कबड्डीपटूंना 1 कोटी रुपये देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. मी सुध्दा कबड्डीचा खेळाडू आहे. मी विद्यापीठ, स्टेट, राष्ट्रीय पातळीवर कबड्डी खेळलो आहे. त्यावेळेस आम्हाला 17 रुपये डी.ए. मिळत असे. त्या काळात बाहेरच्या राज्याबरोबर आमच्या ज्या स्पर्धा व्हावयाच्या त्यावेळी राज्य शासन 1100, 1200, 1500 रुपयांचे पारितोषिक देत असे व खेळाडूंच्या वाटयाला जास्तीत जास्त 150 रुपये येत होते. परंतु राज्यशासनाने कबड्डीसाठी आता 1 कोटी रुपये देण्याचे घोषित केलेले असल्यामुळे मी राज्य शासनाचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. माझ्या सारखे जे माजी खेळाडू आहेत त्यांचाही शासनाने विचार करावा एवढी आग्रहाची विनंती करुन मी थांबतो.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शेतकऱ्यांच्या प्रश्ना विषयी चर्चा सुरु करण्याबाबत**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आज शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सभागृहात चर्चा केली जाणार आहे. अधिवेशनाला आता दोन तीन दिवस शिल्लक राहिलेले आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नावर या सभागृहात चर्चा होण्याची आवश्यकता आहे. पुरवणी मागण्यावर आता जास्त न बोलता शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या संदर्भातील चर्चेला सुरुवात करावी अशी विनंती आहे.

**उप सभापती** : पुरवणी मागण्यांवर रुलींग पार्टीच्या सदस्यांनी बोलले नाही तरी चालेल. त्यामुळे गट नेत्यांनी याबाबत विचार मांडावेत.

श्री. मोहन टकले: सभापती महोदय, आपली सूचना निश्चितपणे विचारात घेण्यासारखी आहे. आपल्या सूचनेप्रमाणे सत्ताधारी सदस्यांची नावे आम्ही अगोदरच कमी केलेली आहेत. पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी आमच्या बाजूच्या दोघांना किंवा तिघांना परवानगी द्यावी अशी विनंती आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:सन 2012-2013 च्या पुरक मागण्या

( चर्चा पुढे सुरु...

श्री. राणा जगजितसिंह पाटील (विधानसभेने निवडलेले ) :सभापती महोदय, विशेष सहाय्य विभागाच्या बाब क्रमांक 189 व 190 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. श्रावण बाळ योजना तसेच संजय गांधी निराधार अनुदान योजेनेवर मी माझे विचार मांडणार आहे. आपल्याकडे जी काही अनाथालये आहेत, बालसुधारगृहे आहेत त्या ठिकाणी 18 वर्षाच्या आतील मुला-मुलींना ठेवले जाते. परंतु 18 वर्षानंतर त्या मुलांना तेथे राहू दिले जात नाही. त्यामुळे 18 वर्षानंतर काय करावयाचे हा प्रश्न त्यांच्या समोर पडतो. सगळयाच मुलांना लगेच नोकरी लागते असे काही नाही. या मुलांकडे पर्मनंट अड्रेस नसल्यामुळे रेशनकार्ड सुध्दा मिळत नाही. हा विषय खूप महत्वाचा आहे त्यामुळे संबंधित मंत्री महोदयांनी तसेच शासनाने याबाबत विचार करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेच्या संदर्भात बाब क्रमांक 197 वर मी विचार व्यक्त करणार आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून 300 कोटी रुपये देण्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. आपल्या राज्यातील जे टंचाईग्रस्त भाग आहेत, जेथे आता दुष्काळी परिस्थिती आहे, दुष्काळी परिस्थिती ग्रामीण भागातच आहे असे काही नाही. ऊस्मानाबाद शहराबरोबर 4-5 नगरपालिकांमधील मजुरांच्या हाताला काम नाही. परवाच ऊस्मानाबाद जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश काढले आहेत की, आता बांधकामांना परवानगी देऊ नका, बांधकामे बंद करा. हजारो मजूर बांधकामावर अवलंबून आहेत त्यांच्या समोर यामुळे मोठा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. संबंधित मंत्री महोदयांबरोबर तसेच माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर हा विषय मी मांडलेला आहे. ग्रामीण भागात ज्या पध्दतीने रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मजुरांच्या हातांना काम देतो त्याच धर्तीवर ज्या शहरीभागात दुष्काळ आहे, तेथील मजुरांच्या हाताला काम नाही तेथील मजुरांना काम उपलब्ध करुन द्यावे अशी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, कृषी विभागाच्या बाब क्रमांक 57 ते 63,पृष्ठ क्रमांक 47 व 48 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. कृषी खात्याच्या माध्यमातून कोकणातील आंबा बागायतदारांना किडीमुळे आणि वातावरणाच्या बदलामुळे 2011-12 मध्ये झालेल्या नुकसानीपोटी 78.38 कोटी रुपयांची नुकसानभरपाई मंजूर झाली होती. मात्र आतापर्यंत ही मदत मिळालेली नाही. आता आंब्याला मोहर येत असून फवारणीच्या कामाला सुरुवात झालेली आहे. या निधीच्या संदर्भात 12 सप्टेंबर,2012 रोजी कॅबिनेटच्या बैठकीत निर्णय झालेला आहे. त्यामुळे हा निधी आपण कोकणामध्ये कधी पर्यंत पाठविणार आहात आणि त्याची अंमलबजावणी कधी करणार आहात याची माहिती मंत्रीमहोदयांनी आपल्या भाषणात द्यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, मत्स्य विभागाची मागणी क्रमांक डी 4 बाब, क्रमांक 64,65,66, पृष्ठ क्रमांक 48,49 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. यामध्ये मौजे किल्ला, ता. जि.रत्नागिरी येथील सर्व्हे नं 73 हि.नं.0 क्षेत्र 10.94 हेक्टर ही शासकीय जमीन मिरकरवाडा मासेमारी बंदर व्यवस्थापन प्राधिकरण, रत्नागिरी यांचेकडे हस्तांतरीत करणे असा विषय आहे.

सभापती महोदय, रत्नागिरी जिल्हयातील हजारो स्थानिक मच्छीमारांच्या फायद्यासाठी व मूलभूत सुविधांसाठी मिरकरवाडा बंदर बांधकामास केंद्र शासनाच्या शेती व पाटबंधारे मंत्रालय, नवी दिल्ली यांचे आदेश क्र 2-9/71 एफ बाय एच दि. 11.4.1977 मध्ये देण्यात आलेल्या सूचनेरुप रत्नागिरी येथे तटीय किनारी मच्छीमार नौकांच्या उपयोग्रासाठी छोटया बंदराचे बांधकाम करण्यासाठी राज्य शासनाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती व त्यामुळे एकूण 344.25 लाख रुपये करण्यात आले होते.

यानुसार मच्छीमारांना बर्फ कारखाना/शीतगृहे, वर्कशॉप, गोदाम, दुकाने, मासळी मार्केट, मासळी लिाव गृह, पाणी पुरवठा, डिझेल पंप, बोट दुरुस्तीसाठी शेड या सारख्या मूलभूत सुविधांसाठी या जागेची आवश्यकता आहे. हा प्रस्ताव आयुक्तांकडून बंदर खात्याकडे आलेला आहे. त्यामुळे ही जागा मच्छीमारांना त्वरित दिली तर रत्नागिरी जिल्हयातील मच्छीमारांना न्याय मिळू शकेल.

...5...

श्री.रामदास कदम....

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 245 ते 251,पष्ठ क्रंमांक 213,214,215 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. ठाणे जिल्हयातील 66 प्राथमिक आरोग्य केंद्रातील साहित्य खरेदीमध्ये कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. मागच्या आठवडयात आरोग्य संचालनालयाच्या वतीने चौकशी सुध्दा झालेली आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आदिवासी भाग आहे. 66 प्राथमिक आरोग्य केंद्राच्या साहित्य खरेदीमध्ये हा भ्रष्टाचार झालेला आहे. यामध्ये शाहपूर, पालघर, जव्हार, मोखाडा, डहाणू या दुर्गम भागातील आरोग्य केंद्राच्या साहित्य खरेदीत झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात आली नसेल तर आपण ती त्वरित करावी व आदिवासींना न्याय द्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, महिला व बालकल्याण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 255 302, 303 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ 05:40

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, एक गंभीर बाब मी शासनाच्या नजरेस आणून देणार आहे. केंद्राच्या बालविकास योजनेत महाराष्ट्राच्या प्रायव्हेट कॉन्ट्रक्टरांनी 1000 कोटी रूपयांचा घोटाळा केल्याचे आढळून येते. याची सीबीआयने चौकशी केली असून श्री.राजन शंकर जाधव, अलाईड प्रोटिन्स फूडस् प्रा.लि.या कंपनीचे डायरेक्टर तसेच श्री.उल्हास पारसमल पगारिया, पारस फूडस चे पार्टनर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून चार्जशिट दाखल केले आहे. सदर खरेदी ही आदिवासींसाठी होते. राज्य शासनाला या प्रकरणाची कल्पना राष्ट्रीय आयोगाने ऑगस्ट 2012 ला दिली आहे. एवढेच नव्हे तर लिखित स्वरूपात देखील तसे कळविले आहे. या दोन व्यक्तिंचे महाराष्ट्रातील दोन मोठ्या पुढाऱ्यांशी संबंध आहेत. मी नोटीस दिलेली नसल्यामुळे कुणाचेही नाव घेऊ इच्छित नाही. या गैरव्यवहाराची सीबीआयकडून चौकशी सुरू आहे. तसेच माननीय राज्यपाल यांनी जुलै 2012 रोजी चौकशी सुरू केली असताना महिला व बालविकास विभागाला याबद्दल काहीच माहिती नाही हे धक्कादायक आहे. माननीय राज्यपालांनी तात्काळ चौकशी व्हावी असा देखील शेरा मारला आहे. खाजगी बड्या ठेकेदारांचे आर्थिक हित जोपासण्यासाठी राज्य सरकारचे मागचे दरवाजे खुले आहेत असा आक्षेप आयोगाने नोंदविला आहे.

आहार पुरवठादारांनी सरकारी तिजोरी लुटली आहे, त्यामुळे एसआयटी मार्फत याची चौकशी केली पाहिजे अशी शिफारस देखील केली आहे. डॉ.एन.सी.सक्सेना व माजी सनदी अधिकारी श्री.हर्ष मंडेर हे आयोगाचे प्रमुख आहेत. आयोगाचे प्रधान सल्लागार बिराज पटनाईक यांनी 31 ऑक्टोबरला सर्वोच्च न्यायालयात 27 पानी चौकशी अहवाल सादर केला आहे. आदिवासींना आपण मोठ्या प्रमाणावर खाद्य देतो त्यांच्या खरेदी मध्ये एक हजार कोटीचा घोटाळा झाल्याचे माननीय राज्यपालांनी कळविले असताना, केंद्राने कळविले असताना आपण त्याच कंपनीला पुन्हा काम दिले आहे. कितीही भ्रष्टाचार केला तरी चालेल ते आमच्या जवळचे आहेत, आदिवासी मेला तरी चालेल असे आपणास वाटते. तेव्हा यासंबंधी स्पष्ट भूमिका आपल्या उत्तरामध्ये मिळेल अशी मी आशा बाळगतो.

यानंतर मी पर्यटन व सांस्कृतिक विभागाच्या बाब क्रमांक 308 व 309 वर बोलणार आहे. मी एक गोष्ट पर्यटन विभागाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिरोडा येथे समुद्रकिनारी असलेली 10 एकर जागा 1998 साली 1 रूपया नाममात्र भाड्यांनी ताज हॉटेलला .....

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

दिली आहे. गेली 14 वर्षे ताज हॉटेलच्या मालकाने तेथे बांधकाम केलेले नाही. ही जमीन त्यांना 27 वर्षासाठी लिजवर देण्यात आली आहे. नियम असा सांगतो की, तीन वर्षात तेथे बांधकाम केले नसेल तर ती जागा पुन्हा शासनाकडे हस्तांतरित केली पाहिजे. ही शासनाची जागा आहे. ती हॉटेल ताजला 1 रूपया नाममात्र भाड्याने दिली असताना 14 वर्षात त्यांनी हॉटेल बांधले नाही. त्यामुळे ही जागा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तरूणांना व्यवसाय करण्यासाठी शासन देणार आहे काय ? असा माझा या निमित्ताने प्रश्न आहे.

सभापती महोदय, यानंतर मी महिला व बाल विकास विभागाच्या बाब क्रमांक 302 व 306 वर बोलणार आहे. राज्यात अंगणवाडीतील 43 लाख बालके आणि गरोदर, स्तनदा मातांसाठी पूरक पोषण आहार देण्यासाठी वार्षिक सुमारे 550 कोटी रूपयांच्या गैरव्यवहाराबाबत सर्व पुरावे आणि अहवालही हाती असताना राज्य शासनाकडून संबंधितांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न होत असल्याचे स्पष्ट होते. त्यासंबंधी राज्य शासनाकडून कुठलीही कारवाई होती नाही. राज्यातील अंगणवाड्यांमधील सहा महिने ते तीन वर्षांची बालके, स्तनदा माता आणि ग्रेड तीन व चारच्या कुपोषित बालकांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सकस आहार मिळत असताना राजकारणी ठेकेदाराच्या पणाला लागले आहेत. राजकारणी, अधिकारी आणि ठेकेदारांनी संगनमत करून बनावट महिला मंडळ स्थापन करून आहार पुरवठ्याचे ठेके तर घेतलेच आहे, शिवाय निकृष्ट अन्नाचा पुरवठा देखील केला आहे. खोटी विक्रीकर प्रमाणपत्रे दिली असे चौकशी अहवालात उघड झाले आहे. धुळे, लातूर आणि नांदेडमधील पुरवठा माफियांनी सरकारी तिजोरी लुटल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. याबाबत चौकशी करून नेमके काय झाले हे आपल्या उत्तरातून समजले तर अधिक बरे होईल.

यानंतर मी आरोग्य खात्याच्या बाब क्रमांक 213 व 215 वर बोलणार आहे. श्री.मधुसूदन अग्रवाल यांच्या एका कपंनीकडून सन 2004 पासून 80 टक्के औषध खरेदी करण्यात आली आहे. अजंता फार्मा लि.असे या कंपनीचे नाव आहे. या कंपनीच्या लॅबचे जे रिपोर्ट आले आहेत ते चुकीचे आले आहेत. बोगस आहेत. ते मी वाचून दाखवत नाही. ते आपण माननीय मंत्री महोदयांना द्यावेत. या कंपनीच्या मालकावर गुन्हा दाखल करण्या ऐवजी पुन्हा पुन्हा त्यांच्याकडूनच 80 टक्के औषध

..3



BGO/ 05:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

खरेदी करण्यात आली आहे. मातृत्व अनुदानातून औषधी खरेदी, आयुर्वेदिक योजना अंतर्गत औषध खरेदी, आदिवासी निधीमधून औषध खरेदी, महिला व बालकल्याण विभागाकडून औषध खरेदी, नरेगा योजना अंतर्गत औषध खरेदी, राज्य शासनाच्या निधीमधून औषध खरेदी या सर्वांमधून 80 टक्के खरेदी फक्त अजंता फार्मामधून करण्यात आली आहे. याचा पार्टनर कोण आहे ? तेव्हा या प्रकरणाची आपण चौकशी करावी अशी मागणी मी येथे करीत आहे. त्यांनी चुकीची औषधे दिली आहेत असे लॅबचे रिपोर्ट आहेत त्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला तात्काळ अटक करावी अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे. मी ही सगळी कागदपत्रे आपणाकडे सादर करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर मी सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 193 ते 195 वर बोलणार आहे. दलितांसाठी हजारो ब्लँकेटस् पडून आहेत. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना घरे बांधून देण्यासाठी अर्थ सहाय्य देताना प्रत्येक कुटुंबाला 2 ब्लँकेटस् व 2 चादरी देण्याची योजना सामाजिक न्याय विभागाने हाती घेतली आहे. या दोन चादरीची व ब्लँकटस्ची बाहेर किंमत किती आहे व किती किंमतीने खरेदी करण्यात आली असा माझा पहिला प्रश्न आहे. 85 टक्के ब्लँकेटस् आणि चादरी वाटपाशिवाय पडून आहेत. पण त्याचे वाटप आदिवासींना, मागासवर्गीयांना झालेले नाही. 45 कोटी रूपयांची खरेदी करण्याचा आदेश सामाजिक न्याय विभागाने मार्चमध्ये काढला होता. सोलापूर जिल्ह्यातील अहिल्यादेवी खादी ग्रामोद्योग घोंगडी उत्पादक सहकारी संस्थेला हे काम देण्यात आले होते. प्रत्यक्षात हे काम ही संस्था करीत नाही. या संस्थेने हे सगळे बाहेरून खरेदी केले आहे. नियमाने असे करता येत नाही. म्हणून या सगळ्या बाबींची चौकशी करून कारवाई करावी अशी मी येथे मागणी करीत आहे. हा मागासवर्गीय, आदिवासींचा पैसा आहे. त्यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देखील आदिवासी जैसे थे च आहे. विकास हा फक्त धनदांडग्यांचा होत आहे. आदिवासींचा पैसा मात्र भ्रष्टाचारामध्ये खाल्ला जात आहे. राजकारणी, अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केला जात आहे त्याची चौकशी व्हावी अशी मी मागणी करतो आणि येथेच थांबतो.

.....

..4

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत**

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. पुण्यामध्ये सांस्कृतिक ट्रस्टच्या वतीने बांधकाम सुरू होते. आयुर्वेदिक महाविद्यालयाचे बांधकाम कोसळून ढिगाऱ्या खाली अनेक जण अडकले आहेत. त्यापैकी चार जणांचे शव बाहेर काढण्यात आले आहे. अजून दहा ते बारा जण अडकल्याची भीती आहे. अधिवेशन सुरू असल्यामुळे माझी सन्माननीय उप सभापतींना विनंती आहे की, या घटनेमागे असणारी कारणे शोधून काढावीत व यात अडकलेल्या लोकांना लवकरात लवकर बाहेर काढण्यासाठी उपाययोजना करावी यासाठी मी सभागृहाचे लक्ष वेधत आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, यासंबंधी निवेदन करण्यात येईल.

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2012 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

(चर्चा पुढे सुरू....

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी क्रीडा विभागाच्या बाब क्रमांक 78 वर बोलणार आहे.

येथे दोन सन्माननीय सदस्यांनी कबड्डीचा उल्लेख केला आहे. कबड्डी हा खेळ आता ऑलिंपिकमध्ये गेला आहे. ऑलिंपिकमध्ये देखील आपल्या टीमने कबड्डीमध्ये विजय मिळविला आहे. आपण या खेळाला प्रोत्साहन देत आहोत. पण आपल्याच राज्यातील खेळांडूंबाबत थोडासा भेदभाव केला जात आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

हे कबड्डी खेळाडू महाराष्ट्राच्या इतर भागात खेळण्यासाठी जातात त्यावेळी त्यांना एस.टी.महामंडळाकडून मोफत पास दिले जातात. यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील खेळाडू आहेत, खानदेशातील खेळाडू आहेत, मुंबई विभागातील खेळाडू आहेत. परंतु विदर्भातील कबड्डी खेळाडूंना असे मोफत पास दिले जात नाहीत. मागील दोन-तीन अधिवेशनामध्ये मी हा विषय मांडला होता. त्यावेळी क्रीडा मंत्र्यांनी विदर्भातील कबड्डी खेळाडूंना मोफत पासेस देण्यात येतील असे सांगितले होते आणि त्यांनी मला लेखी पत्र सुध्दा पाठविले होते. परंतु तशा प्रकारचे आदेश न काढल्यामुळे विदर्भातील कबड्डी खेळाडू मोफत पासेस पासून आजही वंचित राहिले आहेत. विदर्भातील कबड्डी खेळाडूंवर सातत्याने अन्याय होत आहे. या विदर्भामध्ये अधिवेशन होत आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी आजच्या आज विदर्भातील कबड्डी खेळाडूंना एस.टी.चे पास मोफत देण्यात येतील अशी घोषणा करावी. फक्त घोषणा करुन उपयोगाचे नाही तर त्याची अंमलबजावणी तातडीने करण्याच्या सूचना संबंधितांना द्याव्यात अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 166, बाब क्रमांक 186, सामाजिक न्याय विभाग, सभापती महोदय, मागील दोन वर्षापासून ओबीसी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि फीचे पैसे मिळालेले नाहीत. जवळपास 1800 कोटी रुपयांचे देणे आहे. या संदर्भात मी मध्यंतरी माननीय मंत्री महोदयांना भेटलो होतो. शासनाकडून ओबासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि फी मिळत नसल्यामुळे संस्थाचालक त्यांचे हाल करीत आहेत. संस्थाचालकांचे म्हणणे आहे की, त्यांनी सुरुवातीला फी भरावी आणि शासनाकडून पैसे आल्यानंतर ते त्यांना देण्यात येतील. ओबीसी विद्यार्थी कॉलेजमध्ये डोनेशन भ्रुन ॲडमिशन घेऊ शकत नाही. त्यामुळे त्यांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे. शिक्षण नसल्यामुळे त्यांना रोजगार मिळत नाही आणि रोजगार मिळत नसल्यामुळे ते नक्षलवादाकडे वळत आहेत. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी या बाबतीत लक्ष घालून ओबीसी विद्यार्थ्यांना मागील दोन वर्षापासून शिष्यवृत्ती मिळालेली नाही ती मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत. अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लगेच मिळते. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी या बाबतीत लक्ष घालावे अशी विनंती आहे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 154, बाब क्रमांक 173, ग्राम विकास विभाग, यामध्ये पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत मार्गाच्या परिरक्षणासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत घेतलेल्या रस्त्यांची कामे चांगल्या प्रकारे झाली पाहिजेत. पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत कामासाठी काढण्यात येणारी निविदा ही लोयेस्ट किंमतीची असते. या योजनेंतर्गत घेण्यात येणारी रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची केली जातात. अशा निकृष्ट दर्जाच्या कामांच्या चौकशीची मागणी करुनही त्याची चौकशी केली जात नाही. माझ्या मतदारसंघातील खामगाव ते शेलोडी या रस्त्याचे काम पंतप्रधान ग्रामसडक योजने अंतर्गत करण्यात आले. या रस्त्याच्या दुसऱ्या टप्प्यातील काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. त्याबाबत ग्रामस्थांनी माझ्याकडे तक्रारी केल्या. माझ्याकडे तक्रारी आल्यानंतर मी संबंधित अधीक्षक अभियंत्यांकडे त्या कामाची तक्रार करुन चौकशी करण्यास सांगितले. परंतु अद्यापही त्या कामाची चौकशी करण्यास कोण्ी तयार नाही. तेव्हा माझी मागणी आहे की, खामगाव ते शेलोडी रस्त्याच्या कामाची चौकशी करावी.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 214, बाब क्रमांक 248, सार्वजनिक आरोग्य विभाग, दुर्बल घटकांसाठी जीवनदायी योजना अत्यंत चांगली आहे.. या ठिकाणी संबंधित विभागाचे मंत्री उपस्थित दिसत नाहीत. पुरवणी मागण्यांवर चर्चा होत असताना संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित नसतील तर आम्ही पुरवणी मागण्या कोणासमोर मांडायच्या ? पुरवणी मागण्या मंजूर करुन घेण्यास सरकार गंभीर दिसत नाही. माझी आपणास विनंती आहे की, आपण सभागृहाचे कामकाज स्थगित करावे.

**उप सभापती** : सभागृहात ज्या विभागाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा आहे त्या विभागाच्या मंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित राहणे हे त्यांचे कर्तव्य आहे. मंत्री महोदय सभागृहात उपस्थित राहत नसल्यामुळे आम्हाला दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांकडून ऐकून घ्यावे लागते आणि हे शोभादायक नाही. मी सभागृहाची बैठक सायंकाळी 6.05 पर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5.56 ते 6.05 पर्यंत स्थगित झाली. )

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर...**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती माननीय श्री. जयवंतराव जाधव)**

**पृ.शी./मु.शी.**: हरकतीच्या मुद्यासंबंधी

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी आदरणीय उप सभापतींबरोबर मी चर्चा केली होती. माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत मला सभागृहामध्ये हरकतीचा मुद्दा मांडावयाचा होता. माननीय उपसभापतींनी माननीय मुख्यमंत्र्यांना बोलावून घेतो असे सांगितले. आता 6.00 वाजून गेले असून विधानसभेचे कामकाज सुध्दा तहकूब झाले आहे. मी दोन मिनिटांचा हरकतीचा मुद्दा मांडला तर त्यावर फक्त तेच उत्तर देऊ शकतात. तेव्हा आपण कृपया माननीय मुख्यमंत्र्यांना निमंत्रित केले तर मी आपले फार आभार मानीन.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा

(चर्चा पुढे चालू....)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बाब क्र. 248 व पृष्ठ क्रमांक 214 मध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील लोकांना वैद्यकीय मदत मिळावी या करिता राज्य सरकारने दोन वर्षापूर्वी राजीव गांधी जीवनदायी योजना जाहीर केली. योजनेच्या पहिल्या टप्प्यामध्ये महाराष्ट्रातील 8 जिल्ह्यांमध्ये ही योजना जाहीर करण्यात आली, त्यामध्ये नागपूरचा समावेश करण्यात आला नाही. या सभागृहामध्ये मांडण्यात आलेल्या मागणीच्या माध्यमातून गोरगरीब जनतेला योजनेचा फायदा होत आहे इतकी ही चांगली योजना आहे. विदर्भामध्ये कॅन्सरची दोन हॉस्पिटल्स आहेत. त्यापैकी नागपूरला असलेले संत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पिटल आणि दुसरे अकोला येथील संत तुकाराम हॉस्पिटल आणि मेडिकल रिसर्च सेंटर आहे. या दोन्ही कॅन्सर सेंटरचा विदर्भातील लोकांना खूप आधार आहे. ही दोन सेंटर विदर्भामध्ये नसती तर कॅन्सरच्या रुग्णांना मुंबईला जावे लागले असते. ही दोन सेंटर सुरु झाल्यामुळे विदर्भातील बहुतेक कॅन्सर पेशंट हे या हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ जातात. अकोल्याच्या संत तुकाराम हॉस्पिटलमध्ये जवळपास 5 ते 6 जिल्ह्यातील लोक जातात. गरीब आणि बी.पी.एल. कार्ड धारक कॅन्सर रुग्णांना ही योजना लागू आहे. परंतु या हॉस्पिटलमध्ये ही योजना लागू असतांना या हॉस्पिटलमध्ये कर्क रुग्णांवर केलेल्या औषधोपचाराची रक्कम शासनाकडून येणे बाकी आहे. वास्तविक पहाता गरीब रुग्णांवर केलेल्या उपचाराची थकीत बाकी शासनाकडे असता कामा नये.

एका बाजूला आपल्या राज्यावर 2 लाख 70 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे आणि दुसऱ्या बाजूला राज्यातील गरीब रुग्णांना आरोग्याची सुविधा देत असतांना त्या हॉस्पिटलची थकबाकी राज्य सरकारकडे राहता कामा नये. दि.30.9.2012 पर्यंत संत तुकाराम हॉस्पिटलची थकबाकी 1 कोटी 50 लाखापर्यंत पोहोचली आहे. संत तुकाराम हॉस्पिटल हे ट्रस्टचे हॉस्पिटल आहे. या हॉस्पिटलला जर वेळीच पैसे मिळाले नाही तर ते चालू शकणार नाही. या हॉस्पिटलमधील डॉक्टर व कर्मचारी यांचे पगार, कोबाल्ट युनिट व इतर मशिनरींचे मेंटेनन्स तसेच हॉस्पिटलची देखरेख व मेडिकल स्टोअरमधील औषधांची देयके इत्यादी संपूर्ण खर्च त्या हॉस्पिटलला करावा लागत आहे. हा खर्च भागविण्याकरिता बँकेकडून कर्ज घेतले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

जात आहे. अशाप्रकारे कर्ज घेऊन हे हॉस्पिटल चालविण्याचा प्रयत्न केला जात आहे. माझी अशी मागणी आहे की, विदर्भ मुळातच मागासलेला आहे, अशा विदर्भामध्ये कॅन्सरची दोन सेंटर आहेत. त्यापैकी एका सेंटरची दीड कोटी रुपयांची थकबाकी शासनाकडे आहे. या ठिकाणी आपण पुरवणी मागण्यांमध्ये जर जास्तीची रक्कम मागितली असती तर आम्ही तिला मान्यता दिली असती. अशाप्रकारच्या सेवाभावी संस्था काम करतात त्यांना आपण वेळेवर पैसे दिले नाही तर त्या बंद पडण्याच्या मार्गावर जातील. या बाबत हॉस्पिटलच्या व्यवस्थापनाने मंत्रीमहोदयांकडे पत्र व्यवहार केला असून आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये या हॉस्पिटलची थकबाकीची रक्कम किती दिवसात देणार हे जाहीर करावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा सांगून माझे भाषण संपवितो. सहकार व पणन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 240 व बाब क्रमांक 245 मध्ये कापूस प्रापण योजनेच्या कार्यान्वयनासाठी सीमांतिक रक्कम म्हणून दिडशे कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. सभापती महोदय, या राज्यामध्ये 1972 सालापासून एकाधिकार कापूस खरेदी योजना सुरु करण्यात आली. कापसापासून कापडापर्यंत जाण्याचे या योजनेचे स्वप्न होते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . .. 06:10

श्री.पांडुरंग फुंडकर . . ..

पण ते स्वप्न कपड्यापर्यंत गेलेच नाही तर फक्त जिनिंग-प्रेसिंग पर्यंत गेले आणि हळूहळू कापूस एकाधिकार योजना बंद होण्याच्या मार्गावर आली आहे. कापूस एकाधिकार योजनेच्या माध्यमातून विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशातील कापूस उत्पादक शेतकऱ्याला फार मोठे संरक्षण होते.परंतु युतीचे शासन सत्तेवरुन गेल्यानंतर हळूहळू ही योजना बंद पडण्याच्या मार्गावर आहे. खरे म्हणजे या योजनेची सुरुवात झाली तर कापूस उत्पादक शेतकऱ्याला संरक्षण मिळेल. याबाबतीत 150 कोटी रुपयांची मागणी केली. पण ती कशासाठी केली हे समजत नाही. माननीय कृषी आणि पणन मंत्री महोदयांनी मागील दोन महिन्यापूर्वी दिवाळीच्या अगोदर कापूस खरेदी केंद्रे सुरु होतील अशी घोषणा केली होती. पण मराठवाडा आणि विदर्भामध्ये आजपर्यंत एकही कापूस केंद्र सुरु झालेले नाही. कारण त्याबाबतीत यंत्रणाच नाही. त्यामुळे याठिकाणी 150 कोटी रुपयांची मागणी कशासाठी करण्यात येत आहे हे मला समजलेले नाही. जर कापूस खरेदी केंद्र सुरु झाले नाही, फेडरेशन सुरु नाही तसेच जर नाफेडने कापूस खरेदी सुरुच केली नसेल तर 150 कोटी रुपयांची मागणी कशासाठी करण्यात येत आहे हा प्रश्न आहे.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : कर्मचारी नाहीत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, त्यांच्याकडे स्टाफच नाही मग 150 कोटी रुपयांची मागणी कशासाठी करण्यात येत आहे. जर आपण सदनासमोर 150 कोटी रुपयांची मागणी करणार असाल तर तो पैसा तसाच पडून राहील आणि मग मार्च महिन्यामध्ये तो पैसा दुसरीकडे वळविला जाईल असे करावयाचे असेल तर कापूस उत्पादक शेतकऱ्याच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार आहे. अजूनही कापूस खरेदी केंद्रे सुरु केली नसताना 150 कोटी रुपयांची मागणी कशा साठी करण्यात येत आहे याबाबत सभागृहामध्ये खुलासा झाला पाहिजे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशमध्ये ताबडतोब कापूस खरेदी केंद्रे सुरु केली पाहिजेत आणि तशा प्रकारचे आश्वासन आम्हाला सभागृहाच्या माध्यमातून मिळाले पाहिजे एवढेच मला या ठिकाणी सांगावयाचे आहे.

----

2 क्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पान क्र.166, बाब क्र.185,186 याबाबत मला बोलावयाचे आहे. इतर मागासवर्गासाठी शिक्षण फी आणि परीक्षा फी प्रदान करण्यासाठी अतिरिक्त तरतूद करणे या मागणी बाबत सांगावयाचे तर इतर मागासवर्गीयां मधील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिक्षण फी, परीक्षा फी याची प्रतिपूर्ती करण्यासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्याचे ठरविण्यात आले. मात्र मागील दोन वर्षांपासून फी माफी प्रलंबित आहे. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे. तेव्हा याबाबतीत शासनाचे नेमके धोरण काय आहे हे स्पष्ट करावयास पाहिजे. एकीकडे इतर मागासवर्गीयांसाठी सवलती जाहीर करावयाच्या आणि दुसरीकडे या सवलती देण्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करावयाची नाही. मला असे वाटते की, याबाबतीत त्या लोकांची कुचेष्टा होत आहे. त्यांच्यावर एक प्रकारे अन्याय होत आहे. या लोकांचा जो हक्क आहे त्यानुसार त्यांना निधी मिळाला पाहिजे. याबाबतीत माननीय सामाजिक न्याय मंत्री महोदयांनी 1300 कोटी रुपये प्रस्तावित केले होते. मात्र फक्त 200 कोटी रुपयांची तरतूद केलेली असून 1100 कोटी रुपये कमी पडत आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर (खाली बसून) : यासाठी 200 कोटी रुपयांची तरतूद केलेली नाही तर फक्त 97 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

श्री.दिप्ती चवधरी : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर बाब असून याबाबत तातडीने दखल घेण्यात यावी. तसेच माझी वित्त विभागाला विनंती आहे की, ज्या सवलती जाहीर केल्या जातात, त्याप्रमाणे तरतूद करावयास पाहिजे जेणेकरुन ओबीसी समाजावर जो अन्याय होत आहे तो दूर होण्यासाठी मदत होईल. याच विभागातील पान क्र.165, बाब क्र.182 बाबत सांगावयाचे तर अनुसूचित जातीतील मुले आणि मुले यांच्यासाठी शासकीय वसतीगृहाकरता अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. याच धर्तीवर इतर मागासवर्गीय मुला-मुलींसाठी सुध्दा शासकीय वसतीगृहाची आवश्यकता आहे. इतर मागासवर्गीय समाजामध्ये 18 पगड जाती येतात, जवळपास 300 ते 400 समाज यामध्ये समाविष्ट झालेले आहेत. स्त्रिया, गरीब मुले यांच्यासाठी सुध्दा वसतीगृहांची आवश्यकता आहे.तसेच या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरता वसतीगृहाची सोय करण्याबाबत दखल घेतलेली नाही आणि त्यांच्यासाठी वसतीगृहे बांधण्यासाठी तरतूद केलेली नाही. त्यामुळे या दुर्लक्षित समाजासाठी सुध्दा वसतीगृहे असली पाहिजेत आणि त्यासाठी देखील तरतूद करण्यात यावी अशी माझी सूचना आहे.





श्रीमती दिप्ती चवधरी . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, बाब क्र.312, पान क्र.264 सांस्कृतिक कार्य विभागामार्फत राज्य सांस्कृतिक निधीसाठी तरतूद करण्यात आली आहे. हा अतिशय महत्वाचा विभाग आहे. आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव असेल किंवा भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना असेल, साहित्य कला क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना आर्थिक सहाय्य प्रोत्साहन योजना असेल अशा अनेक योजना या विभागामार्फत राबविल्या जातात. मला येथे नमूद करावेसे वाटते की, मॉरिशससारख्या देशामध्ये महाराष्ट्र भवनाची निर्मिती होत असून त्यासाठी महाराष्ट्र शासनाने काही आर्थिक मदत करावी अशी मॉरिशसमधील मराठी बांधवांची इच्छा आहे. दोन वर्षा पूर्वी विधानसभेचे माननीय अध्यक्ष तेथील मराठी मंडळाच्या कार्यक्रमासाठी उपस्थित राहिले असताना 2 कोटी रुपये देण्याबाबत जाहीर केले होते. कै.यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दीच्या निमित्ताने मॉरिशसमधील सर्व मंडळी मुंबईमधील कार्यक्रमासाठी उपस्थित होती. मात्र हे पैसे कोणत्या विभागामार्फत द्यावेत हा आपल्यासमोर प्रश्न असल्यामुळे सांस्कृतिक विभागाने पैसे देण्या साठी असमर्थता दर्शविली आहे. मॉरिशसमधील महाराष्ट्र भवनासाठी माननीय अध्यक्षांनी दोन कोटी रुपये जाहीर केलेले आहेत त्याची आगामी बजेटमध्ये तरतूद करण्यात यावी आणि यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने मराठी बांधवांना न्याय द्यावा एवढेच मी याठिकाणी सांगू इच्छिते. धन्यवाद.

-----

. . . .2 क्यु-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, बाब क्र.245, पान क्र.213 सार्वजनिक आरोग्य यामध्ये "सहाय्यक वेतनेतर अनुदानासाठी महात्मा गांधी स्मारक, परळ येथे निधी देण्यासंबंधातील ही बाब आहे.

सभापती महोदय, आपल्याकडे डायरेक्टर ऑफ हेल्थ सर्व्हीसेस आहे आणि त्यामध्ये अनेक डायरेक्टर ॲडीशनल चार्जवर काम करीत आहेत. सध्या डॉ.अर्चना पाटील या डायरेक्टर आहेत, त्या देखील प्रभारी म्हणून काम करीत आहेत. त्यापूर्वीचे डायरेक्टर श्री.शिंदे देखील प्रभारी होते, त्यापूर्वीचे डायरेक्टर देखील प्रभारी होते. आपल्या राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाचा कारभार प्रभारी लोकांवर चालतो काय याचे उत्तर मिळणे आवश्यक आहे. तसेच बाकीच्या ठिकाणी जे ॲडिशनल डायरेक्टर म्हणून नेमण्यात आले आहेत ते देखील प्रभारी आहेत. एकूण ॲडिशनल डायरेक्टरची नऊ पदे प्रभारी तत्वावर आहेत. तसेच ग्यानबाची मेख खरी इकडे आहे. श्रीमती अर्चना पाटील, डायरेक्टर, हेल्थ सर्व्हीसेस आहेत आणि त्यांचे पती हे पर्चेस विभागामध्ये आहेत. एकाच विभागामध्ये, एकाच ठिकाणी पती-पत्नी काम करु शकतात की नाही याचे मला माननीय मंत्री महोदयांनी आकलन करुन द्यावे. सध्या त्यांची बदली एन.आर.एच.एम. मध्ये करण्यात आली आहे असे मी ऐकले आहे. त्यामुळे सभागृहाला याबाबतीत माहिती द्यावी.

सभापती महोदय, पान क्र.214, बाब क्र.248 जीवनदायी योजना. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जीवनदायी योजनेबाबत सांगितले. आपण जीवनदायी योजनेबाबत मोठमोठया जाहिराती पहातो. त्यामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांचा, माननीय आरोग्य मंत्र्यांचा, माननीय आरोग्य राज्यमंत्र्यांचा फोटो असतो. पण खरोखर जीवनदायी योजना लोकांपर्यंत पोहोचली आहे का याचे उत्तम उदाहरण नागपूर मध्ये पहावयास मिळते. मेयो हॉस्पिटल मध्ये जीवनदायी योजना सुरु आहे. काही महिन्यापूर्वी माननीय मंत्री महोदय, आपण किती पेशंट पाहिले तर दहा पेशंट पाहिले. पण हे दहा पेशंट कोणते होते? हे दहा पेशंट गडचिरोली आणि अमरावतीमधील होते. कारण मेयो रुग्णालयाला दोन जिल्हे दिलेले आहेत. नागपूर जिल्ह्याचा अंतर्भाव या जीवनदायी योजनेमध्ये नाही. ठाणे जिल्ह्याचा अंतर्भाव या योजनेमध्ये नाही. या महत्वाच्या गोष्टी आहेत कारण ठाणे जिल्हा आदिवासी आहे. या आदिवासी लोकांची जीवनदायी योजनेअंतर्गत ऑपरेशन व्हावी असे शासनाला वाटत नाही काय? नागपूरच्या बाजूला विदर्भामध्ये अनेक आदिवासी क्षेत्रे आहेत, यवतमाळ आहे तेथील लोकांचे काय ? जर शासनाला जीवनदायी योजना प्रायोगिक तत्वावर ....

2 क्यु-5

राबवावयाची होती तर मग या जिल्ह्यांचा अंतर्भाव का केला नाही? महत्वाचे म्हणजे गडचिरोली येथील आदिवासी माणूस मेयोमध्ये येणे शक्य आहे काय? अमरावती येथून 200-250 कि.मी.चा प्रवास करुन, पैसे खर्च करुन तो जीवनदायी योजनेचा लाभ घेण्यासाठी कशासाठी येईल हा मुद्दा आहे.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे.

सभापती महोदय, यानंतर मला महिला व बालविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 255 वरील बाब क्रमांक 303 बाबत बोलावयाचे आहे. किशोरी शक्ती योजना, पौगंडावस्थेतील मुलींचे सबलीकरण या संदर्भात ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. या राज्यात सबलीकरणासाठी देण्यात येणारे टेक होम रेशन म्हणजे टीएचआर सर्वत्र जाते का हा महत्वाचा प्रश्न आहे. सध्या टीएचआरची काय परिस्थिती आहे ? आपण या टीएचआर विषयी अनेक गोष्टी ऐकतो. त्याबाबत खरी परिस्थिती काय आहे ? गेल्या अधिवेशनामध्ये ज्यावेळी कुपोषणावर चर्चा झाली होती त्यावेळी नोडल एजन्सी म्हणून काम करीत असलेल्या महिला व बालविकास विभागाच्या माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले होते की, कुपोषणाची सर्व जबाबदारी पालक सचिवांवर असेल, ते मला रिपोर्ट देतील. त्या पालक सचिव पदांची निर्मिती झाली आहे का आणि त्यांनी रिपोर्ट दिला का ? कुपोषणावर श्वेतपत्रिका काढण्यात येईल असे सांगितले होते. त्या संदर्भात दोन तीन बैठका झाल्या. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आणि आम्ही त्या बैठकीला गेलो होतो. त्याबाबत पुढे काहीही झाले नाही. म्हणजे घोषणा कराव्यात आणि त्या फक्त हवेत विरुन जाव्यात अशी परिस्थिती आहे. नागपूरचे अधिवेशन संपले की कुपोषण संपले हे समीकरण झालेले आहे. त्यामुळे या संदर्भात उत्तर मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, यानंतर मी कामगार विभागाच्या पृष्ठ क्रमांक 145 वरील बाब क्रमांक 154 बाबत बोलणार आहे. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचा प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी यामध्ये पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. आमच्या पश्चिम उपनगरांमध्ये अनेक सिक्युरिटी एजन्सीज काम करतात. मुंबईच्या अनेक भागांमध्ये सिक्युरिटी एजन्सीज काम करतात. नागपूरमध्ये करतात, पुण्यामध्ये करतात. याचा मापदंड काय आहे, सुरक्षा एजन्सी कोणी चालवावी, सुरक्षा एजन्सीचे रजिस्ट्रेशन कसे होते, त्यांना परवानगी कशी मिळते ? जो सुरक्षा कामगार आपल्या इमारतीचे रात्री रक्षण करीत असतो तो सकाळी दुसरीकडे जाऊन काम करतो. आपण सर्वजण रात्रीच्या वेळी आपल्या फ्लॅटमध्ये किंवा आपल्या घरामध्ये निर्धास्तपणे झोपलेलो असतो आणि खाली असलेला सुरक्षा रक्षक सुध्दा झोपलेला असतो. या सुरक्षा एजन्सीवर कोणाचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. दीपक सावंत ....

नियंत्रण आहे ? मी आपल्याला नाव घेऊन सांगतो. मुंबईच्या पश्चिम उपनगरामध्ये गणेश सिक्युरिटी फोर्स नावाची फार मोठी एजन्सी आहे. या एजन्सीचे बरेच कॉन्ट्रॅक्ट्स आहेत. सर्व ठिकाणी त्यांचे कामगार आहेत ते दोन शिफ्टमध्ये काम करतात आणि सर्व नियम धाब्यावर बसवून काम करतात. त्याची चौकशी व्हावी.

सभापती महोदय, शिक्षण खात्याच्या संदर्भात एकच प्रश्न मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. मी शिक्षण खात्याच्या पृष्ठ क्रमांक 57 वरील बाब क्रमांक 75 बाबत मी सांगणार आहे. यामध्ये अनुदानित अशासकीय शिक्षण महाविद्यालयांना वेतन थकबाकी प्रदान करण्यासाठी पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. शासनाने घोषणा केली की, 25 टक्के गरीब विद्यार्थ्यांना उत्तम शाळांमध्ये प्रवेश मिळणार. शासनाने एका उत्तरामध्ये असे सांगितले की, साधारणपणे 26 हजार विद्यार्थ्यांना प्रवेश दिला गेला. या बाबतीत खरी परिस्थिती काय आहे, खरोखर 25 टक्के गरीब, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना प्रवेश दिला गेला का ? सीबीएससी, आयसीएससी, आयबी या शाळातून देखील या प्रवेशाची अंमलबजावणी झाली का याची माहिती द्यावी. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती विद्या चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 213, बाब क्रमांक 245 यां संदर्भात मी सांगू इच्छिते की, महात्मा गांधी स्मारक रुग्णालय, परळ यांचे औषधाचे थकीत देणे यासाठी ताबडतोब तरतूद तरतूद करण्यासाठी पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. याच विभागाच्या पृष्ठ क्रमांक 214 वरील बाब क्रमांक 248 बाबत सांगू इच्छिते की, जीवनदायी योजनेत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना वैद्यकीय सहाय्याच्या खर्चासाठी तरतूद करण्याच्या संदर्भात पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर बाब क्रमांक 251 मध्ये 23 स्वयंसेवी संस्थांना अतिरिक्त निधी देण्याबाबत पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. हा अतिशय महत्वाचा विषय आहे. कुष्ठरोग निवारण करण्याच्या संदर्भात शासन काही करु शकत नाही परंतु ज्या स्वयंसेवी संस्था कुष्ठरोग्यांसाठी काम करीत आहेत त्यांना निधीपासून वंचित ठेवणे बरोबर नाही. या 23 कुष्ठरोग निवारण स्वयंसेवी संस्थांना जी आर्थिक तरतूद आपल्याला ताबडतोब देणे आवश्यक आहे ती दिली पाहिजे.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 223 वरील बाब क्रमांक 254 मध्ये यंत्रसामग्री व साधनसामग्री यांची दुरुस्ती याच्यासाठी आवश्यक तरतूद करण्यासाठी पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. पृष्ठ क्रमांक 224 वर बाब क्रमांक 256 यामध्ये कर्करोग रुग्णालय, औरंगाबाद यांच्या वेतन व वेतनेतर खर्चासाठी पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. औरंगाबाद येथे जे कॅन्सर रुग्णालय सुरु केलेले आहे ते निधी अभावी पूर्णपणे सुरु होऊ शकलेले नाही. त्यासाठी सुध्दा ताबडतोब तरतूद करावी. आरोग्य ही बाब अतिशय महत्वाची असून सुध्दा आरोग्य खात्याशी संबंधित लोकांशी मी जेव्हा बोलले तेव्हा असे लक्षात आले की, आरोग्यासाठी जीडीपीच्या तीन टक्के आपण तरतूद देत असताना सुध्दा निधीची तरतूद होऊ शकत नाही. आरोग्यासाठी जो आवश्यक निधी आहे तो आपण देत नाही, ही अतिशय चिंताजनक बाब आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 165 वरील बाब क्रमांक 182 मध्ये अनुसूचित जातीतील मुले व मुली यांच्यासाठी शासकीय वसतिगृहाच्या संदर्भात पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. ही अत्यंत आवश्यक बाब आहे. जेव्हा आपण 14 वर्षापर्यंत शिक्षण मोफत करतो त्यावेळी पुढे जेव्हा मुले कॉलेजमध्ये जातात तेव्हा त्यांना वसतिगृहांची खूप कमतरता भासते. त्यामुळे तो निधी देणे फार आवश्यक आहे. पृष्ठ क्रमांक 167

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती विद्या चव्हाण .....

वरील बाब क्रमांक 188 यामध्ये विरार येथील अपंग पुनर्वसन केंद्राच्या इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी जो 26 लाख 97 हजार रुपयांचा निधी द्यावयाचा आहे त्याची ताबडतोब पूर्तता करण्याबाबत पुरवणी मागणी केलेली आहे. पृष्ठ क्रमांक 167 वरील बाब क्रमांक 189 मध्ये श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन या संदर्भात पुरवणी मागणी केलेली आहे. पृष्ठ क्रमांक 167 वरील बाब क्रमांक 190 मध्ये संजय गांधी निराधार योजनेकरिता ज्या निधीची आवश्यकता आहे तो ताबडतोब देण्याबाबत पुरवणी मागणी केलेली आहे. पृष्ठ क्रमांक 168 वर बाब क्रमांक 192 यामध्ये दारुबंदी प्रचारकार्य याकरिता पुरवणी मागणी केलेली आहे.

सभापती महोदय, नियोजन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 192 वरील बाब क्रमांक 210 यामध्ये इंदिरा आवास योजनेसाठी तरतूद करण्याकरिता पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. या बाबतीत मला प्रामुख्याने सांगावेसे वाटते की, इंदिरा आवास योजनेसाठी केंद्र शासनाकडून निधी आलेला आहे पण राज्य शासनाने रत्नागिरी, धुळे अशा अनेक ठिकाणी निधी देण्याची आवश्यकता आहे. पृष्ठ क्रमांक 196 वरील बाब क्रमांक 215, 216, 217, 220, 224, 227, 228, 229, 232, 233 यामध्ये याच संदर्भात पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. पृष्ठ क्रमांक 205 वरील बाब क्रमांक 235, 237, 238 तसेच पृष्ठ क्रमांक 209 वरील बाब क्रमांक 243 यामध्ये सुध्दा इंदिरा आवास योजनेच्या बाबतीत पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. हा सर्व निधी केंद्र शासनाने दिलेला आहे परंतु राज्य शासनाने काहीही तरतूद केलेली नाही.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 230 वरील बाब क्रमांक 261 यामध्ये मागासवर्गीय मुले आणि मुलींसाठीच्या शासकीय वसतिगृहांसाठी तरतूद करण्याबाबत पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. पृष्ठ क्रमांक 230 वरील बाब क्रमांक 262 तसेच पृष्ठ क्रमांक 231 वरील बाब क्रमांक 263, 264 यामध्ये अनुसूचित जमातीच्या मुलामुलींना हवाई सुदरी, केबीन क्र्यू, हॉटेल मॅनेजमेंट, वाहतूक व्यवस्थापन या संदर्भात प्रशिक्षण देण्यासाठी तरतूद करण्याकरिता पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाच्या संदर्भात मला खास सांगावयाचे आहे कारण तो विभाग अत्यंत दुर्लक्षित आहे. मुंबईच्या नवजीवन वसतिगृहामध्ये अक्षरश: कोंबडीच्या

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती विद्या चव्हाण .....

खुराड्यामध्ये कोंडावे त्या पध्दतीने महिलांना कोंडून ठेवलेले आहे. तेथील वसतिगृहाला अधीक्षक नाही. निधी अभावी इतकी भयंकर अवस्था झालेली आहे. महिला वसतिगृहांची, बालकांच्या वसतिगृहांची अशी अवस्था आहे. मला शासनाला खास विनंती करावयाची आहे की, आपण फक्त महिलांविषय व बालकांविषयी बोलतो पण महिला व बालविकास खात्याला निधी नसल्यामुळे, कोणतीही आर्थिक तरतूद नसल्यामुळे त्यांच्या वसतिगृहात अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये महिलांना आणि बाळांना राहावे लागते. त्यासाठी शासनाने तरतूद करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविते.

----

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती शोभा फडणवीस ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी नियोजन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 187 वरील बाब क्रमांक 197 बाबत बोलणार आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत कामे करीत असताना त्यासाठी लागणारी रेती, मरुम, गिट्टी उत्खननाला 25 मे, 2012 पासून महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक गौण खनिज/2012/प्र.क्र.101/का-3 अन्वये पर्यावरण विभाग नवी दिल्ली यांचे ज्ञापन दिनांक 18.5.2012 नुसार नवीन खणीपट्टा मंजूर करण्यापूर्वी तसेच नूतनीकरणाच्या वेळी पर्यावरण विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र बंधनकारक केले आहे. त्यामुळे आता मार्केटमध्ये चोरीची 500 रुपयांची रेतीची ब्रास आणून अडीच हजार रुपयांना विकली जाते. त्यामुळे रोजगार हमीची कामे थांबणार आहेत. सार्वजनिक बांधकाम, इरिगेशन असे कोणतेही काम आम्हाला करता येणार नाही. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, सुप्रीम कोर्टाने हा जो निर्णय दिलेला आहे त्यावर सुप्रीम कोर्टात स्टे घेऊन या बांधकामाला, महाराष्ट्र राज्याच्या विकासाला परवानगी द्यावी.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 06:30

श्रीमती शोभा फडणवीस...

सभापती महोदय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे कशी होणार ? मजुरांना चार चार महिने मजुरीचे पैसे मिळत नाहीत. या मजुरांचे पोट हातावर असते. चार चार महिने मजुरी मिळाली नाही तर मजूर जीवन कसे जगणार ? तेव्हा या मजुरांना दरमहा पैसे मिळतील अशी व्यवस्था करावी.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बाब क्रमांक 182, पान क्रमांक 165. अनुसूचित जातीतील मुले व मुली यांच्यासाठी शासकीय वसतिगृहासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या निमित्ताने मी शासनाला हे सांगू इच्छिते की, या वसतिगृहासाठी खरेदी करण्यात येणा-या साधनसामग्रीची चौकशी करण्याची गरज आहे. सन 2011-12मध्ये गरज नसताना मुलांना गाद्यांचे वाटप करण्यात आले. या वसतिगृहातील मुलांच्या पोटासाठी तुम्ही काही देत नाही मात्र झोपायला गाद्या देता. त्या गाद्यातील कापूस इतका निकृष्टदर्जाचा असतो की तिकडे गादी असेल तर इकडे तिचा वास येतो. मग आपण ज्या वस्तू वसतिगृहातील मुलांसाठी खरेदी करता त्या त्यांचे आरोग्य सुस्थितीत राहाण्यासाठी खरेदी करता की बिघडण्यासाठी खरेदी करता ? दोन वर्षापूर्वी म्हणजे सन 2008-09मध्ये या वतिगृहातील मुलांसाठी स्टीलच्या वाटया आणि स्टीलची ताटे खरेदी करण्यात आली होती. तीन महिन्यामध्ये त्या वाटया आणि ताटांना भोके पडली. मुले फाटलेल्या, तुटलेल्या ताटातून जेवत होती. यावरुन हे समाजकल्याण खाते खरोखरच गरीब विद्यार्थ्यांचे हित पहात आहेत काय असा प्रश्न पडतो.

सार्वजनिक आरोग्य विभाग, बाब क्रमांक 241, पान क्रमांक 214. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये 2 ऑक्टोबर 2012 ते 12 ऑक्टोबर 2012 या कालावधीत नवीन कुष्ठरोगी शोधण्यासाठी विशेष शोध मोहीम राबविण्यात आली. त्या मोहिमेमध्ये चंद्रपूर जिल्ह्यात 194 नवीन कुष्ठरोगी आढळले. तसेच 1876 संशयित रुग्ण आढळले. त्यामध्ये 65 सांसर्गिक आणि 129 असांसर्गिक रुग्ण आढळले. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये डासांचा प्रादूर्भाव मोठया प्रमाणावर आहे. पूर्वी जिल्ह्यात डासप्रतिबंधक फवारणी होत असे. आता ही फवारणी बंद करण्यात आलेली आहे. परिणामी डासांचा प्रादूर्भाव वाढल्यामुळे कुष्ठरोग्यांचे प्रमाण वाढत आहे. तेव्हा याबाबतीत आरोग्य खात्याने लक्ष घालून वेळच्या वेळी डासप्रतिबंधक औषधांची फवारणी करावी.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

सभापती महोदय, सिकलसेलचे रुग्ण कमी झाले असे शासन सांगत असते. शासनाने जून 2012 पासून सर्व जिल्हा परिषदांच्या आरोग्य विभागाला सिकलसेलच्या चाचणीसाठी सोल्यूबिलिटी टेस्टचे किट पाठविणे बंद केले आहे. त्यामुळे सिकलसेलच्या रुग्णांचा शोध घेण्याच्या कार्यक्रमावर परिणाम झालेला आहे. आता सिकलसेलची चाचणी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला वैद्यकीय महाविद्यालयात जावे लागते. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयामध्ये वैद्यकीय महाविद्यालये नाहीत. त्यामुळे त्या चाचणीसाठी त्यांना नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयामध्ये यावे लागते. सिकलसेलच्या रुग्णांना वारंवार रक्त देण्याची गरज असते. असे असताना सिकलसेलच्या चाचणीचे किट देणे का बंद केले ? तेव्हा शासनाने पूर्ववत सिकलसेलच्या चाचणीचे किट जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाना देण्याची व्यवस्था करावी.

चंद्रपूर जिल्हयातील मूल येथील ग्रामीण रुग्णालयात पाण्याची व्यवस्था नाही. तसेच अधिकारी आणि कर्मचारी यांच्या निवासस्थानाची परिस्थिती बिकट आहे. या पुरवणी मागण्यामध्ये या ग्रामीण रुग्णालयाचा आणि कर्मचा-यांच्या निवासस्थानाच्या दुरुस्तीचा प्रस्ताव ठेवून आवश्यक ती तरतूद करावी. शासकीय रुग्णालयातून जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य तज्ज्ञ यांच्या जागा रिक्त आहेत. मागच्या जुलै महिन्यामध्ये माननीय आरोग्य मंत्र्यांनी 6 तज्ज्ञ आणि 31 डॉक्टर दिल्याचे सांगितले. परंतु त्यांच्या पैकी अद्याप एकही रुजू झालेला नाही. अशा पध्दतीने आरोग्य विभागाच्या आदेशाना डॉक्टर दाद देत नसतील तर त्यांच्या पगारामध्ये वाढ करा, ते का रुजू होत नाहीत याची कारणे शोधा. आपण मेडिकल कॉलेजेस मधून विद्यार्थी निर्माण करतो त्या विद्यार्थ्यांना ग्रामीण भागामध्ये पाठविण्याची व्यवस्था करा.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. पशुसंवर्धन विभाग, बाब क्रमांक 72, पान क्रमांक 53. पशुवैद्यकीय चिकित्सालयासाठी यंत्रसामग्री खरेदी केली जाते. ही यंत्रसामग्री खरेदी करीत असताना पशुचिकित्सालयाची इमारत बरोबर आहे की नाही हे पाहिले पाहिजे. माझ्या जिल्हयातील पशुचिकित्सालयासाठी यंत्रसामग्री दिलेली आहे. परंतु पशुचिकित्सालयाची इमारत पडलेली आहे. या पशुचिकित्सालयाच्या इमारतीसाठी निधी देण्याची मागणी मी मागील तीन वर्षापासून करीत आहे. इमारतीसाठी जागा उपलब्ध आहे. तेव्हा या पुरवणी मागण्यांमध्ये आपण त्या पशुचिकित्सालयाला निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी मागणी करते आणि माझे भाषण संपविते.

--

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2012-13च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सामाजिक न्याय विभाग, पान क्रमांक 165, बाब क्रमांकह 183. राज्य सरकारच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्याकरिता 87.30 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. राज्यातील 3 लाख 75 हजार 833 मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षणासाठी 630 कोटी रु.ची शिष्यवृत्ती मागील 8 वर्षापासून केन्द्र शासनाकडे प्रलंबित आहे. विशेष मागास प्रवर्गातील 67123 विद्यार्थ्यांची फ्रीशीपची रक्कम थकीत असल्याचे आढळून आलेले आहे. त्यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य अत्यंत धोक्यात आलेले आहे. तरी केन्द्र शासनाकडून थकीत फ्रीशिपची रक्कम लवकरात लवकर मिळण्यासाठी कार्यवाही करावी.

सामाजिक न्याय विभाग, पान क्रमांक 168, बाब क्रमांक 193. अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना वित्तीय सहाय्य करण्यासाठी 25 कोटी रु.ची तरतूद करण्यात आलेली आहे. राज्यातील अनुसूचित जाती जमातीच्या विकासासाठी शासनाच्या इंदिरा आवास योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाने आणलेल्या रमाई आवास योजनेचे काम निधीच्या पुरवठ्याअभावी रखडलेले आहे. त्यामुळे राज्यातील लाखो नागरिकांना धरकुलापासून वंचित रहावे लागत आहे. सन 2013-2014 मध्ये 664 कोटी 32 लाख रुपये खर्च करावयाचे असून 1,73,591 घरकुले बांधण्याचे उद्दिष्ट ठरविलेले आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने पाठपुरावार करावा.

सांस्कृतिक कार्य विभाग, पान क्रमांक 264, बाब क्रमांक 312. राज्य सांस्कृतिक निधीसाठी 1 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. कोकणामध्ये दशावतारी नाटकाची परंपरा आहे. कोकणामध्ये दहिकाले होतात. त्यामध्ये दशावतारी नाटके सादर केली जातात. ही दशावतारी नाटके सादर करणारे कलाकार 90-95 वर्षाचे वृद्ध झालेले आहेत. त्यांना विशेष मानधन देऊन त्यांना योग्य तो न्याय द्यावा. अशी माझी मागणी आहे.

नियोजन विभाग, पान क्रमांक 189, बाब क्रमांक 202. आमदार निधी वितरित करण्याच्या पध्दतीमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. हा आमदार निधी जणूकाही आपलाच निधी आहे असे जिल्हा नियोजन अधिकारी समजत असतो. आमदाराने आमदार निधीची मागणी केली तर एक ते दोन महिनयाच्या कालावधीत तो वितरित केला जाईल अशी कार्यपध्दती अवलंबिली जावी. तसेच

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण....

आमदार निधी 2 कोटी रु. वरुन 3 कोटी रु. करावा. विधानपरिषदेच्या सदस्यांना संपूर्ण महाराष्ट्र पहावा लागतो. म्हणून या आमदार निधीमध्ये वाढ करुन तो 3 कोटी रु. करावा अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

--

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2013-2014च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग. पान क्रमांक 48, बाब क्रमांक 62. आपल्या राज्यातील मृद सर्वेक्षण आणि अन्वेषण व मृद विश्लेषण रसायन प्रयोग शाळा यांची अेएस यंत्रे बिघडल्यामुळे आपल्या राज्यातील शेतक-यांच्या शेतातील मातीची तपासणी करण्यास अनेक अडचणी निर्माण होत आहेत. आमच्या बीड जिल्ह्यातील एएस यंत्र बिघडलेले आहे. या पुरवणी मागणीमध्ये 19.73 लाख रु.ची तरतूद केलेली आहे. ही तरतूद अतिशय तुटपुंजी आहे. ही तरतूद वाढवावी आणि बीड जिल्ह्यातील एएस यंत्र दुरुस्त करावे अशी मी विनंती करतो.

दुग्धव्यवसाय विकास विभाग, पान क्रमांक 53, बाब क्रमांक 71. शासकीय दूध योजनेअंतर्गत दुधाची खरेदी करण्यासाठी करण्यात आलेली तरतूद अल्प आहे. या निमित्ताने मला एक गोष्ट विभागाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे ती म्हणजे बीड जिल्हयातील दूध उत्पादक शेतक-यांना मागील 45 दिवसापासून दूध विक्रीचे पैसे मिळालेले नाहीत. शासकीय दूध योजनेअंतर्गत दूध खरेदी करण्यासाठी केलेली तरतूद वाढविण्यात यावी अशी मी मागणी करतो.

सार्वजनिक आरोग्य विभाग, बाब क्रमांक 248, पान क्रमांक 214. जीवनदायी योजनेअंतर्गत आर्थिक दुर्बल घटकातील अनेक रुग्णांना वैद्यकीय सहाय्य देणारी ही अतिशय महत्वाकांक्षी योजना आपल्या राज्यामध्ये राबविली जात आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 06:40

श्री.धनंजय मुंडे...

अनेक महिन्यापासून या योजनेची देयके देता आली नाहीत म्हणून अनेक रुग्णालयांकडून रुग्णास सेवा देण्यास नाकारले जात आहे. या योजनेसाठी मोठी तरतूद केलेली आहे, परंतु ती तरतूद कमी पडण्याची शक्यता असल्यामुळे त्या तरतुदीमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ करावा व आर्थिक दुर्बल घटकातील रुग्णांना जीवनदायी योजनेचा जास्तीत जास्त लाभ देण्यात यावा अशा प्रकारची माझी माननीय आरोग्य मंत्र्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, मी ज्या गावी राहतो त्या गावात 12 ज्योर्तिलिंगापैकी एक ज्योर्तिलिंग आहे. आपल्या राज्यात 5 ज्योतिर्लिंग आहेत, पर्यटन विभाग, बाब क्रमांक 199 पृष्ठ क्रमांक 188 यात पुणे जिल्हयातील भिमाशंकर तीर्थक्षेत्र हे 12 ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योर्तिलिंग आहे. त्या तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी शासनाने 4 कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे. परळी-वैजनाथ येथील ज्योतिर्लिंग हे 12 ज्योतिर्लिंगापैकी एक आहे. त्या ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी 4 कोटी रुपयांचा निधी शासनाने उपलब्ध करुन द्यावा अशी माझी शासनाकडे आग्रहाची मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 197, पृष्ठ क्रमांक 187 यात बीड जिल्हयातील रोजगार हमी योजने अंतर्गत 2007-2008 मध्ये मंजूर झालेल्या जवाहर विहिरीचे तिसऱ्या टप्पयाचे अनुदान 2010 पासून म्हणजे गेल्या दोन वर्षापासून प्रलंबित आहे. एकटया परळी,अंबाजोगाई तालुक्यात 190 विहिरींचा तिसरा हप्ता 50 लाख रुपये आणि संपूर्ण बीड जिल्हयामध्ये याची एकूण रक्कम 2 कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. त्या निधीचा देखील समावेश या पुरवणी मागण्यामध्ये करावा अशा प्रकारची माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 78, पृष्ठ क्रमांक 57 राज्य शासनाच्या वतीने राज्यात 1996 व 2001 या वर्षात क्रीडा धोरण ठरविण्यात आले. पहिल्या धोरणात क्रीडापीठ व दुसऱ्या धोरणामध्ये क्रीडा विद्यापीठ यासाठी तरतूद करण्यात आली होती. परंतु आतापर्यंत एकाही क्रीडा विद्यापीठाची स्थापना झालेली नाही. राज्यातील तिसरे क्रीडा धोरण अंतिम टप्प्यात आहे. पूर्वी जाहीर केलेल्या क्रीडापीठ व क्रीड विद्यापीठाच्या बाबतीत शासन नव्याने निर्णय घेऊन त्यासाठी तरतूद उपलब्ध करुन देणार आहे काय याबाबतचा खुलासा माननीय क्रीडा मंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा, अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनजंय मुंडे....

सभापती महोदय, बाब क्रमांक 189, पृष्ठ क्रमांक 167 श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतून निराधार वृध्द लाभार्थ्यांना अनुदान वाटप करणे. तरतूद होत नसल्यामुळे लाभार्थ्यांना अनुदान मिळण्यास विलंब होतो आहे, या गोष्टीचा शासनाने गांभीर्याने विचार करावा. तसेच या योजनेसाठी जी तरतूद करण्यात आलेली आहे, ती अपुरी पडेल. म्हणून त्या तरतुदीमध्ये देखील वाढ करण्यात यावी अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, आपण मला पुरवणी मागण्यावरील चर्चेत बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

--------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, पानाच्या हालचालीसाठी वारा हवा असतो, मने जुळण्यासाठी नाव हवे असते, मने जुळण्यासाठी नाते हवे असते आणि नात्यासाठी विश्वास हवा असतो. त्या विश्वासाची पहिली पायरी म्हणजे आमच्या आघाडी सरकारचे मंत्रिमंडळ आहे याचा आम्हाला आत्मविश्वास आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 182, पृष्ठ क्रमांक 165 ही सामाजिक न्याय विभागाची मागणी आहे. सामाजिक न्याय विभागाचे अतिशय कर्तव्यदक्ष मंत्री माननीय श्री.शिवाजीराव मोघे या ठिकाणी उपस्थित आहेत. आपल्याकडे 288 केंद्रीय आश्रमशाळा आहेत, त्या आश्रमशाळांना अनुदान द्यावे, यासाठी आम्हाला सत्याग्रह करावा लागतो, आंदोलन करावे लागते आहे ही खेदाची बाब मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो. माननीय मंत्री महोदयांनी या आश्रमशाळांचे नुकतेच अ,ब,क आणि ड याप्रमाणे इन्स्पेक्शन झाले आहे. या चांगल्या संस्था आहेत, या चांगल्या शाळा आहेत, यामध्ये डोंगराळ भागातील आदिवासी कुटुंबातील मुले शिक्षण घेत आहेत. 288 केंद्रीय आश्रमशाळा आहेत, त्या चांगल्या प्रतीच्या आहेत. त्या शाळा दर्जेदार शिक्षण देण्याचे काम करतात. त्यांना तातडीने अनुदान देण्याचा निर्णय किमान अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी घेणार आहात काय या प्रश्नाचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, या राज्यात व्ही.जे.एन.टी.च्या आश्रमशाळा मोठया प्रमाणात आहेत. त्याची शाळा संहिता व्हावी म्हणून आम्ही माननीय मंत्री महोदयांकडे अनेक वेळा निवेदने दिली आहेत. आपण या बाबतीत लक्ष घातले. संहितेचा मसुदा तयार झाला. परंतु अजून ती संहिता बाहेर पडलेली नाही. त्या संहितेला अंतिम रुप देण्यात आलेले नाही. या बाबतचा देखील निर्णय तातडीने घेतला जावा अशा प्रकारची माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

सभापती महोदय, आश्रमशाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा होत नाही. या ठिकाणी शालेय शिक्षण मंत्री प्रा.फौजिया खान बसलेल्या आहेत. आमच्या शालेय शिक्षकांचे वेतन दरमहा एक तारखेस होते. वेतन एक तारखेस मिळावे म्हणून नवीन संगणक प्रणाली अंमलात आणण्याचे काम आमचे शालेय शिक्षण मंत्री आणि शालेय शिक्षण राज्यमंत्री यांनी केले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. आश्रमशाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा एक तारखेस झाले पाहिजे अशा प्रकारची मी मागणी करतो.

4...

श्री.विक्रम काळे...

सभापती महोदय, पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने शिष्यवृत्तीच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापल्या भावना व्यक्त केल्या आहेत. ती शिष्यवृत्ती बी.सी.ए.ची असो किंवा नर्सींगमध्ये शिकणाऱ्यांची असो, त्या शिष्यवृत्तीची रक्कम शासनाने गेल्या दोन वर्षापासून दिलेली नाही. सामाजिक न्याय विभागाच्या इतर अनेक योजना आहेत. त्या योजनांकडे थोडेसे दुर्लक्ष झाले तरी चालेल, ही शिष्यवृत्ती उपलब्ध करुन दिली पाहिजे. सामान्य माणसांचे नेतृत्व आपण करीत आहोत, शेवटच्या माणसाच्या मतामुळे आपण या सभागृहात आलेलो आहोत. त्याच्या लेकरांना न्याय देण्याचे काम केले पाहिजे. ही शिष्यवृत्ती दरवर्षी देण्याचे काम वेळेवर झाले पाहिजे. जी शिष्यवृत्ती थकीत राहिलेली आहे, ती अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी देण्यात यावी अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, संजय गांधी निराधार योजनेच्या मागणीच्या बाबतीत सांगू इच्छितो की, ही योजना अतिशय सामान्य लोकांच्या जीवनाशी निगडीत आहे. संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान दरमहा वेळेवर मिळाले पाहिजे. ते अनुदान त्या त्या गावातील बँकेत परस्पर गेले पाहिजे अशा प्रकारची व्यवस्था शासनाकडून केली गेली पाहिजे अशीही माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, माननीय श्री.संजय देवतळे हे सांस्कृतिक कार्य मंत्री झाल्यापासून त्यांनी अनेक विकासाच्या योजना अंमलात आणण्याचे काम केलेले आहे. सांस्कृतिक कार्य विभागाकडून कलाकारांना मानधन दिले जाते. राज्यातील कलाकारांचा एकदा सर्व्हे करा. प्रत्येक जिल्हयात जे कलाकार आहेत, त्यांची एक यादी तयार करा. या सगळया कलाकारांना मानधन दिले गेले पाहिजे व यासाठी आपण मास्टर प्लॅन तयार केला तर या राज्यासाठी आपल्या हातून चांगले काम होईल. ते काम आपण कराल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, कृषि राज्यमंत्री श्री.गुलाबराव देवकर या ठिकाणी उपस्थित आहेत. तुम्ही, आम्ही सगळे शेतकऱ्यांची लेकरे आहोत. सद्य:स्थितीमध्ये राज्यात पाऊस कमी प्रमाणात पडतो. राज्यात दुष्काळजन्य परिस्थिती आहे. जे पाणी उपलब्ध आहे, त्या पाण्याचा उपयोग कशा पध्दतीने केला पाहिजे या बाबतीत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. स्प्रिंकलरला शासनाकडून अनुदान देण्यात येते. शासनाकडून ड्रीप सिस्टीमसाठी अनुदान दिले जाते. या अनुदानात वाढ केली पाहिजे. यासंदर्भात सबसिडी 90 टक्के केली पाहिजे या बाबतचा आग्रह तुम्ही शेतकऱ्यांचे पुत्र म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांकडे करा आणि ही बाब माननीय मुख्यमंत्र्यांकडून मान्य करुन घ्यावी यासाठी आपण बाणेदारपणा निश्चितपणे दाखवाल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री.विक्रम काळे...

सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांचे मी अभिनंदन करतो. आपण आपल्या काळात अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. आपण वेतनेत्तर कर्मचाऱ्यांचा कधी न सुटणारा प्रश्न सोडविला आहे. त्यामुळे संपूर्ण सभागृह आपले अभिनंदन करते. परंतु या बाबतचा जी.आर.लवकर काढून टाकावा. विरोधकांच्या मनात शंका आहे. सन्माननीय सदस्य श्री. मोते साहेब म्हणाले की, याचा फायदा होणार आहे किंवा नाही. त्या संबंधीचा जी.आर.शासन काढणार आहे की नाही अशी त्यांनी शंका व्यक्त केली आहे. शासनाने यासंबंधीचा जी.आर.काढला तर श्री.मोते साहेबांच्या मनात देखील शंका दूर होईल. म्हणून याबाबतचा जी.आर.शासनाने तत्काळ काढावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, कनिष्ठ महाविद्यालयाचा "कनिष्ठ" शब्द काढावा म्हणून धरणे, आंदोलने होत आहेत. आज या मागणीसाठी नापुरात मोर्चा आलेला आहे. आंदोलनकर्त्यांना वाटते आहे की, मंत्री महोदयांनी आपल्याशी चर्चा करुन ती मागणी मान्य करावी तसेच त्यांनी याबाबतचे ठोस आश्वासन द्यावे. प्राथमिक शाळांचा "कायम" हा शब्द काढण्यात आला आहे, तसा कनिष्ठ महाविद्यालयाचा "कायम" शब्द काढून टाकावा अशी माझी माननीय मंत्री महोदयांना आग्रहाची विनंती आहे.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल तुमचे आभार मानतो आणि या विषयावरील माझे मनोगत पूर्ण करतो. धन्यवाद.

-----------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पूरक मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, दुग्धविकास, पशुसंवर्धन विभागाच्या बाब क्रमांक 160, 162 अन्वये माती परीक्षणासाठी लागणारी उपकरणे व प्रयोगशाळांच्या संदर्भात नवीन तरतूद केलेली आहे. मी राज्य शासनाला सूचना करतो की, राज्यातील प्रत्येक गावातील, प्रत्येक भागातील मातीचे परीक्षण करावे आणि त्याचा मास्टर प्लॅन तयार करुन बदलत्या पर्जन्यमानाच्या दृष्टीने आराखडा तयार करावा. जेणेकरुन मार्गदर्शन करणे सोपे होईल.

सभापती महोदय, जिल्हावार प्रयोगशाळा बांधण्याचा प्रयत्न होत आहे. दुग्ध विकासाच्या प्रयोगशाळा तालुका पातळीवर बांधण्याची आवश्यकता आहे. या राज्यामध्ये दुधामध्ये जेवढी भेसळ होते तितकी इतरत्र कुठेही भेसळ हात नाही. ही भेसळ तपासली गेली पाहिजे, या गंभीर प्रकरणाकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. भंडारा जिल्हयामध्ये दुधामध्ये युरिया भेसळ होत होती. अधिकाऱ्यांनी प्रकरणाचा छडा लावला आणि संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न सुरु झाला. वरुन दडपण आले. या राज्याचे विद्यमान मुख्य सचिव यांनी दुग्धविकास आयुक्तांवर दडपण आणले. सचिवांवर दडपण आणून दुग्धविकास आयुक्तांना प्रकरण दडपून टाकण्याची सूचना करण्यात आली. दुग्धविकास आयुक्त बधले नाहीत. त्यांनी प्रकरण पुढे नेले आणि आपल्या पदाचा राजीनामा मुख्य सचिवांकडे पाठवून दिला. एक प्रामाणिक अधिकारी आपले कर्तव्य बजावत असताना त्यांना आपल्या सेवेचा त्याग करावा लागतो यासारखी दुसरी लाजिरवाणी बाब नाही.

या राज्याच्या मुख्य सचिवांनी दुधामध्ये भेसळ करणाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला आणि प्रामाणिकपणे कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यांवर दडपण आणून त्यांनी दिलेला राजीनामा एका महिन्यात स्वीकारुन त्यांना सेवेतून मोकळे केले. अशी काय घाई होती की, ज्या पध्दतीने मुख्य सचिवांनी ही भूमिका घेतली? दुधात भेसळ करणाऱ्यांना संरक्षण दिले. या राज्यातील मुलांच्या जिवाशी खेळ करणाऱ्यांची गय करता कामा नये. असे मुख्य सचिव पदावर राहू नयेत. जे मुलांच्या जिवाशी खेळतात आणि भेसळ करणाऱ्यांच्या पाठीशी उभे राहतात त्यांना पदावरुन तत्काळ दूर केले पाहिजे अशी मी मागणी करतो. या मुख्य सचिवांना शासन कसे देणार? दुग्धविकास मंत्र्यांनी याची तातडीने चौकशी करुन मुख्य सचिवांना जबाबदार धरुन मुख्यमंत्र्यांकडे रदबदली करावी अशी मी विनंती करतो.

..2..

श्री.कपिल पाटील...........

सभापती महोदय, छोट्या अधिकाऱ्यांनी दडपण आणले तर मी समजू शकतो. परंतु राज्याच्या विद्यमान मुख्य सचिवांनी एका आय.ए.एस.अधिकाऱ्यांवर प्रकरण दाबून टाकण्यासाठी दडपण आणले, ते अधिकारी बधले नाहीत, त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा पाठवून दिला. एका आय.ए.एस.अधिकाऱ्याला दडपण आणल्यामुळे व्हीआरएस घ्यावी लागली, राजीनामा द्यावा लागला, यापेक्षा दु:खाची बाब कोणती असू शकते? चांगले अधिकारी व्हीआरएस घेऊन सेवेतून बाहेर जाणार असतील तर ही शरमेची बाब आहे. याची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली पाहिजे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पूरक मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मागणी क्रमांक 181, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेकरिता तरतूद करण्यात आली आहे. लाभार्थ्यांना निवृत्तीवेतन वेळेवर वितरित करण्याबाबत अनेकांनी आपले मते मांडली आहेत. बॅंकेकडून अनुदान वितरित करीत असताना एक फलक लावण्यात येतो. अमुक एका दिवशीच हे अनुदान वितरित केले जाईल. इतर वेळेला लाभार्थी आले तर त्यांना अनुदान वितरित केले जाणार नाही. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, अशा प्रकारचे कोणतेही नियम राष्ट्रीयकृत बॅंकांना लागू नसताना बॅंकेचे अधिकारी मनमानी करीत आहेत. लाभार्थी हे वाहन उपलब्धतेनुसार आपल्या सोयीप्रमाणे बॅंकेत येत असतात. बॅंकेकडून एकाच दिवशी अनुदान वितरित केले जाते. दुपारी 3.00 वाजल्यानंतर उर्वरित लाभार्थ्यांना पुढील बुधवारी या असे सांगितले जाते, ही बॅंकेची कृती अतिशय जाचक आहे. बॅंकेत या योजनेसाठी खास कक्ष स्थापन करण्याची गरज आहे. एका व्यक्तीकडे स्वतंत्रपणे या विषयाची जबाबदारी देण्यात यावी अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, जिल्हा शासकीय दूध योजनेंतर्गत दूध खरेदीची 45 दिवसांपूर्वीची देयके आठ दिवसात अदा करण्यात येतील असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. शासकीय दूध योजनेची जिल्हा संघाशी स्पर्धा असते. जोपर्यंत दूध संकलन करणाऱ्या यंत्रणेला आपण जिवंत ठेवणार नाही तोपर्यंत निकोप स्पर्धेमध्ये दूध उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही. म्हणून तातडीने प्रलंबित देयके देण्याबाबत मंत्री महोदयांनी निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, मागणी क्रमांक-आय.3, राज्यामध्ये अनेक ठिकाणी धरण बंधाऱ्यांच्या प्रवेशद्वारांचे परिरक्षण व दुरुस्ती करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. बीड जिल्हयात अनेक बंधारे आहेत. एका बंधाऱ्यामधील एका गेटमध्ये पाणी अडविण्यासाठी जवळपास 5 ते 6 ट्रक माती टाकावी लागते. साधारणपणे 100 ते 125 गेट असतात. ते गेट बदलण्यात यावेत. गेवराई तालुक्यातील सिंदफना नदीवरील गेट बदलण्यात यावेत. जेणेकरुन बंधाऱ्याचा खऱ्या अर्थाने उपयोग करता येईल.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ पूर्वी श्री.गिते 06:50

श्री.अमरसिंह पंडित.........

सभापती महोदय, मागणी क्रमांक आर.1, जीवनदायी योजनेंतर्गत दुर्बल घटकातील रुग्णांची वैद्यकीय सहाय्याची देयके निकाली काढणे या संदर्भात तरतूद केलेली आहे. गेवराई तालुक्याला जवळचे गाव औरंगाबाद आहे. असे असताना उपसंचालक कार्यालय लातूर येथे हलविले आहे. गेवराई तालुका पुन्हा एकदा औरंगाबादला पूर्ववत जोडण्यात यावा, अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पूरक मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभाग बाब क्रमांक 211 अन्वये 23 संस्थांसाठी खर्चाची तरतूद केली आहे. मध्यंतरी डॉ.विकास आमटे यांचे स्टेटमेंट आम्ही वाचले होते. त्या स्टेटमेंटची राज्य सरकारने दखल घेतली. गॅस सिलेंडरचे दर वाढल्यामुळे कुष्ठरोग्यांसाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्थांना वाढीव स्वरुपातील खर्च द्यावा असे त्यांनी सुचविले होते. आरोग्य विभागाने या विनंती दखल घेतली आहे का? अन्यथा गेल्या वर्षी एवढाच खर्च दिला गेला तर या सामाजिक संस्थांवर आपण अन्याय करीत आहोत असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, कामगार आणि विशेष सहाय्य विभागाच्या बाब क्रमांक 153, 154 आणि 155 बाबत बोलू इच्छिते. राज्यातील कामगारांना सक्षम बनविण्याचा विभागाने प्रयत्न केला आहे. माजी कामगार कल्याण आयुक्त श्री.मोहन धोत्रे यांना दिनांक 19 जानेवारी, 2012 रोजी बडतर्फ केले गेले. तरी देखील मी राज्य सरकारचा नोकर नाही अशी त्यांनी भूमिका घेतली. दुर्दैवाने श्री.धोत्रे यांना अनेक वर्षापासून सेवेत असताना संरक्षण मिळत आले. काही क्षणापूर्वी माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी केली. चौकशीमध्ये असे आढळले की, श्री.मोहन धोत्रे यांनी महिला कामगार आणि अधिकाऱ्यांचे शोषण केले. ती संघटित गुन्हेगारी होती. या संदर्भात कामगार कल्याणाच्या दृष्टीकोनातून कारवाई झाली नाही तर तरतुदी निष्फळ ठरणार आहेत याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाची मागणी क्रमांक 191 अन्वये दारु बंदी कार्यासाठी तरतूद केली आहे. दोन वर्षापूर्वी दारुबंदी व्हावी म्हणून जवळजवळ 10 हजार महिला चंद्रपूर येथून पायी नागपूरला चालत आल्या होत्या. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी याची दखल घेऊन एक समिती नेमली होती. चंद्रपूर जिल्हयात दारुबंदीच्या संदर्भात 500 ग्रामसभा आणि 800 ग्रामपंचायतींनी ठराव केलेले आहेत. तेथील महिला संघटनांनी वारंवार संघर्ष करुनही चंद्रपूर जिल्हयात दारु मुक्तीच्या संदर्भात शासनाने काय भूमिका घेतली आहे हे कळून येत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी समिती नेमूनही कॅबिनेटसमोर प्रस्ताव चर्चेला का येत नाही? कुठेतरी पाणी मुरते आहे. पर्यावरण मंत्री श्री.संजय देवतळे एवढे का निष्प्रभ झाले असा प्रश्न मनामध्ये उपस्थित झाला आहे. पुढील अधिवेशनामध्ये त्यांना घेराव घालण्यात येणार आहे.

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे......

सभापती महोदय, महिला व बालकल्याण विभागाच्या बाब क्रमांक 302 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. कौटुंबिक सुरक्षितता कायद्यासाठी कौटुंबिक सल्लागार नेमण्याची आपण व्यवस्था केलेली आहे. जो कायदा सन 2005 मध्ये भारतभर लागू झाला त्यासाठी लागणाऱ्या अधिकाऱ्यांची नियुक्ती आपण सन 2012 मध्ये केली आहे. याला साडेसाती म्हणावयाचे की, काय ते मला माहिती नाही. सात वर्षानंतर आपण कौटुंबिक सल्लागारांची तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, गेल्या सहा अधिवेशनांपासून आम्ही महिला बाल विकास विभागाच्या मागण्यांवर विचार मांडतांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांची नेमणूक करा अशी मागणी करतो तेव्हा तेव्हा माननीय मंत्री महोदय एखादे व्रत असल्यासारखे उत्तर देतात की, "आम्ही महिला आयोगाच्या अध्यक्षाची नेमणूक करु." या शुक्रवार पर्यंत, हे अधिवेशन संपत असतांना जर महिला आयोगाच्या अध्यक्षांची नेमणूक झाली नाही तर मला आपल्याविरुध्द हक्कभंग दाखल करावा लागेल. प्रत्येक अधिवेशनात माननीय मंत्री महोदय महिला आयोगाच्या अध्यक्षांची नेमणूक करण्यात येईल असे आश्वासन देतात परंतु त्याची अंमलबजावणी करीत नसल्यामुळे मी हक्कभंग देणार आहे.

सभापती महोदय, रोहयो व नियोजन विभागाच्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. रोहयो व नियोजन विभागाच्या महसूल स्तरावर समिती नेमण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 198,199 बाबीच्या संदर्भात भीमा शंकर, डींबे धरण, तसेच बाब क्रमांक 200 च्या संदर्भात कौडीन्यपूर व एकवीरा देवी कार्ला व अमरावती येथील आंबा देवीचे स्थान यासंदर्भात सुध्दा नियोजन करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पंढरपूर येथे निधी देऊन सुध्दा तेथील प्रगती शून्य आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाने श्वेत पत्रिका जाहीर केलेली आहे. जलसंपदाच्या संदर्भात एसआयटी नेमण्याची घोषणा दोन्ही सभागृहात करण्यात आली. परंतु या एसआयटीसाठी आर्थिक तरतूद आपण कशी करणार आहात ? बाब क्रमांक 124 नुसार म्हटले आहे की, वित्त आयोगाच्या सूचनेनुसार परिरक्षण आणि दुरुस्तीसाठी निधी देण्यात आलेला आहे. विधानमंडळाच्या आश्वासन समिती व अंदाज समितीने अनेक चौकशा करुन अहवाल सभागृहापुढे ठेवलेले आहेत. या अहवालाच्या संदर्भात सदस्यांनी चांगल्या सूचना केल्या तसेच समितीने शिफारसीही केलेल्या

..2..

डॉ.नीलम गोऱ्हे......

आहेत. एसआयटीची चौकशी होणार आहे परंतु आपल्याच आमदारांनी ज्या त्रुटी मांडलेल्या आहेत त्यासंदर्भात शासनाने गांभीर्यानें विचार करावा, अन्यथा अहवाल धूळ खात पडतील अशी विनंती मी या निमित्ताने करते.

सभापती महोदय, आपण जी वेगवेगळी आकडेवारी देतो त्यामध्ये महसूल, कृषी आणि जलसंपदेच्या आकडवारीमध्ये तफावत येते. त्यामुळे हा विषय सुध्दा पडताळणीच्या वेळेस तपासला जाण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, नियोजन विभागाने इंदिरा आवास योजनेसाठी निधी दिला जातो त्यामध्ये पालकमंत्री जे निकष लावतात त्याकडे पाहिले तर वुमेन एडेड हाऊसहोल्डच्या संदर्भात महिलांना न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

---------------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर ): सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 182 ते 187 च्या संदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्ग यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती दिली जात असते. महाराष्ट्र शासनाने शिष्यवृत्तीसाठी आतापर्यंत 1800 कोटी रुपये दिलेले आहे त्यामुळे राज्य शासनाचे अभिनंदन केले पाहिजे.

सभापती महोदय, राज्य शासन वैद्यकीय कॉलेजसाठी, इंजिनिअरिंग कॉलेजसाठी मोठया प्रमाणात पैसे देत असते. समाजातील गरीब मुले बीसी आणि बीबीए या कोर्सकडे मोठया प्रमाणात जात असतात. परंतु या कोर्सला पैसे देणे आपण दोन वर्षापासून बंद केलेले आहे. यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी या सभागृहात आश्वासन दिले होते की, बीसी आणि बीबीएला शिष्यवृत्ती देण्यात येईल. त्यामुळे मी या निमित्ताने मागणी करतो की, बीसी, बीबीए तसेच अन्य व्यावसायिक कोर्सेस आहेत त्यांनाही शिष्यवृत्ती देण्यात यावी.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या पुरवणी मागणीवर चर्चा होत आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी सभागृहात मुद्दा मांडलेला आहे. कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक उपोषणला बसले आहेत त्यांना भेटावयास आम्ही गेलो होतो. त्या ठिकाणी गेल्यावर आपले हृदय पिळवटून निघेल असा आक्रोश ते लोक करीत होते. त्यांच्या आक्रोशाकडे आपण लक्ष देणार आहोत की, नाही ? 15-15 वर्षे सेवा करुनही त्या लोकांना आपण अनुदानित केलेले नाही. शालेय शिक्षण व्यवस्थेत माध्यमिक आणि उच्च माध्यमिक हा एकच विभाग आहे. त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयांच्या शिक्षकांच्या मागणीकडे आपण लक्ष देण्याची आवश्यकता आहे. "कायम" हा शब्द काढला पाहिजे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, 12 वी पर्यंत शिक्षण मुलींना मोफत द्यावे याबाबत केंद्रशासनाची व राज्यशासनाची सूचना आहे. परंतु ज्युनियर कॉलेजेस आपण कायम विनाअनुदानित ठेवतो त्यामुळे ही विसंगती दूर करुन तेथील शिक्षकांना न्याय द्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागातील जीवनदायी योजनेच्या संदर्भात सर्वांनीच उल्लेख केलेला आहे. ज्या जिल्हयात आपण जीवनदायी योजना लागू केली त्या ठिकाणी राष्ट्रीय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे ......

स्वास्थ बिमा योजना सुरु होती. ही योजना खूप चांगली असून या योजनेसाठी केंद्रशासनाकडून 75 टक्के व राज्य सरकारकडून 25 टक्के पैसे आपण देत होतो परंतु ही योजना आपण बंद केलेली आहे. गरीब लोकांच्या आरोग्याच्या संदर्भात ही योजना खूप महत्वाची असल्यामुळे ही योजना पूर्ववत सुरु करावी अशी मागणी करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या बाब क्रमांक 57 ते 62, पृष्ठ क्रमांक 47,48 च्या संदर्भात मी विचार मांडणार आहे. या कृषी विद्यापीठात मोठया प्रमाणात पदे रिक्त आहेत. कोकण कृषी विद्यापीठ दापोली यांच्याशी चर्चा केली असता त्या ठिकाणी प्राध्यापकांची कमतरता असल्याचे मला आढून आले. संशोधन क्षेत्रात आंबा आणि इतर पिकांवर संशोधन करण्यासाठी संशोधकांची आवश्यकता आहे परंतु ही पदे सुध्दा रिक्त आहेत. खास बाब म्हणून कृषी विद्यापीठातील पदे भरण्याच्या संदर्भात शासनाने मंजुरी द्यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 189,190,192 पृष्ठ क्रमांक 167,168 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्वृत्ती दिली जाते. परंतु ही शिष्वृत्ती वेळेवर मिळत नाही तसेच बरेच वेळा ही शिष्यवृत्ती मधल्या मध्येच गडप होते. वर्धा जिल्हयामध्ये शिष्यवृत्तीचा 59 कोटी रुपयांचा घोटाळा झालेला आहे. हा विषय वारंवार चर्चेला येतो परंतु शासनाने अद्यापि कारवाई केली नाही, हे पैसे कोणी हडप केले याची माहिती घेतलेली नाही.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागामध्ये अनेक कर्मचारी अर्धवेळ काम करीत आहेत. अपंगांच्या पेन्शनचा जो प्रश्न आहे तो ताडीने सोडविण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 134, 134 पृष्ठ क्रमांक ह125,126,127,128 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. शासनाने अनुदानासाठी पात्र ठरवलेल्या तुकडयांना व शाळांना पुरवणी मागण्यांमध्ये अनुदान मंजूर होईल अशी अपेक्षा होती परंतु ते अनुदान मंजूर झालेले नाही त्यामुळे यासंदर्भातील अनुदान मंजूर करण्याच्या संदर्भात शासनाने कार्यवाही करावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, नगरपालिकांच्या माध्यमिक शाळांना सुधारित वेतन संरचना नाही. आदिवासी भागतील शाळा तसेच सैनिकी शाळांच्या बाबतीत सातत्याने ओरड आहे की, या हेडखाली मिळणारा निधी दर वर्षी पुरेसा पडत नाही. त्यामुळे आदिवासी भागातील शाळा आणि सैनिकी शाळेतील शिक्षकांचे वेळेवर वेतन होत नाही. त्यामुळे यासंदर्भात शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

..6...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते......

सभापती महोदय, ज्या तुकडयांना शासनाने मान्यता दिली, ज्या तुकडया शासनाने मान्य केल्या त्यांचा "कायम"शब्द काढला आहे. या ठिकाणच्या शाळेचे मूल्यांकन झाले परंतु तुकडयांचे मूल्यांकन झाले नाही. त्यामुळे तुकडयांचे मूल्यांकन होण्याच्या संदर्भात शासनाने उपाय योजना करावी अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------

...7..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त ) : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 189 व 190 वर मी माझे विचार मांडणार आहे. महागाईच्या काळात संजय गांधी निराधार योजना किंवा श्रावण बाळ योजनेसाठी शासन 700 रुपये अनुदान देते. हे जे 700 रुपये अनुदान दिले जाते ते फार कमी आहे. त्यामुळे या अनुदानात 1 हजार रुपयांची वाढ करण्यात यावी अशी विनंती आहे. या ठिकाणी जे लाभार्थी जातात त्यांना अनेक हेलपाटे मारावे लागतात. त्यामुळे सामाजिक न्याय विभागाने एक खिडकी योजना राबवली तर या लोकांना त्याचा फायदा होईल.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 185 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. विशेष मागास प्रवर्ग विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती मागील दोन वर्षापासून मिळालेली नाही ती लवकरात लवकर देण्यात यावी, तसेच हे पैसे विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्येच जमा करावेत अशी विनंती आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 189 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. राज्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी धोरण शासनाने जाहीर केलेले नाही. 1 ऑक्टोबर रोजी ज्येष्ठ नागरिक दिन असतो. 1 ऑक्टोबर रोजी पुण्यामध्ये राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेब तसेच सामाजिक न्याय मंत्री कार्यक्रमासाठी आले होते. पुण्यामध्ये 1 ऑक्टोबर रोजी हजारो नागरिकांचा मेळावा मी आयोजित केला होता. त्या मेळाव्यात शासनाने घोषणा केली होती की, आम्ही ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भात लवकरात लवकर धोरण जाहीर करु. त्यामुळे माझी सन्माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, खर्चिक बाब विचारात न घेता राज्यातील ज्येष्ठांना न्याय देण्यासाठी 1 जानेवारी रोजी नवीन वर्षाची भेट म्हणून ज्येष्ठ नागरिकांचे धोरण लवकरात लवकर जाहीर करावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

मोहन जोशी...

सभापती महोदय, यानंतर मी महिला बालविकास विभागाच्या बाब क्रमांक 303 वर बोलणार आहे. किशोरी शक्ती योजनेला सहायक अनुदान देण्यात आले आहे. परंतु याच किशोरींना शाळेत असताना रूबेला नावाची लस शासाने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. मतीमंद मुले किंवा अपंग मुले पुढे पोटी जन्माला येऊ नयेत यासाठी ही लस दिली जाते. त्याच बरोबर किशोरवयीन मुलींच्या रक्तात हिमोग्लोबीनचे प्रमाण अत्यंत कमी होत जात आहे. याकरिता देखील विभागाने जास्तीचा निधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, मी कामगार विभागाच्या बाब क्रमांक 155 वर बोलणार आहे. पुणे शहरातील कामगार उप आयुक्त कार्यालय हे अत्यंत जुन्या व नादुरूस्त बराकीमध्ये भरते. या कार्यालयात मोडकळीस आलेले फर्निचर आहे. कर्मचाऱ्यांची टेबले व खुर्च्या देखील दयनीय अवस्थेत आहेत. तरी या कार्यालयाच्या देखभाल दुरूस्ती करिता अधिकचा निधी शासनाने उपलब्ध करून द्यावी अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या बाब क्रमांक 78 कडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. पुणे शहरातील खाशाबा जाधव क्रीडा अकादमी येथे इयत्ता 4 थी ते 7 वी पर्यंतचे 200 विद्यार्थी शिक्षण घेतात. आहाराचा कंत्राटदार 2 अंडी, 1 ग्लास दूध, फळे आणि सकस आहार देत नाही. केवळ 1 अंडे, अर्धा ग्लास दूध, निकृष्ट आहार तोही अत्यंत कमी प्रमाणात देत आहे. तेव्हा या संदर्भात युवक व क्रीडा मंत्र्यांनी लक्ष घालून या विद्यार्थ्यांना न्याय द्यावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

.......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या पुरवणी मागण्यासंबंधी मी माझे विचार व्यक्त करणार आहे.

सामाजिक न्याय विभागाच्या पुरवणी मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केल्या आहेत. या चर्चेद्वारा मी सन्माननीय सदस्यांचा गैरसमज दूर करण्याचे देखील काम करणार आहे. या चर्चेमध्ये सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडेजी, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, सन्माननीय सदस्या सर्वश्रीमती दीप्ती चवधरी, विद्या चव्हाण, शोभा फडणवीस व सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांच्यासह अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आहे.

या चर्चेतून एक कॉमन प्रश्न पुढे आला आहे. तो म्हणजे ओबीसी यांच्या संबंधातील आहे. ओबीसींची शिष्यवृत्ती गेल्या 3-4 वर्षापासून विद्यार्थ्यांना मिळालेली नाही असा मुद्दा अनेकांनी उपस्थित केला आहे. शिष्यवृत्तीचे पैसे कोणी तरी मधल्यामध्ये काढून घेतात असा देखील मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्र हे खरोखरच पुरोगामी राज्य आहे. भारत सरकारच्या नियोजन आयोगाने सन 2006 मध्ये निदेश दिले होते की, अनुसूचित जाती, जमातीची जेवढी लोकसंख्या आहे, त्याप्रमाणात अर्थसंकल्पात तरतूद करावी. तशी तरतूद देशातील कुठल्याही राज्याने केली नाही. फक्त महाराष्ट्र हे असे राज्य आहे की, त्याने अनुसूचित जाती-जमातीच्या लोकसंख्येनुसार अर्थसंकल्पात तरतूद केली म्हणून एवढे फंड मिळत आहेत व त्यानुसार आपण योजना करीत आहोत.

ओबीसीच्या विद्यार्थ्यांना गेल्या 3-4 वर्षापासून शिष्यवृत्ती दिलेली नाही हे मला मान्य नाही. फक्त मागच्या वर्षीचे 630 कोटी रूपये देण्याचे राहिलेले आहे, हे मी मान्य करतो. आपण ओबीसींच्या शैक्षणिक फी, शिष्यवृत्तीसाठी 728 कोटी रूपये दिलेले आहेत. 630 कोटी रूपये देणे होते. याबाबत माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री व माननीय राज्य मंत्री यांनी विशेष भाग घेतला. आता आपण 865 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. कोणी म्हणाले की, 1800 कोटी रूपयांपैकी एकही पैसा दिला नाही. आम्ही 865 कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे. सप्लीमेंटरीमध्ये 292 कोटी रूपयांची तरतूद केली आहे म्हणजे 1158 कोटी रूपये आपण या वर्षी देऊ शकतो.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे....

शिष्यवृत्तीचे पैसे वेळेवर मिळत नाही असे देखील येथे सांगण्यात आले आहे. आता आपण इ-स्कॉलरशीप द्वारा विद्यार्थ्यांना पैसे देत आहोत. त्यामुळ अनेक सन्माननीय सदस्यांच्या मनातील शंका दूर होतील. आता मुलांना पैसे देण्याचा प्रश्नच नाही. आता हे पैसे त्या मुलाच्या खात्यावर जमा होणार आहेत. माझ्या जवळ अशी माहिती आली की, जवळ जवळ 16 लाख 31 हजार मुलांनी राष्ट्रीयकृत बॅंकेत अकौंट उघडले आहे. त्या मार्फत आपण मुलांना पैसे देतो. आता आपण संस्थेच्या हातामध्ये देखील पैसे देत नाही. ऑन लाईन पैसे दिल्यामुळे ते मुलांच्याच हातामध्ये जातात.

सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी वर्धा येथील उदाहरण दिले आहे. तेथे गडबड झाली आहे. मुला पेक्षा त्याच्या नावावर गडबड करण्यात आली. एकच विद्यार्थी अनेक ठिकाणी दाखवून पैसे लाटण्याचा प्रकार अनेक संस्थांनी केला आहे. त्याची चौकशी सुरू आहे. यात संस्था व अधिकारी किती जबाबदार आहेत, किती रिकव्हरी करायची याचा विचार शासन करीत आहोत.

प्रत्येक महिन्याला शिष्यवृत्ती जमा करणे हे फार अवघड काम असते. पण आम्ही एक योजना केली आहे की, आमच्याकडे आज जेवढा पैसा उपलब्ध आहे तो ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबरच्या शेवट पर्यंत स्कॉलरशिपच्या रूपाने मुलांना देण्यात येणार आहे. अशा प्रकारे आम्ही पूर्ण वर्षाची स्कॉलरशिप देणार आहोत. हे पहिल्यांदाच घडलेले आहे. पूर्वी आपण मार्च-एप्रिल महिन्यामध्ये हे पैसे देत होतो.

आपण केंद्र शासनाकडे कागदपत्र देत नाही म्हणून केंद्र शासन पैसे देत नाही असे अनेकांनी सांगितले आहे. आपण सर्व कागदपत्र देतो पण केंद्र शासनाचे असे म्हणणे आहे की, जेवढे ओबीसी विद्यार्थी आहेत त्यांना आम्ही स्कॉलरशीप देणार नाही. त्यांचे असे म्हणणे आहे की, ज्याचे उत्पन्न एक लाख रूपयाच्या आत आहे त्यांना आम्ही स्कॉलरशीप देतो. यासाठी त्यांनी एक रक्कम निश्चित केली आहे. जेवढी तुमच्या राज्याच्या वाट्याला रक्कम येईल तेवढी आम्ही देतो, असे केंद्र शासनाचे म्हणणे आहे. आपल्याकडे ओबीसी लाभार्थींची संख्या खूप मोठी आहे म्हणून ते आपल्याला अनुदान देत नाही. त्यांनी 1100 कोटी रूपये दिले आहेत व तेवढीच रक्कम अजून देणे बाकी आहेत. केंद्र शासन सदर रक्कम देईल याची आम्ही वाट पहात बसलो नाहीत. आपण स्वत:हून हे पैसे देत आहोत. त्यामुळेच आपले राज्य हे महान आहे. ते विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष देते हे ही मी आपल्या सांगू इच्छितो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे...

अनेक सन्माननीय सदस्यांनी तक्रारी येत आहेत, मुलांच्या ॲडमिशन्स रद्द झाल्या असे देखील सांगण्याचा प्रयत्न केला. कॉलेज विद्यार्थ्यांकडून पैसे वसूल करीत आहे अशा प्रकारची तक्रार येथे करण्यात आली आहे. पण अशी तक्रार आमच्याकडे अजून काही आलेली नाही. जे कोणी कॉलेज विद्यार्थ्यांकडून पैसे वसूल करण्याचा प्रयत्न करेल त्यांच्यावर आम्ही कारवाई करू. आम्ही 1800 कोटी रूपये देतो. त्यासाठी कॉलेजने देखील दम धरायला हवा. कॉलेजची देखील सामाजिक भूमिका आहे की नाही ? पैसे दिले की, लगेच वसूल कर. आधी पैसे दे असे म्हणून चालणार नाही. असा प्रकार कुठले कॉलेज करत असेल तर आम्ही त्यांच्यावर जरूर कारवाई करू. महाराष्ट्र शासन एवढ्या मोठ्या प्रमाणावर पब्लिक मनी देत असताना कॉलेज जर दम घेत नसेल तर त्यांचा देखील दम आम्ही काढल्याशिवाय राहणार नाही. अशी तक्रार सन्माननीय सदस्यांकडे आली तर ती आमच्याकडे द्यावी. जेवढी म्हणून कठोर कारवाई करणे आवश्यक असेल ती आम्ही जरूर करू.

अन्य जे प्रश्न आहेत त्यासंबंधी मी माझे विचार मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या धोरणा संबंधीचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशीसह अन्य दोन सन्माननीय सदस्यांनी केला आहे. हे धोरण दीपावलीच्या आधी जाहीर करण्याची माननीय मुख्यमंत्र्यांची इच्छा होती. तसा उल्लेख त्यांनी पुण्याला केला होता. पण त्याचा आर्थिक भार किती येईल हे जो पर्यंत पुढे येत नाही तो पर्यंत आपल्याला काहीही करता येत नाही, म्हणून ते धोरण आपण जाहीर करत नाही. यासंबंधी माननीय मुख्य सचिवांनी दोन बैठका देखील घेतल्या आहेत. दरम्यानच्या काळात केंद्रीय सचिवांनी आपल्या सचिवांशी चर्चा केलेली आहे. त्यांनी सांगितले की, आपण थोडा वेळ थांबावे. केंद्र शासन देखील असे धोरण जाहीर करीत आहे. आम्ही फार वेळ थांबणार नाही. मार्च पर्यंत त्यांचे धोरण आले नाही तर मार्चच्या पूर्वी महाराष्ट्र शासनाचे ज्येष्ठ नागरिकांचे धोरण जाहीर होईल याबद्दल कोणतीही शंका बाळगण्याचे कारण नाही.

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे....

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी भटक्या जमातीचे जे लोक आहेत त्यांना रेशनकार्ड मिळाले पाहिजे, मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे अशी सूचना केली. हे लोक एकाच ठिकाणी रहात नसल्यामुळे त्यांना मतदान करता येत नाही. पण त्यांना रेशनकार्ड मात्र निश्चित मिळू शकेल. स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यामुळे आम्ही एक अनोखी योजना आणली आहे. त्या योजनेला आम्ही श्री.यशवंतराव चव्हाण यांचे नाव दिले आहे. विमुक्त व भटक्या जमातीची माणसे पालामध्ये राहतात. त्यामुळे एकेकाला 5-5 गुंठे जागा देणार आहोत. त्यात त्याला घर बांधून देणार आहोत. त्याच्यासाठी जोडधंदा उपलब्ध करून देणार आहोत. व्हीजेएनटीमधील शेवटच्या माणसाला स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम आपण करणार आहोत.

सन्माननीय सदस्य श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी बराचशा गोष्टी सांगितलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी ब्लँकेटस वाटपाचा मुद्दा उपस्थित केला आहे. टेंडर काढताना वाहन इथून तेथे नेण्याची तरतूद करण्यात आली नव्हती.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्री.भारवि.. 07:20

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.शिवाजीराव मोघे...

आता आम्ही तदतूद केलेली आहे आणि 15 दिवसांपासून वाटप सुरु झालेले आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती दीप्ती चवधरी यांनी ओबीसी विद्यार्थ्यांचा मुद्दा उपस्थित केला त्याबाबतची माहिती मी दिलेली आहे. परंतु एक गोष्ट सत्य आहे की, अनुसूचित जाती/जमाती वर्गासाठी स्वतंत्र वसतिगृहे आहेत आणि ती मोठ्या संख्येने आहेत. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी एकेक हजाराची वसतिगृहे सात ठिकाणी मंजूर केलेली आहेत. त्यातील चार वसतिगृहे सुरु झाली आहेत. या विभागाची स्थापना झाली त्यावेळी 271 वसतिगृहे होती. परंतु मागील दोन वर्षात माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्त्वाखाली 100 वसतिगृहे सुरु केली आहेत. मग ती वसतिगृहे भाड्याच्या जागेत असो की स्वत:च्या मालकीच्या जागेत असो. परंतु ओबीसी आणि विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र शासकीय वसतिगृहे नाहीत. त्याबाबत आम्ही चर्चा केलेली आहे. माननीय वित्तमंत्री माझ्या पाठिशी आहेत. माननीय वित्त मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, मार्च महिन्यामध्ये ओबीसी आणि विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता स्वतंत्र वसतिगृहे देण्याचा प्रयत्न करु.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी गाडी खरेदीच्या संदर्भातील मुद्दा मांडला. त्याबाबत सांगू इच्छितो की, माझ्याकडे तशी तक्रार प्राप्त झालेली नाही. तशी तक्रार आल्यास त्याची जरुर चौकशी करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी "रमाई "योजनेबद्दल सांगितले. ई-स्कॉलशीपला भारत सरकरचा बेस्ट अवॉर्ड मिळालेला आहे. "रमाई"मध्ये आपली कामे रखडलेली नाहीत. त्यासाठीचा निधी थोडा उशिरा प्राप्त झाला. त्यांचे असे म्हणणे् आहे की,प्रथम कामाचा हिशोब द्यावा.परंतु गावागावातून हिशोब यायला वेळ लागतो म्हणून निधी थोडा उशिराने वितरित केलेला आहे. मी या ठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो की, संपूर्ण देशामध्ये एखाद्या विभागाकडून मागील तीन वर्षामध्ये "रमाई" योजनेंतर्गत 2 हजार 69 कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. या योजनेंतर्गत लाभार्थी स्वत: घरे बांधतात.

..2..

श्री.शिवाजीराव मोघे...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी सांगितले की, आपण ऑन लाईन वेतन देणार आहात काय ? आम्ही अपंगासाठी पाच जिल्ह्यांमध्ये ते लागू केलेले आहे. फेब्रुवारी महिन्यामध्ये सर्व वेतन आम्ही ऑन लाईन करणार आहोत.

सभापती महोदय, सामाजिक न्याय, विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय कल्याण आणि व्यसनमुक्ती कार्य विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी चादर आणि ब्लँकेटचे वाटप झाले नव्हते ते वाटप करण्यात आले असे सांगितले. नियोजनासाठी पैसे नव्हते असेही त्यांनी सांगितले. चादरी आणि ब्लँकेट खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणावर घोटाळा झाला असे मी सांगितले होते. सोलापूरच्या संस्थेला ठेका देण्यात आला होता, परंतु त्या संस्थेचा चादरी वा ब्लँकेट बनविण्याचा कारखाना नाही. त्या संस्थेने पंजाब मधून निम्म्या दराने या चादरी आणि ब्लँकेटची खरेदी करुन त्यांनी कमिशन घेतले. खरे म्हणजे नियमाप्रमाणे त्यांचा स्वत:चा कारखाना असला पाहिजे. या गोष्टीचा माननीय मंत्री महोदयांकडून खुलासा झाला नाही. तेव्हा या गोष्टीची चौकशी होईल काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, ही सन 2007 मधील योजना आहे. ज्या ठिकाणी जागा उपलब्ध नाही त्या ठिकाणी ती उपलब्ध करुन दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली त्याबाबत माझ्याकडे कोणत्याही प्रकारची तक्रार आलेली नाही. तक्रार आल्यास त्याची निश्चितपणे चौकशी केली जाईल.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक ( वित्त, नियोजन व जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे व इतर सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी एकविरादेवी, अमरावती व तेथील तीर्थक्षेत्राच्या कामाच्या संदर्भात उल्लेख केला. याबाबत नक्कीच तपास करुन जी काही कार्यवाही करण्याची आवश्यकता असेल अथवा निधीची आवश्यकता असेल ती निश्चितपणे करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी बीड जिल्ह्यातील बंधाऱ्याच्या दुरुस्तीची कामे करावयाची आहेत आणि तेथील जुने गेटस् बदलावयाचे आहेत असे सांगितले. जे 250 च्या वरचे बंधारे असतील ज्यातून सिंचन निर्माण होते अशा बाबी तपासून घेण्यात येतील आणि त्या संदर्भात जी काही कार्यवाही करणे अपेक्षित आहे ती तातडीने केली जाईल. जलसंधारण विभागाकडे जे बंधारे येतात त्याबाबत जलसंधारण मंत्री महोदयांकडे त्या संदर्भातील माहिती देण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी सांगितले की, डी.पी.ओ.कडून आमदार निधी मंजूर होण्यास वेळ लागतो. तेव्हा या संदर्भातील सूचना सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येतील. आमदार निधीच्या संदर्भात प्राप्त झालेली प्रकरणे तातडीने निर्धारित वेळेच्या आत काढावीत असे डी.पी.ओं.ना सांगण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी आमदार निधीमध्ये वाढ करण्यात यावी असेही सांगितले. त्याबाबत सांगू इच्छितो की, सन 2010-2011 मध्ये आमदार निधी एक कोटी रुपये होता तो दीड कोटी रुपये केलेला आहे. तर सन 2011-12 मध्ये आमदार निधी दीड कोटी रुपयांवरुन दोन कोटी रुपयांपर्यंत केलेला आहे. आमदार निधीमध्ये वाढ करण्याबाबत दोन्ही सभागृहातील सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन आमदार निधीमध्ये वाढ करण्याबाबत शासन विचाराधीन आहे. तेव्हा येणाऱ्या पुढील दिवसांमध्ये त्या बाबत निश्चितपणे निर्णय घेतला जाईल.

सभापती महोदय, सेन्टेज चार्जेस माफ करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक..

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जिल्हा नियोजन समितीच्या निवडणुकीबाबतचा मुद्दा उपस्थित केला. आजच खालच्या सभागृहात जिल्हा नियोजन समितीमध्ये 50 टक्के महिलांना आरक्षण मिळावे अशाप्रकारचे विधेयक पुर:स्थापन झालेले आहे. ते विधेयक मंजूर झाल्यानंतर जिल्हा नियोजन समितीमध्ये निवडणुका घेण्यात येतील.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 119 ते 134 च्या 73 कोटी 62 हजार रुपयांच्या मागण्या तसेच नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 193, 1 लक्ष 80 हजार, बाब क्रमांक 198 ते 205च्या 73 कोटी 98 लाख 4हजार रुपयांच्या आणि बाब क्रमांक 206 ते 244 च्या 60 कोटी 93 लाख 36 हजार रुपयांच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

-----

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण, अल्पसख्यांक विकास, सार्वजनिक आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभाग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाची बाब क्रमांक 79, अल्पसख्यांक विभागाच्या बाब क्रमांक 318 व 319, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 107, 108, 117, 245 ते 251 आणि महिला व बाल कल्याण विभागाच्या बाब क्रमांक 113 आणि 302 ते 306 या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, अल्पसख्यांक विभागाच्या मागण्यावर कोणीही चर्चा केली नाही.

शालेय शिक्षण विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, डॉ.सुधीर तांबे, सन्माननीय सदस्य सर्वश्री.रामनाथ मोते व विक्रम काळे यांनी आपली मते मांडली.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी गोरगरीब घटकातील विद्यार्थ्यांसाठी जे 25 टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे त्यामध्ये किती विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला आहे असा मुद्दा मांडला. मागील वर्षी गोरगरीब घटकांतील जवळपास 66 हजार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. यावर्षी आपण तारखा निश्चित केलेल्या आहेत आणि त्या टाईम टेबल नुसार ते होणार आहे.

सभापती महोदय, ज्युनिअर कॉलेजचा "कायम" शब्द काढा किंवा डिव्हीजनला मंजुरी देण्यात यावी अशी मागणी येथे करण्यात आलेली आहे. याकडे शासनाचे लक्ष आहे एवढेच सांगू इच्छिते.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी राजीव गांधी आरोग्य योजनेची सद्य:स्थिती काय आहे असे विचारले. या योजनेसाठी आपण सहा महिन्यांसाठी 90 लाख रुपयांचे प्रिमियम भरलेले आहे. आज आपल्याकडे 24 हजार 360 रुग्णांचे प्रिऑथरायझेशन झालेले आहे.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ 07:30

प्रा. फौजिया खान...

त्याचप्रमाणे 21 हजार 692 रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. म्हणजेच एकूण 38 कोटी 19 लाख 82 हजार 834 इतक्या रकमेचे क्लेम रुग्णांवर करण्यात आलेल्या शस्त्रक्रियेसंदर्भात करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे 71 कोटी 41 लाख 14 हजार 946 इतक्या रकमेचे प्री ऑथोरायझेशन करण्यात आले. यावरुन ही योजना किती यशस्वी रितीने सुरु आहे हे आपल्या सर्वांना दिसून येते. त्याचप्रमाणे या योजनेमध्ये इन्शुरन्स एजन्सीसोबत आपण ॲग्रिमेंट केले आहे. अशाप्रकारे ॲग्रिमेंट इतर कोणत्याही राज्यामध्ये करण्यात आले नाही. यामध्ये क्लेम्सची रक्कम पुरेशी नसेल तर त्यामध्ये उरलेल्या रक्कमेच्या 90 टक्के रक्कम इन्शुरन्स कंपनीने शासनाला परत करावयाची आहे. अशाप्रकारचे ॲग्रिमेंट केले असतांना सुध्दा या योजनेच्या बाबतीत आपण आंध्र प्रदेश व कर्नाटकच्या पुढे गेलो आहोत. आज आपल्याकडे 71 कोटींचे क्लेम्स आहेत.

सभापती महोदय, जुन्या जीवनदायी योजनेच्या बाबतीत आदरणीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर आणि माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत , माननीय सदस्या सर्वश्रीमती विद्या चव्हाण, शोभाताई फडणवीस, माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, अमरसिंह पंडित यांनी चर्चेमध्ये भाग घेऊन सूचना केल्या. या जीवनदायी योजनेला राज्यामधून चांगला प्रतिसाद मिळाल्यामुळे या योजनेकरिता करण्यात आलेल्या तरतुदीपेक्षा जास्त मागणी राज्यामधून करण्यात आली आहे. यावर्षी जुन्या जीवनदायी योजनेकरिता 110.90 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. तरी देखील शासनाकडे या योजनेची प्रलंबित देयके रहात आहेत.

सभापती महोदय, आदरणीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी संत तुकाराम हॉस्पिटलच्या बाबतीत त्या रुग्णालयाला 97.25 लाख रुपये देण्यात आले आहेत व 99.77 लाख रुपये पेंडींग आहेत असे सांगितले. सभापती महोदय, या ठिकाणी 30 कोटी रुपयांची पुरवणी मागणी केली आहे. हे पैसे मिळाल्यानंतर या हॉस्पिटल्सचे देयक देण्यात येईल. जुन्या जीवनदायी योजनेच्या बाबतीत देखील ताबडतोब क्लेम अदा करण्यात येतील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, संत तुकाराम हॉस्पिटल हे ट्रस्टचे असून ते आता मोडकळीला आले आहे.

प्रा. फौजिया खान : त्यासाठी 30 कोटींची पुरवणी मागणी करण्यात आली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, त्यांचे दीड कोटी रुपये शासनाकडे पेंडीग आहेत कां?

18-12-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) YY 2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, होय. मला या ठिकाणी आणखी एक-दोन मुद्यांबाबत खुलासा करावयाचा आहे. आदरणीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी या ठिकाणी काही मुद्दे उपस्थित केले आहेत. आपण या ठिकाणी अजंता फार्माच्या बाबतीत एक मुद्दा उपस्थित केला आहे. सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून ई-टेंडरींगव्दारे संपूर्ण पारदर्शक कारभार करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. शासनाने प्रॉक्युरमेंट पॉलीसी स्वीकारली असल्यामुळे कोणत्याही एजन्सीला यामध्ये फेवर करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी आपल्याकडे या संदर्भातील शासकीय कागदपत्रे पाठविली आहेत. यामध्ये अजंता फार्माने औषधांचे जे सॅंपल दिले होते ते सर्व फेल गेले आहेत. ही शासकीय लॅब असतांना व सर्व सॅंपल फेल गेले असतांना त्यांच्यावर गुन्हा दाखल न करता त्यांना पुन्हा खरेदीचे कंत्राट कसे देता? त्यामध्ये नेमके कोण जबाबदार आहे? मी माहितीच्या अधिकारामध्ये प्राप्त केलेली सर्व कागदपत्रे आपणाकडे पाठविली आहेत.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीप्रमाणे आरोग्य विभागाच्या आदेशाने अजंता फार्मा यांना हे कंत्राट देण्यात आलेले नाही. परंतु आपण माननीय सभापतींकडे पाठविलेले पत्र माझ्याकडे अजून आले नाही त्या पत्राची शहानिशा करुन....

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी माननीय मंत्र्यांविरुध्द हक्कभंग दाखल करीन. मी त्या पत्रासोबत शासकीय कागदपत्रे जोडलेली आहेत. अजंता फार्माचे सॅंपल फेल गेले असतांना व चुकीचे औषध दिले असतांना आपण पुन्हा त्याच माणसाला कंत्राट देत आहात...

प्रा. फौजिया खान : आपण या ठिकाणी केलेल्या तक्रारीची चौकशी करण्यात येईल.

**उप सभापती** : मंत्रीमहोदयांनी या प्रकरणी चौकशी करुन चौकशीचा अहवाल सभागृहासमोर ठेवावा.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यासंबंधी महत्वाची माहिती सभागृहाला दिली पाहिजे. आदरणीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी लेप्रसीबाबत मुद्दा उपस्थित केला. मला सभागृहाला सांगण्यास आनंद होत आहे की, पूर्वी आपण प्रति माणशी 400 रुपये मानधन देत होतो त्याऐवजी आता प्रति माणशी 2 हजार रुपये मानधन देण्याचा निर्णय घेतला आहे. त्या करिता या पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करण्यात आली आहे.

अप्रकाशित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

तसेच माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांच्या नोटस माझ्याकडे आहेत. त्यामध्ये मी स्वत: लक्ष देणार असून सभागृहाने सर्व मागण्या मंजूर कराव्यात अशी मी विनंती करते.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, महिला व बाल विकास विभागाच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या राबविण्यात येत असलेल्या योजनेमध्ये 1 हजार कोटींचा घोटाळा झाला आहे त्याबाबत मी उल्लेख केला आहे. त्या प्रकरणाची मी या ठिकाणी माहिती दिली आहे. सी.बी.आय. मार्फत त्याची चौकशी होऊन त्यामध्ये दोन कंपन्यांच्या चेअरमनना अटक करण्यात आली आहे. त्याबाबतचा अहवाल महाराष्ट्र शासनाकडे पाठविला आहे. सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी त्या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. तो अहवाल शासनाने दाबून ठेवला आहे. पुन्हा त्याच एजन्सीला काम देण्यात आले आहे. आदिवासी योजनेमधील खरेदीच्या प्रकरणामध्ये 1 हजार कोटींचा घोटाळा झाल्याचा मी उल्लेख केला आहे. त्याबाबतचा उल्लेख मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये करण्यात आला नाही.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, टीएचआरच्या बाबतीत माननीय सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या कोर्ट कमिशनने त्यांचा टीएचआर संबंधीचा अहवाल माननीय सर्वोच्च न्यायालयाकडे सादर केला आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्यासंबंधी सभागृहामध्ये बोलणे योग्य नाही.

श्री. रामदास कदम : आपण पुन्हा त्याच पध्दतीने ठेकेदाराला काम दिले आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आता माननीय वस्त्रोद्योग मंत्र्यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री. प्रकाश सोळंके (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, वस्त्रोद्योग विभागाच्या मागण्यांवर कुणीही चर्चा केली नाही म्हणून मी आपल्या अनुमतीने वस्त्रोद्योग विभागाच्या पृष्ठ क्रमांक 239 वरील बाब क्र. 282 व 283 वरील योजनांतर्गत योजनांसाठी 1 लाख 55 हजार रुपये एवढया रकमेच्या पुरवणी मागण्या सभागृहासमोर मांडतो.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे पणन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 239 ते 240 वरील बाब क्रमांक 280 व 285 मधील योजनेंतर योजनेसाठी एकूण 160 कोटी एवढया रकमेच्या पुरवणी मागण्या सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर करतो.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत हे शासन गंभीर नाही. आदिवासींकरिता राबविण्यात येत असलेल्या योजनांमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. हे शासन घोटाळयाचे झाले आहे. याचा निषेध करुन मी सभात्याग करीत आहे.

(शिवसेना पक्षाचे माननीय सदस्य सभात्याग करतात.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर (पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, कृषी व रोजगार हमी विभागाच्या मागणी क्रमांक डी-4, डी-5, डी-6 व बाब क्रमांक 47, 48 या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करीत आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी माझ्या भाषणामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे सर्व कामकाज ठप्प झाले आहे, त्याबाबत आपण कोणता निर्णय घेणार आहात?

श्री. गुलाबराव देवकर : त्या संदर्भात माननीय सदस्यांना कळविण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी माझ्या भाषणामध्ये सांगितलेल्या प्रकरणाची शासनाने दखल घेतली पाहिजे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सभागृहात उपस्थित केलेल्या प्रकरणाची राज्य शासनाने गंभीरपणे नोंद घेऊन त्याप्रमाणे कारवाई करावी.

श्री. राजेंद्र गावित (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, कामगार विभागाच्या मागणी क्रमांक 153 ते 155 च्या संदर्भात माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी इमारत व इमारत बांधकाम कर्मचाऱ्यांकरिता उपकरामधून जमा झालेला 935 कोटी रुपयांचा निधी खर्च होत नसल्यामुळे गेल्या 5 वर्षापासून हा निधी अखर्चित असल्याचे सांगितले ही वस्तुस्थिती खरी आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 7.40

श्री.राजेंद्र गावित . . ..

इमारत व इमारत बांधकाम कामगारांच्या बाबतीत कल्याणकारी मंडळ दिनांक 1-5-2001 पासून स्थापन झालेले आहे. परंतु जवळजवळ 10 लाखा पेक्षा जास्त किंमतीचे प्रकल्प वगळून हा एक टक्का सेस गोळा झाला आहे. आतापर्यंत मंडळामध्ये 935 कोटी रुपये जमा झालेले आहेत आणि एकंदर 72,118 इतकी कामगारांची नोंदणी आहे. याठिकाणी खर्च न होण्याची जी कारणे आहेत त्याबाबत सांगावयाचे तर सुरुवातीला या कामगारांमध्ये जनजागृती नसल्यामुळे तेथे नोंदणीही कमी होती आणि याठिकाणी खर्च झालेला नाही ही वस्तुस्थिती आहे.परंतु सध्या कामगार विभागाच्या माध्यमातून तेथे वर्तमानपत्र किंवा कॅम्पसव्दारे जनजागृती अभियान राबवित आहोत आणि गेल्या दिनांक 1 मे 2011 पासून एकंदर 15 बैठका घेतलेल्या आहेत. त्याठिकाणी मुलांना शैक्षणिक साहित्य, प्रसूती योजना, कुटुंबकल्याण योजना आणि अपंगांना अर्थसहाय्य, तसेच कुटुंबातील कोणाचा मृत्यू झाल्यास त्या घरातील व्यक्तींना अर्थसहाय्य देणे अशा वेगवेगळया योजना राबविण्यासाठी कशा प्रकारे खर्च करता येईल याबाबतीत राज्य शासन निश्चितच विचार करील. त्यामुळे कामगार विभागाच्या बाब क्र.153 ते 155 अशा 17 लाख 55 हजार रुपयांच्या तीन पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

----

. . . .2 झेड-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत (विशेष सहाय्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, विशेष सहाय्य विभागाच्या मागण्यांवर बोलताना सर्वश्री राणा जगजितसिंह, श्रीमती विद्याताई चव्हाण आणि सन्माननीय सदस्य सर्वश्री.धनंजयजी मुंडे, विक्रम काळे, अमरसिंह पंडित, मोहन जोशी यांनी विभागाला मोलाचे मार्गदर्शन केलेले आहे.

सभापती महोदय, सर्वच सन्माननीय सदस्यांनी संजय गांधी निराधार योजना आणि श्रावण बाळ योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना वेळेवर पैसे मिळावेत यादृष्टीने काही सूचना केलेल्या आहेत. मी आपल्याला सांगू इच्छितो की, या सर्व लाभार्थ्यांना वेळेवर पैसे मिळावेत यासाठी आम्ही जिल्हाधिकारी यांना सूचना दिलेल्या आहेत की, संबंधितांना पहिल्या आठवड्यापर्यंत पैसे मिळाले पाहिजेत आणि याचे वाटप वेळेवर झाले पाहिजे या अनुषंगाने कलेक्टर यांना पत्रही देण्यात आलेले आहे. मात्र जर वेळेवर वाटप होत नसेल आणि ती बाब आमच्या नजरेस आणून दिली तर आम्ही लवकरात लवकर कार्यवाही करु.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंहजी पंडीत यांनी असे सांगितले होते की, बँकेमध्ये असा बोर्ड लावला जातो की, अमुक एका दिवशीच लाभार्थ्यांना वाटप करण्यात येईल. मी याबाबत सांगू इच्छितो की, आम्ही बँकेला अशा प्रकारच्या कोणत्याही सूचना दिलेल्या नाहीत. परंतु असे होत असल्याचे जर आढळून आले तर माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, जर संबंधितांनी अशा बँकांचा पत्ता दिला तर आम्ही एस.एल.बी.सी.कडे तक्रार करु आणि रिझर्व बँकेकडून अशा प्रकारचा बोर्ड हटवून लाभार्थ्यांना स्पेशल ट्रिटमेंट दिली पाहिजे अशा संबंधितांना सूचना देऊ. सभापती महोदय, आपल्या मार्फत विनंती करु इच्छितो की, विशेष सहाय्य विभागाच्या बाब क्र.189, 190, 192 च्या रुपये 225 कोटी 79 लाख 11 हजार 196 एवढ्या रकमेच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने कृपया मान्यता द्यावी.

-----

. . . .2 झेड-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी पुरवणी मागण्यांच्या संदर्भात बोलताना अत्यंत गंभीर म्हणजे सहा हजार कोटी रुपयांचा एक आणि दुसरा हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याची झाल्याची दोन प्रकरणे मांडली.

सभापती महोदय, सहा हजार कोटी रुपयाच्या घोटाळा मांडताना सन्माननीय मंत्री महोदय स्वत: येथे हजर होते. त्यांनी असे सांगितले की, मला याबाबतीत माहिती नाही पण मी माहिती घेऊन सांगतो. सुदैवाने आमचा जो प्रस्ताव येणार आहे त्यामध्ये याचा उल्लेख असल्यामुळे माननीय मंत्री महोदयांना पत्र जाईल की, आम्हाला त्यावेळी उत्तर देण्यासाठी माहिती घ्यावी. तसेच दुसरा एक हजार कोटी रुपयाचा घोटाळा आहे त्यासंदर्भात सन्माननीय राज्य मंत्री श्रीमती फौजिया खान या उत्तर देत होत्या. पण या राज्यामध्ये राज्यमंत्री हे सह्याजीराव आहेत, त्यांना कोणतेही अधिकार नाहीत, त्यांच्याकडे कोणतीही फाईल जात नाही आणि मंत्री महोदयच सर्व निर्णय घेत असतात. अशा वेळेला पुरवणी मागण्यांमध्ये . . .

(माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा खाली बसून बोलतात.)

सन्माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डाजी आपला काही प्रश्न आहे काय? आपण का चुळबूळ करीत आहात, काही प्रॉब्लेम आहे काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, . . ..

श्री.दिवाकर रावते : मी तुमचे नाव घेतले नाही.

श्रीमती फौजिया खान : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब एक मिनिट. मघाशी मला असे सांगण्यात आले की, तुम्ही लवकर आटपावे. त्यामुळे . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी तुमच्यासाठीच बोलत आहे. आपण खाली बसावे. सबमिशन काय आहे ते जरा ऐकून घ्यावे.त्यांच्याकडे पाच-सहा खाती आहेत. घोटाळा म्हटल्यानंतर तुम्ही कशासाठी बेचैन झालात हे मला कळले नाही. हा विषय महिला व बालकल्याणशी संबंधित आहे आणि तुमच्याकडे संध्याकाळी ते खाते देण्यात आले आहे काय? तुम्ही एकदम बेचैन का झाला हा प्रश्न आहे. घोटाळा म्हटल्यावर एकदम बेचैन होऊ नका. सभापती महोदय, मला आपल्या निर्दर्शनास एवढेच आणावयाचे आहे की, या सदनामध्ये जेव्हा सन्माननीय सदस्य येतात तेव्हा पुरवणी मागण्यांच्या वेळी आपण काय मांडावयाचे याचा अभ्यास करतात, कागदपत्रे घेऊन आणतात.त्यामागे श्रम असतात, मेहनत असते.त्यामुळे एखादी बाब मांडल्यानंतर सरकारला चाणाक्षपणे लगेच कळले पाहिजे की, हे काय सुरु आहे? यासाठी आता माननीय मंत्री महोदयांनाच



श्री.दिवाकर रावते . . . .

सदनामध्ये बसविले पाहिजे, राज्यमंत्र्यांच्या माध्यमातून उत्तरे घेण्यामध्ये काही अर्थ नाही. कारण ते फक्त लाल दिव्याचे धनी आहेत. माननीय मंत्री महोदयांकडे सर्व अधिकार आहेत. कॅबिनेट हा विषयच नाही. मंत्री आणि राज्यमंत्री असे आहे. आपण कॅबिनेट म्हणतो, ते स्वत:ला कॅबिनेट म्हणवून घेतात. राज्यमंत्री हे नामधारी आहेत, त्यांची फजिती होते. सदस्यांच्या श्रमाची जी अवहेलना होते ती अत्यंत गंभीर आहे.सरकारने उत्तर दिले पाहिजे.त्यामुळे येथे जर माननीय राज्य मंत्र्यांच्या ऐवजी माननीय मंत्री महोदय उत्तर देण्यासाठी हजर असते तर बरे झाले असते. कारण ती त्यांची जबाबदारी आहे. त्यांनी सह्या केल्या आहेत, त्यांनी निर्णय घेतला आहे, त्यांनी मान्यता दिली आहे आणि एवढे सगळे असताना पुन्हा संबंधितांकडूनच औषध खरेदी करण्याचा जो निर्णय घेतला आहे तो माननीय मंत्री महोदयांचाच आहे. असे असताना माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देताना त्याचे गांभीर्य लक्षात घ्यावयास हवे होते. म्हणून मला सांगावयाचे आहे की, भविष्यामध्ये पुरवणी मागण्यांवर चर्चा होत असताना सन्माननीय सदस्यांनी जर गंभीर बाब मांडली असेल तर माननीय राज्यमंत्र्यांच्या ऐवजी माननीय मंत्री महोदयांनी उत्तरे दिली पाहिजेत. काही माननीय मंत्री महोदय येथे जबाबदारीने उत्तरे देतात. पण तुम्ही तर राज्यमंत्र्यांना खाली बसविता. तुमचा उत्साह जास्त आहे. आताही तुम्ही सवयीप्रमाणे उभे राहिलात. याचे काय कारण आहे?

सभापती महोदय, मी ही बाब आपल्या निदर्शनास आणत आहे. यापुढे आपण सभापती म्हणून सन्माननीय सदस्यांना संरक्षण देणे आणि सरकारला योग्य ती समज देणेही आवश्यक आहे हे मी आपल्या निदर्शनास आणतो.

-----

. . . .2 झेड-5



श्री.प्रद्माकर वळवी (क्रीडा व युवककल्याण मंत्री) : सभापती महोदय, क्रिडा विभागाच्या मागण्यांच्या संबंधात सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांनी मुद्दा उपस्थित केला की,

विश्वचषक महिला कबड्डी स्पर्धेमध्ये ज्यांनी मेडल्स् धारण केली आहेत त्यांना बक्षीस देण्याच्या संबंधातील निर्णय होता. यासाठी उशीर झाला आहे ही खरी गोष्ट आहे. परंतु माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या प्रस्तावाला मान्यता दिलेली आहे. त्यामुळे लवकरात लवकर हा बक्षीस वितरणाचा कार्यक्रम करण्यात येईल. मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडेसाहेबांना सांगू इच्छितो की, याला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मंजुरी दिलेली आहे, निधी उपलब्ध केला आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यासाठी अगोदरच उशीर झाला आहे. आम्ही गेले सहा महिने हेच ऐकत आहोत. संबंधितांना उद्या चेक देणार आहात काय ?

श्री.प्रद्माकर वळवी : सभापती महोदय, यासाठी सव्वातीन कोटी रुपये आहेत. आम्ही संबंधितांना लवकरात लवकर बक्षीस देऊ.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : लवकरात लवकर हे उत्तर नको नाहीतर बक्षीस रद्द करण्यात यावे.

श्री.प्रद्माकर वळवी : सभापती महोदय, यासाठी मागील आठवड्यामध्येच मंजुरी दिलेली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हिवाळी अधिवेशन संपण्यापूर्वी त्यांना बक्षीस देणार आहात काय? आता आठ महिने झाले आहेत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.प्रद्माकर वळवी : सभापती महोदय, आता प्रस्ताव मान्य झाला असून लवकरात लवकर देऊ.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, प्रस्ताव पूर्णपणे मान्य झालेला आहे. फक्त फायनान्शिअल प्रोसेस पूर्ण करुन पुढील कार्यवाही करावयाची आहे.

**उप सभापती** : सरकारने खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी जी रक्कम निश्चित केली आहे मग ती एक कोटी असेल किंवा आणखी असेल. पण ती रक्कम एकदा मंजूर केल्यानंतर ती त्वरित द्यावयास हवी होती आणि तशी ती देण्यामध्ये विलंब झाला असेल तर ते फारसे भूषणावह नाही.





**उप सभापती** . . . .

त्यामुळे येत्या 15 दिवसामध्येही रक्कम अदा करण्यात यावी आणि जर फायनान्स विभाग अडवत असेल तर त्यांना देखील तसे निर्देश द्यावेत.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, होय. याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब यांनी दुसरा मुद्दा उपस्थित केला आहे की, विदर्भातील जे खेळाडू आहेत त्यांना एस.टी.पासच्या संबंधात सवलत मिळाली पाहिजे. उर्वरित महाराष्ट्रामध्ये ही सवलत दिली जात आहे. फक्त विदर्भामध्येच याबाबत अडचण असल्याचे दिसत आहे. मी याबाबतीत निश्चितपणे माहिती घेतो आणि इतर ठिकाणी ही सवलत लागू असल्याने विदर्भामध्येही याबाबतीत काही अडचण येणार नाही असे मी आपल्याला आश्वासित करतो. जे खेळाडू अधिकृत क्रीडा स्पर्धांना जात आहेत त्यांना पासाची सवलत लागू आहे. ही सवलत इतरही भागामध्ये असून विदर्भामध्येही ती लागू करण्यात येईल अशी मी घोषणा करतो.

यानंतर श्री.बरवड . . ..

अप्रसुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पदमाकर वळवी ....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले साहेबांनी एक मुद्दा उपस्थित केला. मी कबड्डीच्या संदर्भात मी आधीच सांगितले आहे. सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी क्रीडापटूंना सकस आहार देण्याच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला. निश्चितपणे मी त्या संदर्भात आदेश देणार आहे.

प्रा. सुरेश नवले : माजी खेळाडूंबाबत सांगावे.

श्री. पदमाकर वळवी : सभापती महोदय, माजी खेळाडूंच्या मानधनात वाढ करण्यासंबंधी या ठिकाणी तरतूद केलेली आहे. ते निश्चितपणे लवकरात लवकर देण्यात येईल. या ठिकाणी क्रीडा विभागाच्या बाब क्रमांक 75, 76, 77 व 78 अंतर्गत केलेल्या 7 कोटी 76 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय देवतळे ( सांस्कृतिक कार्य मंत्री ) : सभापती महोदय, सांस्कृतिक कार्य विभागाच्या पूरक मागणी क्रमांक झेड डी-1 व झेड डी-2 अंतर्गत बाब क्रमांक 308 ते 317 मधील एकूण 5 कोटी 18 लाख 86 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्या अशी मी विनंती करतो. यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी कोकणामध्ये जे कलाकार दशावदारी सादर करतात त्या वृध्द कलाकारांना मानधन देण्याची मागणी केलेली आहे. त्यांना मानधन देण्यात येते. त्यांनी समाजकल्याण विभागाकडे रीतसर अर्ज करावेत. जे निकष आहेत त्याप्रमाणे त्यांना मानधन मंजूर करण्यात येते. मी सभागृहाला विनंती करतो की, या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी.

श्री. दिवाकर रावते : कॅनडाच्या साहित्य सम्मेलनाचे पैसे परत आले का ?

**उप सभापती** : सन्माननीय राज्यमंत्री प्रा. फौजिया खान यांना मी सांगू इच्छितो की, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी या ठिकाणी जो आरोप केला तो आरोप तसे पहावयास गेलो तर फार गंभीर आहे. ती जर वस्तुस्थिती असेल आणि त्या औषध कंपनीला आपण सुप्रीम कोर्टात केस प्रलंबित असताना लेटर दिले असेल तर अशा परिस्थितीत त्याचा गंभीरपणे पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे असे मला वाटते. आपण तो पुनर्विचार निश्चितपणे करावा अशी मी आपल्याला सूचना देतो.

श्री. दिवाकर रावते : या संदर्भात निवेदन केले पाहिजे.

**उप सभापती** : या संदर्भात परवा निवेदन करावे.

प्रा. फौजिया खान : ठीक आहे.

श्री. दिवाकर रावते : ते निवेदन माननीय माननीय मंत्री महोदयांनी केले पाहिजे.

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदय निवेदन करतील.

श्री. दिवाकर रावते : आपण माननीय राज्यमंत्र्यांना कशाला सांगत आहात ?

**उप सभापती** : त्यांच्याकडून माननीय मंत्री महोदयांना निरोप जाईल.

सन 2012-2013 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करणे

श्री. हेमंत टकले ( समिती प्रमुख ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री. पुरुषोत्तम खेडेकर लिखित "महाराज, माफ करा....!!" या पुस्तकातील अवमानजनक विधानांमुळे उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंग व अवमानाच्या प्रकरणावरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करतो.

सभापती महोदय, श्री. पुरुषोत्तम खेडेकर लिखित "महाराज, माफ कर.....!!" या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर छत्रपती शिवाजी महाराजांचे पाय संत रामदास स्वामी धरतात आणि छत्रपती शिवाजी महाराज त्यांना लाथाडतात असे चित्र छापल्याने व या पुस्तकात संत रामदास स्वामींबद्दल अत्यंत आक्षेपार्ह विधाने करुन त्यांचा अवमानकारक उल्लेख केल्याने उद्‌भवलेल्या महाराष्ट्र विधान परिषदेच्या विशेषाधिकारभंगाच्या व अवमानाच्या प्रकरणासंदर्भातील विधान परिषद सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी औचित्याचा मुद्दा दिनांक 4 एप्रिल, 2012 रोजी उपस्थित केला. सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन माननीय सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांनी त्यांच्या स्वेच्छाधिकाराचा वापर करुन सदर प्रकरण चौकशीकरिता विधान परिषद विशेषाधिकार समितीकडे पाठविले.

सदर सूचनेच्या अनुषंगाने समितीने दिनांक 21 जून, 2012 व 30 ऑगस्ट, 2012 रोजी सदरहू पुस्तकाची तपासणी केली. सदर लिखाणामागे कोणत्याही सदस्यांविरुध्द किंवा विधान परिषदेविरुध्द किंवा सभागृहातील कोणत्याही कार्यवाहीविरुध्द काही हेतू किंवा व्देष असावा असे समितीला आढळून आले नाही. सदर लिखाण सुमार, सामान्य दर्जाचे व विवेकशून्य असून सभागृहाने वा सभागृहाच्या समितीने त्याला अवाजवी महत्व देऊ नये, मात्र एक अपराधात्मक व आक्षेपार्ह लिखाण म्हणून या लिखाणाची नोंद घेतली जाणे शक्य आहे आणि ज्या व्यक्तींविषयी असा लेख लिहिलेला आहे त्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना या विरुध्द कारवाई करता येईल, असे समितीला वाटते. या पुस्तकातील एका विशिष्ट समाजाविरुध्द असलेल्या आक्षेपार्ह मजकुरामुळे निश्चितपणे समाजामध्ये व्देषभावना निर्माण होण्याच्या शक्यतेकडे समिती दुर्लक्ष करु शकत नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली एखाद्या समाजाविरुध्द अत्यंत आक्षेपार्ह लिखाण करुन जनमानसात तेढ व संघर्ष निर्माण करणाऱ्या अपप्रवृत्तींवर वेळीच योग्य ती कायदेशीर कारवाई होणे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. हेमंत टकले ....

आवश्यक आहे असे समितीला वाटते. सबब, या प्रकरणात संबंधित कायद्यांखाली शासनाने योग्य ती कारवाई करावी, अशी समितीची शिफारस आहे.

समितीने या प्रकरणात महाराष्ट्र विधान परिषदेचा व सन्माननीय सदस्यांचा कोणताही विशेषाधिकार भंग व अवमान झाल्याचे विशेषाधिकार कायद्याच्या निकषांवर सिध्द होऊ शकत नाही, म्हणून हे प्रकरण समाप्त करण्यात यावे अशी शिफारस केली आहे.

**उप सभापती** : विशेष हक्क समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ.शी./मु.शी.** : विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

श्री. हेमंत टकले ( समिती प्रमुख ) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, श्री. "पुरुषोत्तम खेडकर लिखित "शिवरायांच्या बदनामीची केंद्रे" या पुस्तकातील मजकुरांवर आधारित 'लोकप्रभा' अंकामध्ये प्रा. हरी नरके यांच्या "फॅसिस्ट शक्तींमुळे बहुजनांचे विभाजन" या लेखातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण" या प्रकरणावरील विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याकरिता म.वि.प. नियम 178 (1) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ.शी.**: बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. एम.एच. सावंत यांनी माजी विधान परिषद विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांना वापरलेली उद्धटपणाची भाषा

**मु.शी.**: बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. एम.एच. सावंत यांनी माजी विधान परिषद विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांना वापरलेली उद्धटपणाची भाषा याबाबतचा विशेष हक्क समितीचा अहवाल विचारात घेणे व अहवालास अनुलक्षून प्रस्ताव

श्री. हेमंत टकले ( समिती प्रमुख ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. तथा माजी मा.विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांनी बुलढाणा जिल्हा परिषदेतील भ्रष्ट कारभारास जबाबदार असणाऱ्या बुलढाणा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व अन्य प्रशासकीय अधिकाऱ्यांविरूद्ध कारवाई व्हावी या मागणीसाठी जिल्हा परिषद कार्यालय येथे सुरू असलेल्या साखळी उपोषणास भेट देऊन उपोषणकर्त्यांची बाजू ऐकून घेतल्यानंतर प्रशासनाची बाजू ऐकण्यासाठी श्री.एम.एच. सावंत, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून उपोषणाच्या ठिकाणी येण्यासाठी आग्रह केला असता श्री. एम.एच. सावंत, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी सन्माननीय माजी विधान परिषद विरोधी पक्ष नेत्यांना उद्धटपणाची भाषा वापरल्याने उदभवलेल्या सन्माननीय माजी विधानपरिषद विरोधी पक्ष नेत्यांच्या व सार्वभौम सभागृहाच्या हक्कभंगाच्या व अवमानाच्या प्रकरणासंबंधातील विधानपरिषद विशेषाधिकार समितीचा अहवाल विचारात घेण्यात यावा."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 08:00

**उप सभापती** : अहवाल विचारात घेण्यात आला आहे आता माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी प्रस्ताव मांडावा.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, मी प्रस्ताव मांडतो की,

"श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. तथा माजी मा.विरोधी पक्ष नेते,विधानपरिषद यांनी बुलढाणा जिल्हा परिषदेतील भ्रष्ट कारभारास जबाबदार असणाऱ्या बुलढाणा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व अन्य प्रशासकीय अधिकाऱ्यांविरूद्ध कारवाई व्हावी या मागणीसाठी जिल्हा परिषद कार्यालय येथे सुरू असलेल्या साखळी उपोषणास भेट देऊन उपोषणकर्त्यांची बाजू ऐकून घेतल्यानंतर प्रशासनाची बाजू ऐकण्यासाठी श्री.एम.एच. सावंत, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून उपोषणाच्या ठिकाणी येण्यासाठी आग्रह केला असता श्री. एम.एच. सावंत, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी सन्माननीय माजी विधान परिषद विरोधी पक्ष नेत्यांना उद्धटपणाची भाषा वापरल्याने उदभवलेल्या सन्माननीय माजी विधानपरिषद विरोधी पक्ष नेत्यांच्या व सार्वभौम सभागृहाच्या हक्कभंगाच्या व अवमानाच्या प्रकरणाबाबत विधानपरिषद विशेषाधिकार समितीचा अहवाल विचारात घेतल्यानंतर हे सभागृह सदरहू अहवालातील निष्कर्षांशी सहमत असून असा ठराव करीत आहे की, **श्री.एम.एच. सावंत, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचा माजी मा.विरोधी पक्ष नेते यांचा अवमान वा अपमान करण्याचा उद्देश नव्हता, तथापि, त्यांचेकडून कळत नकळत चूक झाली व तातडीने त्यांनी क्षमायाचना केली आहे हे विचारात घेता याप्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात येऊ नये व हे प्रकरण येथेच संपविण्यात यावे."**

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, समितीने दिलेल्या निष्कर्षानुसार माननीय मंत्री महोदयांनी अहवाल दिला. या प्रमाणे "महाराज माफ करा" या प्रकरणी शासनाने आपला अहवाल सादर करुन त्या प्रकरणी काय कारवाई केली किंवा करण्यात येणार आहे हे सभागृहाला विदीत होणे आवश्यक होते. परंतु तसे ते झालेले नाही.

श्री. हर्षवर्धन पाटील : त्यासंबंधीचा अहवाल समितीने दिलेला आहे. त्या अहवालाच्या अनुषंगाने शासनाची भूमिका निश्चितपणे मांडण्यात येईल.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 08:00

**उप सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या, बुधवार, दिनांक 19.12.2012 रोजी सकाळी 11.00 वाजता भरेल. सकाळी 11.00 ते दुपारी 12.45 पर्यन्त सभागृहाची विशेष बैठक होईल. त्या बैठकीत आजच्या कामकाजपत्रिकेत दाखविण्यात आलेला सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले व अन्य सन्माननीय सदस्यांनी दिलेला नियम 260 अन्वये प्रस्ताव घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 8 वाजून 6 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 19.12.2012 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही